म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक आनंद

सन

ग्रंथालय क्रमांक

पुस्तकाचें नांव

६५

# धाम महाबळेश्वर वर्णन

(~~वैद्यक~~) (भू. प्रवास)

AN ACCOUNT

OF

# DHAUM-MAHABALESHWAR

( MYTHOLOGICAL, HISTORICAL & DESCRIPTIVE. )

BY

YASHWANTRAO ANANDRAO UDÁS, B. A.

*( Second Edition. )*

**BOMBAY.**

PRINTED AT THE GANPAT KRISHNAJI'S PRESS.

1891

*Price Annas Eight.*

*To be had at the Vividha-Jnana-Vistara Book Depot,*
*Kalba-devi Road, Bombay.*

नंबर ११८

# धौममहाबळेश्वरवर्णन.

कै० यशवंतराव आनंदराव उदास बी. ए.

यांनीं लिहिलें.

बुकनंबर ______

शिलकी.

( आवृत्ति दुसरी ).

मुंबईंत

गणपत कृष्णाजी यांचे छापखान्यांत छापिलें.

१८९१.

किंमत ८ आणे.

[ विविधज्ञानविस्तार पुस्तकालयांत विकत मिळेल. ]

महादेव
पुस्तकनंबर
भिवंडी.

मराठी ग्रंथ संग्रहालय,
ठाणे.


महाबळेश्वर
स्केल २ इंच = ३ मैल.
फर्लांग ८ ४ ० १ २ मैल.
आर्थर सीट
सावित्री नदी
एल्फिन्स्टन पाइंट
धोम महाबळेश्वर देवालय
कृष्णा नदी
महाडाहून आलेला रस्ता
लॉडविक किंवा सिडनी पाइंट
प्रतापगड
केट पाइंट
तलाव
चर्च
स्तंभ
लिंगमळा
माल्कम पेठ
बाम्बे पाइंट
फाकलंड पाइंट
बॅबिंगटन पाइंट
बॉ. सि. प्रेस

पुस्तकनंबर .......
भिवंडी.

मराठी ग्रंथ संग्रहालय,
ठाणे.

# उपोद्घात.

हा निबंध के. **यशवंतराव आनंदराव उदास बी. ए.** यांनीं लिहिला. हे गृहस्थ पुणें प्रांतीं उतुर ह्मणून गांव आहे तेथील राहणारे. यांनीं पुणें, धुळें व मुंबई या ठिकाणीं विद्याभ्यास केला. सन १८६६ त यांची बी. ए. ची परीक्षा उतरल्यावर यांस एल्फिन्स्टन् हायस्कुलांत सेकंड् असिस्टंट् मास्टर नेमिलें. येथें ते दोन वर्षें होते. इतक्यांत मध्यप्रांतांत चंद्रपूर येथें हायस्कूल् स्थापन झालें तेव्हां त्यांची तेथें फर्स्ट असिस्टंटचे जाग्यावर योजना झाली. चंद्रपूर हें गांव जरी शहरांत मोडतां येणार नाहीं तरी बरेंच मोठें आहे. त्या वेळीं तेथें क्याप्टन् स्मिथ् नांवाचे डेप्युटी कमिशनर होते. त्यांनीं लॉर्ड मेयो हे जेव्हां चंद्रपूर येथें गेल्यावर शाळा पाहण्यास गेले, तेव्हां हजार मुलें शाळेंत येणारीं आहेत व मोठी जागा नसल्या कारणानें मुलांस रस्त्यांवर बसवावें लागतें असें सांगून व प्रत्यक्ष दाखवून लॉर्ड साहेबांचा हायस्कुलाकरितां रुकार मिळविला. लागलीच हायस्कुलाची तयारी. हायस्कूल् झालें, व मुंबईहून गोविंदरावजी भागवत वगैरे मंडळी गेली. परंतु हायस्कुलाचे मानानें मुलें नाहींत व कांहीं नाहीं! पूर्वींच इतका कसा ऊत आला होता कोण जाणे! पुढें हायस्कुलाचे प्रतिष्ठेनंतर दोन वर्षांचे पोटांतच महार मांग वगैरे जातींचीं मुलें शाळेंत ब्राह्मणादिजातीय मुलांबरोबर अभ्यासास घ्यावीं, असा स्मिथ् साहेबांनीं ठराव केला. त्या अन्वयें कांहीं महारांचे मुलांस हत्तीवर बसवून मोठ्या समारंभानें वाजत गाजत शाळेंत आणिलें. त्याबरोबर इतर सर्व

मुलें शाळा सोडून निघून गेलीं. अशामुळें हायस्कूल् लव-करच बसलें. तेव्हां यशवंतरावजीस कामठी येथें, ऑडिशनल् हेडमास्तर नेमिलें. पुढें थोडेच दिवसांत चीफ् कमिशनरचे मराठी ट्रान्सलेटरची जागा त्यांस मिळाली. या हुद्यावर असतां त्यांची सन १८७२ चे शिरगणतीचे कामावर योजना झाली. हें काम फार दगदगीचें असून त्यांनीं उत्कृष्ट तऱ्हेनें केलें अशी त्यांची त्या प्रांतीं कीर्ति आहे. पुढें तें काम आटपल्यावर थोडेच दिवसांत त्यांस ज्युडिशियल् कमिशनरचे डेप्युटी रजिस्ट्रारची जागा मिळाली. त्या जागेचा यांनीं दोन वर्षें उपभोग घेतला न घेतला इतक्यांत क्षयाची भावना होऊन त्यांस सन १८७७ चे मार्च महिन्याचे ४ थे तारखेस मुंबईंत देवाज्ञा झाली. यांचें वय ३९ वर्षांचे आंत होतें. यांचा स्वभाव मनमिळाऊ, सरळ, व उद्योगी होता. हे मराठी व इंग्रजी या दोन्हीही भाषेंत चांगले निष्णात असून यांची लिहिण्याची शैली चांगली असे. परंतु आपली लोकांपुढें येण्यापुरती योग्यता नाहीं अशी त्यांची समजूत असल्या कारणानें त्यांनीं ग्रंथ करण्याकडे किंवा तसल्या प्रकारचे उद्योगांत फारसें मन घातलें नाहीं. प्रस्तुत निबंध तरी मोठ्या आग्रहानें त्यांनीं लिहिण्याचें काम पतकरिलें. नागपुर येथील सीताबर्डी क्लबचे सभासद व उपाध्यक्ष या नात्यानें त्यांस निबंध लिहिणें भाग पडत असे, तेव्हां तशा प्रसंगामुळें हा निबंध त्यांनीं लिहिला. हा विषय चांगला उतरला आहे, हें सांगण्याचें प्रयोजन नाहीं; कारण अनेक मर्मज्ञ वाचकांनीं त्या विषयीं अनुकूल असा आपला अभिप्राय दिला आहे. महाबळेश्वराविषयीं यांत कांहीं अवश्य माहिती गाळली आहे किंवा अगदींच आगंतुक माहिती घुसडून दिली आहे असा आरोप या

वर्णनावर येईल असें वाटत नाहीं. स्थलवर्णन लिहूं इच्छिणारांस प्रस्तुत निबंध अनेक प्रकारें अनुकरण करण्यालायक आहे असें अनेक लोकांचें ह्मणणें आहे. यांतील विषयरचना व वर्णनसरणी प्रगल्भ व चित्तवेधक आहेत. या सभेचे संबंधानें त्यांनीं जे दुसरे निबंध वाचले त्यांत इंग्रजी 'Census,' 'Remarks on the Povada on Sivaji' आणि 'A note on Departmental Marathi Books' हे फारच उत्कृष्ट ठरले. त्यांतील माहिती फार वेंचक व भरपूर होती. सदरीं लिहिलेल्या दुसऱ्या विषयावर त्यांनीं निबंध लिहिला त्यावेळीं त्या पोवाड्याचें[1] कवितावद्ध इंग्रजी भाषांतर केलें आहे. तो पोवाडा फार जुना असल्या कारणानें इतिहास व भाषा या दोहों संबंधानें त्यांत फार क्लिष्टत्व होतें तें यांनीं फार परिश्रम करून बरेंच दूर केलें आहे. या निबंधांत तो पोवाडा सुधारून टीपा दिलेला आलाच आहे, तो पाहिला असतां त्यांचे परिश्रमांचें अनुमान होईल. तिसरा विषय त्यांनीं मध्यप्रांताचे विद्याखात्याकडून शालोपयोगी मराठी पुस्तकांबद्दल एक कमेटी मुकरर झाली होती तींत यांची योजना झाली असल्या कारणानें त्या कमेटीस, चालू असलेल्या पुस्तकांबद्दल आपले विचार काय आहेत ते प्रदर्शित करण्याकरितां लिहिला होता. तो सीताबर्डीचे सभेचे विनंतीवरून वाचून दाखविला. त्यांत हल्लीं चालू असलेल्या मराठी क्रमिक पुस्तकांतील न्यूनता फार मार्मिकतेनें दाखविली आहे. शिवाय नागपुराकडील विद्याखात्याचे मुख्य अधिकारी यांचे विनंतीवरून त्यांनीं लेथब्रिज् साहेबाचे हिंदुस्थानचें थोरले

---

१ हें भाषांतर F पुरवणींत घातलें आहे.

इतिहासाचें मराठी भाषांतर केलें आहे. हे इतकेच काय ते त्यांचे ग्रंथ. अंगीं योग्यता असून आणखी कांहीं ग्रंथरचना न होण्याचें कारण लोकभीति. हे जर आणखी कांहीं दिवस वांचते तर त्यांचे मनांतून बरेच ग्रंथ करण्याचे होते. रामटेंक, व पंचमढी यांचें वर्णन महाबळेश्वरवर्णनाचे धर्तीवर करण्याचा त्यांचा विचार होता. नागपुर प्रांताचा इतिहास लिहिण्याचे बेतानें त्या संबंधाचीं कागदपत्रें मिळविण्याचे ते खटपटींत होते. परंतु सर्व जेथच्या तेथें राहिलें. हे फार अभ्यासी असत. एकदा एका विषयाकडे त्यांनीं मन घातलें ह्मणजे त्या विषयाची पिंच्छा पुरविल्याखेरीज ते कधीं राहत नसत. त्यांनीं आपल्या अंतकाळापूर्वीं तीन चार महिने हाय् स्टांडर्डची परीक्षा तीन महिन्यांत तयारी करून दिली, व तींत ते मान्यतापूर्वक उतरले. ज्या परीक्षेचा अभ्यास वर्ष वर्ष करीत असून मंडळी तींत नालायक ठरते त्याच परीक्षेचे संबंधानें तीनच महिने अभ्यास करून त्यांनीं यश मिळविलें, तेव्हां यांचे परिश्रम, ग्राहकबुद्धि व धारणा हीं नांवाजण्याजोगीं होतीं असें ह्मटल्यावांचून राहवत नाहीं.

स. ग्र. १८

# धौममहाबळेश्वरवर्णन.

**महाबळेश्वर** हें स्थळ पुण्याचे नैर्ऋत्येस ७४ मैल सातारा जिल्ह्यांत **सह्याद्रि**पर्वताचे माथ्यावर आहे. या स्थळीं मुख्य ठिकाणें दोन आहेत; एक जुनें महाबळेश्वर व दुसरें नवीन महाबळेश्वर. आपले लोक महाबळेश्वर हें नांव सदोदित जुन्या महाबळेश्वरास देतात, ह्मणजे **धौममहाबळेश्वर** या नांवानें जी पुण्यभूमि प्रसिद्ध आहे तिलाच आपले लोक महाबळेश्वर ह्मणतात, व नवीन महाबळेश्वरास ह्मणजे हल्लीं जेथें हवा खाण्याकरितां लोक जातात त्या ठिकाणास आमचे लोक '**नहर**' ह्मणतात, व विचाराअंतीं नहर हेंच नांव ठीक आहे असें दिसून येईल. कारण 'नहर' हा शब्द केवळ स्थलविशेषाचा वाचक नव्हे; तर, डोंगरी प्रदेशांत ज्या खोऱ्यांतून नद्या वाहतात त्यांच्या थडीवरच्या प्रदेशास ह्मणजे जेथें हमेशा गार हवा असते त्यास 'नहर' ही संज्ञा आहे, व या अर्थानें आपल्या लोकांचें ह्मणणें यथार्थ दिसतें. परंतु प्रस्तुत, सरकारच्या कागदोपत्रीं महाबळेश्वर हें नांव फक्त नवीन महाबळेश्वरास किंवा हवा खायाचे ठिकाणासच लागतें, आणि जुन्या महाबळेश्वरास महाबळेश्वरचें खेडें किंवा **क्षेत्रमहाबळेश्वर** असें लिहीत असतात, व याप्रमाणें सरकारानें भेदही ठेविला आहे. क्षेत्रमहाबळेश्वर हा गांव साताराजिल्ह्यांत जावळीतालुक्यांत आहे. नहर हेंही साताराजिल्ह्यांत आहे, तथापि कोणत्याही तालुक्यांत नसून केवळ एक स्वतंत्र भाग आहे. तेथील बंदो-

वस्त आणि सरकारी कामाकाजांची व्यवस्थाही निराळे प्रकारेंच होत असते. याकरितां सरकारी ठरावाप्रमाणें पाहिलें असतां महाबळेश्वर या नांवांत क्षेत्रमहाबळेश्वराचा समावेश होत नाहीं; परंतु या केवळ सांकेतिक अर्थासच न अनुसरतां येथें क्षेत्रमहाबळेश्वराचेंही वर्णन दिलें आहे, व हें करणें यथार्थ आहे. कारण, मूळ महाबळेश्वर ह्मटलें ह्मणजे क्षेत्रमहाबळेश्वरच होय; व पुराणांतरीं आणि आपल्या लोकांमध्यें प्रसिद्ध तेंच स्थळ आहे. नवीन महाबळेश्वर स्थापन होऊन अद्यापि ५० वर्षेंही पुरतीं झालीं नाहींत. परंतु याशिवाय. वास्तविक विचार केला असतां महाबळेश्वर हें नांव आपल्या रूढीप्रमाणें किंवा सरकारी संकेतानुरूप संकोचित नसून त्याचा विस्तृत व पूर्ण अर्थ किंचित् निराळा आहे; ह्मणजे या ठिकाणीं जे अद्भुत सृष्टिजन्य चमत्कार आहेत त्यांच्या सर्व समुदायास वस्तुतः लोक महाबळेश्वर ह्मणत असतात. या समुदायामध्यें क्षेत्रमहाबळेश्वर व नहर या दोहोंचा समावेश होऊन अवांतर सन्निध जीं चमत्कारिक स्थानें आहेत तींही येतात; व मुख्यत्वेंकरून इतिहासप्रसिद्ध जो **प्रतापगडचा किल्ला** तो तर आलाच पाहिजे. या कारणास्तव या विषयाचे एकंदर चार भाग करून पहिले तीन भागांत स्थलवर्णन, क्षेत्रमाहात्म्य व इतिहासप्रकरण, यांचें अनुक्रमानें वर्णन दिलें आहे, व चौथ्या भागांत हें वर्णन लिहिण्याचा उद्देश व महाबळेश्वर पाहिल्यापासून काय फायदे होतात व काय फायदे आपण करून घेतले पाहिजेत, याविषयीं विचार केला आहे.

---

# भाग १.– स्थलवर्णन.

**महाबळेश्वर** हें स्थळ सह्याद्रिपर्वताच्या ऐन शिखरावर आहे; कारण, ह्या पर्वताची या ठिकाणीं जितकी उंची आहे तितकी इतर ठिकाणीं नाहीं. उत्तरेस हिमालय आणि दक्षिणेस निळगिरी यांचे दरम्यान देखील महाबळेश्वराइतका उंच प्रदेश दुसरा नाहीं. समुद्रसपाटीपासून ह्या डोंगराची साधारण उंची ४५०० फूट आहे व **सिंदोला टेंकडी** ह्मणून महाबळेश्वरीं सर्वांत उंच टोंक आहे तें समुद्रसपाटीपासून ४७०० फुटांवर आहे. या पहाडाच्या पायथ्याशीं तीन बाजूंनीं घाटावरील प्रदेश, ह्मणजे पूर्वेस **वाई** तालुका, दक्षिणेस **जावळी** तालुका व उत्तरेस **भोर** संस्थानचा प्रांत आहे; आणि पश्चिमेस **रडतोंडीचा** घाट, **कोयना** नदीचा **खोरा** व **पारघाट** उतरून गेलें ह्मणजे लागलेंच तळकोंकण सुरू होतें. या पश्चिमेचे बाजूस डोंगराला चढाव अगदीं नीट असून पायथ्याची जमीन बहुतेक समुद्रसपाटीबरोबर आहे. त्यामुळें एकंदर उतार ४००० फुटांहून ज्यास्त आहे. रडतोंडीच्या वाटेनें घाटमाथ्यावर येण्यास मनुष्यांस व जनावरांस किती श्रम पडतात हें दाखविण्याकरितां 'रडतोंडीचा घाट' हें नांव पडलें असावें.

**नहर** हें ठिकाण पर्वतावर असल्यानें तेथील भूमीचा आकार उंच, सखल व वेडावांकडा आहे. या ठिकाणीं मुख्य वस्तीची जागा माल्कमपेंठ येथें आहे व तेथून नहरचा विस्तार पाहिला असतां पूर्वेस वाईकडे १५ मैल आहे, आग्नेयीस साताऱ्याकडेस ७॥ मैल, पश्चिमेस कोंकणघाटमाथ्याकडे दोन मैल आहे व उत्तरेस आणि वायव्येस एल्फिन्स्टन् पॉइंटापावेतों ६ मैलांची लांबण आहे.

नहरास जाण्याला देशांतून व कोंकणांतून रस्ते पुष्कळ आहत व कित्येक उत्तम सडकेचे आहेत. देशांतरचे लोक व कित्येक मुंबईचे लोक देखील सध्यां पुण्यावरून जातात. या मार्गानें कात्रजेस **कात्रजचा घाट** व पुढें वाईच्या आलीकडेस **खांबटकीचा घाट** आणि नंतर वाई येथें कृष्णानदी उतरल्यावर **पसरणीचा घाट** याप्रमाणें तीन घाट लागतात; तथापि रस्त्यानें कोठें त्रास अगर अडचण बिलकुल होत नाहीं. डोंगर चढण्यास वास्तविक प्रारंभ पसरणीच्या घाटापासून होतो. या घाटावर गेल्यावर पुढें **कृष्णा** व **वेण्या** या दोहों नद्यांचें खोरें दोन्ही बाजूंस असून रस्ता अगदीं मधून जात आहे व या ठिकाणापासून क्रमाक्रमानें महाबळेश्वरचे चमत्कार दृष्टीस पडण्यास प्रारंभ होतो असें ह्मणण्यास हरकत नाहीं. पुण्याहून महाबळेश्वरास जाण्यास आणखीही दोन मार्ग आहेत, परंतु ते हल्लीं बंद पडल्यासारखे झाले आहेत. नहराहून सातारा आग्नेयीस दहा कोस आहे, व पूर्वेस वाई दहा कोस आहे. कोंकणांतून वर येण्यास दोन रस्ते आहेत. एक महाडावरून व दुसरा नागोठण्यावरून. मुंबईहून येणारे लोक प्रथमतः जळमार्गानें बाणकोटास येतात, व तेथून खाडींतून महाडास येऊन पुढें १९ कोस खुषकीच्या मार्गानें नहरास जातात. या रस्त्यानें हल्लीं नवीन सडक होऊन ती १८७५ या वर्षीं चालू झाली. जुना रस्ता ह्मटला ह्मणजे उत्तर कोंकणांतून येणारे लोक नागोठण्याच्या तरीवर अगर धरमतरीवर उतरून तेथून खुषकीच्या मार्गानें इंदापूर, महाड, पोलादपूर, अंबेलनाळा, यावरून पारघाटच्या रस्त्यानें महाबळेश्वरीं येत.

या ठिकाणीं जमीन चोहोंकडे तांबडी आहे. याचें मुख्य कारण हेंच आहे कीं मातीमध्यें खनिज लोह पुष्कळ मिश्रित

असतें. घरें वगैरे बांधणें तीं बहुधा तांबडया मातीचींच बांधतात. चुन्याचीं बांधणाहि फार थोडे. परंतु या योगानें महाबळेश्वरीं रहाणारांचे कपडे बाहेरच्या धुळीनें व घरांतल्या वापरण्यानें देखील नेहमीं भगवे होत असतात.

येथील दगड फुसका असून बाहेरून जांभळ्या रंगाचा असतो; ह्मणून त्यास आपले लोक फक्त 'जांभा' असें ह्मणतात. त्यांत लोखंडाचा अंश फार आहे, व लोखंडाचें शोधन करण्यास अतिशय कमी श्रम पडतात. धावड जातीच्या लोकांचे या ठिकाणीं बरेच कारखाने असतात; व अगदीं आवडधोबड साधनानें व अल्पमेहनतीनें लोखंड काढून हे गरीब लोक पोट भरीत असतात. धावड लोकांच्या हातून लोखंडाची कमाई चांगली होत नाहीं. यामुळें उत्तम लोखंडी पदार्थ तयार न होतां खोलगट व जाडी तवे कढया वगैरे ते करितात. हे तवे मराठे कुणब्यामध्यें विकत घेण्याचा फार प्रचार आहे. धावड लोकांना यंत्रांचें वगैरे साहाय्य नसल्यामुळें त्यांचे हातून हें काम अधिक चांगलें होणें नाहीं. ह्याविषयीं पुष्कळ लोकांनीं मनांत खटपटी केल्या आहेत; परंतु हातानें कोणी कांहीं करीत नाहींत. यंत्रें वगैरेच्या साधनानें या कामास उत्तेजन देणें किती इष्ट आहे हें सांगणें नको. हल्लींपेक्षां पूर्वीं येथें लोखंड विशेष उत्पन्न होत होतें. हल्लीं हरकती आहेत त्या अशा कीं भरपूर कोळसा मिळण्यास जंगल तोडण्याचा प्रतिबंध आहे. स्वराज्यांत डोईपट्टी ह्मणजे धावड जातीच्या प्रत्येक पुरुषास सोळा वर्षांच्या वयापासन वर, तीन रुपये आकाराचा कर द्यावा लागत असे, यामुळें त्यांस लोखंड काढण्यास जितका कोळसा लागेल तितकें जंगल तोडण्याची पूर्ण परवानगी असे ह्मणून लोखंड विशेष उत्पन्न होई.

एकंदरीनें या डोंगरावरची जमीन फार सुपीक आहे. धान्यापैकीं खोऱ्यांत भात व वर नाचणी पिकते. गहूंही थोडे-बहुत होतात.

भाज्यांपैकीं बटाटे फार उत्तम प्रकारचे होतात; तशींच रताळीं, नवलकोल, कोबी, बीटरूट, विलायती वाटाणे, ह्या विलायती तऱ्हेच्या भाज्या स्वस्त व हव्या तितक्या मिळतात. याशिवाय देशावरच्या बहुतेक भाज्या मिळण्यासही अडचण पडत नाहीं.

येथील बटाट्यांची आख्या फारच आहे. त्यांचा रंग तांबडा असतो. असे उत्तम बटाटे निळगिरी शिवाय करून हिंदुस्थानांत दुसरे कोठेंही पिकत नाहींत असें ह्मणतात. बटाटा फार मोठा ह्मणजे अर्धशेर वजनाचा देखील एक एक असतो; आणि शिजविल्यावर अगदीं नरम होऊन फार रुचकर लागतो. पूर्वीं बटाटे जसे चांगले व मोठे होत असत त्या-प्रमाणें हल्लीं होत नाहींत. याचें कारण असें सांगतात कीं, काळ्या पाण्याच्या शिक्षेचे चिनी लोक १५ वर्षीमागें महाब-ळेश्वरीं ठेविलेले असत; त्यांनीं प्रथम बटाट्यांची लागवड सुरू केली; व ते लोक फार उद्योगी आणि बागाइतामध्यें चतुर असल्याकारणानें या ठिकाणीं त्यांनीं बटाटे उत्तम प्रकारें कमावून प्रसिद्धीस आणिले. परंतु सध्यां चिनी लोक महाब-ळेश्वरीं बिलकुल नाहींत. आपले माळी आहेत त्यांच्या हातून चिनी लोकांप्रमाणें बागाइताची कमाई होत नाहीं. याशिवाय तांबडे बटाटे हल्लीं फार न लावितां माळी लोक देशावरचे पांढरे बटाटे लावूं लागले आहेत. कारण पांढऱ्याचें पीक स्वभावतः अधिक होतें. या पांढऱ्या बटाट्यांचें बीज

प्रथमतः ढाडेऱ्यांच्या तळेगांवाहून महाबळेश्वरास नेलें होतें असें सांगतात.

महाबळेश्वरीं फळें थोडींबहुत मिळतात. स्ट्रॉबरी, रॉसबरी व पीच या तीन फळांचें पीक चांगलें होतें. हीं सर्व फळें विलायती आहेत, ह्मणजे त्यांची उत्पत्ति मुख्यत्वें थंड देशांत होते, व याच कारणास्तव तीं येथें पुष्कळ मिळतात. स्ट्रॉबरी हें फळ तांबड्या आंबाडीच्या बोंडाएवढें असतें व त्याचा रंग शेंदरी असून चव आंबूस खुबीदार असते. हें फळ मनस्वी थंड असते. त्याचा मुरंबा करितात, आणि नुसतीं फळेंही खातात. रॉसबरी हें फळ अगदीं लहान सुपारीएवढें असतें व वरून रंग काळा असतो. चवेमध्यें स्ट्रॉबरीफळाप्रमाणेंच कांहींसें असतें. हीं दोन्हीं फळें पैशाचीं चारपासून सहापावेतों मिळतात. पीचफळ हें मुंबईस, पुण्यास व इतर ठिकाणीं पहाण्यांत येतें त्याचप्रमाणें असतें. आपलीं स्वदेशी फळें महाबळेश्वरीं पुष्कळ मिळतात. परंतु तीं वाई, सातारा या ठिकाणांहून विकावयास येतात. या डोंगरावर पर्जन्य फार असल्यामुळें फळझाडें चांगलीं येत नाहींत; व आलीं असतां टिकतही नाहींत.

या पर्वतावर औषधांच्या अमोलिक वनस्पति तर शेंकडो आहेत असें सांगतात. त्यांचीं नांवें व गुण अनुभविक विद्वान् वैद्यांना मात्र ठाऊक असतात. या शिवाय नांवें बिलकुल माहित नाहींत अशा वनस्पतिही पुष्कळ आहेत असें ह्मणतात. या ठिकाणीं चोहोंकडे जंगल व निबिड झाडी बारमहा असते. मोठ्या वृक्षांपैकीं जांभूळ, उंबर, गेळा, रामाठा व पिसा हे होत. सर्वांत जांभळीचीं झाडें अतिशयच आढळतात व उन्हाळ्यांत त्यांवर पानें कमी, इतकीं जांभळें येतात.

या ठिकाणच्या हवेचा गुण असा कांहीं विलक्षण आहे कीं वृक्ष फार ठेंगणे होतात. साधारण मोठें झाड ह्मणजे दोन पुरुषांहून अधिक उंच नसतें. अस्सल विलायती झाडांपैकीं ओकझाड या ठिकाणीं आढळतें. सारांश, उष्णदेशांतलीं झाडें येथें होत नाहींत.

फुलझाडांपैकीं नेवाळीच्या झाडांचे थव्यांचे थवे या डोंगरावर सांपडतात. यांस येथें पुसरीचीं झाडें असें ह्मणतात. नेवाळीच्या झाडांचा इतका सुकाळ पाहून नवीन मनुष्यास फार चमत्कार वाटतो. तसेंच लिंगमळा या नांवाचा एक सरकारी बाग आहे तेथें अस्सल विलायती फुलझाडेंही कित्येक आहेत. या मळ्याजवळ सरकारानें साठ पांसष्ट हजार रूपये खर्च करून सिंकोना ह्मणजे ज्यापासून क्वायनाइन उत्पन्न होतें तीं झाडें लाविलीं आहेत. परंतु सर्व पैसा पाण्यांत जाऊन आतां हा नाद सोडून देण्याचा बेत सरकारानें केला आहे. या झाडांखेरीज नदी नाले व पाणथळ जमिनी यांच्या किनाऱ्यानें व इतर ठिकाणीं नेच्या ह्मणून एक लहान सुशोभित व सुरेख झाड असतें. विलायतेंत विलो ह्मणून जें प्रसिद्ध झाड आहे त्याची व नेच्याची जात एकच आहे असें ह्मणतात. नेच्याच्या झाडांमधून कुचऱ्याचीं झाडें मिश्रित असतात. त्यांचीं पानें हळदीप्रमाणें असून कंदापासून उत्तम तवकीर होतें.

जंगली मालपैकीं सांबरीचा कापूस, हिरडे, शिक्केकाई, व बांबूच्या तऱ्हेतऱ्हेच्या हातीं धरण्याच्या काठ्या मिळतात.

या ठिकाणीं अतिशय उत्कृष्ट मध मिळतो. येथल्या मधामध्यें मुख्य दोन प्रकार आहेत. एक तांबडा व दुसरा शुभ्र. तांबडा मध मुख्यत्वेंकरून जांभळीच्या फुलांपासून होतो, व तो उष्ण असतो. उन्हाळ्यामध्यें हा मध काढल्या-

वर त्यांत कांहींसा कडवटपणा असतो. परंतु पावसाळा लोटल्यावर कडवटपणा जाऊन मधास फारच स्वाद, गोडी व तेजस्वीपणा येतो. दुसऱ्या प्रकारचा शुभ्र मध असतो, तो अखरा या नांवाची कांटेरी वनस्पति आहे तिच्या पासून निघतो. या कांटेरी वनस्पतीच्या झुडपांनी महाबळेश्वराचा डोंगर बहुतेक आच्छादिला आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. अखऱ्याचीं फुलें अगदीं लहान पांढरीं व अडुळशाच्या फुलाच्या घाटाचीं असतात व त्याचप्रमाणें ताजीं काढलीं असतां देठांत मध सांपडतो. त्यांस बहुधा एक वर्षाआड बार येतो, व त्यासालीं मध स्वस्त मिळतो. हा मध शुभ्र असतो. या मधाचा स्वाद तांबड्या मधापेक्षांही ज्यास्त आहे यांत संशय नाहीं, व तो अंमळ थंड असतो, यामुळें औषधास फार प्रशस्त समजतात. हे दोन्ही प्रकारचे मध फारच स्वस्त मिळतात. मोठ्या शिशीस चार आणे पडतात. फार महागाई झाली तर सहा आण्यांवर किंमत जात नाहीं. मधमाशांचीं मोहोळें या डोंगरावर किती लागतात यांचा सुमार नाहीं. येथील बहुतेक बंगले उन्हाळा खेरीज करून आठ महिने बंद असतात. त्या वेळीं कित्येक बंगल्यांमध्यें पुष्कळ मोहोळें लागलेलीं असतात व उन्हाळ्यांत राहण्याकरितां बंगले साफ करणें ह्मणजे पहिला उद्योग घरांतील मोहोळें काढण्याचा असतो.

येथील अरण्यांत रानटी जनावरें पुष्कळ आहेत. शिकार करणारे लोक, सांबर व रानडुकरें हीं नेहमीं मारून आणतात. यांशिवाय वाघ, आस्वल, चित्ते, तरस, हेही आढळतात. सांबर असल्यामुळें सांबराच्या कातड्यांचे जोडे व बूट या ठिकाणीं चांगले तयार होतात.

या ठिकाणीं पक्षी फार कमी आहेत. काळे क्वचित् थोडे दृष्टीस पडतात. परंतु चिमण्या तर बिलकुल आढळत नाहींत. पक्षी कमी असण्याचें कारण या डोंगरावर धुकें व पाऊस फार हें होय. पावसाळ्यांत येथें फुरशांचा मोठा प्रळय असतो व त्यांना फार जपावें लागतें.

नहरास आपल्या लोकांची वस्ती माल्कमपेंठ येथें असते. माल्कम्पेंठ हें नांव नामांकित सर जॉन् माल्कम् साहेब यांजवरून पडलें आहे. बाजार येथेंच असतो. बाजारांत दहा बारा विलायती सामानाचीं दुकानें आहेत, व बाकीचीं दुकानें आपल्या देशी वाण्याउदम्यांचीं आहेत. येथील वस्ती सुमारें लहान लहान तीनशें घरांची असावी याशिवाय आसपासच्या खोऱ्यांमध्यें धनगर व धावड लोकांच्याही कांहीं झोंपड्या आहेत. इंग्रज लोकांचे बंगले अजमासें १०० असावेत. एकंदर नेहमीं राहणाऱ्या लोकांची संख्या पांचशेंपेक्षां ज्यास्त नसावी, व उन्हाळ्यांत हवा खाण्याकरितां लोक येतात, त्या वेळीं दोन, अडीच किंवा तीन हजारपावेतों संख्या वाढत असावी असें अनुमान आहे. माल्कम्पेंठेची वस्ती पूर्वपश्चिम साताऱ्याच्या रस्त्यावर आहे. मुख्य बाजार, व विलायती सामानाचीं दुकानें ज्या रस्त्यावर आहेत त्यास **माल्कम्पेंठ** ह्मणतात व त्या रस्त्याच्या पाठीमागें दक्षिणेस रस्ता आहे त्यास मरेपेंठ ह्मणतात. ही मरेपेंठ डॉक्टर मरे या नांवाच्या इंग्रजानें वसविली आहे.

येथें बंदोबस्ताकरितां एक सुपरिंटेंडेंट असतो व त्याजकडेसच सिव्हिल सर्जन व मुख्य माजिस्ट्रेट, म्युनिसिपालिटी वगैरे अष्टाधिकार असतात. फक्त दिवाणी काम वाईच्या मुनसफाकडे असतें. सुपरिंटेंडेंटास पहिल्या वर्गाच्या माजिस्ट्रे-

टाचा अधिकार असतो. याशिवाय कोतवाल ह्मणून एक अंमलदार असतो, त्यास दुसऱ्या वर्गाच्या माजिस्ट्रेटाचा अधिकार असून खजिन्याचें काम व पोलिसाचा व जंगलचा बंदोबस्तही तो करितो.

या ठिकाणीं म्युनिसिपालिटीचें उत्पन्न दरसाल १५००० रुपयेपर्यंत आहे. यापैकीं साडेसहा हजार रुपये सरकारांतून प्रतिवर्षीं बंदोबस्ताकरितां मिळत असतात. सुमारें २७०० रुपये बंगल्यांच्या जमिनींचा सारा येतो. हा सारा दर एकरास सरासरी अडीच रुपयेप्रमाणें घेतात. चार पांच बंगले सरकारी आहेत. त्यांचें भाडें सुमारें २५०० रुपये येतें. तीन एक हजार रुपये जकात, गाड्या, व घोडीं यांवर कर बसवून उत्पन्न होतात. खर्चाची मुख्य रकम ह्मटली ह्मणजे रस्त्यांच्या दुरुस्तीबद्दल होय. ह्या कामीं बराच पैसा खर्च होतो. एकंदर रस्त्याची लांबी घेतली तर ४० मैलांहून देखील अधिक भरेल. यापैकीं निमे रस्ता गाड्या जाण्यासारखा आहे व निमे पायरस्ता आहे. सरकार पैसा देत असतें त्याचा मुख्य हेतु हाच कीं झाडी तुटूं नये व रस्ते दुरुस्त राहून भोंवतालचे चमत्कार पाहण्यांत यावे, आणि हवा स्वच्छ राहून तिजपासून होणारे फायदे पूर्णपणें व्हावेत.

या ठिकाणीं कचेऱ्या व इतर सार्वजनिक स्थळें ह्मटलीं ह्मणजे सुपरिंटेंडेंटाची कचेरी, डाकघर, तारबंगला, इस्पिताळ, सानिटेरियम, कोतवालचावडी, शाळा, एक लहानसें देशी पुस्तकालय, व फ्रियरहॉल याप्रमाणें आहेत. फ्रियरहॉल येथें युरोपिअन लोकांकरितां पुस्तकालय आहे व इंग्रज लोकांचीं नाटकें, नृत्यें वगैरे होणें तीं या ठिकाणींच होतात. सारांश, महाबळेश्वर येथील युरोपियन लोकांचा टाउनहॉलच आहे

असें ह्मणण्यास हरकत नाहीं. आपले लोकांस सार्वजनिक कामांकरितां जमणें झाल्यास देशी पुस्तकालयांत जमतात. हें पुस्तकालय आपले लोकांनीं वर्गणी करून बांधिलें आहे व उन्हाळ्यांत बाहेरचे लोक येतात ते देणगीच्या रूपानें, आणि दरमहा आठ आणे रुपयाप्रमाणें वर्गणी ह्मणून यथाशक्ति देतात; तेणेंकरून प्रतिवर्षीं नवीन पुस्तकें विकत घेतलीं जाऊन वर्तमानपत्रेंही इंग्रजी व मराठी साधारण असावीं तितकीं वाचण्यास मिळतात. रावसाहेब **विश्वनाथ नारायण मंडलिक** यांचा आश्रय या पुस्तकालयास मोठा आहे. उन्हाळ्यांत प्रतिरविवारीं तिसऱ्या प्रहरीं हवा खाण्यास येणाऱ्या देशी लोकांची सभा भरून निबंध व व्याख्यानेंही होत असतात. महाबळेश्वरीं आपल्या लोकांस अशा गृहाची आवश्यकता फारच आहे; कारण या ठिकाणीं विश्रामाकरितां लोक येतात ह्यांना नियमित उद्योग ह्मणून कांहीं नसतो, यास्तव पुस्तकालयासारखी मनोरंजक जागा असल्यापासून फायदे फार आहेत ह्यांत संशय नाहीं.

येथील हवेमध्यें साधारण गुण असा आहे कीं प्रकृति पुष्ट व सतेज राहून सदोदित आंगांत हुषारी असते. असें होण्याचीं कारणें हीं आहेत कीं,

( १ ). हवेमध्यें थंडी फार, व थंडी फार असण्याचें कारण उघडच आहे. अगोदर ऐन पर्वताचे शिखरावर वस्ती आहे. दुसरें, वृक्षवनस्पति हीं सदोदित दाट, सच्छाय व हिरवीं असल्यामुळें सूर्याची प्रखरता बिलकुल नाहींशी होते. तसेंच कृष्णा आदिकरून नद्यांची उत्पत्ति या डोंगरांतून असल्यामुळें त्यांच्या उगमाचें पाणी चहूंकडे पहाडांत खेळत आहे व निरंतर आकाशांत मेघपटलांचें आच्छादन असतें. या ठिकाणीं

दिवसास किंचित् झोंप घेतली तर सर्दी होऊन प्रकृति तात्काळ बिघडते. श्रीमंत लोकांच्या बंगल्यांतून नेहमी शेगड्या पेटलेल्या असतात. ह्या शेगड्या साधारण शेगड्यांप्रमाणें नसतात. विलायतेंत चाल आहे त्याप्रमाणें भिंतींत दगडाच्या वगैरे पेवासारख्या शेगड्या बांधून, धूर जाण्यास वर आरपार द्वार केलेलें असतें. या योगानें साक्षात् आंगास शेक न झोंवतां हवेंतील जलांश नाहींसा होऊन पाहिजे तेवढीच थंडी हवेंत राहते. उन्हाळ्यामध्यें उष्णतेपासून बाहेरगांवीं विकार होतात ते येथें होत नाहींत. तसेंच उष्णता शमन होण्याकरितां अत्यंबुपान, कृत्रिमवायु, कृत्रिम शीतोपचार यांपासून पुढें वाईट परिणाम होतात, ते येथें राहिल्यापासून होत नाहींत; कारण यी साधनांची आवश्यकताच नसते.

( २ ). हवा सुखावह असण्याचें दुसरें कारण हें आहे कीं, हवा इतकी थंड आहे तथापि तिच्यांत स्निग्धता विशेष असते; ह्मणजे अर्थ हा कीं, बहुधा अतिशय थंडीमध्यें अन्यत्र जशी अतिरूक्षता असते आंगावरचें कातडें तडकतें तळहात, तळपाय, ओंठ फुटतात; व उष्णाच्या दाहानें जितकी संतप्तता शरीरांत असते, तितक्याच प्रकारचा विपरीत परिणाम थंडीपासून होत असतो, आणि निरुत्साह व शिथिलता उत्पन्न होते, तसा प्रकार एथें बिलकुल नाहीं. साधारण थकवा येण्यास देखील व्यायाम फार करावा लागतो व तो थकवाही केवळ क्षणिक असतो. त्यापासून हातांपायांची आग, मस्तकाची उद्विग्नता, तोंडास शोष वगैरे होत नाहींत.

महाबळेश्वरीं प्रत्येक दिवशीं किमानपक्ष चार मैलांचा तरी व्यायाम झाला पाहिजे.

( ३ ). तिसरें कारण असें आहे कीं, देश व कोंकण या दोहोंच्या हवेचें या ठिकाणीं संमीलन होऊन दोहोंचे दोष जाऊन गुण मात्र राहिले आहेत. मावळांतील सर्दी, कोंकणची अंतरंग उष्णता, खानदेश व वऱ्हाड येथील रूक्ष वात हे गुण येथील हवेंत मुळींच नाहींत.

( ४ ). चौथें कारण असें आहे कीं, सर्व ऋतूंमध्यें येथील हवेचें मान बहुतेक सारखें असतें. साधारण वार्षिकमान ६६ अंश आहे. यामध्यें व कोंकण आणि घाट येथील हवेंत सरासरी २० अंशांचा फरक आहे. मागील दहा वर्षांची सरासरी घेऊन खालील प्रमाणें काढलीं आहेत. त्यांवरून ऋतुपरत्वें हवेच्या मानांत बदल अतिशय कमी होतो हें लक्षांत येईल.

| | |
|---|---|
| साधारण वार्षिक मान ........ *पारा | ६६.२ |
| सूर्योदयापासून सूर्योदयापर्यंत उष्णतेंत दररोज फेरफार होतो तो ........ | ९.२ |
| सर्वांत अधिक मान ........ | ७१.२ |
| सर्वांत कमी मान ........ | ६१.३ |
| हिंवाळ्याचें मान ........ | ६९.१ |
| उन्हाळ्याचें मान ........ | ७०.७ |
| पावसाळ्याचें मान ........ | ६३.८ |
| हिंवाळ्यांत मध्यान्हास ........ | ९७.१ |
| उन्हाळ्यांत मध्यान्हास ........ | १०४.९ |

* Mahableshwar Guide of 1875. p. 25.

उन्हाळ्याच्या व हिंवाळ्याच्या मानांत फक्त ५ अंशांचा फरक आहे व पावसाळा आणि उन्हाळा यांच्या मानांत ७ अंशांचा फरक आहे. याप्रमाणें हवेची स्थिति फारच थोडे ठिकाणीं आढळते. वरील प्रमाणें महाराष्ट्र देशांतील बरेंच अतिउष्ण हवेचें ठिकाण जें नागपुर तेथील हवेशीं लावून पाहिलीं असतां तिचें वैगुण्य तात्काळ दिसून येतें.

| | महाबळेश्वर. | नागपुर. |
|---|---|---|
| साधारण वार्षिक मान ............. | ६६ | ७८.३ |
| दररोजचा फरक ............. | ९.८ | २४.५ |
| सर्वांत अधिक मान ............. | ७१.२ | ९२.२ |
| सर्वांत कमी मान ............. | ६१.३ | ६७.७ |
| हिंवाळ्याचें मान ............. | ६५.१ | ७२.२ |
| उन्हाळ्याचें मान ............. | ७०.७ | ८९.३ |
| पावसाळ्याचें मान ............. | ६३.८ | ८२.२ |

आणखी एक लक्ष्यांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे ती अशी कीं, महाबळेश्वरचें व इंग्लंडचें अतिशय उष्ण मान अगदीं सारखें आहे. तसेंच वातावरणवेत्त्यांनीं पृथ्वीवरील ठिकठिकाणचीं उष्णतेचीं मानें एकत्र करून सरासरी काढली आहे तिच्याशीं महाबळेश्वरचें साधारण मान बहुतेक मिळतें. परंतु या ठिकाणीं हितावह हवा काय ती उन्हाळ्यांत व हिंवाळ्यांत असते; ह्मणजे मार्च, एप्रिल, मे, नोव्हेंबर, डिसेंबर, जानेवारी आणि फेब्रुवारी या दिवसांत मात्र चांगली हवा असते; आक्टोबरचा कांहीं भाग खेरीज करून बाकी पावसाळा असतो. या दिवसांची हवा फार खराब असते. उन्हाळ्यांत पश्चिमेकडून व उत्तरेकडून समुद्राचा वारा येत असतो. एप्रिल महिन्याच्या शेवटीं शेवटीं ढग, मेघगर्जना, व किंचित् पर्जन्यही

पडूं लागतो. मे महिन्यांत हा सर्व प्रकार अपून आणखीं धुकें मनस्वी येत असतें.

(५). येथील हवा निरोगी असण्याचें आणखी एक कारण असें आहे कीं 'मलेरिया' ह्मणून हवेंत जो विकार असतो तो या ठिकाणीं अगदीं नाहीं. सांचलेलें पाणी, पाणथळ जमीन, कुजलेला झाडांचा पाला व गवत वगैरे यांच्या ओलाव्यानें जो दमट हवा निघते ती येथें बिलकुल नाहीं. याचें कारण असें सांगतात कीं, पावसाचें विकारी पाणी डोंगरावर न राहतां खालीं वाहून जातें व नद्या वगैरे यांना उतार असल्यामुळें पावसाचें पाणी जमिनींत न मुरतां प्रवाहरूपानें देशावर निघून जातें. डोंगराच्या सभोंवतील प्रदेशांची हवा स्वभावतः उत्तम असल्यामुळें खालील विकार वर जात नाहीं. यास्तव पावसाळा गेल्यावर हिंवताप वगैरे या ठिकाणीं येत नाहींत. कारण हिंवतापाचें मूळ जी मलेरियायुक्त हवा ती येथें नसते. मलेरियाचा नाश होण्यास कारण येथील हवेंत किंचित् अंतरंगशोषकता आहे व ही शोषकता, तेथील हवा वजनांत फार हलकी असल्यामुळें उत्पन्न होऊन सर्दीचे विकार नष्ट करीत असते. येथील हवेमध्यें नेहमीं हुषारी राहते याचें कारण असें सांगतात कीं, या प्रदेशाची उंची समुद्रसपाटीपासून साडेचार हजार फुटी असल्याच्या योगानें शरीरावर हवेचा दाब पुष्कळ कमी बसून रुधिरवाहिन्यांतून रक्ताची गति किंचित् तीव्र होते. तेणेंकरून सदा उत्साहवृत्ति राहते; व याच कारणास्तव अशक्तता, वीर्यक्षय, मस्तकाचा हलकेपणा, वायूची शुष्कता, व रक्तशोष इत्यादिकांच्या योगानें शिथिलता, निरुत्साह, उद्विग्नता, व व्याकुलता इत्यादि प्रकार या ठिकाणीं फार कमी होतात.

तसेंच हवा तलख व अंतर्यामीं किंचित् शोषक असल्यामुळें या ठिकाणीं सदैव पित्त जागृत असतें, व अग्निमांद्य मोडून पचनादि व्यापार जोरानें चालतात व अन्नाचा रस यथाक्रम होऊन रक्तशुद्धि व वीर्यवृद्धि हळुहळू होत असते.

येथील हवा पुरुषांपेक्षां स्त्रियांस व विशेषेंकरून लहान मुलांस फारच हितावह आहे; ही गोष्ट हल्लीं अनुभवसिद्ध आहे. इंग्रज लोक एकवेळ स्वत: महाबळेश्वरीं जाणार नाहींत, परंतु मुलांना उन्हाळ्यांत अवश्य तिकडेस पाठवितात. येणेंकरून पोरांना लहानपणीं रोगराई होते ती होत नाहीं. दांत येतेवेळेस क्लेश कमी होतात, व एकंदरीनें शरीर सुदृढ व पुष्ट होतें आणि उतारवयांत निरोगी व निकोप राहतें.

वर सांगितलेले हे येथील हवेचे गुण झाले. परंतु कांहीं दोषही आहेत, व त्यांचें मूळ अतिपर्जन्य होय. प्रतिवर्षी २५० इंचांहून अधिक पाऊस पडतो. मागील पांच वर्षांत साधारण मान येणेंप्रमाणें होतें:—

| | | |
|---|---|---|
| सन १८७० | *इंच | २५६. ७८ |
| ,, १८७१ | ,, | २००. ३० |
| ,, १८७२ | ,, | २६८. ३४ |
| ,, १८७३ | ,, | २७१. ७ |
| ,, १८७४ | ,, | २९७. ८५ |

हगवण, संधिवायु, व आकृतिविशिष्ट रोग ह्मणजे गुल्म, प्लीहा, यकृत्, उदर, इत्यादिकांस येथील हवा फार वाईट आहे. परंतु धातुक्षय, रक्तशोष, ज्वर इत्यादिकांपासून होणारे विकारांस फार चांगली आहे.

---

* Mahableshwar Guide of 1875. p. 25.

या ठिकाणचें पाणी फारच गोड, सतेज व निर्मळ असतें. त्याच्या गोडीचें तर खरोखर वर्णन करतां येत नाहीं. एकाच कृष्णा नदीचें पाणी, परंतु महाबळेश्वरचें व लागलेंच पुढें दहा कोसांवर वाईचें पाणी या दोहोंमध्यें जमीनअस्मानचा फरक असतो व तो फरक समजण्यास दोन्ही ठिकाणचें पाणी साक्षात् प्यालें पाहिजे; शब्दानें वर्णन करणें व्यर्थ आहे. पाण्यामध्यें स्वच्छता इतकी असते कीं, पंचपात्रींत किंवा पेल्यांत घातलें ह्मणजे भांड्याचे अतिसूक्ष्म डाग नुसते एकाएकीं दृष्टीस पडत नाहींत, ते चांगले उमगूं लागतात. असें पाणी असून दुःख इतकेंच वाटतें कीं, येथें तृषेचा अभाव असल्यामुळें तें पिववत नाहीं.

उन्हाळ्यांत पाणी कमी असतें असें नाहीं. इंग्रज लोकांच्या बंगल्यांतून दहा पांच बंगल्यांआड एकेक विहीर आहे, व माल्कमपेठेचे उत्तरेस वेण्यातलाव आहे. याशिवाय डोंगरांतून ठिकठिकाणीं झरे वाहत असतात. बहुतकरून उंबराचा वृक्ष दृष्टीस पडला ह्मणजे मुळाशीं झुळझुळ वाहणारा लहानसा झरा तरी हटकून सांपडतो. तथापि ही गोष्ट खरी आहे कीं, उन्हाळ्यामध्यें पाणी विपुळ असावें तसें नसतें. कित्येक ठिकाणीं दूर अंतरावरून, व दरडी चढून आणावें लागतें. कृष्णा आदिकरून नद्यांचे उगम महाबळेश्वरीं आहेत, तथापि वाहतें पाणी या ठिकाणीं मुळींच नाहीं ह्मटलें तरी चालेल. वेण्यातलावांतून एक लहानसा प्रवाह निघून वेण्येचे खोऱ्यांत जाऊन पडतो हें खरें आहे; परंतु तो कांहीं विशेष जमेस धरण्यासारखा नाहीं.

या ठिकाणीं हवा खाण्याकरितां लोक येतात ते मुख्यत्वेंकरून उन्हाळ्यांतच येतात. कारण, येणारे लोक बहुतकरून

सरकारी नौकर असल्यामुळें त्यांना इतर संधि मिळत नाहीं. हिंवाळ्यांतही येथील हवा चांगली असते. परंतु महाबळेश्वर साताराजिल्ह्यांत असल्यानें तेथील इंग्रजलोक मात्र मधून मधून येऊं शकतात. ज्यांना नौकरीचा धोशा पाठीमागें नाहीं असे लोकही येतात. परंतु त्यांची संख्या फार थोडी असते; कारण, येणें कांहीं फुकाचें नाहीं. पैसा अद्वातद्वा खर्च करावा लागतो, व उन्हाळ्यांत दोन अगर तीन महिने राहणें हें मोठ्या श्रीमंत लोकांना देखील जड पडतें. परंतु पैसा खर्च केल्याचें पूर्ण फळ मिळतें इतकेंच नाहीं, तर द्विगुणितही मिळतें. या कारणास्तव ईश्वरानें त्यांना ऐपत दिली आहे व जे येथें राहण्याचे फायदे समजतात ते मात्र पैसा खर्च करून येतात. अशी स्थिति वास्तविक पाहतां इंग्रज लोकांचीच आहे. ईश्वरकृपेनें त्यांना राज्यसत्ता आली आहे, मोठमोठे पगार मिळतात, राजविलासांची सवय व राजविलासांची गोडीही त्यांना आहे. परंतु आपल्या लोकांमध्यें हे सर्व प्रकार उलटे आहेत. अगोदर भीक, त्यांतून रोजगार मिळाला तर बायका पोरें व इतर नातलग पोसावयाचे असल्यामुळें, सदोदित हातातोंडाशीं गांठ असते; शिवाय परतंत्रता. या कारणास्तव महाबळेश्वरीं जाण्याचें मनांत आलें तरी जन्मांतून एकवार गेलें तर कृतकृत्य झालों असें समजावें. जे लोक व्याजबट्टा करून दोन पैसे मिळवितात व संचय करितात त्यांना ऐपत असते, परंतु जाण्यापासूनचे फायदे कळत नाहींत. सारांश, महाबळेश्वर आपलें असून तेथील सुख आपले दैवीं नाहीं. असो.

हा जो प्रकार वर लिहिला आहे त्यावरून एवढें स्पष्ट आहे कीं, हवा खाण्यास येणारे इंग्रज लोकच असतात. त्यांची

संख्या बायका पोरें मिळून पांचशांत कमी नसेल असें वाटतें. शिवाय इतकीच संख्या, किंबहुना त्याच्या दीडपट, नौकर लोकांची व आश्रितांची असते. केवळ उदीमाच्या उद्देशानें पन्नास पाऊणशें व्यापारी लोकही येतात. परंतु हे सर्व नौकर, आश्रित, व उदमी लोक इसापनीतींतले पक्कान्न नेणारे उंटा-प्रमाणें केवळ भारवाहक समजले पाहिजेत. इंग्रज लोकांचीं बायकामुलें होईल तितकें करून उन्हाळ्याचे अव्वलपासून अखेरीपर्यंत राहतात. परंतु पुरुष लोकांस तसें करण्यास सांपडलें नाहीं तरी साधेल त्याप्रमाणें महिना पंधरा दिवस निदान आठ रोज तरी येऊन राहतात, व इतके दिवसांत खर्च किती करतात ह्मणाल तर मनुष्याप्रत अगदीं नाहीं ह्मटलें तरी तीन-शें रुपये दरमहा खर्च होत असेल असें वाटतें. वाटतें असें भीत भीत ह्मटलें याचें कारण असें कीं, वास्तविक पाहतां तीनशें रुपयांच्या दीडपट, किंवा दुप्पट देखील खर्च होत असेल. परंतु माहिती नाहीं व अजमास करण्यास जावें तर 'राजा दर-रोज केळच्या खात असेल काय?' या गोष्टीप्रमाणें व्हावयाचें.

खर्चाची मुख्य रक्कम ह्मटली ह्मणजे घरभाडें होय. इंग्रज लोकांचे बंगले माल्कमपेठेचे वस्तीपासून दूर असतात. एके-का बंगल्याचें भाडें सर्व उन्हाळ्याकरितां तीनशें, पांचशें, व हजारपर्यंत देखील असतें. या ठिकाणीं भाडें ह्मटलें ह्मणजे वर्षभर राहिलें, व आठदिवस राहिलें तरी सारखेंच पडतें. कारण, घरवाल्यांना वर्षाचें भाडें उन्हाळ्यांत वसूल करून घ्यावें लागतें. कदाचित् कोणास वाटेल कीं, इतकालें भाडें देतात त्याअर्थीं घरवाल्यांची चैन असेल; परंतु ही समजूतही खोटी आहे. कारण, साधारण बंगला बांधण्यास देखील पैसे

व श्रम फार लागतात. कारागीरलोक व बहुतेक सामान पहाडावर चढवावें लागतें. या दुःखासही घरवाले इतके भीत नाहींत; परंतु पावसाळ्यामध्यें घरांची जतन होणें फार कठीण काम असतें. कारण, पाऊस फार अवकाळ्या असतो व वादळें भयंकर होतात. यामुळें घरांचा खुळखुळा होऊन जातो व बांधण्याच्या खर्चापेक्षां डागडुगींतच पुष्कळ पैशाचें नुकसान होतें. इतकेंही असून हे बंगले महालासारखे मोठे विस्तीर्ण किंवा सोईचे असतात असें नाहीं. त्यांना बहुधा 'हट' अगर 'कॉटेज' अशी संज्ञा असते व त्याचप्रमाणें त्यांचें स्वरूप असतें. मुख्य सुख इतकेंच कीं हरएक बंगल्यासभोंवती सुखप्रद, रमणीय आणि गर्द झाडी असते, तेणेंकरून 'स्निग्धच्छायातरुषु वसतिः' याची आठवण होते. नामदार फिट्जेरल्ड साहेब व दाऊद सासून यांचे बंगले राजकीय आहेत; परंतु अशा घरांची संख्या मोजण्यास हाताचीं बोटें देखील फार आहेत. आपल्या लोकांकरितां माल्कमपेठेंत वाण्याउदम्यांचीं रिकामीं घरें व दुकानें राहण्यास मिळतात. कित्येक झोंपड्या मोकळ्या जाग्यावरही आहेत; परंतु मध्यमप्रतीची जागा ह्मटली ह्मणजे दरमहा पंचवीस अगर तीस रुपये दिले पाहिजेत. या ठिकाणीं इंग्रज लोकांना व आपल्या लोकांना मुख्य अडचण ही आहे कीं राहण्यास जागा मिळत नाहीं. उन्हाळ्याचे पूर्वीपासून तजवीज राखून जागा अटकावून ठेवाव्या लागतात. असें न केलें तर बहुधा येणेंच होत नाहीं. जर धनत्तर पाण्यासारखा पैसा खर्च करणारांस जाग्याचें हें दुःख सोसावें लागतें तर गरीबागुरिबांची काय दुर्दशा असेल याचें अनुमान सहज करतां येईल.

शरीरसमृद्धीस मुख्य कारणें येथील हवा व रमणीय

ठिकाणीं फिरणें हीं होत. याकरितां पहांटेस मोठ्या झुंझुरका सूर्योदयापूर्वी उठण्याचा परिपाठ येथें आहे, व कांवळें ऊन पडतें तोंच व्यायाम करून घरीं परत यावें हा विहित मार्ग आहे. परंतु या नियमास उल्लंघणारे पुष्कळ असतात. कारण प्रातःकाळीं पांच वाजतां साखरझोंप मोडून थंडीच्या तडाक्यांत उठण्याचा निश्चय सर्वांचे हातून चालत नाहीं. याकरितां उशीरानें उठून व उशीरानें व्यायाम करून परत येणारे फार असतात. आणि मुख्यत्वेंकरून आपल्या लोकांमध्यें अशा प्रकारचा आळस पुष्कळ आढळतो. इंग्रज लोकांच्या नियमांत मात्र अंतर होत नाहीं. ते घोड्यावर जातात. परंतु पायीं फिरण्याचा प्रघात फार आहे. सायंकाळीं फिरतेवेळीं मात्र गाड्या घेतात. दिवसास उत्तमान्नभोजन किंवा मित्रमंडळीकडे मेजवान्या होत असतात. पुढें साडेचार किंवा पांच वाजेपावेतों गंजिफा, बुद्धिबळें वगैरे घरांतील खेळ चालले असतात. मग उन्हें जात चाललीं ह्मणजे बग्या, फैटणी, शिग्राम, टांगे, वगैरे यांत बसून थव्यांचे थवे पुनः बाहेर फिरण्यास निघतात. व कोठें तरी सुंदर व रमणीय ठिकाणीं बसून सुस्वर, मनोरम आणि वीरश्रीजनक किंवा आनंदकारक वाद्यसंगीत ऐकतात. या ठिकाणीं हजारों रुपये खर्च करून विहाराच्या जागा तयार केल्या आहेत. तेथें क्रिकेट व बाडमिंटन् हे खेळ मोठ्या झपाट्यानें चालले असतात. यांपैकीं क्रिकेट ह्मणजे काय व त्यापासून हितावह परिणाम काय होतात हें सांगणें नको. परंतु इंग्रज लोकांमध्यें हा खेळ आलीकडेस किंचित् मागें पडत चालला आहे, व बाडमिंटनाचा नाद इंग्रज लोकांस चोहोंकडे अतिशय लागला आहे. हा खेळ थोडे दिवसांपूर्वी शोधून काढला असें ह्मणतात; व क्रिकेटपेक्षां हरएक प्रकारें

याजपासून फायदे फार आहेत. स्त्रियांचे कोमळ जातीस तर हा खेळ फारच प्रशस्त आहे. सुमारें दहा हातांचे अंतरावर, दीड पुरुष उंचीचे खांब रोविले असतात व त्यांच्या वरच्या भागाला, अडीच तीन हात रुंदीचा जाळीदार तारांचा एक पत्रा बांधतात, आणि दोन्ही बाजूनें खेळणारे लोक उभे राहून या पत्र्यावरून व खालून एकमेकांचे अंगावर चेंडू टाकित असतात. या खेळाचें वेड इंग्रज लोकांस व विशेषेंकरून त्यांच्या स्त्रियांस इतकें असतें कीं महाबळेश्वरीं दुसरा कांहीं नियमित उद्योग नसल्यामुळें प्रत्येकदिवशीं निमे अधिक काळ बाडमिंटन् खेळण्यामध्यें गुजरतो. हा खेळ खेळतांना सहजावृत्त्या इतका चलनव्यापार व अंगवैचित्र्य होत असतें कीं अबलाजनांच्या नाजूक गात्रांस अतिपरिश्रमाचा भास होत नाहीं. शारीरिक श्रमानें रांठपणा न येतां त्यांच्या सुकुमार अंगवेलीचें मार्दवही कमी होत नाहीं, त्वचेची स्निग्धता जात नाहीं, आणि लावण्याचें तेज व मुखचंद्रमा उत्तरोत्तर प्रफुल्लित होऊन वृद्धिंगत होत जातो. या खेळानें स्वाभाविक ईर्ष्या तर पुष्कळच उत्पन्न होते. परंतु त्यांतूनही हृद्य वाद्यसंगीत होत असलें ह्मणजे कांहींएक प्रकारचें अवर्णनीय व विलक्षण स्फुरण येऊन चित्तोल्हास मुखकमळावर साक्षात् दिसूं लागतो. मग हास्यविनोदादि प्रकार सुरू होतो. विश्रामाची अपेक्षा झाल्यास जवळ वृक्षांतर्गत कुंजाप्रमाणें रमणीय एकांत स्थळें सिद्ध असतातच. अस्तमानपर्यंत हा क्रम झाल्यावर पुनरपि रात्रौ तऱ्हेतऱ्हेच्या राजविलासी मेजवान्या, कधीं गवरनर साहेबांकडे, कधीं सेनाधिपतिकडे, कधीं इतर श्रीमंत लोकांकडे होतच असतात. अशा प्रसंगीं नृत्य व गायन सदोदित चालत असतें. या खेरीज आठ दहा दिवसांनीं थियेटर हॉलामध्यें नाट्य-

नाटकें होत असतात. कधींमधीं वेण्यासरोवरावर जलक्रीडेक-रितां पुष्कळ लोक जातात व इतर रमणीय ठिकाणीं वनभोजनेंही वारंवार होत असतात. धर्मार्थादि सत्कृत्यें मुळींच होत नाहींत असें नाहीं. आईबापविरहित गरीब क्रिश्चियन मुलींनीं केलेलीं शिवणकामें, कशिदे, खेळणीं व इतर सुबक वस्तूंचें प्रदर्शन करून त्या कामीं केवळ परोपकारबुद्धीनें मोठमोठ्या सरदार लोकांच्या स्त्रिया जातीनें झटत असतात. या योगानें प्रदर्शन पाहण्यास येणाऱ्या लोकांच्या मनांतही धर्मबुद्धि उत्पन्न होऊन सर्व आपआपल्या शक्त्यनुरूप द्रव्यद्वारा या सत्कृत्यास साह्य करितात. सारांश, या ठिकाणीं ऐहिक अर्थास अनुलक्षून तनु, मन, धन खर्च करून इंग्रज लोक शारीरसुखाच्या पाठीमागें लागलेले असतात. व्यग्रता किंवा चिंता उत्पन्न करणारी हरएक गोष्ट— ह्मणजे कचेरीचीं कामें व गहन विचारादि करून मानसिक श्रम बिलकुल करीत नाहींत. केवळ शरीराची समृद्धि व चित्ताची प्रसन्न वृत्ति ठेवित असतात.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट सांगणें राहिली आहे ती अशी कीं, इंग्रज लोकांत विवाह होतात ते स्वयंवरविधीनें होत असतात. आपल्या प्राचीन स्वयंवरांमध्यें व या अर्वाचीन प्रकारांमध्यें भेद इतकाच कीं, आर्य लोकांत वधू हो विवाहापूर्वीं वराचे गुणानुवाद कर्णानें श्रवण करून, दूतीजनांच्या मुखानें ऐकून एकदम स्वयंवर करित असे. उभयतांची पूर्वीं गांठही पडत असे, परंतु तांत्रिक. कधीं एकमेकांची ओझरती नजरानजर झाली ह्मणजे फार झालें. तेवढ्यावरून व चित्रें वगैरे पाहिल्यावरून गुणसाम्य झालें ह्मणजे प्रेमानुबंधन होत असे. पूर्वीं आपल्या लोकांत गाढ परिचय व परस्परांचें सूक्ष्म परीक्षण होत नसे. इंग्रज लोकांमध्यें प्रकार किंचित् भिन्न आहे.

प्रथमतः पूर्णपणें परिचय होऊन एकमेकांची गुणपरीक्षा करित असतात. या कारणास्तव प्रणयिजनांना भेटीचे प्रसंग येणें जरूर असतें. हे प्रसंग महाबळेश्वरीं फिरते वेळीं, खेळामध्यें, नृत्यगायनाचे समयीं, भोजनें व वनोपहार यांच्या निमित्तानें अनायासें येतात. तेणेंकरून परस्पर संघट्टण व मैत्री होऊन वाङ्‌निश्चय होऊन जातात, व महाबळेश्वराहून खालीं गेलें ह्मणजे लग्नांची एकदम गर्दी उडते. सारांश, या ठिकाणीं अहोरात्र स्त्रियांचा पुरुषांत, व पुरुषांचा स्त्रियांत प्रवेश असतो. **पंडितांनीं** 'रुक्मिणीस्वयंवरां'त लिहिलें आहे कीः—

ऐश्वर्यवंत वय आकृतिही समान
स्वार्थार्थ होतिल परस्पर त्यांस मान ।
मैत्री विवाह न घडे अधमोत्तमांतें
तूं भाळलीस नृपनंदिनि काय मातें ॥

या श्लोकाचा अखेर चरण अर्थातच प्रस्तुत विषयास लागू नाहीं. पहिल्या तीन चरणांवरून पाहिलें असतां दिसून येतें कीं, आपल्या लोकांमध्यें ऐश्वर्यांत, वयांत, व आकृतींत साम्यता नसली ह्मणजे विवाह होत नसे. परंतु इंग्रज लोकांत केवळ ह्या बाह्य चिन्हांकडे न पाहतां गुणसानुरूप्य, कीं जेणेंकरून ऐहिक व्यापार व पारलौकिक अर्थ पुढें साध्य होतील याकडे लक्ष देतात. अधिक उणें वय, कमजास्त संपत्ति, लहान मोठी आकृति असली, तथापि चिंता करीत नाहींत. याप्रमाणें शुष्क अडचणी नसल्यावर शुद्ध निर्मळ व निष्कपटी प्रेमाच्या वृद्धीस सर्वांशीं अनुकूळ असें जें महाबळेश्वरचें स्थळ तेथें मुग्धजनांचा पुरुषांत विशेषतर प्रवेश होण्यानें 'चै-

तन्यचंद्रोदयांत लिहिल्याप्रमाणें परिणाम स्वाभाविकपणें होतो यांत नवल काय? ह्मणजेः—

यत्र यत्र हरिणीदृशां क्रम-
स्तत्र तत्र मदनस्य विक्रमः ।

याचा भावार्थ असा आहे कीं, चकितहरिणीनेत्रा सुंदर स्त्रिया यांचा प्रवेश जेथें जेथें होतो त्या त्या ठिकाणीं मदनाचा विक्रम ह्मणजे निश्चयें करून जय होतोच.

याप्रमाणें राजविलास होत असतात, तथापि आश्चर्याची गोष्ट ही आहे कीं वेश्यादि जनांचा गंध देखील नसतो तेच आपल्या राजेरजवाड्यांपैकीं दोनचार गृहस्थ येत असतात त्यांचा प्रकार अगदीं उलट असतो. हा भेद अवश्य लक्षांत ठेविला पाहिजे. राजविलासानें आपले राजेलोक क्षयी होऊन सरकारानें दत्तक घेण्याची मोकळीक दिली आहे तथापि एका-मागें एक घराणीं निर्वंश होत चाललीं आहेत. परंतु आपले प्रस्तुतचे राज्यकर्ते राजविलास करून संतति, संपत्ति व विद्या यांच्यामध्यें लोकमतें विरोध आहे तो मोडून मैत्रीभाव उत्पन्न करितात.

आपल्या लोकांस वरील गोष्टी तर अनुकूल नसतातच. परंतु साधारण हवापाण्याचें सुख देखील नीट मिळत नाहीं. याचें कारण असें आहे कीं जे थोडे लोक हवेकरितां येथें येतात ते सर्व नवीन पद्धतीचे अलीकडचे विद्वान् असतात. हे लोक प्रथमतः शरीराची काळजी न घेतां अतिअभ्यासांत सर्व शक्ति घालवून मग कोणी क्षयाच्या भावनेनें, कोणी मस्त-कशूळानें, कोणी यकृत् उदरादि रोगानें ग्रस्त असतात. या व्याधींचे निवारणार्थ औषधपाण्याचे उपाय नेहमीं सुरू असतात. त्याचप्रमाणें महाबळेश्वरीं हवा खाण्यास जाणें ह्मणजे

औषधाचा एक प्रकार असतो. या लोकांना सुखोपभोग कोठला ! रोगाची गति वाढवून यमसदन लवकर दृष्टीस न पडो एवढ्याचीच काळची करतां करतां मारामार असते. ज्यांना दोनतिनशें रुपये दरमहा मिळतात त्यांचा हा प्रकार झाला. आतां ज्यांना असे रोग वगैरे नसतात त्यांना इच्छा झाली तथापि ऐपत नसते. मिळून दुर्दशाच. महाबळेश्वरीं मध्यम प्रतीनें राहणें ह्मणजे आपल्या लोकांस मनुष्याप्रत किमानपक्ष ७५ रुपये खर्च केला पाहिजे. व शिवाय जाण्यायेण्याचा खर्च लागतो. समाजानें गेल्यास अर्थात्च कमी पैसा लागेल; परंतु कित्येक लोक जातात त्यांस खर्चाचा अजमास न कळल्यामुळें हाल सोसावे लागतात. राहण्याची व खाण्यापिण्याची यथास्थित तजविज रहात नाहीं. या योगानें उलटी प्रकृति खराब करून घेऊन परत यावें लागतें. सारांश, आपल्या लोकांमध्यें जे केवळ उत्पन्नभक्षी व परतंत्र असतात त्यांना महाबळेश्वरीं मिळावें तसें सुख मिळत नाहीं. त्यांची दशा "गुंजभर सोन्यांत गाढव मढविणें" ह्या ह्मणीप्रमाणें होतें. मोठी उडी मारली तर शें दीडशें रुपये खर्चावयाचें आपण धैर्य करतों. परंतु यांतील निमेशिमे पैसा आगगाडी व भाडें खाऊन जातें. त्यामुळें महाबळेश्वरीं गेल्यावर बहुतेक पैशाचा अभाव होतो. आपल्या लोकांमध्यें वकील मंडळीस व मोठमोठ्या व्यापाऱ्यांस जास्त कमी पैसा खर्च करण्याचें सामर्थ्य असल्यानें महाबळेश्वरचें सुख बरें मिळतें, बाकी सर्वत्रांची यातनाच असते. असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

परंतु एक सुख मात्र इंग्रज लोकांस व आपल्यास, गरीबांना व श्रीमंतांना एकसारखें मिळतें, व तें सुख अनुपम आहे यांत संशय नाहीं. तें कोणतें ह्मणाल तर अद्भुत सृष्टि-

जन्य चमत्कार या ठिकाणीं दृष्टीस पडतात तें होय. महाबळेश्वरच्या हवापाण्यापेक्षां देखील एका अर्थीं या चमत्कारांची मातबरी जास्त आहे यांत संदेह नाहीं. असे चमत्कार जेथें दृष्टीस पडतात त्या ठिकाणास " पॉइंट " असें ह्मणतात. " पॉइंट " ह्मणजे टोंक हें बहुतेकांस माहित आहेच. महाबळेश्वरच्या भूमीचीं भोंवतालच्या खोऱ्यामध्यें गेलेलीं जीं टोंकें आहेत त्यांस पॉइंट ही संज्ञा आहे. हे पॉइंट येणेंप्रमाणें आहेतः—मुंबई पॉइंट, कार्न्याक पॉइंट, फॉकलंड पॉइंट, लाड्‌विक् अथवा सिडनी पॉइंट, हे माल्कम्‌पेठेच्या पश्चिमेस कोयना नदीच्या खोऱ्यानें आहेत. एल्फिन्स्टन् पॉइंट, आर्थर सीट, मलेट पॉइंट, हे क्षेत्रमहाबळेश्वराच्या पश्चिमेस सावित्रीच्या खोऱ्यानें आहेत. बाबिंग्‌टन् पॉइंट कोयना नदीच्याच खोऱ्यानें आहे, परंतु थेट दक्षिणेस आहे. माल्कम्‌पेठेच्या पूर्वेस केट पॉइंट व वेण्येचा धबधबा आहे. यांपैकीं कित्येक पॉइंटांचें वर्णन येथें लिहितों.

मुंबई पॉइंट माल्कम्‌पेठेपासून दोन मैलांवर रडतोंडीच्या घाटाच्या ऐन माथ्यावर आहे. मुंबईहून व कोंकणांतून घाटमाथ्यावर येतांना रडतोंडीच्या घाटानें चढून प्रथमतः मनुष्य मुंबई टोंकावर येतें ह्मणून त्यास "मुंबई पॉइंट" असें नांव दिलें आहे. ह्या टोंकावर उभें राहिलें ह्मणजे खालीं कोयना नदीचा खोरा तीन हजार फूट खोल आहे तो पाहून डोळे फिरूं लागतात. तसेंच थेट समोर इतिहासप्रसिद्ध व आपल्या शिवाजीराजाच्या चरित्रानें परिपूत झालेला प्रतापगडचा किल्ला जमिनीवरून नीट सुळ्यासारखा जात आहे तो नजरेस येतो. किल्ल्याच्या उजव्या बाजूस गर्द झाडीमध्यें लहानसें टुमदार पारगांव व पुढें पारघाट दिसतो. नंतर पारघाटाच्या

माथ्यावरून नवीन बांधलेली महाडची सडक नागिणीप्रमाणें नागमोडीनें उतरत येऊन कोयनेच्या खोऱ्यामध्यें अल्पकाळ-पर्यंत गडप झाल्याप्रमाणें होऊन नंतर मोठ्या डौलानें घाट-माथा चढत चढत महाबळेश्वरीं श्रीशंकराच्या गळ्यांत माळे-प्रमाणें वेष्टण घालण्यास जात आहे कीं काय असें वाटतें. आपल्या डाव्या अंगास लहान मोठ्या पर्वतांची अस्ताव्यस्त गर्दी पसरलेली असते. हें पर्वतमंडळ व तसेंच आपण उभे राहतों त्या बाजूस व उजवे बाजूस, पर्वतराज आहेत ते डोकीं उंच करून वीरश्रीनें लढण्यास अर्धरथी, एकरथी, महारथी असे उभे ठाकलेले असतात. परंतु सर्वांत ठेंगणा तथापि पुराणविख्यात अभिमन्युप्रमाणें चक्राकृति, दुर्धर, अतिरथी, जो **प्रतापगड**चा शैल तो सगळ्या गिरिवीरांस आपल्यापुढें अर्धचंद्राकार व्यूहरचनेनें उभे ठेऊन त्यांच्यावर पाहरा करीत आहे कीं काय असा भास होतो. आणि प्राकाररूप वीरभूषणें मस्तकीं परिधान करून, व सुळ्याचें खड्ग हातीं घेऊन, प्रतापगड या नांवानुरूप साक्षात् कृति करण्यास आवेशानें सिद्ध आहे कीं काय असें वाटतें. परंतु महावीरांचीं मनें जितकीं कठोर तितकींच मृदु असतात. "वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि" असें कविराज भव-भूति याचें वचन आहे. त्या वचनाप्रमाणें प्रातःकाळीं प्रताप-गडचा किल्ला पहाण्यास गेलें ह्मणजे त्या गिरिवीराची शोकावस्था दृष्टीस पडूं लागते. व जसें कांहीं पूर्वींचे दिवस आठवून, ज्या छत्रपतीच्या आश्रयानें आपलें संगोपन झालें, ज्या विख्यात राजाचे कारकीर्दींत आपल्या हातून महान् महान् पराक्रम होऊन स्वदेशबांधवांचें रक्षण व परदेशनिवाशां-चें खंडण होत असे, ज्या स्वदेशाभिमानी व आर्यधर्मप्रति-

पालक राजानें आर्यमातेच्या उद्धारार्थ यवनांचें पारिपत्य करीत असतां आपल्या हातून यथाशक्ति सेवा घेतली, व ज्या गुणग्राही वीरानें या आपल्या अल्प सेवेस देखील मोठा प्रताप समजून उदारपणानें "प्रतापगड" ही पदवी दिली, व प्राकारादि भूषणें आणि अलंकार बक्षीस दिले, व ज्या पुण्यश्लोक, ईश्वरपरायण आणि गोब्राह्मणप्रतिपालकांच्या निवासानें श्रीजगदंबेचे पाय आपल्या मस्तकीं लागून राजगुरु व साधुश्रेष्ठ रामदासस्वामी यांच्या आगमनाचा लाभ होत होता; तो छत्रपति, तो राजश्रेष्ठ, तो स्वदेशाभिमानी, तो आर्यधर्मप्रतिपालक, तो गुणग्राही, उदार, पुण्यश्लोक शिवराजा आतां नाहीं, त्याअर्थीं आपलें जिणें व्यर्थ आहे. अशा दुःखांत निमग्न होऊन "सूर्याच्या पोटीं शनैश्वर" याप्रमाणें निर्वीर्य, स्वदेशाभिमानशून्य, आर्यमातेस भाररूप, असे जे त्या शिवराजाचे वंशज त्यांचें मुखावलोकनही नको या हेतूनें हा वृद्ध, प्रतापवान् शैलवीर, मेघपटलरूप वस्त्रानें आपलें तोंड झांकून किंवा प्रातःकाळीं आमच्या सारख्यांचें तोंड पाहणें दुश्चिन्ह समजून दिनमणीचा प्रकाश पडेपर्यंत आपलें मुख दाखवीत नाहीं. सारांश, प्रतापगड पाहून विचारी पुरुषांच्या मनांत ह्या सर्व कल्पना आल्यावांचून रहात नाहींत.

नहराच्या पश्चिमेस तीन मैल लाड्विक् किंवा सिड्नी पॉइंट आहे. गतवर्षीं पर्यंत या टोंकास फक्त सिड्नी पॉइंट असें ह्मणत असत. हें नांव मुंबईचे माजी गव्हरनर सर सिड्नी बेक्विथ यांजवरून पडलें आहे. हे साहेब सन १८३१ सालीं महाबळेश्वरीं असतां मरण पावले. येथें त्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या सत्पत्नीनें व प्रियमित्रांनीं एक सुंदर चबुत्रा माल्कमपेठेच्या उत्तरेस वेण्णासरोवराजवळ बांधला आहे.

ही गोष्ट या ठिकाणीं लिहिण्याचा मुख्य हेतु असा आहे कीं आपल्या लोकांचा देवभोळेपणा कांहीं विचित्र आहे. बेकूविथ साहिबांच्या थडग्यापुढें दररोज ऊद जळून एक दोन नारळ फुटून नवस होत असतात. असो. ह्या सिड्नी पॉइंटावर सन १८२४ सालीं साताराचे रेसिडेंट कर्नल लाड्विक् साहेब हे प्रथमतः आले. यांच्या पूर्वीं महाबळेश्वरीं गोरे लोकांचा पाय मुळींच लागला नव्हता. यास्तव या टोंकास लाड्विक् पॉइंट ह्मणणें हें उचित होतें. तथापि गतवर्षीं पर्यंत ही गोष्ट घडून आली नाहीं. अखेरीस लाड्विक् साहेबांचे चिरंजीव हल्लीं मद्रासेस अकौंटन्ट जनरल आहेत त्यांणीं या बाबतींत मुंबई सरकारास लिहिल्यावरून सरकारानें त्यांचें ह्मणणें मान्य केलें. व लाड्विक् पॉइंट हें नांव कायम केलें आहे. अलीकडेस कर्नल लाड्विक् साहेबांचे चिरंजीवांनीं या टोंकावर जाण्याच्या रस्त्याला वडिलांच्या नांवानें एक चबुत्रा बांधला आहे.

या पॉइंटाकडे जातांना रस्त्यानें तीन मैल पर्यंत दुतर्फा झाडी आहे, कित्येक जागीं वृक्षांची इतकी गर्दी आहे कीं सूर्याचे किरणाचा प्रवेश बिलकूल होत नाहीं. व भर दोनप्रहरीं सायंकाळ झाल्याचा भास होतो. मार्गानें सपाटी ह्मणून अगदीं नाहीं. दोडकोस पर्यंत जातांना एकसारखी खोल खोल व कित्येक ठिकाणीं अगदीं घसरती उतरण लागते. उतरण उतरून कोयनेच्या खोऱ्याच्या किनाऱ्यावर गेलें ह्मणजे ज्याप्रमाणें लीलेनें हत्ती शुंडा समोर करतो त्याप्रमाणें पर्वताची पाव मैल पर्यंत लांब, बारीक, टोंकदार, भूशलाका एकदम खोऱ्यामध्यें घुसते. या शुंडेवरून जातांना मार्ग कांहींसा नागमोडीसारखा चिंचोळा असून दोन्ही बाजूनें सुमारें तीन

तीन हजार फूट खोऱ्याची खोली आहे. यास्तव जाणारा आपल्या जिवाला भीत भीत व चक्कर येण्याच्या धास्तीनें, बाजूला न पाहतां कित्येक ठिकाणीं काठी टेंकित टेंकित या सोंडेच्या अग्रभागीं गेला म्हणजे तेथें फक्त बारा फूट रुंदीचे टोंकावर येऊन पोंचतो. या टोंकास आपले लोक डोमेश्वर म्हणतात. या ठिकाणाहून जो कांहीं अद्भुत चमत्कार दृष्टीस पडतो त्याचें वर्णन देतां येत नाहीं. पाहणारांच्या मनासच विचारलें पाहिजे. वृक्षवनस्पतींचा हिरवागार अफाट समुद्र पुढें पसरलेला असतो. त्यांत शपथेला बोटभर देखील जागा हिरव्या रंगाखेरीज दिसत नाहीं. व हें हिरवें मैदान समोंवतील पर्वतांच्या कोंडमाऱ्यांतून निघून मोठें होत होत अखेरीस क्षितिजास जाऊन भिडतें. या चमत्कारानें क्षुद्र जंतुवत् पाहाणारे जे आपण त्यांची दृष्टि अगदीं फांकून जाते. पायांखालीं तीन हजार फुटींची भिंत उभी पाहून नजर ठरत नाहीं. झोंक गेला तर रसातळास जाण्याची भीति असते. डावे बाजूस मुंबई पॉइंठ व प्रतापगडचा सुळा उघडाबोडका उभा असतो. पुढें कांहीं अंतरावर एकमेकांबरोबर युद्ध करण्यास महान् राक्षस उठल्याप्रमाणें कोणी वांकडा तिकडा, कोणी नीट, कोणी दुसऱ्याच्या अंगावर रेलला आहे, कोणी झोंबी खेळण्यास जात आहे, असे डोंगर दृष्टीस पडतात. उजवे बाजूस एल्फिन्स्टन् पॉइंट व खालीं सावित्रीचा खोरा आपल्याकडेस डोकाऊन पाहत असतो.

या चमत्कारातिशयांत निमग्न होऊन कांहीं वेळ उभें राहिलें तर आकाशांत व भूमीवर मेघाच्या क्रीडा व विहार चाललेले असतात ते दृष्टीस पडतात. मे महिन्यामध्यें ढग येण्याचें सुरू झालें म्हणजे प्रातःकाळीं आकाशांत ढगांची

इतकी गर्दी होते कीं कांहीं एक मोठें भयंकर बंड चाललें आहे, असा भास होतो. कित्येक ढग निवळ काळे व कित्येक अर्धवट काळे व पांढरे असतात. कित्येकांचा रंग काय आहे हें सांगतां येत नाहीं. कारण, क्षणोक्षणीं रंग पालटून बारीक पिंजलेल्या कापसाचा निर्मळ शुभ्रपणा व काजळाचा सतेज काळेपणा या दोहींचें मिश्रण होऊन चित्र-विचित्र प्रकार होत असतात. कित्येक ढग गजाकृति, कित्येक अजगरासारखे, व कित्येक तुकडे केलेल्या सर्पासारखे अगणित रूपें व अगणित वेष धारण करून अनेक प्रकारच्या क्रीडा व युद्धें स्वेच्छयैव करीत असतात; कित्येक मेघ पर्वतांच्या मस्त-कावर जाऊन स्वस्थ बसल्याप्रमाणें, किंवा हात पाय ताणून निजल्याप्रमाणें दृष्टीस पडतात; व असें एक एक तास पर्यंत डोंगरास समूळ आच्छादून टाकितात. कित्येक ढग डोंगरा-च्या तटावर हत्तीप्रमाणें उभे राहून हिरव्यागार झाडीवर चरत आहेत असें वाटतें. लहान लहान मेघबालकें दऱ्याखोऱ्यांतून चैनेनें फिरत असतात. हा बंडावा सूर्य वर येऊन किरणें पडूं लागत तों पर्यंत चालतो. नंतर कांहीं अतिविलक्षण तऱ्हा होऊं लागते. सूर्याचीं कोंवळीं कोवळीं किरणें व रमणीय रक्तवर्ण तेज हीं कृष्ण व शुभ्र मेघामध्यें मिश्रित होऊन जो कांहीं चमत्कार दृष्टीस पडतो तो कोणाच्यानें वर्णन करवेल ? पुढें सूर्याचीं किरणें प्रखर होत चाललीं ह्मणजे मेघमंडळाम-ध्यें एकदम पळापळ सुटते, व ज्याला जिकडे वाट फुटेल तिकडे तो जातो. कित्येक तर सूर्याला न भितां हठवादानें पर्वतासारखे निश्चळ उभे राहतात. शेवटीं रवीचा सप्ताश्वरथ मेघपर्वतांना भेदून बोगद्यांतून आगगाडी बाहेर येतांच एंजिनाच्या धुराचा लोट आकाशांत वेगानें जातो, त्याप्रमाणें

मेघांच्या चिंध्या चिंध्या होऊन आभाळांत मिसळून जातात. व वनस्पतीनें आच्छादित पर्वताच्या हिरव्यागार तटावर मेघ फिरत असतात त्यांची विलक्षण गमत दिसूं लागते. वृक्षांच्या हिरव्या मैदानावर चोहोंकडे ऊन पडलें असून मध्येंच ढगांच्या छायेचे काळे डाग दिसूं लागतात, व ढगें लोंबत राहून जिकडे जिकडे फिरतात तिकडे तिकडे त्यांची छायाही जात असते; आणि किरणांचा आंत प्रवेश होऊन ढग फुटून वितळूं लागले ह्मणजे त्यांची छाया इतक्यांत वर्तुळाकार, इतक्यांत चाळणीसारखी, अशी होऊन बोलतां बोलतां नाहींशी होते. यासमयीं किंचित् वारा सुटला ह्मणजे पर्वतांच्या शिखरावरचे मेघ कविरत्न जो **कालिदास** याणें 'मेघसंदेशां'त वर्णन केल्याप्रमाणें शैलाचे अग्रभाग घेऊन पळून जात आहेत असें वाटतें, व कोणी स्त्रीजन हा चमत्कार अवलोकन करित असल्या तर कालिदासाच्या श्लोकाची आठवण होऊन कविवचन किती रसभरित आहे याचा तात्काळ अनुभव येतो:—

अद्रेः शृंगं हरति पवनः किंस्विदित्युन्मुखीभि-
र्दृष्टोत्साहश्चकितचकितं मुग्धसिद्धांगनाभिः ।
स्थानादस्मात्सरसनिचुलादुत्पतोदङ्मुखः खं
दिङ्नागानां पथि परिहरन् स्थूलहस्तावलेपान् ॥

या श्लोकाचे अखेर चरणांत दिग्गजाची उपमा मेघास दिली आहे. तिचें सार्थत्व घडोघडी महाबळेश्वरीं अनुभवास येतें. 'मेघदूता'चे प्रारंभीं यक्षानें मेघास पाहिलें आहे, त्या विषयीं कवीची उक्ति अशी आहे कीं:—

आषाढस्य प्रथमदिवसे मेघमाश्लिष्टसानुं
वप्रक्रीडापरिणतगजप्रेक्षणीयं ददर्श ॥

याचा भावार्थ असा आहे कीं, आषाढाच्या प्रथम दिवशीं

यक्षानें एक मेघ पाहिला. तो जसा कांहीं हत्ती वप्रक्रीडा करीत, ह्मणजे सरोवरांतून बाहेर आल्यावर सरोवराच्या तटास गंडस्थळाचा टेंका देऊन वर माती फेंकीत आहे असा दिसला. महाबळेश्वरीं हा चमत्कार दृष्टीस पडावयास आषाढ महिन्याची जरूरी लागत नाहीं. सारांश, दीड प्रहर दिवसाचे सुमारास ऊन चांगलें पडलें ह्मणजे ढग वितळून नाहींसे होतात तेव्हां कालिदासानें दिलेलें मेघाचें लक्षण हुबेहूब जुळतें, आणि

धूमज्योतिःसलिलमरुतां संनिपातः क्व मेघः ॥

असे जे ढग 'त्यांची उत्तरोत्तर कशी दशा होत जाते हें पुसाल तर

खिन्नः खिन्नः शिखरिषु पदं न्यस्य गंतासि यत्र
क्षीणः क्षीणः परिलघु पयः स्रोतसां चोपभुज्य ॥

तसेंच सायंकाळीं पाऊस येण्याचा सुमार असला तर आकाशतळावर कवीनें लिहिल्याप्रमाणें "स्निग्धभिन्नांजनाभैः" अशा मेघांची सतेज काळी पैठणी पसरल्या सारखी दिसते. सारांश,

जानामि त्वां प्रकृतिपुरुषं कामरूपं मघोनः ॥

या चरणांत "कामरूप" ह्मणजे इच्छारूप धारण करणार असें जें यक्षानें मेघदूतास विशेषण दिलें आहे तें अक्षरशः सत्य आहे.

मे महिन्याच्या शेवटीं शेवटीं धुकें येऊं लागतें त्या वेळीं जो चमत्कार दृष्टीस पडतो तो फार विलक्षण असतो. धुकें येऊं लागलें ह्मणजे पंधरा मिनिटांच्या आंत आकाशांतून बारीक पिंजलेल्या शुभ्र कापसासारखी चहूंकडून वृष्टी होऊं लागते व त्या योगानें भररस्त्यांत एक हाताच्या अंतरावरचें

देखील मनुष्य दिसत नाहीं; व पर्वत, खोरे, वृक्ष, पाषाण, वगैरे सर्व आच्छादिले जाऊन जळप्रळयांत जग बुडतें ह्मणून ह्मणतात त्याप्रमाणें धुक्याच्या प्रळयांत महाबळेश्वर अल्पकाळपर्यंत बुडालेलें असतें.

एल्फिन्स्टन् पॉइंट हें टोंक माल्कमपेठेहून सहा मैल व क्षेत्रमहाबळेश्वराहून एक दीड मैल आहे. या टोंकाचें नांव नामदार माउंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन् साहेब यांच्यावरून पडलें आहे. स्यानिटेरियम्‌करितां जागा प्रथमतः या ठिकाणीं कायम करण्याचा बेत होता. परंतु पाण्याची कमताई असल्या कारणानें माल्कमपेठ येथें पुढें बंगला बांधला. हा पॉइंट एका अजस्र कड्याचे टोंकावर असून, खालीं भयंकर कोयनेच्या खोऱ्याची एक तीन हजार फूट खोल घळ आहे. या टोंकावरून डोकावणें फार धैर्याचें काम आहे, कारण खालीं जो भव्य व भयानक प्रकार दिसतो त्याला उपमा नाहीं. या घळीचे समोर प्रतापगडचा किल्ला उभा आहे. तसेंच सावित्रीनें महाबळेश्वराच्या मस्तकांतून निघून ज्या चिंचोळ्या खोऱ्यामध्यें धाडकन चार हजार फूटीचे उंचीवरून उडी टाकिली आहे त्या खोऱ्याचा प्रांतभाग एल्फिन्स्टन् पॉइंटाचे उत्तरेस आला आहे; व पश्चिमेस समुद्रसुशोभित कोंकणपट्टी सरधोपट पसरली असून त्यावरील लहान लहान डोंगर व टेंकड्या अस्ताव्यस्त फेंकल्यासारख्या दिसतात. ह्या टेंकड्या कित्येक काळ्या, बहुतेक भुऱ्या, व मधून मधून हिरव्या दिसतात. व हा किंचित् उंच सखल प्रदेश उत्तरोत्तर अफाट पसरत जाऊन क्षितिजाशीं मिळाला ह्मणजे, आकाशाचे भिंतीला अपरंपार गल्था मारल्याप्रमाणें दिसतो. व नभस्तलापासून ह्या गल्थ्याचा फुगीर भाग किंचित् पुढें येऊन त्याचा रंग नीलव-

र्ण, पांढुर व कोठें कोठें गुलाली झाकीचा असतो. हा गल्या समुद्राच्या पाण्याचा होय. समुद्र व घाटमाथा यांजमध्यें तीस पस्तीस मैलांचें अंतर असल्यामुळें समुद्राचें पाणी दुर्भिणीनें पाहिल्याखेरीज ओळखतां येत नाहीं. शिवाय ऊन असल्यास रविकिरणें मध्यें आल्यानें, परावर्तनादि व्यापार मेघमिश्रित वातावरणांत होऊन समुद्राच्या पाण्याचा विस्तीर्ण ढीग कांहीं एक विलक्षण रंगाचा दिसतो; व या उदकाची लंबायमान रेखा पश्चिमेचे आभाळामध्यें ढळढळीत दिसत असते.

या पॉइंटाचे उत्तरेच्या बाजूस खालीं सावित्रीच्या खोऱ्यामध्यें व पलीकडे, अजमासें पन्नास पाऊणशें पर्वतांची पंक्ती उभी आहे. तिच्या भयंकर व अक्राळ विक्राळ स्वरूपाचें वर्णन करवत नाहीं. दहा दहा पर्वतांची एक एक ओळ याप्रमाणें कित्येक ओळी बसल्या आहेत. प्रत्येक डोंगर एकमेकापासून भिन्न असून, मस्तकाचा नीट अणकुचीदार सुळा वर गेलेला असतो, व शिवाय दोन्ही बाजवा करवताच्या धारेसारख्या खालपावेतों पोंहचल्या असतात. या ठिकाणीं वनस्पतीचा लेश देखील नाहीं, व एखाद्या किल्ल्याच्या कपाटावर चोचीदार लंगरी खिळ्याच्या रांगी असतात तद्वत् नागवें बोडकें, व मस्तकसहित सर्वांग भादरलेलें, जळकें, काळेंकुळकुळीत, व मधून मधून किंचित् भुरे अशा प्रकारचे जे हे डोंगर त्यांचें उग्र व रौद्र स्वरूप पाहून, पाहणारांचें हृदय खरोखर भयाभीत व चंचल होऊन दृष्टि स्थिरपणें ठरत नाहीं, व मनांत कल्पना येते कीं, मेघराज जो मघवा ह्मणजे इंद्र यानें पर्जन्यवृष्टीच्या वेळेस अवज्ञा करून वृष्टि न करणारे जे मेघ त्यांना सुळीं देण्याकरितां एक भयंकर यंत्र तयार केलें आहे कीं काय? अथवा

इंद्रानें पर्वतांचे पक्ष कापण्याकरितां या ठिकाणीं बर्च्या जमवून ठेविल्या आहेत कीं काय? पण हल्लीं पर्वतांना पक्ष नाहींत त्या अर्थीं बर्च्या कशास पाहिजेत असें वाटलें तर कवी **भारवि** यानें 'किरातार्जुनीय'काव्यांत हिमालयाचें वर्णन केलें आहे तें असें कीं:—

अविरतोज्झितवारिविपांडुभि-
र्विरहितैरचिरद्युतितेजसा ।
उदितपक्षमिवारतनिस्वनैः
पृथुनितंबविलंबिभिरंबुदैः ॥

अशा प्रकारच्या पक्षांचें छेदन करण्यास ह्या बर्च्या समर्थ आहेत. सारांश, सर्व महाबळेश्वरापेक्षां या ठिकाणीं जो चमत्कार विशेष दृष्टीस पडतो तो खरोखर अवर्णनीय आहे. मेघमंडळास भिडणारे उंच पर्वत, व त्यांच्या पायथ्यासभोंवतीं हजारों फूट खोलीचे खोरे, कित्येक अगदीं चिंचोळे नळीप्रमाणें असून वरून कड्यानें आच्छादित असल्यामुळें आंत सूर्याचा प्रवेश न होतां, अंधकार व तशांत निबिड छाया असते असें, कित्येक मगराप्रमाणें भयंकर तोंडें वासीत जाऊन पुढें अफाट मैदानें जाऊन मिळतात असे, आणि या खोऱ्यांमध्यें पर्वतांतून उत्पन्न होऊन, अजस्र कड्यावरून हजारों फूट खालीं उड्या घालून ज्या नद्या,

विविधकामहिताः सहितांभसः
स्फुटसरोजवना जवना नदीः ॥

इत्यादि भारवि कवीनें वर्णन केलेल्या लक्षणांनीं अन्वित होऊन देशसमृद्धीस कारण होतात; त्यांची पात्रें सर्पाकृति व उन्हाळ्यांत शुष्क आणि जलशून्य दिसत असतात, तीं व ज्या कड्यावरून ह्या नद्या उड्या टाकितात त्या कड्याला

हजारों वर्षांपासून पडलेले विस्तीर्ण घट्टे दिसतात ते, तसेच भगवान् परशुराम यांच्या चरणसंयोगानें व पुण्यचरित्रेंकरून पवित्र झालेलीं समुद्रतीर व ती सपाट भूमि, व तिजवर बाळ-डोंगर सोंगट्यांप्रमाणें दिसतात ते, व पुढें चित्रविचित्र मेघ-कांतिवत् समुद्रोदकाची राशी क्षितिजावर प्रकाशमान असते ती; इकडे पर्वतावर ब्रह्मारण्यांत तपोवनामधील वृक्षसंमर्द, पूरातन तपश्चर्येचीं स्थानें, दऱ्या व गुहा इत्यादि यांचा एकत्र समुच्चय एकसमयावच्छेदेंकरून दृष्टिगोचर होतो तेव्हां जो लोकोत्तर, निरतिशय, व अमानुष चमत्कार आणि जी सृष्टीची नैसर्गिक स्थिति साक्षात् नेत्रासमोर येते तिजकडे लक्ष दिलें ह्मणजे पाहणारांच्या अंतःकरणाची वृत्ति काय होते हें त्यासच विचारिलें पाहिजे. कितीही मोठा पाषाणहृदयी नास्तिक असला तथापि या ठिकाणीं आणून त्यास उभें केलें तर निमिषमात्राचा अवकाश न लागतां सर्व पाखंड भंग होऊन तो ईश्वरपरायण होईल यांत किंचित् संदेह नाहीं. आपल्यासारख्याच्या तर ऊर दडपून गेल्याप्रमाणें होतो, आणि गर्व असल्यास सर्व हरण होऊन लीन व नम्र वृत्ति होते. जिकडे पाहावें तिकडे ईश्वर दिसूं लागतो व अंतर्यामींची गडबड नाहींशी होऊन विचारास अवसर सांपडला ह्मणजे वाटतें कीं, जगदीश, जगन्नियंता, जगत्प्रतिपालक, सर्वज्ञ, सर्वसाक्षी, सर्वशक्ति, अनादि, अनंत, निराकार, निर्विकार असा जो प्रभु त्याचा अपार महिमा व अगाध लीला किती आहे बरें? व आपण किती क्षुद्र व आकिंचन आहोंत? परंतु आपलें सामर्थ्य तर कांहींच नाहीं. महान् महान् राजे व योद्धे, ज्यांनीं शेंकडों वर्षें राज्य करून दिगंतरीं कीर्ति मिळविली त्यांचीही दुर्दशा आपल्याप्रमाणेंच आहे. या गोष्टीचें प्रत्यंतर या ठिकाणीं

तात्काल दिसून येतें. तें असें कीं, कमळगड, प्रतापगड, व पुरंदर हे तीन किल्ले एथून दिसत असतात. मुसलमानांचें राज्य असतां या प्रांतीं विजापूरकरांचें ठाणें कमळगडावर असे. पुढें मराठ्यांनीं यवनांचा पराभव करून प्रतापगडीं आपलें ठाणें केलें. नंतर पेशव्यांनीं राजश्री भोगून पुरंदरास एकाअर्थी आपलें माहेरघर केलें होतें. परंतु कोठें ते यवन, मराठे व पेशवे गेले त्यांचा पत्ता नाहीं. त्यांणीं या ठिकाणीं राजविलास भोगले, शूरकृत्यें केलीं आणि यावच्चंद्रदिवाकर आपली सत्ता चालावी ह्मणून मजबूत व दुर्गम किल्ले बांधले. पण हल्लीं ते किल्ले धुळीस मिळत चालले आहेत, व सर्व राजसत्ता प्रस्तुतच्या राज्यकर्त्यांस प्राप्त होऊन त्यांनींही या ठिकाणीं नहरास विलासाचें स्थान कायम केलें आहे तेवढें मात्र शोभायमान दिसतें. बाकीच्यांचा लय झाला. तस्मात् हे ईश्वरा, आह्मी मर्त्य, अकिंचन, अनभिज्ञ मानव आहोंत. आमचें तुझ्या अमानुषशक्तीपुढें काय सामर्थ्य? तुझा परम मित्र व भक्त जो अर्जुन त्यानें विश्वस्वरूप पाहिल्यानंतर तुझा स्तव केला आहे या प्रमाणें तूं आहेस; ह्मणजे:—

त्वमादिदेवः पुरुषः पुराण-
स्त्वमस्य विश्वस्य परं निधानम् ।
वेत्तासि वेद्यं च परं च धाम-
स्त्वय्याततं विश्वमनन्तरूपम् ॥

ह्मणून, नमो नमस्तेऽस्तु सहस्रकृत्वः
पुनश्च भूयोऽपि नमो नमस्ते ॥

या प्रकरणाचे शेवटीं इंग्लिश भाषा जाणणारे मित्रांस हें सांगणें आहे कीं, वर्डस्वर्थ कवीचें 'एक्सकर्शन' नांवाचें काव्य कितीएक जागीं अर्थ समजण्यास फार कठीण ह्मणून

हाकाहाक आहे. परंतु महाबळेश्वरचे चमत्कार पाहिले म्हणजे कवीचा अर्थ स्पष्ट लक्षांत येतो. हा अर्थ मनांत समजण्याचाच आहे. प्रगट करण्याला कवीजनाला देखील सुलभ नाहीं. वर्ड्स्वर्थ कवीनें लिहिलें कीं:—

The clouds were touch'd,
And in their silent faces did he read
Unutterable love. Sound needed none,
Nor any voice of joy ; his spirit drank
The spectacle ; sensation, soul, and form
All melted into him ; they swallow'd up
His animal being ; in them did he live,
And by them did he live: they were his life.
In such access of mind, in such high hour
Of visitation from the living God,
Thought was not ; in enjoyment it expired.
No thanks he breathed ; he proffer'd no request;
Rapt into still communion that transcends
The imperfect offices of prayer and praise,
His mind was a thanksgiving to the Power
That made him ; it was blessedness and love.
He had early learn'd
To reverence the volume which displays
The mystery—the life which cannot die:
But in the mountains did he *feel* his faith ;
There did he see the writing—all things there
Breathed immortality, revolving life,
And greatness still revolving, infinite ;
There littleness was not ; the least of things
Seem'd infinite ; and there his spirit shaped
Her prospects, nor did he believe,—he *saw.*
What wonder, if his being thus became
Sublime and comprehensive ? Low desires,
Low thoughts had there no place ; yet was his heart

Lowly ; for he was meek in gratitude ;
Oft as he call'd those ecstacies to mind,
And whence they flowed : and from them he
acquired
Wisdom, which works through patience ; thence
he learn'd
In many a calmer hour of sober thought,
To look on Nature with a humble heart,
Self question'd where he did not understand,
And with a superstitious eye of love.

Wordsworth. *Excursion.* Book I.

इंग्लंड देशांतील चमत्कार पाहून मनावर ग्रह होतो त्याचें हें वर्णन झालें. परंतु एका विद्वान् अनुभवी इंग्लिश गृहस्थानें सांगितलें आहे कीं, हिंदुस्थानांत जे चमत्कार दृष्टीस पडतात त्यांच्याशीं साम्य केलें असतां विलायतेच्या चमत्कारांची फार थोरवी वाटत नाहीं.

# भाग २,–क्षेत्रमाहात्म्य.

क्षेत्रमहाबळेश्वर हें नहरापासून चार पांच मैलांवर आहे. गांवामध्यें, घरें सुमारें तीसपासून चाळीसपर्यंत असतील. सर्व वस्ती देशस्थब्राह्मणांची व गुरवांची आहे. शिवाय कोळ्यांचींही कांहीं घरें आहेत. ब्राह्मण तीर्थउपाध्ये होऊन राहिले आहेत. गुरवाकडे गांवची पाटीलकी व महाबळेश्वराची पूजा असते; आणि कोळी लोक हे कृष्णेवरचे एक प्रकारचे वतनदार ह्मणजे गंगापुत्र होत. कृष्णेच्या पाण्यांत दक्षिणा वगैरे टाकतात त्यावर मालकी कोळ्यांची असते. गांव फारच लहान आहे, व सर्व देवालयें व तीर्थें एकापुढें एक सुमारें हजार हातांच्या जाग्यामध्यें आहेत. त्यांचीं नांवें महाबळेश्वरक्षेत्रवर्णनांत येणेंप्रमाणें लिहिलीं आहेतः—

सह्याद्रिमस्तके गंगाः पंच ज्ञाताः सुपुण्यदाः ।
तद्वत्तस्मिन्ब्रह्मतीर्थं विष्णुतीर्थं तदग्रतः ॥
तदग्रे रुद्रतीर्थं च चक्रतीर्थं तदग्रतः ।
तदग्रे हंसतीर्थं च तीर्थं चारण्यसंज्ञकम् ॥
मलापहं तस्य वामे चाष्टमं पितृमुक्तिदम् ।
तथा महाबलः शंभुर्द्वितीयोऽतिबलेश्वरः ॥
कोटीश्वरः क्षेत्रपालस्तथा धूर्जटिरीश्वरः ।
अरण्येष्वपि लिंगानि दिव्यदेवमयानि च ॥

"सुपुण्यदाः" पंचगंगा सांगितल्या आहेत त्या कृष्णा, वेण्या, ककुद्मती ह्मणजे कोयना, सावित्री आणि गायत्री ह्या होत. कृष्णा, वेण्या व कोयना ह्या दक्षिणेंत संचार करून पूर्वसमुद्रास ह्मणजे बंगालचे उपसागरास मिळतात. कृष्णेचा व वेण्येचा संगम सातार्‍याचे पूर्वेस तीन कोसांवर माहुली येथें

झाला आहे. कोयनेचा व कृष्णेचा संगम साताऱ्याचे दक्षिणेस कऱ्हाड येथें झाला आहे. या संगमास प्रीतिसंगम असें ह्मणतात. चौथी नदी सावित्री ही पश्चिमवाहिनी होऊन पश्चिमसमुद्रास ह्मणजे आरबी समुद्रास बाणकोटचे खाडीजवळ मिळते. पांचवी गंगा गायत्री होय. ही अदृश्य आहे. हिचा प्रवाह वगैरे कांहीं नाहीं.

या पांचही नद्यांचे उगम एका लहानशा टेंकडीमध्यें आहेत. तिच्यांतून सदोदित स्वयंभू पाण्याचा मोठा झरा वाहत असतो. ही टेंकडी मातीची आहे व तिच्यामध्यें पांच मोठमोठे कोनाडे खोदले आहेत. त्यांतून पांच प्रवाह निघतात, ते पंचगंगेचे होत. क्षेत्रस्थ लोक असें सांगतात कीं पंचगंगा प्रथमतः महाबळेश्वराच्या मस्तकांतून निघून ह्या टेंकडींतून बाहेर निघाल्या व पुढें आपआपल्या मार्गानें देशक्रमणास गेल्या. या ह्मणण्यास क्षेत्रमाहात्म्याचा आधार आहेः—

एवं च ता महानद्यः प्रभूताः सह्यमस्तके ।
तदा महाबलेशस्य मूर्धतः सहसोद्गताः ॥
तथा चाश्वत्थमूलात्ताः पंच गंगाः पराः शुभाः ।
ब्रह्मतीर्थसमीपस्थाः प्रकटा गोमुखे ववुः ॥

तथापि वास्तविक पाहिलें असतां या पर्वताच्या माथ्यावर चोहोंकडे पाणी खेळत आहे. त्यास अमुक नियमित स्थळीं पंचगंगांची उत्पत्ति आहे असें न ह्मणतां सर्व सह्याद्रीचे मस्तकांतून ह्या नद्या निघतात ही गोष्ट सत्य आहे.

वर जी टेंकडी सांगितली ती वरचे आंगून व इतर बाजूनें, चिरेबंदी दगडांनीं बांधून काढली आहे. परंतु वरील श्लोकावरून असें अनुमान दिसतें कीं, पूर्वीं या ठिकाणीं अश्वत्थ वृक्ष

असावा व हल्लीं टेंकडी आहे ही जागा अश्वत्थाच्या पाराची असावी. टेंकडीच्या दोन्ही बाजूनें उत्तम चिरेबंदी दगडांच्या धर्मशाळा बांधल्या आहेत. या धर्मशाळांच्या मधोमध व टेंकडीसमोर, दोन सुंदर कुंडें आहेत. धर्मशाळांमध्यें कित्येक बैरागी लोक राहत असतात व कुंडांत स्नानें करून संध्यावंदन, पूजा इत्यादि कर्में करण्यास ब्राह्मण लोक धर्मशाळेंत बसतात. या इमारतीचें काम सुमारें १२५ वर्षांपूर्वी **अनगळ** या नांवाच्या एका धर्मात्म्या सावकारानें बांधलें. कुंडासमोर एका चिऱ्यावर खालील लेख आहे, त्यावरून सावकाराचें नांव कळतें:--

॥ कृष्णा, वेण्या, ककुद्मति, गायत्री व सावित्रीचे चरणीं तत्पर परशुराम नारायण अनगळ ॥

ह्या पुण्यवान् परशुरामपंताचे वंशज अद्यापि साताऱ्यास आहेत. परशुरामपंतानें धर्मशाळा बांधल्या, परंतु मधल्या दोन कुंडांवर कांहीं आच्छादन घातलें नव्हतें. कारण तसें केल्यास उजेड व हवा येण्यास मार्ग बिलकुल राहणार नाहीं. परंतु येणें करून वाऱ्यापावसाचा बराच उपद्रव होत असे. यास्तव सन १८७२ सालीं जमखिंडीकरांनीं बराच पैसा खर्च करून धर्मशाळांवर जाळीदार विलायती लोखंडी पत्र्याचें आच्छादन घातलें आहे.

वर जे पंचगंगेचे पांच प्रवाह सांगितले ते पूर्वाभिमुख वाहतात. या शिवाय उत्तरेस आणि दक्षिणेस दोन प्रवाह आहेत. उत्तरेच्या प्रवाहास भागीरथी व दक्षिणच्या प्रवाहास सरस्वती असें ह्मणतात. बारा वर्षांनीं कन्यागतामध्यें भागीरथी कृष्णेस भेटावयास येते त्यावेळीं मात्र भागीरथीचें पाणी वाहतें; तसेंच साठ वर्षांनीं कपिलाषष्ठीचे दिवशीं सरस्वती

गायत्रीस भेटण्यास येते तेव्हांच सरस्वतीचा प्रवाह वाहूं लागतो अशी कथा आहे. यास आधार क्षेत्रमाहात्म्यांतील खालील श्लोकांचा आहे:—

तदारभ्यात्र गंगापि गुरौ कन्यागते सति ।
द्वादशैर्द्वादशैर्वर्षैरायाति कृष्णया सह ॥
सरस्वती च गायत्र्या संयोगं यातुमिच्छति ।
प्रयागक्षेत्रसंभूता उत्तराभिमुखी सरित् ॥

तथापि या नियमित वेळांखेरीज सरस्वती व भागीरथी यांच्या कोनाड्यांतून पाणी येत नाहीं हें ह्मणणें निराधार आहे. पण लोकांचा भाव असा आहे यांत संशय नाहीं.

हे दोन कोनाडे व पंचगंगेचे पांच कोनाडे यांच्या तोंडाशीं दगडाचा दक्षिणोत्तर पाट बांधला आहे. त्यांत सातही प्रवाहांचें पाणी जमून नंतर दुसऱ्या एका पाटानें गायमुखाचे द्वारा मुख्य कुंड ह्मणजे ब्रह्मकुंडांत पडतें. महाबळेश्वरीं मुख्य माहात्म्य ब्रह्मतीर्थाचेंच आहे. उगमस्थानीं श्रीकृष्णेचें स्नान, पूजा, व तीर्थविधि इत्यादि सत्कृत्यें ह्या तीर्थावर होतात. इतर कुंडांत कोणी कधींही स्नान करीत नाहीं.

ब्रह्मकुंडाला लागूनच पुढें विष्णुकुंड आहे. नंतर उगममंदिरांतून बाहेर निघाल्यावर लागलेंच डावे बाजूस रुद्रतीर्थ आहे. पुढें उजवे बाजूस नहराचा रस्ता संपतो तेथें चक्रतीर्थ आहे. नंतर बरेंच लांब गेल्यावर रस्त्याचे उजवे बाजूस अतिबळेश्वराचें देऊळ, आणि त्याचे समोर डावे बाजूस महाबळेश्वराचें देवालय आहे. अतिबळेश्वराचे देवालयांत हंसतीर्थ आहे व पुढें बरेच अंतरावर कृष्णेच्या खोऱ्याला अगदीं लागून एक जुनाट देऊळ आहे. त्यांत प्रस्तुत देव वगैरे कांहीं नाहीं. हें कदाचित् तीर्थमाहात्म्यांत सांगितलेलें कोटी-

श्वराचें देवालय असेल. त्याचे समोर एक कुंड आहे. त्यास पितृमुक्तिकुंड ह्मणतात. श्राद्धाचे पिंड वगैरे यांत विसर्जन करणें विहित आहे. परंतु पिंडाच्या राशींच्या राशी पडून कुजलेल्या अन्नाची दुर्गंधि सहन होईनाशी झाली तेव्हां-पासून या कुंडाचे डावे बाजूस अगदीं एकीकडे अरण्यकुंड ह्मणून आहे त्यांत पिंड टाकण्याचा परिपाठ पडला आहे. पितृमुक्तिकुंडाचे उजवे बाजूस मलापहतीर्थ आहे. या कुं-डाचा फार दिवसांपासून पत्ता नव्हता. परंतु सन १८७३ सालीं एका बैराग्यास सहज जमीन खणतांना तें सांपडलें. क्षेत्रस्थ लोक सांगतात कीं, ब्रह्मतीर्थांतून कृष्णा नदी निघून पितृमुक्तितीर्थांत आली व नंतर त्या तीर्थास लागूनच दोन हजार फूट खोल विस्तीर्ण व भव्य पूर्वाभिमुख खोरा आहे त्यांत उडी टाकून देशपर्यटणास गेली. कृष्णा उडी टाकते त्या ठिकाणाहून पावसाळ्यांत मोठा पाण्याचा धबधबा असा-वा यांत शंका नाहीं. परंतु उन्हाळ्यामध्यें फक्त करांगुलीएवढी धार झुळझुळ वाहत असते. ती बुद्ध्या पाहिल्याखेरीज दिसत देखील नाहीं. खोऱ्याचे अगदीं पायथ्याशीं दगडाचें एक देवालय आहे तें धूर्जटीश्वराचें स्थान होय. या ठिकाणीं दर्शनास जाणारे लोक फार विरळा. या प्रमाणें अष्टतीर्थें व चार देवता तीर्थमाहात्म्यांत सांगितल्या आहेत त्या होत.

या ठिकाणीं मुख्य देव कृष्णाबाई व महाबळेश्वर हीं आहेत. क्षेत्रवर्णनांत कृष्णाबाईच्या स्नानाचें माहात्म्य कन्या-गतांत मोठें सांगितलें आहे:—

गुरौ कन्यागते जाते यात्रां कुर्वन्ति ये जनाः ।
तेषां दारिद्र्यदुःखं च नाशमायातु नित्यशः ॥

यामुळें आसपासचे व आगगाडीच्या योगानें लांबलां-

यचे लोक देखील कन्यागतामध्यें कृष्णास्नानाकरितां या ठिकाणीं येतात. प्रतिवर्षी फाल्गुनमासीं येथें मोठा उत्साह होत असतो. काशीपेक्षांही या क्षेत्रांचें माहात्म्य जवभर अधिक आहे असें क्षेत्रवर्णनांत लिहिलें आहे:---

काशीक्षेत्रादप्यधिकं यवेनैकेन वर्तते ॥

महाबळेश्वराचें देऊळ हेमाडपंती घाटाचें आहे. वर घुमटास कळस वगैरे नाहीं. शेवटपर्यंत एकावर एक दगडाचे चिरे उतरते रचलेले आहेत. आंत देव आहे त्यास शिवलिंगाची आकृति फारशी नाहीं. जमिनींतून वर आलेला खडकाचा भाग असून त्यास सभोंवती शोभा आणून लिंगाकार दिल्यासारखें केलें आहे. देवाच्या मस्तकावर सात छिद्रें आहेत. तीं सदोदित जिवंत पाण्यानें भरलेलीं असतात, व कृष्णादि पंचगंगा आणि भागीरथी व सरस्वती यांची उत्पत्ति या छिद्रांतून होय असें क्षेत्रमाहात्म्यांत सांगितलें आहे. त्याप्रमाणें कोणकोणत्या गंगेचें कोणकोणतें उगमस्थान आहे हें पुजारी लोक दाखवितात. देवाजवळ नेहमीं तीन चार नंदादीप जळत असतात. पूजा नैवेद्य उत्साहादि नित्यनैमित्याकरितां पांच हजाराची सालिना जहागीर आहे. लिंगमळा व सिंकोनाच्या बागाच्या मळ्याची जागा महाबळेश्वराच्या जहागिरींत आहे. ही जहागीर शिवाजी महाराजाच्या वेळची असावी. त्याच्या पूर्वींची नाहीं. असें ह्मणण्यास एक प्रमाण असें आढळतें कीं, महाराजाचे जुने पेशवे जे मोरो त्रिमळ पिंगळे यांच्या घराण्यांत देवाच्या नेमणुकीची व्यवस्था स्वराज्यांत चालत होती व त्याप्रमाणें अद्यापपावेतों चालत आहे. प्रतिवर्षी महाशिवरात्रीस महाबळेश्वरीं यात्रा भरत असते.

याशिवाय क्षेत्रमाहात्म्यांत सांगितलीं नाहींत अशीं दोन

देवालयें सांगण्यासारखीं आहेत. शुक्रतीर्थाजवळ अहल्याबाई-नें एक सुंदर शिवालय बांधलें आहे; व उत्तम मंदिराचे पाठीमागें रामदासस्वामींनीं मारुति स्थापन केला आहे, त्याचें स्थान आहे. स्वामीचे चरित्रांत असें लिहिलें आहे कीं, "शके १५६६ तारण नाम संवत्सरे वैशाख मासीं स्वामी कृष्णातीरीं आले ते प्रथम महाबळेश्वरीं येऊन तेथें वास केला. याच समयीं शिवाजी राजे १७ वर्षांचे वयांत असतां विजापूरवाल्याशीं द्वंद्व करून राजगडीं राहून राज्य साधण्यास आरंभ केला होता. इकडे समर्थ महाबळेश्वरीं चातुर्मास्य राहून नित्य कीर्तन करित असतां तेथील गृहस्थ व भिक्षुक बहुत भक्तीस लागले. त्यांत अनंतभट व दिवाकरभट महाबळेश्वरकर या उभयतांस अनुग्रह प्रसाद दिला आणि तेथून निघाले. ते समयीं अनंतभट यांणीं बरोबर येतों ह्मणून बहुत आग्रह केला. तेव्हां तुह्मी येऊं नये, येथेंच रहावें असें सांगितलें आणि तेथें श्रीमारुती स्थापून देऊन त्याची पूजा करून स्वस्थ असावें अशी आज्ञा करून आपण निघून वाईस गेले."

आतां स्कंदपुराणामध्यें या क्षेत्राचे उत्पत्तीविषयीं वृत्तांत लिहिला आहे त्याचा अलंकारादि कव्युक्ति एकीकडे ठेऊन केवळ इतिहासपर सारांश देतों.

मनुष्यजातीची उत्पत्ति होण्याच्या पूर्वीं शैल्यकाननादि सृष्टि निर्माण करून ब्रह्मदेव ब्रह्मलोकीं तप करीत असतां विष्णूंनीं त्यास मनुष्यसृष्टि करण्याची आज्ञा दिली. तेव्हां

---

१ रामदासस्वामींचे चरित्राची बखर, विठ्ठल रामचंद्र बापट व नारो लक्ष्मण दिघे यांची.

ठाणे ग्रंथ संग्रहालय
ठाणे.



शिव, विष्णु, सरस्वती, कश्यपादि ऋषी, व वेद या सर्वांस समागमें घेऊन ब्रह्मदेव सह्याद्रीच्या मस्तकावर आले. नंतर ब्रह्मा, विष्णु, महेश यांणीं ब्रह्मतीर्थ, विष्णुतीर्थ, आणि रुद्रतीर्थ या ठिकाणीं तपश्चर्या केली. त्या वेळेस सृष्टि उत्पन्न करण्याजोगी तपःसिद्धि होऊन, तपोवनें इत्यादि निर्माण झालीं. नंतर देवत्रयांनीं यज्ञास आरंभ केला व ब्रह्मदेवानें महाबळेश्वर, अतिबळेश्वर, व कोटीश्वर यांचें क्रमानें पूजन केलें, ही तीर्थनामांची उत्पत्ति झाली. पुढें लिंगनामांची विख्याति कशी झाली याचें निरूपण केलें आहे.

पूर्वी नारदऋषि स्वेच्छासंचार करून एके वेळ विंध्याद्रीजवळ आले आणि त्यास ह्मणाले कीं, "हे पर्वता, तुजपेक्षां मेरुपर्वत मोटा आहे याचें कारण काय ?" हें ऐकून विंध्याद्रीनें आपलें शरीर इतकें मोठें केलें कीं सूर्याची गति रुद्ध होऊन पृथ्वीवर सर्वत्र अंधकार झाला. त्यावेळीं सर्व देवऋषीनीं अगस्त्याची प्रार्थना केली कीं, 'विंध्याद्रि आपला शिष्य आहे, या कारणास्तव आपण त्यास लहान होण्याची आज्ञा करावी.' या कार्याचे सिद्धीस्तव अगस्तिऋषि दक्षिणेंत गेले व विंध्याचलास नम्र करून कार्यभाग उरकल्यानंतर लोहपर्वतावर कार्तिकस्वामीचें स्थान आहे तेथें जाऊन राहिले. ते समयीं काशीवास सुटल्याचा खेद होऊन ऋषीनीं कार्तिकस्वामीस प्रश्न केला कीं, 'सह्याद्रीवर तीर्थस्थानें, पंचगंगा व महाबळेश्वरादि देवता आहेत त्यांचें माहात्म्य मजला निवेदन करावें. कारण काशीसम क्षेत्र असेल तेथें निवास करून परमार्थ साधावा असा माझा मानस आहे.' त्यावरून कार्तिकस्वामीनीं इतिहास निवेदन केला, तो असा कीं, 'पद्मकल्पांत महाबळ व अतिबळ या नांवाचे दोन पराक्रमी दैत्य भाऊ भाऊ असत,

त्यांनीं तिन्ही लोकांस फार जर्जर केलें. तेव्हां ब्रह्मा, विष्णु, महेश हे सैन्य घेऊन त्यांजबरोबर युद्ध करण्यास गेले असतां, विष्णूनें अतिबळाचा वध केला. हें वृत्त महाबळास कळतांच तो देवांबराबर समर करण्यास आला. त्याचे दुर्धर प्रतापापुढें देवत्रयांचा ठिकाण लागेना. या कारणास्तव देवांनीं जाऊन महामाया जी देवी तिचें स्तवन केलें व दैत्याचा नाश होईल अशी युक्ति सांगावी ह्मणून विनंति केली. देवी प्रसन्न होऊन तिनें दैत्यास मोह घालून संगरांतून परत आणलें. नंतर महाबळानें संतुष्ट होऊन वर मागण्याविषयीं देवांस सांगितलें. तेव्हां 'तूं आमचे हातून मरावास' हें वरदान त्यांनीं मागितलें. सर्व देव आपणास शरणागत झाले आहेत, आपण विश्वाचे स्वामी आहोंत, व विश्वाचा उपभोगही घेतला आहे त्या अर्थीं देहाचे सार्थक होऊन गेलें, आतां मरण यावें हेंच उचित, असा विचार करून दैत्यानें देवांस देह अर्पण केला. नंतर देवांनीं त्यास मुक्तिपद देऊन वर मागण्यास सांगितलें. तेव्हां दैत्यानें देवाचा स्तव करून वर मागितला तो असा कीं:—

प्रसन्नोऽसि यदा शंभो तदास्मिन् सह्यमस्तके ।
मन्नाम्ना लिंगरूपस्त्वं सृष्ट्यादौ भव शंकर ॥
मस्तके पंचगंगानामुत्पत्तिश्चास्तु संततम् ।
मद्भ्रातृनाम्ना विष्णो त्वं दिव्यलिंगं भव प्रभो ॥
सैन्यस्य मम कोटीनां कोटीशो भवपद्मज ।
मन्नाम्ना ख्यातिमागत्य क्षेत्रं चास्तु भुवि प्रभो ॥

याचा भावार्थ हा आहे कीं, शिवानें लिंगरूप धारण करून महाबळेश्वर नांवानें या ठिकाणीं वास करावा; व विष्णूनें माझ्या भ्रात्याच्या ह्मणजे अतिबळेश्वर या नांवानें

येथें रहावें; आणि ब्रह्मदेवानें माझ्या कोटिसैन्याचें नांव धारण करून कोटीश्वर व्हावें. तसेंच सर्व क्षेत्रभूमीसही महाबळेश्वर हें नांव द्यावें. याप्रमाणें देवस्थानांची उत्पत्ति होय. पुढें पंचगंगांची उत्पत्ति लिहिली आहे.

ब्रह्मा, विष्णु, महेश यांचा निवास येथें होऊं लागल्यावर ब्रह्मदेवानें यज्ञ करण्याचें मनांत आणून, ब्रह्मारण्यांत उत्तम रत्नखचित मंडप घातला व यज्ञसामुग्री जमा करून, देव, ऋषि, गंधर्व इत्यादिकांस निमंत्रण केलें. वेदी सिद्ध होऊन, यज्ञाच्या मुहूर्ताची घटिका भरत आली. तथापि मुख्य यजमान जो ब्रह्मदेव त्याची पत्नी सावित्री ही वस्त्रभूषणें परिधान करण्याचे समारंभांत निमग्न असल्यामुळें तिला मुहूर्ताच्या समयाचें भान न राहतां येण्यास विलंब लागला. तेव्हां विष्णुप्रभृति देवांची अनुमति घेऊन ब्रह्मदेवानें आपली द्वितीय पत्नी जी गायत्री इचे समागमें यज्ञदीक्षा घेतली व कर्मास आरंभ केला. नंतर मंगलवाद्यांचा गजर व वेदघोष झाला तो ऐकून सावित्री लगबगीनें यज्ञमंडपांत येऊन पाहते तों गायत्रीसमागमें यजमान यज्ञ करीत आहेत. यास्तव कोपायमान होऊन ब्रह्मा, विष्णु, महेश, व गायत्री या चौघांस सावित्रीनें शाप दिला:—

ब्रह्मविष्णुमहेशाश्च मामुल्लंघ्य यशस्विनीम् ।
धर्मातिक्रममारेभुरतः संतु जलात्मकाः ॥
स्त्रियो नाम्ना प्रथां यांतु गायत्र्याः पक्षपाततः ।
गायत्र्यपि नदी भूत्वा केनापीयं न लक्षिता ॥

याचा भावार्थ हा आहे कीं, तुम्ही गायत्रीचा पक्षपात केलात त्या अर्थी जलरूप होऊन स्त्रीनांवानें जगांत प्रसिद्ध व्हाल, व गायत्रीही नदी होईल व तिजकडे लोक दुर्लक्ष

करितील. हें शापवचन ऐकून विष्णूसही क्रोध आला व त्यानें सावित्रीलाही तसाच शाप दिला. तेव्हां या परस्पर शापांचे योगेंकरून विष्णु, कृष्णानदीरूप झाले. शिव, वेण्यारूप व ब्रह्मदेव, ककुद्मतीरूप झाले; आणि गायत्री व सावित्री यांचीं नांवें तींच राहिलीं.

याप्रमाणें पंचगंगांची उत्पत्ति स्कंदपुराणांत सांगितली आहे. आतां त्या क्षेत्राचे उत्पत्तीविषयीं हल्लींच्या विद्वानांचें व शोधकांचें काय मत आहे हें संक्षेपतः सांगतों:—

हें स्थान लोकप्रसिद्ध बारा ज्योतिर्लिंगें आहेत त्यांतलें नव्हे. गोकर्णमहाबळेश्वरचें क्षेत्र उत्तरकानडयामध्यें कारवाडचे दक्षिणेस समुद्रतीरावर आहे. या स्थानाची ख्याति व माहात्म्य स्कंदपुराणांत, महाभारतांत, व इतर पुराणांतही वर्णन केलें आहे, परंतु तद्वत् प्रकार धौममहाबळेश्वरचा नाहीं. यद्यपि स्कंदपुराणांतच गोकर्ण व धौममहाबळेश्वर या उभयतांचीं वर्णनें दिलीं आहेत, तथापि स्कंदपुराण हें हरवलेल्या पुराणांपैकीं आहे. त्यांतील ब्रह्मोत्तरखंड मात्र प्रस्तुत उपलब्ध आहे. परंतु येवढेंच खंड शिल्लक राहिल्यानें केवळ स्वार्थसाधू असे जे ब्राह्मण लोक त्यांचें साधून त्यांनीं मन मानेल त्याप्रमाणें ब्रह्मोत्तरखंडांत अदलाबदल करून नाहीं नाहीं त्या आधुनिक क्षेत्रांचीं वर्णनें आंत घुसडलीं आहेत. यास्तव प्रस्तुतच्या ब्रह्मोत्तरखंडावर बिलकुल भरंवसा ठेवतां येत नाहीं. ज्या ठिकाणीं भारतादि इतर इतिहासांस प्रत्यंतर मिळतें तेथें मात्र ब्रह्मोत्तरखंड खरें मानतां येतें. गोकर्णक्षेत्राविषयीं असें प्रत्यंतर सांपडतें, परंतु धौममहाबळेश्वराविषयीं सांपडत नाहीं, येवढयानेंच केवळ धौममहाबळेश्वरवर्णन खोटें ह्मणतां येत नाहीं; परंतु खोटें मानण्यास आणखी कारणें आहेत; तीं अशीं

कीं, या ग्रंथाची संस्कृत भाषा अगदीं अर्वाचीन दिसते; त्यांत अशुद्धें फार आहेत; इतिहाससंगति नाहीं; व कथाभाग पोरकट आहे. या सर्व कारणांस्तव धौममहाबळेश्वरक्षेत्र हें अगदीं अलिकडचें असावें. या ठिकाणीं फक्त गोकर्णाची नक्कल केली आहे. गोकर्णांत ज्या प्रमाणें ताम्रपर्णी नदी आहे व खडकास शिवलिंग मानून पूजा करितात त्याचप्रमाणें येथेंही कृष्णानदी व खडकाची पूजा आहे. तेथील खडकास महाबळेश्वर ह्मणतात तसेंच येथेंही आहे.

आतां पंचगंगांचे उत्पत्तीविषयीं अर्वाचीन शोधकांचें असें मत आहे कीं, कृष्णादि पांच नद्या महाबळेश्वरांच्या मस्तकांतून निघाल्या हें ह्मणणें अप्रयोजक आहे. या नद्यांची उत्पत्ति महाबळेश्वरच्या सर्व डोंगरांत आहे. तसेंच उगममंदिरांत त्या पांच नद्यांचा उगम आहे हें ह्मणणें बरावर नाहीं. अनेक कोनाडे केल्यानें अनेक प्रवाह झाले आहेत. या ठिकाणीं कृष्णेची उत्पत्ति मात्र आहे, परंतु ती देखील वास्तविक पाहतां या देवळांत नसून कृष्णेच्या खोऱ्यावर देऊळ आहे तेथें असावी. पंचगंगांपैकीं गायत्रीचा तर पत्ताच नाहीं. बाकीच्या ज्या राहिल्या त्यांचे उगम आपआपल्या खोऱ्यांत आहेत. वेण्या हें नांव "वेण"राजावरून पडलें असावें, व कोयना या शब्दाची व्युत्पत्ति " कुवेण " याजपासून अथवा " कोइ " ह्मणजे पर्वत याजपासून असावी. सावित्री व गायत्री हीं नांवें सूर्यवाचक शब्दापासून निघालीं आहेत.

आतां लिंगपूजेविषयीं या लोकांचें मत असें आहे कीं, लिंगपूजेची उत्पत्ति मूळ भिल्ल, कोळी, गोंड, खोंड इत्यादि अनार्य लोकांपासून आहे. पुढें ब्राह्मणांनीं तिखटमीठ लावून

शिवदैवतेस आपलेंसें करून घेतलें. या प्रमाणें आधुनिक विद्वानांचें मत होत चाललें आहे, व या मताचें दृढीकरण श्रीमहाबळेश्वरीं होतें. तें असें कीं, या ठिकाणीं कृष्णेवरचे गंगापुत्र कोळी आहेत. गांवची पाटीलकी व महाबळेश्वरची पूजा गुरवाकडे आहे. तथापि हे गुरव आर्यबीजाचे नसून कोळ्यांप्रमाणेंच नीच जातीचे आहेत, यास्तव महाबळेश्वरचें स्थान मूळ कोळीलोकांचें आहे. पुढें ब्राह्मण वरचढ होऊन मराठ्यांच्या राज्यांत किंवा त्यापूर्वीं थोडे दिवस या ठिकाणीं त्यांनीं आपलें वर्चस्व कायम केलें असावें. यास आधार असा सांपडतो कीं, महाबळेश्वर हा गांव जावळी प्रांतांत आहे. हा प्रांत शिवाजीमहाराजांच्या हातीं येण्यापूर्वीं मोरे या आडनांवाच्या एका मराठे सरदाराकडे विजापूरवाल्यांकडून जहागीर असे. मोरे हे येऊन जाऊन कमलगडावर राहत असत. कृष्णेचें स्नान करून व महाबळेश्वरावर श्रद्धा बसून त्यांणीं हें स्थान उदयास आणिलें. पुढें शिवाजीमहाराजांनीं देवास जहागीर वगैरे देऊन तोच क्रम चालू ठेविला. यास्तव या क्षेत्राची उत्पत्ति सुमारें साडेतीनशें वर्षांपूर्वींची असावी. येणेंप्रमाणें क्षेत्राची उत्पत्ति अर्वाचीन विद्वानांच्या मताप्रमाणें आहे. या विद्वानांमध्यें प्रमुख नामदार विश्वनाथ नारायण मंडलिक हे आहेत. त्यांनीं सन १८७० सालीं सूक्ष्म विचार करून या विषयावर मुंबई एशिआटिक सोसायटीपुढें निबंध वाचला त्याचें येथें सार घेतलें आहे. या ठिकाणीं एक कल्पना सुचली आहे. जर वांई ही पूर्वींची विराटनगरी असेल तर येथें पांडव अज्ञातवासाकरितां आले असतील हें मानलें पाहिजे व असें मानण्यास प्रमाणें अशीं आहेत कीं, वांईंत कीचककिचरा या नांवानें अद्याप एक ओढा प्रसिद्ध आहे.

व पांडवांच्या अज्ञातवासाचे वेळीं कीचक विराटाचे घरीं होता हें पुराणांतरीं लिहिलें आहे. या शिवाय वैराटगड या नांवाचा एक किल्ला वांईपासून कोस दीड कोस आहे. त्यास वांई हें कदाचित् विराट्नगर असेल. दुसरें, पांडव-अज्ञातवासास येथें आले असावे असें ह्मणण्यास इतकाच आधार आहे कीं, पांडवगड या नांवाची एक टेंकडी वांईजवळ आहे, तेथें पुढें मराठ्यांनीं किल्ला बांधला. कदाचित् पांडव या टेंकडीवर राहत असावे. पांडवांत त्यांचे कुळउपाध्ये धौम्यऋषी हे बरावर होतेच. धौम्याचा आश्रम वांईपासून अडीच तीन कोशांवर कृष्णेचे कांठीं आहे. हें जर धौम्याचें स्थान खरें असेल तर धौम्यऋषीनीं महाबळेश्वरीं तपश्चर्या केल्यामुळें तें क्षेत्र उदयास येऊन धौम्यमहाबळेश्वर असें नांव कशावरून पडलें नसेल? केवळ महाबळेश्वर व धौम जवळ जवळ असल्याकारणानें धुळेमालेगांवाप्रमाणें दोन नांवें एकत्र जुळलीं असें समजावें तर धौमाखेरीज महाबळेश्वराजवळ दुसरीं ठिकाणें थोडीं होतीं कीं काय? त्यांचें नांव महाबळेश्वरास कां लावण्यांत आलें नाहीं? धौम्यासारख्या महान् ऋषींचें नांव महाबळेश्वरक्षेत्रास देण्यामध्यें कांहीं विशेष अर्थ असावा असें अनुमान होतें. भाषादिकांचे प्रमाणावरून पाहतां महाबळेश्वरवर्णन हा ग्रंथ, स्कंदपुराणांतील नसून अर्वाचीन असावा असें खरोखर दिसतें, त्याअर्थी आज शेंकडों वर्षे धौम्यमहाबळेश्वर असें लोक ह्मणत आले, हे केवळ काकतालीयन्यायानें न ह्मणतां धौम्यऋषि महाबळेश्वरीं कधींकाळीं राहत होते व त्यांच्या निवासानें तें क्षेत्र उदयास आलें हें इतिहासबीज धौममहाबळेश्वर या नांवांत कां अवगूढ नसेल? कदाचित असेल. वैराटगड, पांडवगड, हीं कदाचित् मराठ्यांच्या वेळचीं अलीकडचीं नांवें असतील. पण

धौमक्षेत्राचें नांव त्या वेळचें असून मराठ्यांनीं दिलेलें असेल तर अर्थातच वरील तर्क असंभाव्य समजला पाहिजे.

# भाग ३.– इतिहासप्रकरण.

महाबळेश्वर व प्रतापगड हीं ठिकाणें घांटमाथ्यावर जावळीप्रांतांत आहेत हें मागें सांगितलेंच आहे. एथील इतिहासांत एक मोठी असाधारण गोष्ट अशी आहे कीं, इंग्लिशांच्या हातीं हा प्रदेश येईपर्यंत या ठिकाणीं स्वराज्य व स्वातंत्र्य होतें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. मुसलमानांचे पूर्वींपासून **शिरक्यांचा** अंमल एथें चालत आला, व त्यांस 'राजे' असें ह्मणत असत. ब्राह्मणी वंशाचे बादशाहांनीं सन १३४७ इसवीमध्यें आपली गादी स्थापन केली, त्या वेळेपासून दक्षिणेंत यवनांची सत्ता सुरू झाली. या यवनांनीं स्वपराक्रमेंकरून बहुतेक महाराष्ट्र देश काबीज केला. परंतु पुरंदरचे डोंगरापासून हरणकाशीपर्यंत घांटमाथ्याचा प्रदेश आहे तो, व दाभोळापासून रामसपर्यंत समुद्रतीरचा भाग, शंभर अधिक वर्षें लोटलीं तथापि यवनांचे हातीं लागला नाहीं. मुसलमानांनीं प्रयत्नांत बिलकुल कमी केलें नाहीं, वांईच्या देशमुखाजवळ कागदपत्र सांपडले त्यांवरून असें कळतें कीं, दुर्गादेवीच्या दुष्काळानंतर ह्मणजे सन १४०८ पासून पुढें पुष्कळ वर्षेंपावेतों कृष्णा व गोदावरी यांचे दरम्यानचा मुलूख ओसाड पडला असतां तेथील मराठे सरदारांनीं बंडें करून सर्व डोंगरी किल्ले मुसलमानांचे हातीं होते ते आपले स्वाधीन करून घेतले व रयतेपासून करभार घेण्याचा क्रम चालविला. या कारणास्तव **सुलतान अहमदशाहवली ब्राह्मणी** याचे कारकीर्दींत सन १४२९ सालीं सरदार **मलिक उलितजार** हा **दादू नरसू काळे** या नांवाच्या एका शाहाण्या ब्राह्मणास समागमें घेऊन या ठिकाणीं बंडें मोडून

टाकण्यास आला. त्याणें प्रथम खटाव देशाचे व शंभूमहादेवाचे डोंगरांतील बंडवाले यांचें पारिपत्य केलें व पुढें वांईस जाऊन आसपासचे किल्ले सर केले, आणि घांटमाथ्याखालीं उतरून कोंकणपट्टींतही एकवार जाऊन आला. परंतु मार्गांत शिर्के यांचे वाटेस तो बिलकुल गेला नाहीं. नंतर दादू नरसू काळे यांस बंदोबस्ताकरितां ठेवून मलिक उल्तिजार परत गेला. सारांश, या स्वारीपासून कोंकण घांटमाथ्यावरील मराठ्यांचे सत्तेस धक्का न पोंचतां त्यांचें प्राबल्य बहुतेक पूर्ववत् कायम राहिलें. यास्तव सन १४३६ सालीं **दिलावरखान** नामें सरदारानें दुसरी स्वारी केली, परंतु यापासूनही कांहीं अर्थसिद्धि झाली नाहीं. शेवटीं सह्याद्रीवरचे किल्ले व खालीं दाभोळपर्यंत मुलुख काबीज करण्याचे निश्चयानें सुलतान **अल्लाउद्दीन ब्राह्मणी** याचे कारकीर्दीत **मलिक उल्तिजार** पुन: स्वारी करण्यास निघाला. त्याणें चाकणास सैन्याचा तळ देऊन जुन्नराजवळ किल्ला बांधिला. नंतर कोंकणघांटमाथ्यावर जाऊन शिरक्यांचा किल्ला हस्तगत केला, व मुलें माणसें आणि कुटुंबसुद्धां त्यांस कैद करून मुसलमानी धर्म स्वीकारला पाहिजे ह्मणून दुराग्रह चालविला; परंतु शिरक्यांनीं सांगितलें कीं, 'कोंडाण्यांतील सिंहगडचे मराठे राजे आमचे आप्त व प्रतिस्पर्धी आहेत. आह्मीं मुसलमान झाल्यास ते आमचा द्वेष करतील. या कारणास्तव सिंहगडवाल्यांचा पराजय करून त्यांस अगोदर मुसलमान करावें, ह्मणजे आह्मीं सिद्धच आहोंत.' मलिक उल्तिजार याणें भोळेपणानें या गोष्टीवर विश्वास ठेवून शिरक्यांच्या ह्मणण्यास रुकार दिला, व दुसरे दिवशीं कोंडाण्याकडे कुच सुरू केला. परंतु शिरक्यांनीं यवनांचे फौजेवर रात्रीं अचानक घाला घालून, सात

हजार शिपाई व सरदार व मलिक उत्तिजार यांस ठार मारलें. ही गोष्ट सन १४५३ सालीं घडली. पुढें १६ वर्षेपावेतों ह्मणजे ब्राह्मणी राज्याचा शेवट होईपर्यंत शिरक्यांच्या वाटेस कोणी गेलें नाहीं. नंतर ब्राह्मणी राज्य नाहींसें होऊन त्याचे निरनिराळे विभाग झाले त्यांत कोंकण घांटमाथा सन १४८९ मध्यें विजापूरकरांचे हद्दींत आला. विजापूरवाल्यांनीं मराठे लोकांस चाकरीस ठेवून व मोठमोठीं विश्वासाचीं कामें देऊन आपलेसे केले. कर्नाटकांत स्वाऱ्या वगैरे करण्याकरितां बंदोबस्ताचे कामीं विजापूरवाल्यांचे तर्फेनें मराठे लोक व जात असत. परंतु कोंकण घांटमाथ्यावरील जावळीचे शिरके हे विजापूरवाल्यांस बिलकुल जुमानित नसत. कारण सह्याद्रीचे पहाडामध्यें बादशाहाचे फौजेचा बिलकुल इलाज चालत नसे. याशिवाय शिरके हे मोठे शूर निग्रही व खुनशी असत. याकरितां बादशाहास निमुट बसावें लागे. परंतु कालगतीचे योगानें शिरक्यांचा लय होण्याचा समय जवळ येऊन **चंद्रराव मोरे** यांणीं त्यांचा पराजय केला.

शिरक्यांप्रमाणें **मोरे** हेही मराठेच होते. ज्या पुरुषानें **मोरे** यांचें घराणें मुळारंभीं उदयास आणलें तो कर्नाटकांत विजापूरवाल्यांचे पदरीं प्रथमतः नाईक होता. पुढें त्याचा पराक्रम व चाणाक्षपणा पाहून **युसफ अदिलशाहानें** त्यास बारा हजार पायदळाची सरदारी दिली, व नीरा आणि वारणा या नद्यांमधील मुलूख घांटमाथ्यासुद्धां काबीज करण्याची नौकरी सांगितली. मोरे यांणीं ही कामगिरी फार उत्तम प्रकारें बजावून शिरक्यांस पदच्युत केलें आणि शिरक्यांचे साथी **गुजर, मामूलकर, मोहिते, महाडीक** यांचेंही पारिपत्य केलें. या कारणास्तव बादशाहानें प्रसन्न होऊन मोरे

यांस 'चंद्रराव' हा किताब व जावळी प्रांतांतील शिरक्यांचा मुलूख इनाम दिला. शिरक्यांप्रमाणें मोरे यांसही पुढें 'जावळीचे राजे' ह्मणूं लागले. त्यांचे राज्यांत विजापूरवाले हात घालीत नसत व हात घालूं सकतही नसत. सारांश, एका मराठ्याचे हातून हा मुलूख दुसऱ्याचे हातीं गेला; व यद्यपि मोरे हे शिरक्यांप्रमाणें बादशाहासीं वांकून नसत तथापि वास्तविक स्वातंत्र्याचे संबंधानें पाहिलें असतां कोंकण घांटमाथ्यावरील लोकांचे स्थितींत किमपि फेरफार झाला नाहीं.

मोरे यांच्या घराण्यांतील सर्व पुरुष मोठे प्रतापी असत. चंद्रराव यांचा मुलगा **यशवंतराव** याणें **परिंद्याजवळ** अली अदिलशाहाचा शत्रु· **बुऱ्हाण निझाम** याजबरोबर लढाई करून जय संपादन केला व शत्रूचा हिरवा झेंडा हिसकावून घेतला. पुढें बादशाहाचे परवानगीनें हा झेंडा मोरे मिरवीत असत. याप्रमाणें मोरे यांचें राज्य अव्याहत सात पिढ्यांपावेतों ह्मणजे १६५५ पर्यंत चाललें. नंतर शिवाजी महाराजांनीं घांटमाथा काबीज केला. याविषयीं हकीकत येणेंप्रमाणें आहेः—

शिवाजी महाराजांचे पुंडाईबद्दल त्यांचे वडील **शाहाजी** राजे यांस विजापूरवाल्यांनीं कर्नाटकांतून धरून आणून चार वर्षें कैदेंत ठेविलें; तेव्हां **महाराजांनीं** दिल्लीस **शाह जहान** बादशाहास पत्र लिहून वडिलांची मुक्तता केली. यावरून दिल्लीचे दरबारीं शिवाजी महाराजांचें एवढें वजन पडलें हें पाहून विजापूरवाले किंचित् मनांत दचकूं लागले, व महाराजांबरोबर उघडपणें वैमनस्य करीत नसत. याशिवाय विजापूरवाल्यांकडून पुष्कळ दिवस दिल्लीस खंडणीचा पैसा न

गेल्यानें मोगलांनीं फार निकड लाविली होती, यामुळें आणखीं विजापूरवाल्यांस असा धाक पडला असे कीं, **महाराजांशीं** विनसल्यास ते आमचा मुलूख मोगलांचे स्वाधीन करतील. या कारणास्तव कसेंही करून गुप्त रीतीनें महाराजांस आपले काबूंत आणावें अशी युक्ति त्यांणीं चालविली. या वेळीं शिवाजी महाराज हमेशा महाडास रहात असत, व सह्याद्रीच्या मार्गानें त्यांचें घांटावर येणें जाणें असे. हें पाहून विजापूरवाल्यांनीं **बाजी शामराज** या नांवाच्या एका मनुष्याबरोबर फौज देऊन त्यास, पारघाटाचे सुमारास दडून राहण्यास सांगितलें, व महाराज जाण्यायेण्याची संधी पाहून त्यांच्यावर शस्त्र चालवावें असा बेत केला, परंतु ही सर्व बातमी शिवाजी महाराजांस पूर्वींच कळून त्यांणीं पारघाटाचे पायथ्याशीं बाजी शामराज येतांच त्यांच्या सैन्यावर छापा घातला व समूळ पराजय करून त्याचे लोकांस रानोमाळ हांकून लाविलें. या कामामध्यें चंद्रराव मोरे यांणीं विजापुरवाल्यांचो फौज घांटमार्गानें जाऊं दिली व त्यांची दुष्ट मसलत माहीत असतांही मदत केली, येणेंकरून **महाराजांस** त्वेष येऊन त्यांणीं मोरे यांचा सूड घेण्याचा निश्चय केला.

या पूर्वीं **मोरे** व **महाराज** यांच्यामध्यें बराच घरोबा असे. एकमेकांकडे जासूद व कारकून जात येत असत. **महाराजांनीं** मोरे यांचें पारिपत्य करण्याकरितां सैन्य जमा केल्यावर, जावळी प्रांताची माहिती मिळावी ह्मणून व मोरे हे कितपत सावधगिरीनें असतात व त्यांचे सैन्याची कशी काय तयारी आहे ही खबर घेण्याकरितां **राघो बल्लाळ ब्राह्मण** व **संभाजी कावजी मराठा** असे दोन कारकून २५ मावळ्यांसहवर्तमान जावळीस रवाना केले. या कारकुनांनीं अंतर्यामींचा

हेतु गुप्त ठेवून मोरे यांस सांगितलें कीं, 'शिवाजी महाराजांस जातीनें आणखी एक लग्न करणें आहे. त्यास आह्मी आपले कन्येस पाहण्यास आलों आहों.' मोरे यांणीं कारकुनांचें यथायोग्य आदरातिथ्य करून त्यांच्याशीं निष्कपटपणानें वागूं लागले. हा प्रकार पाहून राघो बल्लाळाचे मनांत पापबुद्धि आली व मोरे अगदीं गैरसावध आहेत हें लक्षांत आणून त्याणें चंद्रराव यास ठार मारण्याची मसलत केली. संभाजी कावजीसही हा बेत पसंत झाल्यावर, उभयतां कारकुनांनीं शिवाजी महाराजांस पत्र लिहिलें. परंतु पत्रांत मजकूर काय होता हें कळत नाहीं. पुढें महाराजांनीं कृष्णेचे उगमाजवळ महाबळेश्वरीं आडमार्गानें सैन्य रवाना केलें व आपण पुरंदरच्या वाटेनें जाऊन सैन्यास मिळाले; इतक्या अवकाशांत जावळी येथें राघो बल्लाळ व संभाजी कावजी यांणीं चंद्रराव व त्यांचे बंधु यांची एकांत गांठ घेऊन त्या उभयतांस ठार मारलें. नंतर बरोबरच्या मावळ्यांसहवर्तमान कोणास न कळतां जंगलांत पळून गेले. इतक्यांत शिवाजी महाराज फौजेसुद्धां जावळीस येऊन दाखल झाले व गांवास वेढा घातला. मोरे यांचें दिवाण हिंमतराव यांणीं बराच वेळपर्यंत शौर्यानें युद्ध केलें. परंतु ते अखेरीस मरण पावले. नंतर महाराजांनीं वांसोटा किल्ला सर केला. तेणेंकरून संपूर्ण जावळी संस्थान त्यांचे स्वाधीन झालें. चंद्रराव यांचे मुलांनीं पुढें विजापुरवाल्यांशीं संधान बांधून गुप्त रीतीनें पत्रव्यवहार सुरू केला, या अपराधास्तव त्यांस आपलें शिर द्यावें लागलें.

येणेंप्रमाणें जावळीप्रांत व नीरा आणि कोयना यांचे कांटचा प्रदेश हस्तगत केल्यावर, तेथें जाणें येणें सुलभ व्हावें ह्मणून आणि पारघांटाचें नाकें आपल्या काबूंत राहावें या

उद्देशानें पारघांटानजीकचे टेंकडीवर नवीन किल्ला बांधावा असा **महाराजांनीं** बेत केला, व या कामीं **मोरो त्रिमळ पिंगळे** या नांवाच्या एका देशस्थ ब्राह्मणाची योजना केली. हे मोरोपंत लहानपणीं आपल्या वडिलाबरोबर शाहाजी राजाची चाकरी धरून कर्नाटकांत गेले होते. नंतर सन १६५३ मध्यें स्वदेशीं परत आल्यावर शिवाजी महाराजांच्या पदरीं राहिले. **महाराजांनीं** कांहीं दिवस त्यांस पुरंदरची किल्लेदारी दिली होती. पुढें यजमानांच्या कृपेनें त्यांना पेशवाईचीं वस्त्रें व अधिकारही मिळाला. पिंगळे हे सातारचे राहाणारे होते व अद्यापि त्यांचे वंशज साताऱ्यास आहेत. मोरोपंतांनीं सन १६५६ सालीं किल्ल्याचें काम उत्तम प्रकारें तडीस नेलें व किल्ल्यास 'प्रतापगड' असें नांव दिलें. येणेप्रमाणें प्रतापगड बांधल्याची हकीकत होय.

नंतर सन १६५७ मध्यें औरंगजेब विजापूरवाल्यांशीं लढूं लागला त्या वेळीं त्यांस **महाराजांनीं** पत्र लिहिलें कीं 'आह्मीं आपले नौकर आहोंत. त्या अर्थी विजापूरवाल्यांजवळून आह्मीं मुलूख घेतला आहे त्याची आह्मांस सनद करून द्यावी.' औरंगजेबानें हें ह्मणणें मान्य करून सनद दिली, व शिवाय दाभोळप्रांतावर मोगलांचा अधिकार असून विजापूरवाले व्यर्थ अंमल करीत आहेत हें पाहून तोही मलूख औरंगजेबानें **महाराजांस** दिला. याप्रमाणें तळकोंकण व घांटमाथा **महाराजांचे** ताब्यांत आल्यावर ते वारंवार प्रतापगडास येऊन रहात असत.

येणेप्रमाणें शिवाजी महाराजांचें प्राबल्य फारच वाढत चाललें हें पाहून विजापूरवाल्यांनीं त्यांचें शासन करण्याचा निश्चय केला व या कामीं **अफझुलखान** नामें एका नामांकित

सरदाराची योजना करून, त्याजबरोबर पांच हजार स्वार, सात हजार उत्तम पायदळ, व कित्येक तोफा, जेजाला, आणि बाण इत्यादि युद्धसामग्री दिली. निघतेवेळीं अफझुलखानानें बादशाहास मोठ्या बढाईनें सांगितलें कीं, 'शिवाजी किंपदार्थ आहे. त्यास विलंब न लावतां बांधून आणून आपल्या सिंहासनाजवळ हजर करतों.'

अफझुलखान फौज घेऊन सन १६५९ मध्यें निघाला, व विजापुराहून थेटच्या रस्त्यानें गेल्यास मार्गांत डोंगर वगैरे चढावे लागतात व पर्जन्य फार असतो, या कारणास्तव पंढरपुरास जाऊन तिकडून वांईस आला. हें वर्तमान **महाराजांस** कळतांच ते राजगडाहून प्रतापगडीं आले, आणि तेथून वकील पाठवून अफझुलखानाशीं फार गरिबीचें बोलणें लाविलें. तें असें कीं, 'खानसाहेबांसारख्या प्रतापी पुरुषांशीं लढण्याची माझी काय प्राज्ञा ? जर आपले योगेंकरून बादशाह मला सर्व अपराधांची क्षमा करील तर मजवर मोठे उपकार होतील. व मी सर्व मुलूख परत देईन.' अफझुलखान अगोदरच गर्विष्ठ; त्यांतून राजकीय कामांत आपण फार दक्ष आहों अशी त्यास घमेंडी असे. त्यामुळें वकिलाचें हें बोलणें ऐकून तो अतिशयच चढला व त्यास पूर्वापार भान राहिलें नाहीं. याशिवाय पहाडामध्यें मावळे लोकांवर यश मिळणें कठीण ही गोष्ट पूर्वीं वांईप्रांताचे सुभेदारीवर असतां त्याचे अनुभवास आली होती. या कारणास्तव शिवाजी महाराज आपण होऊन शरण येतात याचा त्यास अंतर्यामीं फार आनंद झाला, व त्याणें **महाराजांकडे** आपले कारकून **पंतोजी गोपीनाथ** यांस बोलणें चालणें करण्याकरितां पाठविलें. नंतर **महाराजांनीं** प्रतापगडावरून खालीं उतरून पंतोजी गोपीनाथांची भेट

पारगांवीं घेतली. पंतोजी गोपीनाथांनीं सांगितलें कीं, 'आपण सर्व मुलूख परत द्याल, तर खानसाहेब बादशहाकडून आपले सर्व अपराध क्षमा करवितील व थोडी बहुत जहागिरीही आपणास देववितील.' इतक्यांत महाराजांनीं वकील व त्याजबराबर आलेल्या लोकांची राहण्याची तजवीज अगोदर लाविली. त्यांत पंतोजी गोपीनाथांस अगदीं एकीकडे बिऱ्हाड दिलें व रात्रौ चहूंकडे निजानिज झाल्यावर पंतोजी गोपीनाथांस एकांतीं गांठून व दंडवत करून बोलले कीं, 'आह्मीं शूद्र, व आपण ब्राह्मण; आह्मांस सर्वथैव वंद्य आहां. जगदंबेनें प्रसन्न होऊन मजला गोब्राह्मणांचा प्रतिपाल करण्याची आज्ञा दिली आहे. मी जो उपक्रम आरंभिला आहे तो केवळ या आज्ञेस अनुसरून आहे व या कृत्यास आपणही अनुकूल व्हावें हेंच माझें मागणें आहे. मी आपले उपकार विसरणार नाहीं.' यावर पंतोजी गोपीनाथांनीं उत्तर केलें कीं, 'आपण स्वामिद्रोह करतां हें ठीक नाहीं, आपणास राज्यलोभ फार सुटला आहे असें दिसतें. आपण ज्या मसलती करतां, यांत देशकालवर्तमानाकडे पूर्णपणें लक्ष देत नाहीं असें मला वाटतें.' यावर महाराजांनीं प्रत्युत्तर केलें कीं, 'वास्तविक विचार करतां स्वामिद्रोहाचा दोष आमच्यावर येऊं शकत नाहीं. अहो, हा आपला देश असून परमुलखाचे लोक येतात व आपल्या तोंडांत देऊन देश हिसकावून घेतात, आपल्यास सदैव दास्यत्वांत ठेवून धर्मच्छल करतात, व डोळ्यांनीं पाहवत नाहींत असे घडोघडीं आपल्या आईबहिणींचे सुद्धां हाल करतात. अशांस स्वामी ह्मणणें अप्रयोजक आहे, व स्वामिद्रोहाची कल्पना देखील मनांत आणूं नये. आपण ह्मणतां मला राज्यलोभ सुटला आहे, पण आह्मीं काय सुखांत दिवस

घालवितों ?. रात्रंदिवस हृद्रोग व शत्रूंची भीति जागृत असते. बलिष्ठाबरोबर आह्मी विरोध चालविला आहे. आह्मास एक रात्रभर सुखाची झोंप देखील नाहीं. परंतु इतकेंही कष्ट सोसण्याचें कारण एवढेंच कीं, दास्यत्व जाऊन धर्मरक्षण होवो, व यवनांनीं आपल्या आईबहिणींचे केलेले हाल दृष्टीस न पडोत. जर एवढ्याचा कोणी पतकर घेईल तर खरोखर मला राज्यसत्तेची जरूरी नाहीं. आपण ह्मणाल कीं देशकालवर्तमानाकडे पूर्ण लक्ष द्यावें, हें खरें आहे. परंतु साक्षात् मला जगदंबेची आज्ञा आहे, व आपणही अनुकूल झालां, ह्मणजे देवब्राह्मणांची साह्यता मिळाली. यापेक्षां जास्त विचार करणें नको.' ही गोष्ट पंतोजी गोपीनाथांस रुचल्यासारखी पाहून **महाराज** बोलले कीं, ' आपण हिवऱ्याचे कुळकर्णी आहां; त्यास हिवरें हा गांव आपणास वंशपरंपरेनें इनाम देतों. आपण ह्या आलेल्या संकटापासून मुक्त करण्याचे कामांत मात्र आह्मांस मदत द्यावी. ' नंतर पंतोजी गोपीनाथाचें वचन घेऊन उभयतांचा बेत असा ठरला कीं अफझुलखानास एकांतीं भेटीकरितां आणून नाहींसा करावा.

पुढें **महाराजांनीं** आपले वकील **कृष्णाजी भास्कर** यांस पंतोजी गोपिनाथाबरोबर अफझुलखानाकडे पाठविलें, व कळविलें कीं, '**महाराज** आपणास फार भितात. आपण जाऊन त्यांस अभयवचन द्याल तर विश्वासेंकरून ते आपल्या स्वाधीन होतील; व युद्ध न करतां मुलख देतील. पंतोजी गोपीनाथाचें अनुमोदन पडल्यावर अफझलखानानें ही गोष्ट मान्य केली व त्याप्रमाणें **महाराजांस** निरोप पाठविला.

निरोप आल्यावर **महाराजांनीं** मोरोपंत पिंगळे यांस नवीन पठाणलोक चाकरीस ठेविले होते त्यांना व मावळे

लोकांना घेऊन जावळीस तयार राहण्यास सांगितलें, व नेताजी पालकर यांस सैन्यासह गुप्तपणें प्रतापगडीं असण्याची आज्ञा दिली, आणि सांगितलें कीं, 'अफझुलखानाची भेट किल्ल्यावर चढतांना अर्ध्या वाटेवर होणार आहे; याकरितां अर्धी फौज गडावर व अर्धी खालीं ठेवावी ह्मणजे प्रसंग पडल्यास तारांबळ होणार नाहीं.

याप्रमाणें व्यवस्था झाल्यावर किल्ल्यामध्यें **महाराजांनीं** स्नान करून, नित्य नियम उरकून आपली मातोश्री **जिजाबाई** इच्या पायांवर मस्तक ठेवून आशीर्वाद घेतला; आणि अंगांत चिलखत चढवून, व त्यावर अंगरखा घालून, उजव्या अस्तनींत एक बिचवा गुप्त ठेविला, व डाव्या हातांत वाघनखें घालून भेटीस निघाले. अफझुलखान पूर्वींच येऊन संकेताचे ठिकाणीं वाट पहात बसला होता. त्याणें दीड हजार फौज बरोबर आणली होती. पण शिवाजी महाराज भितील असें पंतोजी गोपीनाथानें सांगितल्यावरून अफझुलखानानें किल्ल्याचे पायथ्याशीं फौज ठेविली; आणि **सैद बंदू** नांवाचा एक हत्यारबंद शिपाई बरोबर घेऊन भेटण्यास आला; त्याप्रमाणें **महाराज**ही फक्त **नानाजी मालुसरे** यास बरोबर घेऊन आले. भेटीचें स्थान जवळ आलें तेव्हां **महाराज** दबकत येतात असें पाहून, पंतोजी गोपीनाथानें अफझुलखानास सांगितलें कीं, 'आपल्याबरोबरच्या हत्यारबंद शिपायास **महाराज** भीत आहेत. यास्तव त्याला अंमळ दूर ठेवावें.' त्याप्रमाणें शिपाई दूर झाल्यावर उभयतांचें आलिंगन होत असतां, महाराजांनीं खानाचे पोटांत वाघनखें खुपसलीं. त्या योगानें अफझुलखान बराच घायाळ झाला, परंतु इतक्यांत तरवार उपसून त्यानें महाराजांचे डोक्यावर वार केला व 'घात आहे!' ह्मणून

ओरडला. इतक्यांत महाराजांनीं बिचवा काढून त्याचा शेवट केला. अफझुलखानानें तरवार मारली होती व महाराजांचे मस्तकावर टोप असल्यामुळें लागू झाली नाहीं. ही सर्व गडबड एका क्षणांत झाली; नंतर अफझुलखानाचा शिपाई सैद बंदू लढण्यास आला. त्यास तानाजी मालुसऱ्यानें ठार केलें आणि **खंडू माळे** याणें अफझुलखानाचें शिर कापून किल्लयावर नेलें व संकेताप्रमाणें तोफांचे बार केले. ते होतांच प्रतापगडचे व जावळीचे फौजेनें येऊन यवनांच्या लष्करावर छापा घातला. त्यांत यवनांचा अगदीं पराभव झाला. नेताजी पालकरानें जे जे लोक सांपडले त्यांची कत्तल केली; परंतु मोरोपंतानें **महाराजांनीं** सांगितल्यावरून पुष्कळांचे प्राण वांचविले. जे लोक लढाईंत कैद झाले त्यांचा **महाराजांनीं** अतिशय समाचार घेतला. या लढाईंत विजापूरवाल्यांचे नामांकित सरदार **झुंझारराव घाटगे** हेही **महाराजांचे** हातीं सांपडले. त्यांचा व शाहाजीराजांचा फार स्नेह असे. त्यांणीं आपले पक्षाकडे रहावें ह्मणून महाराजांनीं फार प्रयत्न केला. परंतु त्यांची मर्जी नाहींशी दिसल्यावरून त्यांस सन्मानानें परत जाऊं दिलें. **खंडूजी कांकडे** याणें अफझुलखानाची बायको व मुलें यांस पकडून आणलें. परंतु पुढें लांच खाऊन खंडूजीनें आडमार्गानें कोयनेच्या कांठाकांठानें कऱ्हाडापर्यंत जाऊन तेथें त्यांना सोडून दिलें. या बेइमानीबद्दल **महाराजांनीं** खंडूजीचें तात्काळ डोकें उडविलें.

या लढाईंत शिवाजी महाराजांस शत्रूचे ४००० घोडे, पुष्कळ हत्ती व उंटें सांपडलीं; शिवाय द्रव्य व युद्धसामग्रीही मिळाली. स्वपक्षाचे लोकांचा मोठा मानसमारंभ करून कडीं, तोडे, गोफ, अलंकार व वस्त्रें इत्यादि इनामें **महाराजांनीं**

वांटलीं. महाराजांचीं वाघनखें हल्लीं विलायतेंत, राणीसाहेबांच्या पदार्थसंग्रहालयांत वास करीत आहेत असें ह्मणतात, येणेंप्रमाणें अफझुलखानाच्या स्वारीचा शेवट झाला, व यवनांवर मराठ्यांचे वर्चस्वाची सुरुवात झाली.

प्रतापगडचे लढाईनंतर सन १६६१ मध्यें महाराजांनीं प्रतापगडावर देवीचें देवालय स्थापन केलें. राज्यकार्यामुळें आपली कुळस्वामिनी जी तुळजापुरची भवानी इचे दर्शनास जाण्यास महाराजांस सवड मिळत नसे. यास्तव देवीचें स्थान संनिध असल्यानें नेहमीं दर्शन होत जाईल या हेतूनें देवालयाची स्थापना करण्यांत आली. देवीचें देऊळ सुंदर बांधलें आहे व पुढें लहानसें एक तळें आहे. देवीला चारपांच हजारांची नेमणूक आहे. पुजारी, पुराणिक इत्यादिक गडावर राहून नित्य सेवा करीत असतात. या देवालयास अनुलक्षून ग्रांट् डफ् साहेबांनी लिहिलें आहे कीं, जावळीचे मोरे व शृंगारपुरचे दळवे हे हिंदु असून त्यांस जिंकून त्यांचीं संस्थानें महाराजांनीं घेतलीं ही गोष्ट मराठे लोकांस न आवडल्यामुळें, धर्मनिष्ठपणा दाखवून जातवाल्यांची प्रीति संपादन करण्याकरितां महाराजांनीं देवीची स्थापना केली व रामदासस्वामीचा उपदेश ग्रहण केला. या ह्मणण्यास साहेबांनीं आधार दिला नाहीं. केवळ अनुमान असल्यास त्याची मातबरी नको.

रामदासस्वामीच्या भेटीचा प्रयत्न शिवाजी महाराजांनीं प्रतापगडीं असतां केला, व नंतर स्वामीचा गुरूपदेश घेतला. यांविषयींची हकीकत स्वामीचे चरित्रांत इत्थंभूत दिली आहे. ती फार गोड असून भक्तिभावानें लिहिली आहे. याकरितां चरित्राचे सरणीस धक्का न लावितां मुख्य गोष्टींचा सारांश

येथें घेतला आहे. तो येणेंप्रमाणेः—

रामदासस्वामींनीं कृष्णातीरीं राहून अद्भुत चमत्कार केले. ते ऐकून शिवाजी महाराज रायगडीं असतां एके समयीं आपल्या मनांत ह्मणाले, 'हे साधु या प्रांतांतील आहेत; त्यांचें दर्शन व भाषण अवश्य झालें पाहिजे.' अशी उत्कंठा धरून महाराजांची स्वारी रायगडाहून खालीं मुक्कामास आली. त्या समयीं तेथें कोणी गोसांवी आलेले पाहून महाराजांनीं त्यांजकडून कीर्तन करविलें. कीर्तनांत गोसांव्यांनीं 'ध्रुवचरित्र' लाविलें व सद्गुरूवांचून मोक्ष नाहीं असें प्रतिपादन केलें. हें ऐकिल्यापासून महाराजांचें चित्त अगदीं उद्विग्न झालें आणि गुरु कोणास करावें, याविषयीं विचार करित असतां, आपली कुलस्वामिनी जी भवानी इची प्रार्थना करण्याकरितां प्रतापगडीं आले, आणि 'गुरु कोणास करावें येविषयीं आज्ञा व्हावी,' ह्मणून देवीचें चिंतन केलें असतां, देवीनें सांगितलें कीं, 'रामदास यांसच शरण जावें. कारण ते तुह्मांकरिताच उत्पन्न झाले आहेत.' हा दृष्टांत झाल्यावर शिवाजी महाराज दर्शनाच्या उद्देशानें चाफळास आले, आणि रामदासस्वामींनीं रामाच्या मूर्ति स्थापन केल्या होत्या त्यांच्या दर्शनास गेले. तेथें स्वामींचा शोध करितां, चाफळखोऱ्याचे अधिकारी नरसो मल्लनाथ यांणीं सांगितलें कीं, 'स्वामी मठांत न राहतां बहुतकरून अरण्यांत फिरत असतात.' पुढें मठ कोणीं बांधला, याविषयीं पुसतपास करितां पुजारी याणें सांगितलें कीं, 'देवालयास पैका आपलाच लागला आहे.' नंतर महाराजांनीं देवळासमोर फिरून पाहिलें, तों उत्तरेकडून नदी, व दक्षणेकडून ओढा, या दोहोंमुळें मठ ज्या दरडीवर होता तीस उपद्रव होत आहे. या कारणास्तव नरसो मल्लनाथ

याजपाशीं ७०० होन दिले आणि ओढा फिरवून बंधारा बांधावा ह्मणून आज्ञा दिली. नंतर दुसरे दिवशीं महाराज रामदासस्वामीचा शोध करीत अरण्यांत फिरले परंतु शोध लागेना. तेव्हां निरुपाय होऊन कांहीं राज्यकारणामुळें प्रतापगडीं निघून आले. परंतु **स्वामींची** भेट झाली नाहीं ह्मणून मनास फार चुटपुट लागली होती. या कारणास्तव पुनः देवीची प्रार्थना केली कीं, 'प्रयत्न केला असतांही **स्वामींचें** दर्शन होत नाहीं याचें कारण काय?' त्याच दिवशीं रात्रीं स्वप्नामध्यें "पायीं पादुका, कटीं कौपीन, हातीं माळ, काखेस कुबडी, मस्तकीं जटाधारण व टोप याप्रमाणें रामदासस्वामींची मूर्ति महाराजांपुढें उभी राहिली व नारळ प्रसाद दिला, आणि आपण कोण ह्मणून महाराजांनीं विचारल्यावर **स्वामींनीं** सांगितलें कीं, 'आह्मीं गंगातीरीं रहाणार, परंतु सांप्रत तुमच्याकरितां कृष्णातीरीं आलों आहोंत, व तुह्मांला एवढेंच सांगणें आहे कीं, तुह्मीं जें राज्यसाधन आरंभिलें आहे तेंच चालवावें, आणि धर्माचा उच्छेद झाला आहे त्याची संस्थापना करून देवब्राह्मणांचे ठायीं सादर असावें,' इतकें ह्मणून स्वामी अदृश्य झाले, व महाराज जागृत झाले. नंतर महाराज मातोश्रीची आज्ञा घेऊन महाबळेश्वरीं आले. तेथून वांईस व माहुलीस गेले. तों तेथें **स्वामींकडून** ओवीबद्ध पत्र आलें तें येणेप्रमाणें:—

"निश्चयाचा महामेरू । बहुत जनांशीं आधारू ।
अखंडस्थितीचा निर्धारू । श्रीमंत योगी ॥ १ ॥
परोपकाराचिया राशी । उदंड घडती जयाशी ।
ज्याचे गुणमहत्त्वाशी । तुळणा कैंची ॥ २ ॥
नरपती हयपती । गजपती गडपती ।

पुरंदर आणि शक्ति । पृष्ठभागीं ॥ ३ ॥
यशवंत कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंत ।
पुण्यवंत आणि जयवंत । जाणता राजा ॥ ४ ॥
आचारशील विचारशील । दानशील धर्मशील ।
सर्वज्ञपणें सुशील । सर्वा ठायीं ॥ ५ ॥
धीर उदार सुंदर । शूर क्रियेशीं तत्पर ।
सावधपणेंशी नृपवर । तुच्छ केले ॥ ६ ॥
तीर्थे क्षेत्रें तीं मोडलीं । ब्राह्मणस्थानें बिघडलीं ।
सकळ पृथ्वी आंदोळिली । धर्म गेला ॥ ७ ॥
देव धर्म गोब्राह्मण । करावयाशीं रक्षण ।
हृदयस्थ जाहला नारायण । प्रेरणा केली ॥ ८ ॥
उदंड पंडित पुराणिक । कवीश्वर याज्ञिक वैदिक ।
धूर्त तार्तिक सभानायक । तुमचे ठाईं ॥ ९ ॥
या भूमंडळाचे ठायीं । धर्म रक्षी ऐसा नाहीं ।
महाराष्ट्र धर्म राहिला कांहीं । तुह्मांकरितां ॥ १० ॥
आणखी कांहीं धर्म चालती। श्रीमंत होऊनी कितेक असती।
धन्यधन्य तुमची कीर्ती । विश्वीं विस्तारिली ॥ ११ ॥
कित्येक दुष्ट संहारिला । कित्येकांस धाक सुटला ।
कित्येकांस आश्रय झाला । शिव कल्याणराजा ॥ १२ ॥
तुमचे देशीं वास्तव्य केलें । परंतु वर्तमान नाहीं घेतलें ।
ऋणानुबंधें विस्मरण झालें । वा, काय नेणू ॥ १३ ॥
सर्वज्ञ मंडळी धर्ममूर्ती । सांगणें काय तुह्माप्रती ।
धर्मस्थापनेची कीर्ति । संभाळिली पाहिजे ॥ १४ ॥
उदंड राजकारण तटलें । तेथें चित्त विभागलें ।
प्रसंग नसतां लिहिलें । क्षमा केली पाहिजे ॥ १५ ॥ ”

हें पत्र पाहून शिवाजी महाराज फार सद्गदित झाले व उत्तर लिहिलें कीं, 'स्वामी, मी बहुत अपराधी आहें. आपण क्षमावंत आहां. सांप्रत कृपाकरून आशीर्वादपत्र पाठविलें तें पाहून परमानंदातें पावलों. दर्शनाची इच्छा धरून येत आहें. त्यास कृपा करून दर्शन दिलें पाहिजे, ही विज्ञप्ति.'

हें पत्र स्वामीकडून आलेल्या ब्राह्मणास दिलें व स्वामी चाफळखोऱ्यांत आहेत असें त्याणें सांगितल्यावरून चाफळास स्वामीच्या मठांत गेले व शोध करितां स्वामी सिंगणवाडीस आहेत असें कळलें. मठांतील मंडळीनीं भोजनाविषयीं महाराजांस आग्रह केला असतां, 'समर्थांचे पाय पाहिल्यावांजून अन्नग्रहण करावयाचें नाहीं,' असें सांगून दिवाकरभटाबरोबर सिंगणवाडीस गेले. तेथें शिवाजी महाराजांचें पत्र व ते बरोबरच येऊन पोंचले. स्वामींनीं विनोदानें महाराजांस म्हटलें कीं, 'तुमचे देशांत आम्हीं इतके दिवस आहों, आमचा परामर्श बराच घेतला.' हें ऐकून महाराजांस फार वाईट वाटलें. पुढें उभयतांचा संवाद होऊन महाराजांनीं सिंगणवाडी येथें स्वामीचा उपदेश घेतला. ते समयीं महाराजांस स्वामींनीं एक नारळ प्रसाद दिला. आणि मूठभर माती, मूठभर खडे व मूठभर लीद, याप्रमाणें महाराजांचे पदरांत घातलें. पुढें स्वामींच्या आज्ञेवरून महाराज तीन दिवस चाफळास राहिले व स्वामीचा निरोप घेऊन प्रतापगडीं निघून गेले. तेथें मातोश्रीनीं विचारिलें कीं, 'लीद, माती आणि खडे दिले याचा अभिप्राय काय?' तेव्हां शिवाजी महाराज बोलले, 'आईसाहेब, यांतील भाव असा आहे कीं, नारळ प्रसाद हा माझे कल्याणार्थ; व माती दिली येणेंकरून पृथ्वी प्राप्त होईल, व खडे दिले येणेंकरून बहुत किल्लेही ताब्यांत

रहातील, व लीद दिली येणेंकरून पागा पुष्कळ पदरीं राहील, असे भाव समर्थांनीं सुचविले.' हें वृत्त शके १५७१ विरोधी नाम संवत्सरीं ज्येष्ठ शुद्ध ९ स झालें.

वरील वृत्तांतामध्यें कित्येक गोष्टी आपल्या दृष्टीला असंभाव्य व असाधारण दिसतात, परंतु स्वामींचें चरित्र त्यांच्या शिष्यांनीं भक्तिभावें लिहिलें आहे हें लक्षांत ठेवून, व, असंभाव्य वर्णन दिसेल त्या ठिकाणीं लौकिकार्थ घेऊन चाललें असतां, कोणताही प्रत्यवाय न येऊन वास्तविक इतिहास समजेल यांत शंका नाहीं.

सारांश, प्रतापगडीं कुळस्वामिनी भवानीचें स्थान असल्यानें, व रामदास स्वामींच्या दर्शनाचा उपक्रम तेथून झाल्याच्या योगानें, व देश आणि कोंकण यांन्या नाक्यावर प्रतापगडचा किल्ला होता म्हणून महाराजांची या ठिकाणीं पुष्कळ श्रद्धा असे.

रामदास स्वामीचे भेटीनंतर सन १६६५ मध्यें महाराजांनीं 'राजा' हें पद धारण केल्यावर त्यांची व त्यांच्या वंशजांची सत्ता महाराष्ट्रांत कायम झाली. पुढें महाराजांच्या पुण्याईनें त्यांचे चाकर, राजकार्यधुरंधर व विश्वासनिधि जे श्रीवर्धनचे पेशवे त्यांणीं, महान् पराक्रम करून एके काळीं तीन दिवसपर्यंत हस्तिनापुरीं पांडवाची पुरातन गादीही चालविली. पेशव्यांच्या कारकीर्दींत प्रतापगडीं म्हणण्यासारखी गोष्ट एवढीच झाली कीं, साडेतीन शहाण्यांतले पहिले शहाणे सखाराम बापू बोकील व नानाफडनविस यांचें वैमनस्य पडल्यावर, नानांनीं त्यांस प्रतापगडीं सन १७७८ सालीं कैदेंत ठेविलें होतें. सखाराम बापू हे पंतोजी गोपिनाथांचे नातू किंवा पणतु होत

असें ह्मणतात, व सव्वाशें वर्षांपूर्वी पंतोजी गोपिनाथांनीं जेथें मराठ्यांस साह्य केलें त्या ठिकाणीं बापू कैदेंत होते. याप्रमाणें दैवगति कांहीं विलक्षण असते!

पेशव्यांची कारकीर्द सन १८१८ पर्यंत चालली. त्या वर्षीं इंग्लिशांनीं बाजीरावास पदच्युत करून महाराष्ट्रदेश जिंकला. तथापि दैवयोगेंकरून महाबळेश्वर हें ठिकाण आपल्या लोकांचे हातून गेलें नाहीं. कारण सन १८१९ मध्यें सातारचे राजे प्रतापसिंह व इंग्लिश यांच्यामध्यें तहनामा होऊन, सातारकरांस मुलुख मिळाला, त्यांत जावळी सुभा व अर्थात् महाबळेश्वर हीं ठिकाणें सातारकरांकडेसच राहिलीं; आणि भैरवगड, प्रचीतगड आणि वासोटा या किल्ल्यांवर मर्जीस असल्यास इंग्लिशांनीं फौज ठेवावी असा करार होता तथापि प्रतापगडच्या किल्ल्याशीं इंग्लिशांचा संबंध कांहीं एक नसाना असा ठराव होता.

पुढें सन १८२९ सालीं इंग्लिशांनीं सातारकरांपासून महाबळेश्वर मागून घेतलें. हा प्रकार असा झाला कीं, सन १८२४ मध्यें सातारचे रेसिडेंट कर्नल् लॉडविक् साहेब हे उन्हाळ्यांत हवा बदलण्याकरितां महाबळेश्वरीं आले व हल्लीं लॉडविक् पॉइंट आहे तेथें राहिले. यापूर्वीं साहेबलोकांचें येणें या स्थळीं कधींही झालें नव्हतें, हें पहिल्या भागांत सांगितलेंच आहे. येथील हवा फार उत्तम व स्थळ रमणीय आहे असें पाहून कर्नल् लॉडविक् साहेबांनीं ही गोष्ट सर्व लोकांस कळवून सरकारांनही जाहिर केली. पुढें कर्नल ब्रिग्ज् साहेब सातारचे रेसिडेंट झाले. त्यांणीं सन १८२६ सालीं महाबळेश्वरीं एक बंगला बांधला व सातारच्या महाराजांक-

डून घाटमाथ्यापावेतों गाडीरस्ता करून घेतला. नंतर मुंबईचे गव्हरनर सर सिडनी बेकूविथ् साहेब हे हवा खाण्याकरितां येऊं लागले. त्यांणीं आजारी युरोपियन शिपायांकरितां एक इसपिताळ बांधविलें. सन १८२७ सालीं बेकूविथ् साहेबांच्या योगानें आणखीही साहेबलोक हवा खाण्याकरितां आले. कर्नल् रॉबर्टसन् साहेब रेसिडेंट झाल्यावर त्यांणींही एक बंगला बांधला. सन १८२८ चे नोवेंबर महिन्यांत सर जॉन् माल्कम् साहेब हवा खाण्याकरितां आले, व त्यांणीं आपल्याबरोबर एक डाक्तर आणून महाबळेश्वरच्या हवेची चिकित्सा करविली. आणि सरकारी बंगल्याकरितां जागा निवडून काढल्या व खासगत आपला बंगला तयार केला. तो अद्यापि कायम असून त्यास "माल्कम्घर" असें ह्मणतात. माल्कम् साहेबाच्या सांगण्यावरून सातारचे महाराजांनीं नहर येथें एक गांव वसविला व त्यास 'माल्कम्पेंठ' हें नांव दिलें. पुढें साताऱ्यापासून महाबळेश्वरपर्यंत जुना रस्ता होता तो माल्कम् साहेबांनीं महाराजांकडून रडतोंडीचे घांटापासून घाटमाथ्याखालीं पारघांटापावेतों बांधून घेतला. तसेंच नहरास पाण्याचा तोटा होता ह्मणून वेण्यातळावही करून घेतला.

नंतर सन १८२९ सालीं तारीख १६ मे रोजीं नामदार ईस्ट इंडिया कंपनी व सातारकर महाराज यांच्यामध्यें तहनामा होऊन माल्कम्पेंठ व सभोंवतील १५ मैलांच्या परिघाची जागा महाराजांनीं कंपनीस दिली. तसेंच पारगांवही दिलें. परंतु प्रतापगडचा किल्ला व त्यासभोंवतील गडकऱ्यांच्या जमिनी पूर्वींप्रमाणें महाराजांकडे रहाव्या असा स्पष्ट ठराव झाला. माल्कम्पेंठचे व पारगांवचे ऐवजीं कंपनीनें महाराजांस

खांवटकीचे घांटाखालीं वांईहून सात कोश खंडाळें म्हणून गांव आहे तो दिला. खंडाळें हें पूर्वीं शिंद्यांकडे होतें. तें त्यांणीं इंग्लिशांस दिलें. तेव्हां सातारकरांच्या संस्थानामध्यें एवढा एकच गांव इंग्लिशांचा असल्यामुळें तेथील बंदोबस्त करण्यास अडचण पडे. यास्तव सातारकर महाराजांकडे खंडाळें गेल्यानें उभयतांचाही फायदा झाला. पुढल्यावर्षी मुंबई कोडांतील सन १८३० चा कायदा १४ याचे द्वारां महाबळेश्वर हा कायदेशीर मुलूख आहे असा ठराव होऊन कोंकण जिल्ह्यांत सामील झाला. शेवटीं सन १८४८ मध्यें शाहाजी महाराज कैलासवासी झाल्यावर त्यांणीं थोरले शिवाजी महाराजांचे वंशांतले व्यंकोजी राजे दत्तक घेतले असतां, त्यांचें दत्तविधान अमान्य करून सरकारानें सातारचें संस्थान खालसा केलें. तथापि प्रतापगडचा किल्ला सातारकरांकडेसच होता. सन १८७४ पर्यंत किल्ल्यावरील देवीच्या नेमणुकीची व्यवस्था सातारच्या शेवटल्या आईसाहेबांकडेस होती व पुजारी वगैरे त्यांचे लोक किल्ल्यावर रहात असत. परंतु १८७४ सालीं आईसाहेब कैलासवासी झाल्या. त्यांच्या दत्तकाचा इतिहास हल्लीं सर्वांस माहीत आहेच.

ह्या भागांत एक गोष्ट लिहिण्याची बाकी राहिली आहे., ती ही कीं मागें जो प्रतापगडच्या लढाईचा वृत्तांत दिला आहे तो **ग्रांट डफ्** साहेबांच्या ग्रंथावरून घेतला आहे. परंतु या लढाईवर रचलेला एक जुना पवाडा 'विविधज्ञानविस्तार' या मासिक पुस्तकामध्यें सहाव्या पुस्तकाच्या दहाव्या अंकांत छापिला आहे, तो प्रस्तुत विषयास अनुसरून असल्यामुळें पुनः एथें घेतों.—

# शिवाजी महाराजांचा पवाडा.

सकळा देवा आदि देवू ॥ शिवा नमन धरूनी भावू ॥ जैसा शिवाजीचा भावू ॥ कलिमधिं प्रसन्न महादेवू ॥ सांबाचा अवतार छत्रपति, राजा शिव ॥ शिवाजीच्या तळ्यांत पाणी, पीती सर्व जीव ॥ पाणी पूर्ण पिकलें न्हाव ॥ भाकेंत गुंतला

---

१. ह्या पवाड्याची चाल लागत नव्हती, प्रास मिळत नव्हते, कडव्यीं पडलेलीं नव्हतीं, अर्थ पुष्कळ दुर्बोध होता, व त्यांतील इतिहासाची माहिती नीट समजत नव्हती. रा० रा० नारायण रामचंद्र सोहनी व रा० रा० रामराव दादा कदम या उभयतांनीं विशेष श्रम करून या जुन्या पवाड्याचा बराच उद्धार केला आहे. पवाड्यांतील कित्येक नांवांचा वगैरे पत्ता लागत नाहीं तो उत्तरोत्तर शोधाअंतीं लागणार आहे. विविधज्ञानविस्तारामध्यें पवाडा दिला आहे त्याची नक्कल E पुरवणींत दिली आहे.

हा पवाडा पुढील चालींत ह्मणतां येतो.—

तुह्मीं झुरे बावरे फंदी मुशाफर दिसतां ।
नवी नवल पराई कोण्या ठिकाणीं असतां ॥

(मुशाफर)

तसेंच खालील चालही लागते:—

पहातां पहातां धर्म बुडाला अधर्म झाला चहूंकडे ।
जिकडे तिकडे कली मातला कठीण काळ हा आला पुढें ॥

(महिपतीकृत लावणी)

२. वाघ व शेळी एका ठिकाणीं पाणी पीत होतीं, ह्मणजे शिवाजी महाराजांच्या राज्यांत लहान थोर निर्भय रहात होते.

३. शिवाजी महाराजांचें राज्य पूर्ण दशेस आलें; सर्वांनीं या पूर्णतेचा यथेच्छ उपभोग घ्यावा.

महादेव ॥ [४]राजगडासारिखा देवें, दिला ठाव ॥ रगतगड रो[५]येला, [६]जावळी [७]प्रतापगड मंडण ॥ सोनबा [९]सहिला, राजगडावरी सुवर्ण ॥ [१०]गड [११]हुडा दुर्ग चांगले, [१२]भाग मी राजाचें गाईन ॥ १ ॥

सांगन शिवाजीच्या हिकमती ॥ किल्ले दुर्ग, किती झूलती ॥ भले [१३]दुणेदार जाणती ॥ मराठे राजकुम्मर ऐकती ॥

---

४. राजगडचा किल्ला सन १६४७ मध्यें शिवाजीमहाराजांनीं तोरण्याजवळ मोरबद या नांवाचे टेंकडीवर बांधला.

५. रोहिला किल्ला सन १६५५ मध्यें हिरडस मावळचे देशमुखापासून महाराजांनीं घेतला.

६. टीप १४ पहा.

७. सन १६५६ मध्यें प्रतापगड बांधला.

८. बाणकोटचे किल्ल्यास मंडणगड ह्मणतात.

९. सोनबा सहिल्या ह्मणून राजगडावर कोणी शिवाजी महाराजांचा अधिकारी असावा, त्याचें नांव सोनबा. यास 'सहिल्या' ह्मटलें ही चुकी दिसते. कारण, 'सोनबा महाला' या नांवाचा महाराजांचे पदरीं एक पायदळाचा सरदार होता तोच हा असावा. व तो गडावर सुवर्णाप्रमाणें असे, ह्मणजे नांवाप्रमाणें त्याची चांगली कृति असे, असा अर्थ या ओळीचा दिसतो.

१०. दुर्ग व किल्ला यांमधील भेद राजव्यवहारकोशांत स्पष्ट केला आहे;—'दुर्गं किल्लेति विज्ञेयं गिरिदुर्गं गडः स्मृतः.'

११. बुरुज. ( हा कर्नाटकी शब्द आहे. ) 'पुच्छ पेटतांची हनुमंत उडे । लंकेमध्यें हुडे वाडे जाळी ॥' मोरोपंतकृत सीतागीत. ओवी ११४.

१२. भाग्य, ऐश्वर्य.

१३. द्रव्यवान्. दुणा ह्मणजे द्रव्य ज्याजवळ आहे तो दुणेदार; जसें, दाणादुणा.

मोऱ्या 'चंद्रराव धरिती ॥ गड मग जावळीचा घेती ॥ पावनगड पनाळा, प्रबळगड है संगीन ॥ मतंगड घोसाळा, राहिल्या अनंत वाड्या दिन ॥ कमळगड वेढिला, काबिज केलें तळकोंकण ॥ पांत्रेली चवली घेऊन मुलुख, काबिज केला महाराजान ॥ धोंडपाताळ कोंकण घाटचे किल्ले मी

---

१४. जावळीचे चंद्रराव मोरे यांस शिवाजी महाराजांचे लोकांनीं धरून ठार मारलें व जावळी सन १६५५ मध्यें घेतली.

१५. पावनगड व पनाळा हे किल्ले जवळ जवळ आहेत व ते शिवाजी महाराजांनीं सन १६५९ मध्यें घेतले. हे किल्ले मजबुतीविषयीं फार प्रसिद्ध होते ह्मणून त्यांस प्रबळ व संगीन हीं विशेषणें दिलीं आहेत. परंतु 'प्रबळगड' या नांवाचा एक किल्लाही आहे. त्यास देखील कदाचित् येथें हवाला असेल.

१६ घोसाळ्याजवळचा बिरवाडीचा किल्ला सन १६५९ त महाराजांनीं बांधला तो.

१७. दीन, ह्मणजे लहानसा. (गाण्याचे श्लोकाकरितां 'दिन.')

१८. मुळांत येथें 'कुबळ्यर' असें होतें, परंतु पुढील संदर्भावरून उघड दिसतें कीं हें नांव 'कमळगड' आहे. कमळगडचा किल्ला महाबळेश्वराजवळ आहे.

१९. राज्यपद प्राप्त होण्याचे अगोदर विजापुरसरकारचे रयतेपासून वसुलाचा चतुर्थांश, अष्टमांश, याप्रमाणें खंडणी महाराज घेत असत, तीस अनुलक्षून हें लिहिलें आहे. यापासूनच पुढें मराठ्यांची चौथाई व सरदेशमुखी सुरू झाली.

२०. घाटावरचे मराठे लोक तळकोंकणास 'धोंडपाताळ कोंकण' असें ह्मणतात.

गाईन ॥ सिंरवळ[21] सुपेंळ[22] देश, [23]घेतले जसें इंदापुरापासून ॥ [24]कुणबीस्तान कोंकण ॥ शेकसेल[25] पीर मी पाहीन ॥ घेतलीं बाराही [26]बंदरें, भाग मी राजाचें गाईन ॥ २ ॥

कल्याण[27] भिंवडी मारून नेली ॥ फिर्याद[28] विजापु-

---

२१. वाईचे वाटेवरचें शिरवळ, हिरडस मावळच्या देशमुखापासून सन १६५५ त घेतलें.

२२. सुपे प्रांताचें प्राचीन नांव 'सुपळ' होतें व हें अद्यापि वृद्ध मनुष्यांच्या मुखांतून ऐकूं येतें. सभोंतील प्रांतापेक्षां सुपे प्रांताचें पीक फार चांगलें आहे ह्मणून त्यास पूर्वी 'सुफल' ह्मणत व याचाच अपभ्रंश 'सुपळ' असा झाला. पुढें आणखी फेरफार होऊन 'सुपें' ह्मणूं लागले. हा प्रांत शिवाजी महाराजांच्या जहागिरींतच होता. परंतु तेथील अधिकारी बाजी मोहित्या हा विजापुरवाल्यांविरुद्ध वागल्यास अनुकूळ नव्हता ह्मणून महाराजांनीं त्यास कैद करून कर्नाटकांत रवाना केलें व सन १६४७ त तो प्रांत आपले ताब्यांत घेतला.

२३. पुणें जिल्ह्यांतील इंदापुर. हें सुप्याप्रमाणेंच घेतलें.

२४ मराठे कुणब्यांचा मूळदेश जो कोंकणचा भाग तो.

२५. ज्या वाडीचा विस्तार होऊन 'पुणें' शहर झालें त्या वाडींत पूर्वी पुणेश्वर व नारायणेश्वर अशीं दोन शिवालयें होतीं. तीं मुसलमानांनीं मोडून त्या ठिकाणीं अनुक्रमें धाकटा व थोरला शेकसल असे दोन दर्गे केले. सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें असतां अद्यापही या दर्ग्यांच्या इमारतींत देवळाचा देखावा दिसतो. (पुण्याचें वर्णन पहा.)

२६. दाभोळ वगैरे बंदरें सन १६६० मध्यें घेतली.

२७. कल्याणचा सुभेदार मुलाना अहंमद यानें विजापुरास खजिना पाठविला असतां तो लुटून सन १६४८ मध्यें शिवाजी महाराजांनीं कल्याणप्रांतांत हस्तगत केला.

२८. फिर्याद.

राजा गेली ॥ बाच्छायां क्रोध झाला ॥ जैसी अग्न प्रजवळली ॥ जिता धरा शिवाजीला ॥ कुलवजिरांशी बोलिला ॥ बोलावा बाजी घोरपड्याला ॥ संगें ह्मादजी भोसल्याला ॥ घाटग्या झुंजाररायाला ॥ संगे देवक्या जिवाजीला ॥ सडंग त्रिमुखरायाला, मंगें बेदऱ्या पिलाजीला ॥ करन्यावरन्या संभाजीला ॥ संगें इंगळ्या सुभानाला ॥ राजेखान बडेखान ॥ सिंद्दीला अबदुलखान ॥ अवघ्या वजीरांचा कोट, संदरे बैसले दिवाण ॥ विडा पैजेचा उचलिला ॥ खान विजापुरांत बोलिला ॥ जो बाच्छाई नावाजला ॥ घोडा फिरंग सदरे दिला ॥ सातशें भरले उंट बाणाचे ॥ करडें लष्कर खानाचें ॥ लष्कर चवदा हजार घोडा ॥ चाले धरावया तोंडा ॥ भांड सर्व देती ॥ कणकिल्ले विलोकिती ॥ खान दरमजली कुच

२९. शहाजी महाराजास बोलावून कपटानें धरून विजापुरीं आणिलें तो हा बाजी घोरपड्या आहे. यास बापाच्या सांगण्यावरून शिवाजीमहाराजांनीं पुढें ठार मारिलें.

३०. यांत महाराजांनीं प्रतापगडचे लढाईंत धरून कैद केलें होतें. परंतु हे शाहाजी राजाचे मित्र असल्यामुळें, त्यांच्या विनंतीवरून त्यांस महाराजांनीं सन्मानानें परत लावून दिलें.

३१. हे महाकुंग्याचे इंगळे असावेत. हेंच नांव पुढें शिवाजी महाराजांच्या दरबाराचें वर्णन दिलें आहे त्यांत आलें आहे. परंतु हे दोन्ही मनुष्य निराळे असले पाहिजेत.

३२. हा हपसाणचा सिद्दी असावा.

३३. दिवाण ह्मणजे राजा व सदर ह्मणजे सभा किंवा कचेरी. 'दिवाणवाडा स्याद्राजमंदिरं सदरः सभा.' (राजव्यवहारकोश.)

३४. तलवार.

३५, या ओळीचा अर्थ कळत नाहीं. या ठिकाणीं खालील ओळ वाचल्यास कांहीं अर्थ निघतो—'भांडार सर्व देती, जन किल्यावरून विलोकिती.'

केला ॥ चालून तोरव्यासी आला ॥ बिनें फतेमारीच्या बि-
नीचा, खालीं आला ॥ कृष्णाजी बामण बोलिला, साहेब
झाला अपशकून ॥ भाग मी राजाचें गाईन ॥ ३ ॥
खान दरमजली कुच केला ॥ चालून तुळेजापुरा गेला ॥

---

३६. तोरवें हें खेडें विजापूर शहरचे तटापासून पश्चिमेकडे अर्ध कोसावर आहे. त्यास पूर्वी 'तोग्रा' असें ह्मणत असत व कांहीं दिवस विजापुरवाल्यांची जागाही तेथें होती.

३७. 'बीन' ह्मणजे निशाणाची काठी व 'बिनी' ह्मणजे निशाणाचा पटका. 'फतेमारी' हें तोफेचें नांव आहे, जसें जयंती, महाकाली वगैरे. या सर्व वाक्याचा अर्थ असा आहे कीं, फतेमारी तोफेवरील निशाणाची काठी, अबदुल्लाखान विजापुरची हद्द सोडून तोरव्यास आला तेव्हां खालीं पडली. हा अपशकुन झाला. 'बीन' या शब्दावरून 'बिनीवाले' ह्मणजे स्वारीचे पुढें मुख्य निशाण घेऊन जाणारे हें सर्वत्र प्रसिद्ध आहे.

३८. हा अबदुल्लाखानाबरोबर आलेला कारकून होय. ग्रांट् डफ् साहेबानें पंतोजी गोपिनाथ बोकिल आल्याचें लिहिलें आहे. तें लिहिणें या पवाड्यावरून साधार नाहीं हें उघड आहे. कारण, पवाड्याच्या रचनेवरून पवाडा वेळचे वेळीं झालेला आहे तेव्हां अर्थातच त्यांतील माहिती इतर माहितीपेक्षां अधिक प्रमाणभूत आहे.

३९. तुळजापुरास अबदुल्लाखान गेल्याचा आधार प्रस्तुत उपलब्ध असल्याचें इतिहासावरून सांपडत नाहीं. परंतु पंढरपुरास गेल्याचें खचित आहे. विजापुराहून वांईकडे जाण्याचा नेहमींचा मार्ग ह्मटला ह्मणजे तोरवें, तिकोटें, होनवाड, आथणी, यांवरून आहे. परंतु अबदुल्लाखान सातशें उंटासहीत फौज घेऊन पाऊस बंद होण्यापूर्वी विजापुराहून निघाला आणि तिकोटें आणि तोरवें यांच्या दरम्यान डोण नदीचे तीन ओघ असून त्या नदीचा उतारा फारच कठीण आहे, तिचें पाणी समुद्राप्रमाणें खारें आहे, पाणी विशेष असतें असें नाहीं, परंतु नदीचे पात्रांत हत्ती बुडेल इतका चिखल नेहमीं असतो, या अडचणीकरितां अबदुल्लाखान सरल मार्गानें न जातां डोण नदीला डावें घालून पंढरपुराहून वांईस गेला.

फोडलीच भोवानीला ॥ मांडली मागत्यान देवीला ॥ खान दरमजली कुच केला ॥ चालुनि पंढरीस गेला ॥ पंढरीच्या विठोबाला ॥ भिवरेमंदी[४०] बुडविला ॥ मसुद बांधली देवाला ॥ मग खानाचा भोग पुरला ॥ खान दरमजली कुच केला ॥ चालून पालीलागिं आला ॥ पालीचा खंडोबा, अज्यामत दावि मोंगलाला ॥ न्हांटो[४१] न्हाटोरे भाइ बोलिला ॥ तीन कोस मोड केला ॥ दीपमाळ बांधिली देवाला ॥ मग खानाचा भोग पुरला ॥ खान दरमजली कुच केला ॥ चालूनि औंवुंदाला[४२] गेला ॥ आवुंदाची येमाई, दावी प्रचित खानाला ॥ गोंधळ घातला देवीला ॥ मग खानाचा भोग पुरला ॥ पांढऱ्या[४३] संभूला घेतला ॥ खान दरमजली कुच केला ॥ चालून वाईलागीं गेला ॥ औंपुल्या[४४] मुलुकामधीं राहिला ॥ वरवेपणाचा कागद लिहिला ॥ बामण कृष्णाजी पाठविला ॥ [४५] हेजीम बोले शिवाजीला ॥ हेजीम बोले राजाला ॥ आला भेटाया खान ॥ भाग मी राजाचें गाईन ॥ ४ ॥

शिवाजी जरी तूं भेटसी ॥ उदंड दवलत देईन तुशीं ॥

---

४०. मध्यें.

४१. पळा. दक्षिण देशांतील मुसलमान हा शब्द ' पळणें ' याबद्दल योजतात.

४२. पंत प्रतिनिधीचें औंद. येथें यमाई देवीचें स्थान आहे. पंत प्रतिनिधीच्या घराण्यांतील मूळपुरुष ' त्रिंबक कृष्ण कुळकर्णी ' हा या देवीच्या प्रसादानें उदयास आला अशी दंतकथा आहे.

४३. धवलागिरी.

४४. अबदुलाखान कांहीं दिवस वांईचा सुभेदार होता म्हणून आपल्या मुलखांत राहिला असें म्हटलें आहे.

४५. निरोप घेऊन जाणारा. येथें वकील कृष्णाजी.

शिवाजी हेजिमाशीं बोलतो ॥ खान मजला काय देतो ॥ चहुं आगळे चाळीस गड, मी खानाला देतों ॥ मजवरी कृपा आहे खानाची, जांवळी[४६] सदर संवारितों ॥ याव तेथ भेटायाला, खानाची मी वाट पाहतों ॥ तसलिबा[४७] दिल्या बामणाला ॥ बामण खानाजवळी आला ॥ शिवाजिचा हेजीम जिवाजी, राजान हेजीम जिवाजी, म्हालदार[४८] धाडिला ॥ खानापाशीं येऊन बोले, धड न अवदुल्याला ॥ चौदाहजार घोडा आणिला, तुह्मी काशाला ॥ अवूत द्याया जगदंबेला[४९] ॥ बोलतां अबदुल्ला खवळला ॥ जिवाजी ह्मालदार शिवाजी राजाजवळी आला ॥ खान दरमजली कुच केला ॥ चालून रडतोंडिचे[५०] घाटाला ॥ चढून गड वेढा दिला ॥ चवदा दिवस कोंड केला ॥ खबर कळली महाराजाला ॥ राजा[५१] गुपित न राहिला ॥ शों-[५२]

---

४६. जावळी प्रांताचें सदर ठिकाण, ह्मणजे प्रतापगड.

४७. सलाम, मानपूर्वक मुजरा.

४८. महालाचा अधिकारी. महाराजांनीं आपल्याकडून खानाकडे पाठविलेला गृहस्थ ग्रांट् डफ् साहेबांनीं एके ठिकाणीं महाराजाकडून कृष्णाजी भास्कर नांवाचा कारकून अबदुलाखानाकडे गेला असें लिहिलें आहे तें पवाड्यावरून साधार दिसत नाहीं. जिवाजी हा 'जिवमहाला' या नांवाचा महाराजांचे पदरीं पायदळाचा सरदार होता तो असावा.

४९. प्रतापगडची भवानी.

५०. या घांटीस हल्लीं महाबळेश्वरीं 'मुंबई पाइंट' असें ह्मणतात. चवदा दिवस वेढा दिल्याचा मजकूर येथें लिहिला आहे त्यास इतिहासाचा आधार दिसत नाहीं.

५१. उगाच दडून बसला नाहीं.

५२. शामराजपंत शिवाजी महाराजांचे पहिले पेशवे.

मराजा, बोलाविला ॥ [53]रघुनाथ पेशव्याला ॥ [54]धोंडया माणकोजीला ॥ [55]इंगळ्या सुभानाला ॥ [56]मैफलमाजी राजा सदरेला बैसून ॥ भाग मी राजाचें गाईन ॥ ५ ॥

सरदार बैसले वृंदं, पुसे सुभेदाराला ॥ भाईनु अबदुल्लाखान आला ॥ त्याचा धाक तो देवाला ॥ कसा जाऊं भेटाशाला ॥ बुद्धी सांगा आह्माला ॥ गाईकवाड कृष्णाजी बोलिला ॥ शिवबा [58]शिर्ले चढवा आंगाला ॥ [59]पोलाद घातली गळा ॥ कंवरबस्ता वेडा केला ॥ पट्टा ह्मालदारा दिला ॥ पट्टा जिवाजीला दिला ॥ [60]वाघनखें रायाच्या पंजाला ॥ वरूनी बारीक झगा

---

५३. शामराजपंत पेशव्यास सिद्दीवर स्वारी करण्यास पाठविलें असतां त्याचा पराभव झाल्यामुळें पेशवाईचा अधिकार काढून घेतला व सिद्दीचे पारिपत्यास्तव रघुनाथपंत यांस नेमिलें होतें, यावरून पवाडयाचा शाईर रघुनाथपंतास पेशवे ह्मणत आहे असें दिसतें. वास्तविक पाहतां शामराजपंतानंतर पेशव्याचा अधिकार रघुनाथपंतास न मिळतां मोरो त्रिमळ पिंगळे यास मिळाला होता. हा रघुनाथपंत शाहाजी राजाचा विश्वासू कारकून नारोपंत हणमंते यांचा मुलगा होय. पवाडयाचे शेवटीं यालाच ' हणमंते ' असें ह्मटलें आहे.

५४. हा शिवाजीचा पहिला सरनौबत ह्मणजे घोडेस्वारांचा सेनाधिपति होता.

५५. टीप ३१ पहा.

५६. दरबार. मुळांत 'महिकुल' असा शब्द आहे. तो स्पष्ट चुक आहे. 'फ' चा 'क' लिहिला गेला असें उघड दिसतें.

५७. खबर. हा शब्द ' खूबखूद ' या ह्मणींत येतो.

५८. चिलखत.

५९. तलवार.

६०. हीं विजयी वाघनखें हल्लीं इंग्लंडच्या राणीसाहेबांचे पदार्थसंग्रहालयांत आहेत.

त्याला ॥ भगवंताची दया त्याला ॥ [61]बाच्छाई साज करूनि आला ॥ जिजाबाईस भेटी गेला ॥ जिजा आली भेटायाला, [62]पालखींत बैसून ॥ भाग मी राजाचें गाईन ॥ ६ ॥

जिजा घेती अलाई बलाई, चढती दवलत येऊंदे तुला ॥ घे यशाचा विडा, स्मर अपुल्या महादेवाला ॥ तसलीम माझी येवू तुला ॥ शिवबा बोले जिजाबाईला ॥ सयें येवढी प्राप्त झाली, भेटलों नाहीं दिवाणाला[63] ॥ वा रे बुद्धीनें कार्य साधावें ॥ उसने[64] संभाजीचें घ्यावें ॥ वये येथून सलाम, सांगे शाहाजी राजाला ॥ गड दिले गडकऱ्यांला ॥ राज्य दिलें नेतोजीला[65] ॥ राजान पुतण्या उमाजीला ॥ पांचशें लोक दिले त्याला ॥ रड-तोंडीच्या घाटीला ॥ तुक्या भिवान वेढा दिला ॥ राजान सदरा शृंगारिल्या ॥ गाद्या पडगाद्या घातल्या ॥ अंतलशा[66] कुंमाशा[67] वस्ता, दर्यांतल्या[68] जोडिल्या ॥ सुरंग खांब जडताचे ॥ वरि

---

६१. अर्थात् महाराजांची मातोश्री.

६२. शुभ शकुन होण्याकरितां मातोश्री पालखींत बसून सामोरी आली.

६३. शाहाजी राजाला. 'दिवाण' हा शब्द 'राजा' या अर्थी आहे, जसें 'दिवाणदस्त' ह्मणजे राजास करभार देत तो.

६४. शिवाजीचा वडील भाऊ संभाजी यास कर्नाटकामध्यें कनकगिरी येथील मुसलमानांनीं ठार मारला होता त्याचें उसनें घ्यावें असा अर्थ. परंतु कनकगिरीचे मुसलमानांचा पराभव करून व तेथील किल्लेदारास ठार मारून शाहाजीनें तात्काळ सूड घेतला होता.

६५. महाराजांचा दुसरा सरनौबत.

६६. एक प्रकारचें रेशमी कापड.

६७. धनचेडीचे पर. (परांच्या गाद्या आतलसाच्या केलेल्या.)

६८. अपूर्व वस्तूंस दर्यांतल्या वस्ता ह्मणतात.

घोंस पोवळियांचे ॥ माणिकाऱ्या बरव्या हारी ॥ लाविल्या मोत्यांच्या हो वरी ॥ सदरे तिर्णे[६९]यांची मांडणी ॥ सूर्य लकलकितो गगनीं ॥ सँरसवाणी नाचे पाणी ॥ चांदवे जडताचे चौकुनी ॥ पलंग सोनेरी टाकिला ॥ पडदा मस्तानी घातला ॥ पडदा चिटाईत घातला ॥ नानापरिचीं चित्रें त्याला ॥ घोस हिऱ्याच्या जडिल्या माळा ॥ [७१]चौघे बळी बांधुनि फळी, चालिले एका ओळिन ॥ भाग मी राजाचें गाईन ॥ ७ ॥

पहिल्या सँदरेला गेले ॥ गडकऱ्यांनीं दटाविलें ॥ दुसऱ्या सदरेला गेले ॥ कारकुन अबदुल्याला बोले ॥ तिसऱ्या सदरेला गेले ॥ मन कंचर्णीत बुडविलें ॥ अबदुल्ला खदखदां हांसला ॥ शिवाजी आले सदरेला, जिवाजी आले सदरेला ॥ पहिला सलाम महादेवाला ॥ दुसरा सलाम शहाजिला ॥ तिसरा सलाम जगदंबेला ॥ चौथा सलाम गडकऱ्याला ॥ सलाम पांचवा माझा, येतो अबदुल्यारे तुला ॥ तुरे कुनबीका छोरा ॥ बनाया दिवानका सदरा ॥ ऐशा सदरीं नाहीं आला ॥ इदलशा बाच्छावाला ॥ तुरे कुनबीका छोरा ॥ खेतवाडी करकर भरना, दिवाणका सारा ॥

---

६९. तिवयावर समयांची मांडणी.

७०. मुळांत 'साळसवर्ण' आहे परंतु 'सारसवाणी' म्हणजे सारसपक्ष्याप्रमाणें कारंजाचें पाणी नाचत होतें असा अर्थ दिसतो. सबब हा फेरफार केला आहे.

७१. हा शब्द या ठिकाणीं फार मार्मिक आहे. अबदुल्लाखान, सैद बंडू व कारकून हे तीन. चवथा कोण होता हें समजत नाहीं.

७२. किल्ल्यांत जातांना जागोजाग दरवाज्यामध्यें देवड्या असतात त्या.

खाना काय ज्याची करणी, द्यावें रघुनाथाला ॥ . जाणतों आह्मी खाना तुह्मी, जातीचे कोण ॥ भाग मी राजाचें गाईन ॥ ८ ॥

अवदुल्ला जातिचा भटारी ॥ मिय्या करना दुकानदारी ॥ विजापुरमे दुकान तेरा ॥ लड्डु जिलबी बेचँहारा ॥ बुरे भटारनीका छोरा ॥ हम राजापर लिया तोरा ॥ अवदुल्यानें कव घातली, शिवाजी गवसून धरला सारा ॥ चालवी कटारीचा मारा ॥ शिल्यावरी नचले जरा ॥ राजान बिचवा लावून दिला ॥ वाघपंजाचा केला मारा ॥ त्याचे फाडिले उदरा ॥ खानाचि चरबी आली दारा ॥ अबदुल्लाखान लँढेकरी भला ॥ पटका कमरेचा सोडिला ॥ खचून हात फिरंगीं घातला ॥ मारिला त्याचा गुंडाळा ॥ राजाचा शिरटोप तोडिला ॥ पांच वेढे हो मंदिलाचे ॥ चवदा वेढे हो तोड्यांचे ॥ तुटून जरासा लागला ॥ जखम चढली महाराजाला ॥ मारिला शिवाजिन गुंडाळा ॥ मान खांदा गवसुन केला ॥ जाँनव्याचा दोरा देखिला, पडलासा खान ॥ भाग मी राजाचें गाईन ॥ ९ ॥

सैदबंडू उठावला ॥ त्यानें पट्टा मारिला ॥ पट्टा त्याचा शि-

---

७३. ज्या रघुनाथाची ह्मणजे ईश्वराची करणी. ज्यानें आह्माला हें ऐश्वर्य दिलें त्याला भ्यावें. 'खाना काय ?' ह्मणजे, खानाला काय भ्यावें ?

७४. विकणार.

७५. योद्धा, लढवय्या.

७६. पट्याचा गुंडाळा. ही अबदुल्लाखानाची तरवार सातारकर महाराजांच येथें अद्यापि आहे.

७७. मानेवर केलेला वार खांद्यावरून जानव्याप्रमाणें उतरता पोटापर्यंत गेला. अशा वाराला जानव्याचा दोरा असें ह्मणतात.

वाजीन, वरचेवरतीं तोलिला ॥ सैदवंडू जो मारिला॥खांद्यापासून सारा केला ॥ सैदवंडू देखिला पडला ॥ त्याचा बामण झोरें आला ॥ परत परत रे माघारा, सरजा शिवाजि बोलिला ॥ बामण मारूं नये तुला ॥ किरँया देवाची आह्माला ॥ महाराज खदखदा हासिला ॥ हातिचा पट्टा टाकुन दिला ॥ जिवाजीच्या ह्मालदारान ॥ घातली शीघ्र उडी त्यान ॥ बरचा बराणपुरी काढिला ॥ त्यानें अचाट फेकून दिला ॥ नाभीकमळीं बैसला ॥ बरच्या फुटला पाठीला ॥ वामण हर हर बोलिला ॥ त्याचा प्राण निघून गेला ॥ कॉवजी राजाचा लेक, ध्या ध्या करीत जवळी आला ॥ भोयांच्या पाया वार केला ॥ खंटारा धरणी पाडिला ॥ शिवाजी आले घेऊन गेले, खानाचें शिर कापून ॥ भाग मी राजाचें गाईन ॥ १० ॥

प्रतापगडच्या भोवानीला ॥ वाहिलें शीर जगदंबेला ॥ मातला गे होता बोकड जो बत्तीसदाती ॥ अबदुल्याची ध्यावी आहुती ॥ व्हाया येथून कुल इशारत राजाच्या लोकाला ॥ बारा तोफा मारा केला ॥ आवाज प्रतापगडावर होती ॥ कडाका पायदळें येती ॥ पडले धडधडा, वळले निशाणाचे हत्ती ॥ त्रिमुख

---

७८. क्रिया, शपथ.

७९. चंद्रराव मोऱ्याचे भावास मारणारा हा संभाजी कावजी असावा. हा महाराजांचे मोठ्या प्रीतींतला असल्यामुळें त्यास 'लेक' ह्मटलें असेल.

८०. सैद बंडू लढत असतां अबदुल्लाखानाचें प्रेत पालकींत घालून नेत होते. तेव्हां खंडू माळी वगैरे लोकांनीं ( कावजीही त्यांतलाच असावा ) पालखी पाडली आणि खानाचें शीर कापलें. शाइरानें त्या पालकीस निंदेनें 'खटारा' असें ह्मटलें आहे.

कोंकड्या सुरेराव, लोटले रडतोंडीच्या घाटी ॥ तुक्या भिवा- जी भिडला साटी, आरबाचा घोडा पाडाव केला ॥ त्या क्षणीं ईनुमंत्या पायदळा ॥ पाइच्या नेई राज्याला ॥ महाराज पना- ळ्यावर गेले, पनाळा चौफेरी बांधिला ॥ कैदीन भांडून पें- नाळा ॥ नाहीं देई बाच्छाहाला ॥ सरदार मिळाले सदरेला ॥ बाईने शाहीर बोलाविला ॥ आग्निनदास कवीश्वर, त्याने कडा- का गाइला ॥ दिला एक इनाम गांव, इनाम गांवें बक्षीस त्याला ॥ चढविले हाताला, लंगर सोन्याचे दोन ॥ भाग मी राजाचें गाईन ॥ ११ ॥

ह्या पवाड्यांतील वृत्तांतामध्यें व ग्रांट् डफ् साहेबांनीं प्र- तापगडच्या लढाईची जी हकीकत दिली आहे तिजमध्यें अ- त्यंत तफावत आहे. ही गोष्ट पवाडा व त्यावरील टीपा सूक्ष्म रीतीनें वाचल्यानें वाचकांचे लक्षांत येईल. आतां पवाडा जर वेळचेवेळीं झालेला असेल व त्यांतील इतिहास प्रमाणभूत

---

८१. हा शिवाजी महाराजांचा जुना नौकर चाकर होता. याणें जावळी व रोहिला किल्ला घेतेवेळीं मोठी बहादुरी केली व पुढें १६७२ मध्यें मोंगलाचा सरदार इखलासखान याजबरोबर युद्ध करून मराठ्यांनीं सालेरचा किल्ला संरक्षण केला ते वेळीं सुरेराव कांकड्या लढाईंत पडून मरण पावला. या वेळीं त्याकडे पांच हजारांची सरदारी होती.

८२. टीप ५३ पहा.

८३. प्रतापगडचे लढाईनंतर विजापुरवाल्यांनीं सिद्दी जोहर यास महाराजांवर पाठविलें. तेव्हां महाराज पनाळ्यावर होते. सिद्दी जोहरानें तेथें पुष्कळ दिवस तळ देऊन वेढा दिला होता. शेवटीं महाराज रांगण्यावर गेले व सिद्दी जोहर याचे हातीं पना- ळा लागूं दिला नाहीं. या गोष्टीस अनुलक्षून हें लिहिलें आहे.

८४. जिजाबाईनें.

असेल तर-ह्या पवाड्याच्या योगानें मराठ्यांच्या इतिहाससंबंधी कांहीं नवीन महत्त्वाची माहिती झाली असें समजलें पाहिजे व यास्तव या विषयाचा विचार करणें योग्य आहे.

आतां वरील पवाडा जुना असून वेळचे वेळीं झाला आहे या गोष्टीविषयींचीं प्रमाणें शोधून काढण्यास पवाड्याबाहेर जाणें नको. पवाड्यांत मुख्य वर्णन प्रतापगडच्या लढाईचें आहे. ही लढाई शिवाजी महाराजांस राज्याभिषेक होण्यापूर्वीं कांहीं दिवस घडली. यास्तव त्या काळाचीं सूचक चिन्हें पवाड्यांत असल्यास पवाडा त्या काळचा आहे याविषयीं शंका राहणार नाहीं. हीं प्रमाणें येणेंप्रमाणें आहेत:—

( १ ) 'देवू,' 'भावू,' 'शिवू,' हीं मूळ अकारांत शब्दांचीं उकारांत रूपें पवाड्याच्या प्रारंभीं आहेत. तीं दोनशें वर्षांमागील रामदास, तुकाराम इत्यादि शिवाजी महाराजांच्या वेळचे कवींच्या ग्रंथांतच आढळतात. यास्तव तीं रूपें त्या काळाचीं दर्शक होत.

( २ ) 'अज्यामत' ( चमत्कार ), 'तसलीम' ( सलाम, मजुरा, ) 'मइफल' ( गुप्त सभा ), हे जे यावनी शब्द पवाड्यांत आहेत ते मराठ्यांस राजसत्ता प्राप्त होण्यापूर्वीं मुसलमानांचें प्राबल्य होतें ते वेळच्या यावनी भाषेचे सूचक आहेत. हे शब्द पवाड्याच्या कवीनें अगदीं स्वाभाविकपणें घातल्यासारखे दिसतात. परंतु हल्लींच्या मराठींत ते मुळींच येत नाहींत असें ह्मटल्यास चालेल. या प्रकारचे यावनी शब्द पवाड्यासारख्या कवनांत ते वेळीं येत होते यांत नवल नाहीं; कारण दासबोधासारख्या ते वेळच्या वेदांतपर ग्रंथांत देखील कांहीं यावनी शब्द आहेत. जसें:—'तजविजा विवेक विचार,' 'धक्काधक्कीचा मामला,' 'मजालसीवरी

थाटे.' अशी संस्कृत व यवनीमिश्रित भाषा मोरोपंतादि अलिकडच्या कवींमध्यें अतिशय क्वचित् येते.

( ३ ) पवाड्याच्या वेळचे आगतस्वागताचे प्रकार केवळ यावनी तऱ्हेचे होते असें दिसतें. कारण, पवाड्यांत 'सलाम' व त्यापासून निघालेला शब्द 'तसलीम' ( मराठींत 'तसलीव,' अनेकवचनीं 'तसलीवा' ) यांचा उपयोग देवब्राह्मण, मातापितृ, शूद्रयवन, या सर्वांचे ठायीं एकसारखा केला आहे, जसें:—

१. 'तसलीव दिल्या ब्राह्मणाला.'

२. तसलीव माझी येऊं तुला,
शिवबा बोले जिजाबाईला.'

३. 'पहिला सलाम महादेवाला,
दुसरा सलाम शाहाजीला,
तिसरा सलाम जगदंबेला,
चौथा सलाम गडकऱ्यांला,
सलाम पांचवा माझा येतो
अबदुल्या रे तुला.'

यावरून शिवाजी महाराज सिंहासनारूढ होऊन रामदास स्वामींच्या आज्ञेवरून त्यांणीं " रामराम " ह्मणण्याचा प्रघात घालण्यापूर्वीं, ह्मणजे, प्रतापगडच्या लढाईच्या सुमारास पवाडा झाला असावा असें अनुमान होतें.

( ४ ) शिवाजी महाराजांनीं जे प्रदेश व किल्ले काबीज केल्याचें पवाड्यांत लिहिलें आहे ते व ज्या इतर इतिहासपर गोष्टी पवाड्यांत आल्या आहेत त्या सर्व महाराजांस राज्याभिषेक होण्यापूर्वीं, ह्मणजे सन १६४७ मध्यें विजापुरवाल्यांस न जुमानतां राजगड बांधला तेव्हांपासून प्रतापगडच्या लढाईनंतर सन १६६० मध्यें पनाळ्यास युद्ध झाल्याचें लिहिलें आहे तेथ-

पर्यंतच्या आहेत. जसें, सन १६४७ मध्यें महाराजांनीं राजगड बांधला व बाजी मोहित्यास कैद करून सुपें प्रांत सर्वांशीं आपले स्वाधीन करून घेतला. सन १६४८ मध्यें तळें व घोसाळें घेतलें. सन १६४९ मध्यें मुलाना अहंमद याणें पाठविलेला* खजिना लुटून कल्याण, भिंवडी व कोंकणचे कित्येक किल्ले हस्तगत केले. पुढें चार पांच वर्षेंपर्यंत शाहाजीराजे विजापुरीं कैदेंत होते यामुळें त्यांची मुक्तता करण्यांत शिवाजी महाराज गुंतल्यानें नवीन मुलूख सर झाला नाहीं. नंतर सन १६५५ मध्यें चंद्रराव मोरे याचें पारिपत्य करून जावळी प्रांत व रोहिला किल्ला घेतला. सन १६५६ मध्यें प्रतापगड बांधला. ( सन १६५७ मध्यें जुन्नरावर हल्ला केला, परंतु याविषयींचा उल्लेख पवाड्यांत नाहीं ). सन १६५८ मध्यें हबसाणाचे सिद्दीवर स्वारी करून कोंकणचा कांहीं भाग घेतला. सन १६५९ मध्यें प्रतापगडची लढाई झाली. नंतर त्या वर्षीं पावनगड व पनाळा हे किल्ले घेतले, आणि पुढच्या सालीं दाभोळ हस्तगत करून पनाळा किल्ला सिद्दी जोहराच्या हातीं लागूं दिला नाहीं. या सर्व गोष्टी पवाड्यांत आहेतच. त्यावरून पवाडा सन १६६० च्या पुढचा नाहीं असें अनुमान होतें; कारण पवाड्याचे कवीचा हेतु 'भाग मी राजाचें गाईन' या ध्रुवपदावरून शिवाजी महाराजांच्या उत्कर्षाच्या सर्व गोष्टी सांगण्याचा होता, व त्याप्रमाणें मुळापासन सन १६६० पर्यंत बहुतेक सर्व गोष्टी त्याणें सांगितल्या आहेत. पुढच्या सांगितल्या नाहींत, याचें कारण हेंच कीं पवाडा रचला त्या वेळीं त्या गोष्टी घडल्या नसाव्या. तस्मात् प्रतापगडच्या लढाईनंतर पवाडा लागलाच झाला असावा यांविषयीं संशय राहत नाहीं.

( ५ ) पवाड्याचे शेवटीं लिहिलें आहे कीं 'बाईन शाहीर बोलाविला,' ह्मणजे जिजाबाईनें आपल्या पुत्राचें ऐश्वर्य वर्णन करण्यास कवन करणारे बोलाविले. यावरून जिजाबाईच्या वेळीं पवाडा झाला असावा असें साफ दिसतें.

( ६ ) पवाड्याचे जुनेपणाविषयीं आणखी असें प्रत्यंतर आहे कीं, त्यांत कित्येक मनुष्यांचीं नांवें आहेत. त्यांचा सध्यां पत्ता लागत नाहीं. हीं नांवें पवाड्याचे वेळीं प्रसिद्ध असावीं ह्मणून कवीनें घातलीं आहेत. अशीं अप्रसिद्ध नांवें घालण्याचें धैर्य अर्वाचीन कवीस येणार नाहीं.

( ७ ) सध्यां पवाडा अगदीं मोडकळीस आल्यासारखा दिसत आहे व हल्लींचे गोंधळी लोकांस कित्येक ठिकाणीं विचारतां तो माहीत नाहीं असें आढळतें. सवाई माधवरावाचा व इतर अलीकडचे पवाडे, कवन करणारे लोकांस प्रस्तुत अवगत आहेत, परंतु हा पवाडा नाहीं. तस्मात् तो त्यापूर्वींचा जुना असावा व अर्वाचीन पवाड्यांचे महत्त्व काढून विस्मरणांत पडत चालला आहे. तथापि गद्यरूप ग्रंथांपेक्षां पद्यें फार दिवस राहतात यामुळें उपलब्ध झाला आहे.

आतां पवाडा वेळचेवेळीं झाला नसावा अशी शंका येण्यास एक कारण आहे तें असें कीं पवाड्याचे आरंभीं शिवाजी महाराजास 'छत्रपति' असें विशेषण दिलें आहे. त्या अर्थीं राज्याभिषेक झाल्यानंतर पवाडा झाला असावा. परंतु ही शंका येण्याचें कारण नाहीं. शके १५७१ ह्मणजे सन १६४९ इसवी सालीं रामदास स्वामी व शिवाजी महाराज यांची प्रथम भेट झाली. त्या वेळीं स्वामींनीं महाराजास पत्र लिहिलें आहे त्यांत 'छत्रपति' हें विशेषण जरी शिवाजी महाराजांस दिलें

नाहीं, तथापि त्या अर्थाचीं व किंबहुना त्याहून विशेष प्रकारें राज्यवैभवसूचक विशेषणें दिलीं आहेत. तीं अशीं कीं:—

" नरपति, हयपति, गजपति,
पुरंदर आणि शक्ति
पृष्ठभागीं. "

( रा० स्वा० बखर पृ० ५८. )

यावरून असें दिसतें कीं राज्यवैभवसूचक विशेषणें शिवाजी महाराजांस देण्याचा प्रघात राज्याभिषेक होण्यापूर्वीं पुष्कळ दिवसांपासून होता. वास्तविक राज्याभिषेक सन १६७४ इ० सालीं रायगड येथें झाला व त्या वेळापासून मराठी राज्याचा शक सुरू झाला; परंतु सन १६७४ सालीं पवाडा झाला नसावा हें उघड आहे. कारण, वर लिहिलेंच आहे कीं पवाड्यामध्यें शिवाजी महाराजांच्या प्रतापाचें वर्णन मुळारंभापासून केलें असून सन १६६० मध्यें पनाळ्याची लढाई झाली तेथपर्यंत वृत्तांत आहे. पुढील वर्णन दिलेलें नाहीं. यावरून पुढील कथा पवाडा झाल्याच्या वेळीं घडल्या नसाव्या असें अनुमान होतें व या कारणास्तव त्यांचें वर्णन पवाड्यांत दिलें नसावें. याशिवाय, पवाड्याचे शेवटीं लिहिलें आहे कीं जिजाबाईनें कवित्व करणारे बोलावून आणून पवाडा ह्मणविला; परंतु रायगडीं शिवाजी महाराजांस राज्याभिषेक झाल्यानंतर १५ दिवसांनीं जिजाबाई कैलासवासी झाली. त्यास या १५ दिवसांच्या अवकाशांत ह्मणजे बहुधा जिजाबाई मरणोन्मुख असावी अशावेळीं पवाडा गाइला असेल असें संभवत नाहीं; यामुळें १६७४ सालापूर्वीं पवाडा झाला असावा असें वाटतें. दुसरी शंका अशी उत्पन्न होईल कीं १६६५ मध्यें शाहाजी राजे मर-

ण पावले; ते वेळीं शिवाजी महाराजांनीं 'राजा' ही पदवी धारण केली व छत्रपति ह्या नांवानें नाणें पाडण्यास प्रारंभ केला, त्या समयीं पवाडा झाला असावा; ह्मणजे प्रतापगडच्या लढाईनंतर ५।६ वर्षांनीं झाला असावा अशी शंका येईल; परंतु ही शंका कांहीं बरोबर दिसत नाहीं. कारण शके १५८१ ह्मणजे सन १६५९ सालापूर्वीं तुकाराम बावांनीं शिवाजी महाराजांस पत्र लिहिलें आहे त्यांत 'छत्रपति' हें विशेषण स्पष्टपणें दिलें आहे इतकेंच नाहीं, परंतु छत्रपति शब्दावर कांहीं विनोदाचें भाषणही लिहिलें आहे:—

"शिव नाम तुझें । ठेविलें पवित्र ।
छत्रपति सूत्र । विश्वाचें कीं ॥ १ ॥
राया छत्रपति । ऐकावें वचन ।
रामदासीं मन । लावीं वेगीं ॥ २ ॥
तुझी चाड आह्मा । नाहीं छत्रपति ।
आह्मी पत्रपति । त्रैलोक्याचे ॥ ३ ॥"

( रा० स्वा० बखर पृ० १३४ )

यावरून निःशंक खात्री होते कीं १६५९ इ० सालीं ह्मणजे प्रतापगडाच्या लढाईचे वेळीं व त्यापूर्वीं छत्रपति हें नांव सर्व लोकांत प्रसिद्ध होतें. या पत्रांत तुकारामानें अष्ट प्रधानादिकांचाही उल्लेख केला आहे, यावरून शिवाजी महाराज प्रतापगडच्या लढाईचे वेळीं सर्व राजचिन्हांनीं अंकित होते यामुळें छत्रपति हें विशेषण पवाड्याचे कवीनें त्यांस दिलें यांत नवल नाहीं. व तें नांव दिल्याचे योगानें पवाडा वेळच्यावेळीं झाला नसावा अशी शंका घेणें नको. उलटें असें अनुमान होतें कीं पवाड्यांतील गोष्टी पवाड्याच्या कवीनें प्रत्यक्ष पाहिल्या असाव्या.

आतां पवाड्यांतील इतिहास कितपत खरा आहे याविषयीं विचार केला पाहिजे व विशेषेंकरून शिवाजी महाराजांनीं अफ्झुलखानास कपटानें मारलें ह्मणून दोष त्यांच्यावर आला आहे तो कितपत आधारभूत आहे याविषयीं विचार करूं. पवाड्यांतील हकीकतीस महाराष्ट्र बखरीचें पूर्णपणें प्रत्यंतर मिळतें यामुळें ती हकीकत प्रमाणभूत नाहीं असें ह्मणतां येत नाहीं. स्कॉट वेरिंग ह्या नांवाच्या एका साहेबानें महाराष्ट्र देशाचा इतिहास लिहिला आहे, त्यांत प्रतापगड येथें अफ्झुलखानाबरोबर भेट झाली त्याविषयींची हकीकत येणेंप्रमाणें लिहिली आहे:—[1]

" विजापूरवाल्यांनीं शिवाजीस पुष्कळ वेळां धमकी " देऊन पाहिली व लालूचही दाखविली. पण सर्व प्रयत्न " पाण्यांत गेले असें पाहून, आपल्या चिरंजिवाचें बंड मो- " डावें ह्मणून शाहाजी कर्नाटकांत असतां त्यास सांगितलें. " पण शिवाजी आपलें ऐकणार नाहीं हें शाहाजीनें भवि- " ष्य करून, व बादशाह संतापून हवा तसा सूड घेवो " असें मनांत आणून, शाहाजीनें मुलाचें मन वळविण्याचा " नाद अगदीं सोडून दिला. तेव्हां बादशाहानें अबदुल्ला- " खान याजबरोबर १२,००० लोकांची टोळी देऊन शि- " वाजीवर स्वारी करण्याकरितां रवाना केली. ही फौज कृ- " ष्णा नदीचे कांठीं वांईपर्यंत येऊन दाखल झाली. नंतर " अबदुल्लाखानानें आपला कारकून शिवाजीकडे पाठविला " व कळविलें कीं, 'शरण याल तर तुमचे अपराध क्षमा हो- " ऊन पुढें अधिक कल्याण होईल.' कारकुनास आणखी " असेंही सांगितलें होतें कीं, 'शिवाजीची गांठ घेणें आहे,

१ पुरवणी A पहा.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

" याजकरितां भेटीची कशी काय तजवीज करावयाची या-
" विषयीं व्यवस्था करून यावें.' शिवाजीनें भेटण्याचें कबू-
" ल केलें. परंतु 'अबदुल्लाखानाचें सैन्य किल्ल्याचे पायथ्या-
" शीं उतरूं देणार नाहीं; तसेंच पुष्कळ लवाजमा घेऊन
" येऊं देणार नाहीं,' ह्मणून सांगितलें. अखेरीस भेटीचा
" निश्चय होऊन तयारीस आरंभ झाला. शिवाजीनें तयारी
" इतकी कडेकोट चालविली कीं जसें कांहीं जिवावर अति
" दुर्घट अरिष्ट येऊन पोंचलें आहे. सदोदित भयंकर प्रसं-
" गाचा अनुभव असे यामुळें साधारणतः मनाला जें स्थैर्य
" असावें तेंही शिवाजीचे अंगीं यावेळीं नव्हतें. त्याणें ब्रा-
" ह्मणांस पुष्कळ दान धर्म केला व ईश्वरानें या प्रसंगां-
" तून पार पाडावें ह्मणून एक ब्राह्मण गयेस व एक का-
" शीस पाठविला. त्याणें नेहमींचा पोशाख न करितां न
" जाणो काय संकट येणार आहे या शंकेनें प्रसंगानुरूप
" तजवीज ठेविली होती. त्याच्या आईनें त्यास पोटाशीं ध-
" रलें व 'मनांत बेत आणला आहेस तो टाकून दे,' ह्मणून
" विनवणी केली. परंतु त्याच्या कृतीवरून त्यास अतिशय
" धास्ती पडली होती, असें जरी दिसून येत होतें, तथापि
" आपला कपटी हेतु सिद्धीस जाण्यास जी जी ह्मणून सा-
" वधगिरी पाहिजे होती तींत त्याणें किमपि कमी पडूं दिलें
" नाहीं. भेटीचे तंबूजवळ छापा घालण्याकरितां त्याणें गु-
" प्तपणें लोक दडवून ठेविले होते. तसेंच ऐन् मार्याचे
" जाग्यावर मोठमोठे नाक्यांचे ठिकाणीं त्याणें आपली फौ-
" ज वसविली व शत्रूचे तळाकडे तोफांचा मोर्चा लावून
" ठेविला.

" अबदुल्लाखानास त्याच्या मित्रमंडळीनें जाऊं नये

" ह्मणून सांगितलें असतांही, त्यांचें ह्मणणें न जुमानतां तो
" भेटीस गेला. परंतु प्रतापगडावर जाण्याचा रस्ता उंचस-
" खल व अगदीं संकोचित असल्यामुळें, त्याला हत्तीवरून
" उतरणें भाग पडलें. नंतर, त्याणें शिवाजीस कळविलें कीं,
" 'तुह्मींच भेटीकरितां खालीं यावें,' परंतु 'असें होणें नाहीं' ह्म-
" णून शिवाजीनें निक्षून सांगितल्यावर, अबदुल्लाखानानें
" मुळारंभीं बेत केल्याप्रमाणें किल्ल्यावर जाण्याचा निश्चय
" केला. अबदुल्लाखान भेटीस आला हें पाहून शिवाजीनें
" घाईघाईनें व मोठ्या गंहिवरानें मित्रमंडळीचा निरोप घे-
" तला व आपला मुलगा संभाजी यास त्यांच्या पदरांत
" घालून, आपण भेटीस गेला. नंतर या देशच्या चालीप्र-
" माणें उभयतांनीं हात पुढें करून एकमेकांस आलिंगन
" दिलें. इतक्यांत असें झालें कीं अबदुल्लाखान हा शरीरानें
" सदृढ व मजबूद असे ह्मणून त्याणें एका हातानें शि-
" वाजीस गच्च धरून शस्त्रप्रहार करण्याचा प्रयत्न चालवि-
" ला. परंतु शिवाजीनें सावधगिरी करून चिलखत घातलें
" होतें, यामुळें या प्रसंगीं त्याचा जीव वांचला. त्याणें अ-
" बदुल्लाखानाची मिठी सोडविली व पोटांत वाघनखें खुप-
" सून तरवारीनें त्याचा छेद केला. खानाची ही दशा पाहू-
" न त्याचा कारकुन लढण्यास सरसावला. परंतु शिवाजीनें
" धार्मिकपणाचें विलक्षण सोंग आणून कारकुनास सांगित-
" लें कीं, 'दूर हो, तूं ब्राह्मण आहेस, व ब्रह्महत्येचें पातक
" माझे हातानें घडणें नाहीं.' असें ह्मणतांच सैन्य धांवून
" आलें व अखेरीस अबदुल्लाखानाच्या कत्तलीची खबर
" नेण्यास शत्रूच्या मनुष्यांपैकीं त्या ब्राह्मणाशिवाय कोणी-
" एक शिलक राहिला नाहीं. विजापुरवाल्यांच्या फौजेंत

" इतकी धांदल उडाली कीं, त्यांना पळतां पळतां मारामार
" पडली. शिवाजीचे सैन्यानें त्यांस पकडून त्यांचा पराजय
" केला यामुळें त्यांना तोफा, हत्ती, घोडे व सामान शत्रूंचे
" हवालीं करून परत जावें लागलें."

ही हकीकत सत्य असेल तर पवाडा खरा मानला पाहिजे. दोन्ही हकीकतींमध्यें क्षुल्लक फेरफार दृष्टीस पडतात. परंतु ते जमेस धरण्यासारखे नाहींत. आणि पवाडा वेळचे वेळीं झाला असावा व पवाड्यांतील गोष्टी कवीनें प्रत्यक्ष पाहिल्या असाव्या हें अनुमान जर खरें असेल तर **वेरिंग** साहेबांच्या इतिहासापेक्षां पवाड्यांतील इतिहास कांहीं अंशीं जास्त विश्वसनीय समजला पाहिजे व ज्या ठिकाणीं दोहोंमध्यें फरक आढळतो तेथें पवाड्यांतील हकीकत असंभाव्य नसल्यास खरी मानणें सयुक्तिक आहे.

पवाड्यावरून व **वेरिंग** साहेबांचे इतिहासावरून पाहतां मुख्य लक्षांत ठेवण्याच्या गोष्टी येणेंप्रमाणें आहेतः—

( १ ) अफझुलखानाचा हेतु शिवाजी महाराजांस जिवंत धरून विजापुरीं नेण्याचा होता.

( २ ) अफझुलखानानें आपण होऊन प्रथमतः शिवाजी महाराजांकडे कारकून पाठविला व 'शरण आल्यास सर्व अपराध क्षमा होऊन तुमचें कल्याण करीन' असें अभिवचन त्यानें शिवाजी महाराजांस दिलें व 'मी भेटीस येतों' अशी इच्छा प्रदर्शित केली.

( ३ ) भेटीचा परिणाम काय होईल याविषयीं शिवाजी महाराजांस शंका येऊन त्यांनीं देवावर हवाला ठेवून भेट घेण्याचा निश्चय केला.

( ४ ) भेटीचे वेळीं प्रथमतः अफझुलखानानें शिवाजी

महाराजांस ठार मारण्याचा प्रयत्न केला. त्यावरून शिवाजी महाराजांनीं त्यांस तात्काळ नाहींसा केला.

ह्या वरील गोष्टी जर सत्य असतील तर अफझुलखानास कपटानें मारलें हा जो दोष **ग्रांट् डफ्** व इतर इंग्लिश इतिहासकर्त्यांनीं शिवाजी महाराजांस दिला आहे तो निराधार समजला पाहिजे. **स्कॉट वेरिंग** साहेबांनीं वर जी हकीकत दिली आहे तिजवर ते आपलें मत येणेंप्रमाणें लिहितात,—

"वरील इतिहासास सर्वांशीं आधार मराठी बखरींचा "आहे व तो इतिहास मला खरा वाटतो. कारण, जर "शिवाजीप्रमाणें अबदुल्लाखानाच्या मनांतून कपटानें घात "करावयाचा नसता तर, शिवाजीसारख्या मनुष्याबरोबर "व शिवाजीनें विलक्षण अटी घातल्या त्या सर्व पतकरून "अबदुल्लाखान भेटीस गेला असता कीं काय याची मला "फार शंका आहे. जर केवळ भेट घेण्याचाच हेतु असता "तर त्याच्या कारकुनानें जें काम केलें त्यापेक्षां अधिक "अबदुल्लाखान जातीनें काय करणार होता? परंतु अबदुल्ला-"खानाचा दुष्ट हेतु होता ह्मणून शिवाजीचा अधमपणा "कमी होतो असें नाहीं. त्याणें मुळारंभापासून अबदुल्ला-"खानास मारण्याचा बेत केला होता."

हें वरील ह्मणणें बिलकुल रास्त नाहीं. कारण, जर मराठ्यांनीं दिलेला इतिहास सत्य आहे ही गोष्ट वेरिंग साहेब कबूल करतात, तसेंच अफझुलखानानें आपण होऊन भेटीविषयीं आग्रह धरिला ही गोष्ट वेरिंग साहेब

---

१ पुरवणी B पहा.

खरी मानतात, व ज्या ज्या अडचणी व अटी शिवाजी महाराजांनीं घातल्या त्या त्या अफझुलखानानें कबूल केल्या याविषयीं जर वेरिंग साहेबास शंका नाहीं, व अफझुलखानानें प्रथमारंभीं शिवाजी महाराजांचा प्राण घेण्याच्या हेतूनें शस्त्रप्रहार केला ही गोष्ट जर वेरिंग साहेब कबूल करतात, तर शिवाजी महाराजांनीं अफझुल-खानास कपटानें मारलें असें मानणें शोभत नाहीं इतकेंच नाहीं, तर अप्रयोजक दिसतें असें ह्मटलें पाहिजे. वरील सर्व गोष्टीवरून उलटा असा संभव दिसतो कीं आपला जीव वांचविण्याकरितां शिवाजी महाराजांना अफझुलखान यास मारणें भाग पडलें असावें; परंतु चिलखत वगैरे घालून शिवाजी महाराजांनीं कडेकोट तयारी केली होती त्यामुळें त्याच्या मनांत पापवासना असावी असें वेरिंग साहेब समजतात. पण त्यांनीं असें कां समजावें हें नीट-पणें कळत नाहीं. कारण, विजापूरवाले व शिवाजी महाराज या उभयतांमध्यें जो शत्रुभाव निरंतर चालत होता त्याकडे लक्ष दिलें असतां शिवाजी महाराजांनीं हत्यारबंद होऊन हुशारी केली होती ही केवल स्वाभाविक गोष्ट होय. यांत नवल कांहींच नव्हतें असें समजलें पाहिजे. विजापूरवाल्यांचा हेतु पुष्कळ दिवसांपासून शिवाजी महाराजांस धरण्याचा होता व तो सिद्धीस नेण्यास त्यांनीं हरप्रयत्न केला. शिवाजी महाराजांचे तीर्थरूपांस ४ वर्षें कैदेंतही टाकिलें. बाजी शामराज याजबरोबर लष्कर पाठवून १६५१ सालीं शिवाजी महाराजांस धरण्याचा उद्योग केला. परंतु तो निष्फळ झाला तेव्हां अखेरीस अफझुलखानाबरोबर फौज रवाना केली. या सर्व गोष्टींचा

जर विचार केला तर शिवाजी महाराजांनीं हत्यारबंद होऊन हुशारी केली यांत कांहीं एक नवल नाहीं व यावरून त्यांच्या मनांतून पूर्वीपासून अफझुलखानास मारण्याचें होतें असें सिद्ध होत नाहीं व वेरिंग साहेबाची कल्पना केवळ मनःकल्पित दिसते. त्या कल्पनेस आधार त्यांच्या इतिहासांत बिलकुल नाहीं.

वेरिंग साहेबांनीं मराठ्यांचा इतिहास लिहिला आहे तो मराठी बखरींवरून व इतर ग्रंथांच्या आधारावरून लिहिला आहे. परंतु या प्रसंगीं इतर ग्रंथ खरे न मानतां केवळ मराठी बखरींतील हकीकत खरी मानली आहे. या इतर ग्रंथकारांपैकीं एका बुंदेल्या सरदारानें शिवाजी महाराजांचें चरित्र लिहिलें आहे त्यांतून वेरिंग साहेबांनीं बरीच माहिती घेतली आहे. या सरदारानें प्रतापगडच्या भेटीविषयीं वृत्तांत दिला आहे तो येणेंप्रमाणें:—

" शाहाजीनें आपल्या मुलाची पुंडाई मोडावी ह्मणून "विजापूरवाल्यांनीं त्यांस सांगून पाहिलें. परंतु तें सांगणें "सर्व व्यर्थ गेलें. कारण, शाहाजीनें विजापुरवाल्यांस कळ- "विलें कीं, 'शिवाजीबरोबर मी कांहीं एक संबंध ठेवीत नाहीं "व तो कोणी माझा आप्तविषय आहे, असेंही मी मानीत "नाहीं.' सरशेवटीं अफझुलखान ह्या नांवाच्या एका सरदारा- "बरोबर मोठी फौज देऊन ती विजापूरवाल्यांनीं शिवाजीवर "रवाना केली.

" शिवाजीनें अफझुलखानास मोठ्या युक्तीचें पत्र लिहि- "लें व विनंति केली कीं, 'माझ्या सर्व अपराधांची क्षमा व्हावी

१ पुरवणी C पहा.

"आणि आपण येथें येऊन स्वतः मजला पदरांत घ्यावें.' मग
"शिवाजी राहत होता त्या ठिकाणापर्यंत अफझुलखान बिन-
"हरकत जाऊन पोहोंचला. नंतर उभयतांमध्यें असा संकेत
"ठरला कीं, अफझुलखानानें १० लोक व शिवाजीनें फक्त ५
"लोक बरोबर घेऊन संकेतस्थानीं भेटीस यावें. त्याप्रमाणें
"उभयतांची भेट झाली. परंतु भेट घेतेवेळीं शिवाजीनें वि-
"श्वासघातानें अफझुलखानावर शस्त्रप्रहार केला. पुढें शिवा-
"जीकडून इशारा होतांच त्यांची फौज दडून राहिली होती
"ती एकदम बाहेर निघाली व त्यांनीं विजापूरवाल्याचें सैन्य
"गैरसावध असतां त्यांच्यावर हल्ला केला. ह्या प्रसंगीं अफ-
"झुलखान संनिध नसल्यामुळें त्याचे सैन्याचा तात्काळ परा-
"भव झाला."

वरील वृत्तांत मुसलमानी इतिहासावरून घेतला आहे यांत शंका नाहीं. कारण, वृत्तांत लिहिणारा जो बुंदेला सरदार तो अवरंगजेबाचे पदरीं नौकर असून त्या पादशाहाबरोबर सर्व स्वाऱ्यांमध्यें दक्षणेंत होता व त्यानें त्या स्वाऱ्यांचा व शिवाजीच्या चरित्राचा इतिहास लिहिला आहे. त्यास हा[१] वृत्तांत केवळ विरुद्ध पक्षांकडील समजला पाहिजे, परंतु वेरिंग साहेबांनीं तो निराधार कां मानिला याचीं कारणें त्यांच्या ग्रंथावरून पाहतां खालीं लिहिल्याप्रमाणें दिसतातः—

"माझ्या ग्रंथाला आधारभूत साधनें फार नाहींत व ग्रं-
"थांत चमत्कार वाटण्यासारख्या गोष्टीही फार थोड्या आहेत,
"याचें मला कितीही वाईट वाटलें तथापि माझ्या मनाला एवढें
"एक समाधान आहे कीं मी फारशी ग्रंथ अवलोकन करण्यां-

१ पुरवणी D पहा.

"त अंतर केलें नाहीं. परंतु माझ्या मतें या ग्रंथासारखे मिथ्या
"ग्रंथ दुसरे कोणतेही नसतील, व सूक्ष्म विचार करून त्यांच्यां-
"तून सत्य काय आहे हें काढण्याचा कोणी प्रयत्न करील,
"तर तो कधींही सफल होणार नाहीं. फिरिस्तानें सर्व भरत-
"खंडाचा एक इतिहास लिहिला आहे व दक्षिणचाही एक
"निराळा इतिहास रचला आहे. हा ग्रंथकार मात्र निःपक्ष-
"पातानें व खरी माहिती मिळवून लिहितो. परंतु मराठ्यांनीं
"स्वातंत्र्य संपादन करण्यापूर्वींच फिरिस्ता मरण पावला व त्या-
"ची जागा रिकामी झाली ती पुनः भरली नाहीं. मुसलमा-
"नांचे उत्तम उत्तम प्रांत मराठ्यांनीं जिंकून घेतले, यामुळें
"अर्थात् मराठ्यांचा उत्कर्ष पाहून मुसलमानांच्या मनांत त्वेष
"येतो व त्यांना फार वाईट वाटतें. आलिकडेस तैमुरलंगाच्या
"घराण्यांतील बादशाहा मराठ्यांनीं कैदेंत ठेविला आहे. या-
"मुळें तर मुसलमानांच्या मनांतील मराठ्यांविषयींची द्वेषबुद्धि
"अधिकच वाढली असावी. या कारणास्तव मुसलमान लोक
"मराठ्यांना अनुकूल असें किंचित् तरी लिहितील अशी
"आशाच करणें नको. ते जो वृत्तांत देतात तो वास्तविक
"गोष्टी गाळून, व विपरीत अर्थ करून, लिहिलेला असतो,
"व मराठ्यांचा एक अणुमात्र दोष असला तर, तेवढाच ध-
"रून त्यास ते अतिशय फुगवितात. शिवाय त्यांची लिहि-
"ण्याची सरणी तर खरोखर दोषास्पद आहे. त्यांच्या कल्पना
"संभवनीय नसून, ओढून ताणून आणलेल्या असतात.
"मोठे मोठे शब्द घालून त्यांची भाषा कानाला गोड लागेल
"अशी केलेली असते; व त्यांच्या शब्दांची जुळणी प्रासयुक्त
"असते. यामुळें सूक्ष्म व रसिक वाचकांना त्यांच्या लिहि-
"ण्याचा वीट येतो. कारण, असें लिहिणें इतिहासयोग्य ख-

"रेपणास मारक असतें. काव्यबद्ध इतिहास असला म्हणजे
"पद्यरचना करण्यांत व प्रास मिळविण्यांत बराच सत्यांश ना-
"हींसा होतो. जरी फारशी इतिहास पद्यात्मक नाहींत, तथापि
"काव्यांतील सर्व व्यंगें त्यांच्यांत भरलीं आहेत. त्यांतील उ-
"पमा कांहीं चमत्कारिक असतात व विरोधभाव वळोनें काढ-
"लेला असतो. अशा शुष्क अलंकारांनीं मुसलमानी इतिहास
"भरलेले असून विशेषणांचा भडिमार इतका असतो कीं वा-
"चणारांचें मन व्यग्र होऊन गोंधळून जातें.

"परंतु मराठ्यांचे इतिहास या प्रकारचे नाहींत. मराठे
"इतिहासकर्ते ( कदाचित् हें नांवही कित्येक त्यांना देणार ना-
"हींत ) सरळ व साध्या पद्धतीनें आणि डौल न आणतां लि-
"हितात; व झालेली हकिकत योग्य शब्दांनीं लिहिली म्हणजे
"त्यांचें समाधान होतें. अतिशयोक्तीच्या कल्पना, किंवा
"फुगवून भाषा लिहिणें या कामीं ते पडत नाहींत. पेशव्यां-
"ला मल्हारराव होळकरांनीं पत्र लिहिलें आहे तें शिवाय क-
"रून वाईटाला चांगल्याचें रूप देण्याचा प्रयत्न त्यांणीं को-
"ठेंही केलेला नाहीं. जयापजयाची हकीकत ते संक्षिप्तपणें
"लिहितात व पराजयाची गोष्ट सांगणें असली म्हणजे ते थो-
"डक्यांत आटोपतात असें म्हणावें, तर जयाचा वृत्तांत सांगणें
"असल्यास ते उगाच लांबलचक लिहित नाहींत हें खरें आहे.
"वाचकांचें मन स्वपक्षाकडे ओढून घेणें, किंवा त्यांच्यावर
"मिथ्याग्रह करणें याविषयीं ते खटपट करीत नाहींत. परंतु
"कालमानाच्या संबंधानें व इतिहासप्रकरणीं विचार लिहून
"ठेवण्याचे कामांत त्यांच्यामध्यें व्यंगें आहेत यांत शंका
"नाहीं."

वरील गोष्टीवरून स्पष्ट आहे कीं, निदान वेरिंग साहेबाचे

मतें मराठ्यांनीं दिलेला इतिहास या बाबतींत विश्वसनीय आहे, व या वृत्तांतावरून अफझुलखानास कपटानें मारल्याचें अनुमान वेरिंग साहेबांनीं ओढून ताणून काढिलें आहे तें खरें दिसत नाहीं.

आतां ग्रांट् डफ् साहेबांनीं जी हकीकत दिली आहे तींत मुख्य ध्यानांत ठेवण्याच्या गोष्टी येणेंप्रमाणें आहेतः--

(१) शिवाजी महाराजांनीं पंतोजी गोपिनाथ वकील याज-बरोबर खलबत करून त्यास वश करून घेतलें व अफझुलखानास ठार मारण्याचा बेत केला.

(२) शिवाजी महाराजांनीं आपण होऊन अफझुलखानास प्रतापगडीं भेटीकरितां येण्याची विनंति केली.

(३) भेटीचे वेळीं अफझुलखानानें आपण होऊन प्रथमतः शस्त्र उचललें नाहीं. शिवाजी महाराजांनीं पूर्वीं बेत केल्याप्रमाणें त्यास ठार मारलें.

प्रथमतः पंतोजी गोपिनाथाबरोबर खलबत केल्याबद्दलचा मजकूर वेरिंग साहेबांच्या इतिहासांत नाहीं, ही चमत्कार वाटण्यासारखी गोष्ट आहे. वेरिंग साहेब आपल्या ग्रंथाच्या पुरवणींत लिहितात कीं, "मी पुष्कळ मराठी बखरी वाचल्या. त्यांमध्यें खुद्द शिवाजी महाराजांच्या निरनिराळ्या चार बखरी पाहिल्या. त्यांपैकीं एक बखर रायरी येथें असे व ती सर्वांत विश्वसनीय समजत असत." या सर्व बखरींमध्यें पंतोजी गोपिनाथाबरोबर संगनमत झाल्याचा किंचित् उल्लेख जरी असता तरी वेरिंग साहेबांनीं तो सांगितला असता यांत शंका नाहीं. कारण, तशा प्रकारचा कांहीं मजकूर नसतांही शिवाजी महाराजांच्या मनांतून अफझुलखानास मारण्याचा बेत पूर्वींपासून

होता वगैरे शुष्क अनुमान करून वेरिंग साहेबांनीं दोषारोप केला आहे, त्या अर्थीं खलबत झाल्याविषयींची हकीकत किंचित् खरी असती तर तिचा हवाला देऊंन वेरिंग साहेबांनीं आपल्या मताचें जास्त दृढीकरण केल्यावांचून सोडलें असतें असें संभवत नाहीं.

पंतोजी गोपिनाथावरोबर संगनमत झाल्याचें दिग्दर्शन देखील पवाड्यांत नाहीं. परंतु मराठ्यांच्या बखरी व पवाड़ा हे ग्रंथ शिवाजी महाराजांच्या स्वपक्षाचे लोकांनीं लिहिले आहेत, त्या अर्थीं महाराजांस दोष न यावा या बुद्धीनें त्यांनीं कदाचित् संगनमत झाल्याचा मजकूर गाळला असावा अशी शंका येईल. पण बुंदेल्या सरदाराचे ग्रंथांतून वर जी हकीकत घेतली आहे तींतही याविषयीं बिलकुल उल्लेख नसावा ही गोष्ट वास्तविक आश्चर्य वाटण्यासारखी आहे. केवळ विस्तारभयास्तव त्याणें ही गोष्ट लिहिली नसेल अशी कल्पना केल्यास ती सयुक्तिक दिसत नाहीं; कारण, औरंगजेब शिवाजी महाराजांस कुत्सितपणें व तिरस्कारबुद्धीनें सदोदित "डोंगरांतील उंदीर" असें ह्मणत असे. त्यास निदान आपला धनी जो औरंगजेब त्याला खुष करण्याकरितां तरी बुंदेल्या सरदारानें संगनमत झाल्याचा मजकूर खरा असता तर लिहिला असता असें वाटतें. याशिवाय मुसलमान इतिहासकारांमध्यें संगनमत झाल्याविषयींची हकीकत सत्य आहे असें सर्वत्र एकमत नसावें अशी शंका येथें येऊं पहाते, कारण, वरील बुंदेला सरदार मुसलमानी पक्षाचा होता व त्याणें आपल्या ग्रंथांतील माहिती मुसलमानी इतिहासामधून घेतली असावी हें उघड आहे; व असें असतां संगनमत झाल्याविषयींचा मजकूर त्याणें मुळींच किंवा स्पष्टपणें कां लिहिला नाहीं याचें चांगलें समाधान होत नाहीं.

प्रतापगड एथील देवीच्या पुजाऱ्यांजवळ तेथील इतिहासाची जी जुनी मराठी बखर आहे तिजवरूनही अफझुलखानास कपटानें मारिल्याचा दोष शिवाजी महाराजांवर येत नाहीं असें सांगतात. तस्मात् संगनमत झाल्याविषयींचा वृत्तांत मराठ्यांच्या बखरींत नसून ग्रांट् डफ् साहेबांनीं कित्येक मुसलमानी ग्रंथांवरून घेतला असावा असें स्पष्ट दिसतें. आणि असेल तर तो वृत्तांत एकदेशीय समजला पाहिजे, व असा एकदेशीय आणि विरुद्ध पक्षाकडील वृत्तांत सत्य कां मानावा याविषयीं ग्रांट् डफ् साहेबांनीं सबळ कारणें दिलीं पाहिजे होतीं. परंतु त्यांणीं मुळींच कांहीं कारण दिलें नाहीं ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. एके ठिकाणीं पायथ्याशीं टीप देऊन तींत मराठी बखरींचा हवाला ग्रांट् डफ् साहेबांनीं दिला आहे असें दिसतें. ( स्पष्टार्थ समजत नाहीं. ) परंतु अशा महत्त्वाच्या बाबतींत येवढें लिहिणें पुरें नाहीं. निदान विचारीपणानें जो पुरुष इतिहास वाचणार आहे त्याचें समाधान केवळ कांहीं एक कागदांचा अस्पष्ट हवाला दिल्यानें होणार नाहीं. शिवाय, ज्या कागदांचा हवाला दिला आहे ते सध्यां पाहूं गेलें असतां कोठें आहेत हें समजत नाहीं. ग्रांट् डफ् साहेबांनीं व दक्षणचे कमिशनरांनीं ज्या मौल्यवान् मराठी बखरींची होळी केली ह्मणून ह्मणतात त्यांतच सदर्हु कागदांचा समावेश झाला असावा; आणि असें असल्यास ग्रांट् डफ् साहेबांचें ह्मणणें, एक तर वेदवाक्य मानलें पाहिजे, नाहीं तर योग्य रीतीनें सिद्ध नाहीं. झालें ह्मणून अग्राह्य समजलें पाहिजे. आणि ग्रहण करण्यास खात्रीलायक प्रमाण मिळेपर्यंत विचारी लोक निःशंकपणें ग्रहण करणार नाहींत.

ग्रांट् डफ् साहेब आपखी लिहितात कीं, "शिवाजी महा-

राजांनीं आपण होऊन अफझुलखानास प्रतापगड येथें भेटीस येण्याची विनंति केली." या गोष्टीवर सर्वांशीं विश्वास बसत नाहीं. कारण ग्रांट् डफ् लिहितात कीं, "अफझुलखान पूर्वी वांई प्रांताचा सुभेदार होता, या कारणास्तव [ प्रतापगडासभोंवतील ] जंगली व डोंगरी प्रदेशांत प्रवेश केल्यावर अतिशय दुःख व प्रयास भोगावे लागतील हें अफझुलखानास माहित होतें." या कारणास्तव आणि "मुसलमान लोकांचा स्वाभाविक गर्विष्टपणा अफझुलखानामध्यें परिपूर्ण भरला असून, तो शत्रूस तृणवत् समजत असे" म्हणून, अफझुलखानानें प्रतापगडीं भेट घेण्याचें कबूल केलें, परंतु शिवाजी-महाराजांनीं अफझुलखानाची विनवणी कां करावी याचा हेतु समजत नाहीं. प्रतापगड येथें महाराज अशा ठिकाणीं होते कीं कसाही बलाढ्य शत्रु आला तथापि त्यांना भीति नव्हती; कारण, कोंकणघाटमाथ्यावरील जो हा प्रदेश त्याचा मुळापासून इतिहास पाहिला असतां तेथें मुसलमानांचा काबू कधींही चालला नाहीं हें पूर्वींच सांगितलें आहे. ब्राह्मणी घराण्याचे कारकिर्दींत सरदार मलिक उत्तिजार यास शिरक्यांनीं सैन्यासह ठार मारिलें. पुढें विजापुरवाल्यांचें हातूनही शिरक्यांचें पारिपत्य न होतां, चंद्रराव मोरे यांची योजना करून त्यांणीं शिरक्यांचा पराजय करविला. परंतु खुद्द मुसलमानांचा कांहीं एक इलाज चालला नाहीं. नंतर शिवाजी महाराजांस धरण्याकरितां सन १६५१ मध्यें विजापुरवाल्यांनीं कोणीं मुसलमान सरदारास न पाठवितां बाजी शामराज या नांवाचे हिंदूस पाठविलें. परंतु त्याचाही पराजय झाला. त्याप्रमाणें हिंदुस्थानांत मुसलमानी राज्य झाल्यापासून कोंकणघाटमाथ्यावर मुसलमानांच्या फौजेचा कांहीं इलाज चालला नाहीं ही गोष्ट लक्षांत आणिली असतां शिवा-

जी महाराज प्रतापगडीं असल्यावर अफझुलखानाची विशेष भीति धरतील अशी कल्पना होत नाहीं. उलटें असें वाटतें कीं ही गोष्ट अफझुलखानास स्वानुभवानें वांईस असतां माहित झाली होती या कारणास्तव अफझुलखानानेंच आपण होऊन कांहीं युक्तीनें शिवाजी महाराजास घाटमाथ्याबाहेर आणण्याचा प्रयत्न चालविला असावा, व या हेतूनें शिवाजी महाराजांकडे प्रथम आपला वकील पाठवून स्नेहभावाचें बोलणें लाविलें असावें. याप्रमाणें हकीकत मराठी बखरींत व पवाड्यांत सांपडते. याविरुद्ध ग्रांट् डफ् साहेबांनीं वृत्तांत दिला आहे. तो खरा कां मानावा याचीं कारणें समजत नाहींत व दिलेलींही नाहींत.

एका शंकेचें या ठिकाणीं निवारण केलें पाहिजे. पवाड्यावरून समजतें कीं, प्रथम कृष्णाजी ब्राह्मण अफझुलखानाकडून शिवाजी महाराजांकडे आला व त्याच्या ह्मणण्यावरून प्रतापगड येथें अफझुलखानाची भेट घेण्याचा संकेत शिवाजी महाराजांनीं केला. पुढें पवाड्यांत असें लिहिलें आहे कीं, शिवाजी महाराजांनीं आपला वकील जिवाजी यास अफझुलखानाकडे रवाना केलें. परंतु या वकीलाच्या उद्दाम व विरोधी भाषणाच्या योगानें अफझुलखानास राग येऊन तो सैन्यासहवर्तमान प्रतापगडास गेला व किल्ल्यास चवदा दिवस वेढा घातला. यावरून प्रथमतः स्नेहभावाचें जें बोलणें झालें होतें तें मोडून नंतर पंतोजी गोपिनाथाचे मार्फत बोलाचाली झाली असावी अशी शंका कित्येक घेतात. परंतु ही शंका ठीक दिसत नाहीं. चवदा दिवस वेढा घातल्याचा मजकूर पवाड्यांत लिहिला आहे तो खरा नाहीं असें ह्मटलें पाहिजे. कारण, त्यास आधार मराठी बखरींत, किंवा मुसलमानी इतिहासांत,

अथवा ग्रांट् डफ् साहेबांचे ग्रंथांत मिळत नाहीं. पवाड्याच्या कवीनें रघुनाथराव हणमंते यांस पेशवे ह्मणण्यामध्यें जशी चुकी केली आहे तद्वतच येथेंही चुकी आहे. शिवाजी महाराजांचें व अफझुलखानाचें स्नेहभावानें बोलणें झाल्यावर महाराजांचा वकील जाऊन अफझुलखानास अमर्याद भाषण बोलला असेल हें संभवत नाहीं, व बोलला असल्यास अफझुलखाना-सारखा मनुष्य तें भाषण सहन करून वकीलास जिवंत सोडून देईल असें मनांत सुद्धां आणवत नाहीं. तस्मात् पवाड्याच्या कवीनें वेढा घातला वगैरे ह्मणण्यांत चुकी केली आहे असेंच समजलें पाहिजे; व वेढा घातल्यानंतर पंतोजी गोपिनाथाबरोबर खलबत झाल्याची कल्पनाही संभवत नाहीं. सारांश, प्रथमारंभीं बोलणें झालें होतें तदनुसार अफझुलखान फौज घेऊन भेटीच्या उद्देशानें प्रतापगडाकडे गेला व त्याची फौज चवदा अगर कांहीं दिवसपर्यंत किल्ल्यासभोंवतीं होती इतकाच अर्थ चवदा दिवस वेढा घातल्याचे मजकुरापासून निघतो. रडतोंडीचा घाट ह्मणजे ज्या मार्गानें अफझुलखान गेला तो व प्रतापगड हीं ठिकाणें समोरासमोर आहेत व दोहींमध्यें अंतर थोडें असल्यामुळें, मध्यभागीं अफझुलखानाची फौज येऊन पडली होती ती पहाणारास, गडासभोंवतीं वेढा घालून पडली आहे असें अनुमान करण्यास जागा होती. सबब पवाड्याच्या कवीचा तसा ग्रह होऊन त्याणें ती गोष्ट आपल्या कवितेंत घातली आहे. एकंदरीनें पाहातां शिवाजी महाराजांचा वकील अफझुलखानास अमर्याद भाषण बोलला हें जसें असंभाव्य दिसतें, तद्वत् वेढा घातला हें कवीचें ह्मणणेंही असंभाव्य दिसतें.

शेवटीं ग्रांट् डफ् साहेब लिहितात कीं, "भेटीच्या प्रसंगीं शिवाजी महाराजांनीं अफझुलखानावर प्रथम शस्त्र उचलिलें,"

परंतु ही गोष्ट खरी न वाटण्यास एक प्रमाण असें आहे कीं अफझुलखानानें विजापुराहून निघतेवेळीं शिवाजी महाराजांस "जिवंत धरून आणून बादशहाचे सिंहासनाजवळ हजर करण्याचा पण केला होता. या गोष्टीस आधार पवाड्यामध्यें आहेः—"जिता धर शिवाजीला, कुलवजिरासी बोलला, खान "विजापुरांत बोलला, विडा पैजेचा उचलिला." ग्रांट् डफ् साहेबांच्या ग्रंथांत तर याविषयीं पुष्कळच लिहिलें आहेः— "अ-"फझुलखान नामें एका श्रेष्ठ पदवीच्या सरदारानें आपण होऊन "शिवाजीवर स्वारी जात होती तिचें सैन्याधिपत्य स्वीकारिलें, "व दक्षणेंतील मुसलमान लोक गर्विष्ठ असतात त्याप्रमाणें त्यानें "मोठ्या घमेंडीनें व डौलानें सांगितलें कीं, 'बंडखोर व कःपदार्थ "असा जो शिवाजी त्यास विडया घालून मी बादशाहाचे तख्ता-"जवळ आणून हजर करितों." यावरून स्पष्ट आहे कीं, शिवाजी महाराजांस धरून नेण्याची प्रतिज्ञा अफझुलखानानें केली होती व ज्या अर्थी शिवाजी महाराज प्रतापगडाबाहेर निघण्यास राजी नव्हते व किल्ल्याचे खालीं उतरून भेट घ्यावी ह्मणून अफझुलखानानें सांगितलें असतांही त्यांनीं त्यांचें ह्मणणें मान्य केलें नाहीं, त्या अर्थीं आपला पण सिद्धीस नेण्यास प्रतापगडीं गेल्यावांचून दुसरा मार्गच अफझुलखानास उरला नव्हता. अशा स्थितींत शिवाजी महाराज मित्रभावानें भेटले असते, तथापि त्यास कैद करून विजापुरीं नेण्याचा जो अफझुलखानाचा हेतु तो सिद्धीस गेला नसता हें उघड आहे. या कारणास्तव आपण होऊन प्रथम शस्त्रप्रहार करून शिवाजी महाराजांस आपले काबूंत आणण्याविषयीं अफझुलखानानें प्रयत्न केला असेल ही गोष्ट चांगली संभवते. विजापूर येथें एका इमारतीवर लेख आहे त्यांत अफझुलखानाचें वर्णन येणेप्रमाणें दिलें आ-

हे;—"अत्यंत दैवशाली, प्रस्तुतचा सेनाधिपति, दक्षणेंतील सरदार लोकांमध्यें प्रमुख व खोटया धर्मांचा उच्छेदक असा जो अफझुलखान महमदशाही त्याणें ही इमारत सन १६५२ इसवीमध्यें बांधली." ह्या लेखावरून अफझुलखान केवढा नामांकित सरदार होता हें स्पष्ट आहे व तो किती गर्विष्ठ होता हें पूर्वींच सांगितलें आहे. त्या अर्थीं अशा मनुष्यानें केलेली प्रतिज्ञा सिद्धीस न जाणें ह्मणजे त्यास मोठें लांछन होय, व हें लांछन न यावें ह्मणून कोणतीही गोष्ट करण्यास तो कमी करील असें त्याच्या स्वभावावरून संभवत नाहीं. आणि असें जर आहे, तर मराठी बखरींत व पवाड्यांत लिहिल्याप्रमाणें त्याणें प्रथम शस्त्रप्रहार केला हें खोटें ह्मणवत नाहीं.

पवाड्यांत लिहिलें आहे कीं, जिजाबाईनें शिवाजी महाराजांस सांगितलें, "बारे बुद्धीन कार्य साधावें, उसनें संभाजीचें घ्यावें," या वरून अशी शंका उत्पन्न होते कीं, आपला वडील पुत्र संभाजी यास कर्नाटकामध्यें कनकगिरी येथील मुसलमानांनीं लढाईत ठार मारलें होतें ही गोष्ट जिजाबाईच्या मनांत जळत होती. ह्मणून तिणें अफझुलखानावर सूड घेण्याविषयीं शिवाजी महाराजांस सुचविलें व त्यांणीं त्यास ठार मारलें असावें. परंतु कनकगिरीचे मुसलमानांचा पराभव करून व तेथील किल्लेदारास ठार मारून शाहाजीनें संभाजीच्या मरणाबद्दल पूर्ण सूड घेतला असें ग्रांट् डफ् साहेबांनींच लिहिलें आहे. त्याअर्थीं त्या गोष्टीचा जिजाबाईनें पुनः उद्गार काढला तो के-

---

१ Journal of the Bombay Branch of the Royal Asiatic Society. Vol. I. P. 382.

२ Grant Duff (3rd Edition 1873) P. 66.

वळ मातृत्वाचें कळवळ्यामुळें निघाला असावा. त्या ह्मणण्यास शिवाजी महाराजांनीं रुकार दिल्याचें पवाड्यांत लिहिलें नाहीं, आणि वेरिंगसाहेबांनीं वृत्तांत दिला आहे तो पाहतां जिजाबाईनें उलट उपदेश केल्याचें भासतें व असेंही कळतें कीं, शिवाजी महाराजाचें स्वाभाविक धैर्य देखील ह्या प्रसंगीं खचलें होतें व आलेल्या संकटांतून मुक्त व्हावें ह्मणून त्यांणीं काशीस व गयेस ब्राह्मण पाठविले व सर्वस्वी हवाला ईश्वरावर ठेवला होता. या गोष्टीस आधार पवाड्यांतही मिळतो. शिवाजी महाराजांस निरोप देतेवेळीं जिजाबाईनें ह्मटलें आहे कीं:— " स्मर आपुल्या महादेवाला. " तसेंच सरदारांची सभा असतां शिवाजी महाराज बोलले आहेत कीं:— "भाइनु अबदुल्लाखान आला, त्याचा धाक तो देवाला." या सर्व गोष्टीवरून असें दिसतें कीं, शिवाजी महाराजांस भीति उत्पन्न झाली होती व भेटीचा प्रसंग कसा लोटेल याची त्यास काळजी होती आणि याच मतास्तव हत्यारबंद होऊन त्यांणीं कडेकोट तयारी केली असावी. शिवाय अफझुलखान शरीरानें सुदृढ व दांडगा होता, त्याचे १५०० लोक किल्ल्याचे पायथ्यासीं उभे होते. त्याची इतर सर्व सेना किल्ल्याचे आसपास पसरली होती, हें सर्व लक्षांत आणिलें ह्मणजे शिवाजी महाराज आपण होऊन अफझुलखानास प्रथमतः मारण्यास उद्युक्त झाले असतील हें संभवत नाहीं व या गोष्टीस मराठी बखरींत आधारही नाहीं.

वरील सर्व कारणांवरून ग्रांट् डफ् साहेबांनीं दिलेला इतिहास आपल्या लोकांच्या इतिहासापेक्षां अधिक विश्वसनीय कां मानावा हें समजत नाहीं. या ठिकाणीं कोणी शंका घेईल कीं ग्रांट् डफ् साहेबांनीं आपल्या ग्रंथाचे प्रस्तावनेंत व

गोल्ड्स्मिड् साहेबांस पत्र लिहिलें आहे त्यामध्यें वारंवार अशा अर्थाचा मजकूर लिहिला आहे कीं, "फार मौल्यवान् व दुर्मिळ बखरी व कागदपत्र जमा करून मीं आपला ग्रंथ लिहिला आहे. माझ्या ग्रंथांतील वृत्तांताचे सत्यपणाविषयीं कोणास शंका घेणें नको. ज्याला ज्याला मीं आपला ग्रंथ दाखविला त्याणें त्याणें तो पाहून मानच डोलविली." यास्तव जर ग्रांट् डफ् साहेबांचा वृत्तांत सत्य असेल तर, त्याचे सत्यपणाविषयींचीं कारणें दिलीं नाहींत ह्मणून तो कांहीं असत्य होऊं शकत नाहीं. शिवाय, ग्रांट डफ् साहेबांनीं प्रस्तावनेंत लिहिलें आहे कीं, "आमच्या लिहिण्याविरुद्ध ज्या ग्रंथकारांचे लेख असतील त्यांचे लेखांवर आह्मी टीका करीत बसत नाहीं." या कारणास्तव ग्रांट् डफ् साहेबांच्या ग्रंथांतील हकीकत सत्य नाहीं असें कां ह्मणावें?

परंतु अलिकडेस कांहीं माहिती होत चालली आहे तेणेंकरून ग्रांट् डफ् साहेबांच्या ग्रंथांतील कित्येक गोष्टींचे खरेपणाविषयीं शंका आल्या आहेत. फार तर काय, पुण्याहून थोडया अंतरावर चाकणचा किल्ला आहे त्याचें त्यांणीं वर्णन दिलें आहे तें सर्व खोटें आहे असें समजतें. शिवाजी महाराज उदयास येण्यास रामदासस्वामी किती कारणीभूत झाले हे सर्वांस माहित आहेच. परंतु स्वामीविषयीं ग्रांट् डफ् साहेबांनीं कांहीं एक लिहिलें नाहीं असें ह्मटलें असतां चालेल. प्रथमारंभीं रामदासस्वामीचें नांव आलें आहे तेथें ग्रांट् डफ् साहेब असें [१] ह्मणतात कीं, "मोरे व दळवे हे हिंदु असून "त्यांस शिवाजी महाराजांनीं ठार मारलें या गोष्टीचा मराठ्यां-"स विरोध वाटला होता, तो मोडून स्वजातीय लोकांचें मन

---

१ Grant Duff 3rd Edition 1873) P. 83.

"खुश व्हावें ह्मणून शिवाजी महाराजांनीं प्रतापगडीं देवीची "स्थापना केली व रामदासस्वामीचा उपदेश घेतला." ह्मणजे साहेबांच्या ह्मणण्याचा अर्थ हा कीं, रामदासस्वामींचा उपदेश घेतला हें एक ढोंगच केलें. असें करण्यामध्यें धार्मिकपणा कांहीं नव्हता. आतां ज्यास रामदासस्वामींची किंचित् थोडी माहिती आहे तो देखील असें ह्मणणार नाहीं व असें ह्मणणारास आमच्या लोकांची वास्तविक स्थिति कांहींच समजत नाहीं, किंवा माहित नाहीं, अथवा बुद्ध्या विरोधभावानें ती वर्णन केली असावी अशी कल्पना येते. तस्मात् ग्रांट् डफ् साहेबांच्या इतिहासांतील प्रत्येक गोष्टीचे सत्यपणाविषयीं निःशंक राहूं नये हेंच खरें आहे. याशिवाय, ज्या मराठी बखरींचे व कागदपत्रांचे हवाले ग्रांट् डफ् साहेबांनीं आपल्या ग्रंथांत दिले आहेत व ज्यांच्या साह्यानें त्यांणीं आपला सर्व ग्रंथ लिहिला त्यांची त्यांणीं जाळून होळी कां केली हें कळत नाहीं. असें केल्यापासून काय फायदा होता हा त्यांसच माहित असावा. सारांश ज्या बखरींस ग्रांट् डफ् साहेबांनीं आपल्या पुस्तकांत ठिकठिकाणीं हवाला दिला आहे तो जाळलेल्या ग्रंथांस दिला आहे असें ह्मटलें पाहिजे. या योगानें इतिहास विश्वसनीय न होतां उलटा विपरीत ग्रह मात्र वाचकांचे मनावर होतो. ग्रांट् डफ् साहेब प्रस्तावनेंत एके ठिकाणीं लिहितात कीं, "मराठे लोक हे लोकांच्या हक्कसंबंधाचे कागद नाहींसे करीत असत." परंतु ग्रांट् डफ् साहेबांनीं ज्या कागदांचा नाश केला ते हक्कसंबंधाचे देखील नव्हते. त्यांत केवळ सरळ इतिहासाच्या गोष्टी होत्या, व ते जाळल्यानें साहेबांचा काय फायदा झाला असेल हें ईश्वरास माहित.

अखेरीस या संबंधानें अत्यंत महत्त्वाची गोष्ट ही आहे

कीं शिवाजी महाराजांनीं अफझुलखानास कपटानें मारिलें हा दोष आपल्या लोकांनीं कधींही कबूल केला नाहीं. आपल्या लोकांचें ह्मणणें सदोदित असें आहे कीं, अफझुलखानानें प्रथम खोटसाळपणा केला ह्मणून शिवाजी महाराजांस त्याला ठार मारणें भाग पडलें. हें जें आपल्या लोकांचें ह्मणणें तें ग्रांट् डफ् साहेबही मान्य करितात. त्यांणीं असें लिहिलें आहे कीं, "जावळीचे राजे चंद्रराव मोरे यास ठार मारण्या-
"विषयीं शिवाजीमहाराजांनीं आज्ञा दिली ही गोष्ट मराठे
"लोक कबूल करितात. परंतु अफझुलखानास कपटानें मारिलें
"ही गोष्ट ते कबूल करीत नाहींत. हलकट लोकांची समज
"अशी आहे कीं, अफझुलखानानें प्रथम शस्त्र उचलिलें ह्मणून
"शिवाजीनें त्यांस ठार मारिलें. हें कृत्य विश्वासघाताचें व निं-
"द्य न समजतां मराठे लोक त्यास फार स्तुत्य समजतात."[१]
आतां ह्या लिहिण्याचा अर्थ बिलकूल दुर्बोध आहे व त्यांत संगती दिसत नाहीं असें ह्मटलें पाहिजे. कारण, जर चंद्रराव मोरे यांस मारण्याविषयीं शिवाजी महाराजांनीं आज्ञा दिली होती ही गोष्ट आपले लोक कबूल करितात तर अफझुलखानास ठार मारलें ही गोष्ट ते कां कबूल करीत नाहींत हें समजत नाहीं. चंद्रराव मोरे हे हिंदु असून शिवाजी महाराजांचे स्वजातीय मराठे होते व ते मोठ्या घराण्यांतले असून राजे ह्मणवीत असत. उभयतांमध्यें स्नेहभावही होता. मोऱ्यांना मारणें ही गोष्ट मराठे लोकांचे मतें निंदास्पद व दोषार्ह होती यांत शंकाच नको. असें असूनही ती आपले लोक कबूल करतात तर, अफझुलखान जो जातीचा यवन व शिवाजी महाराजांचा परम शत्रु होता, आणि जो सैन्य घेऊन उघड

१ Grant Duff (3rd Edition 1873) P. 132.

उघड शिवाजी महाराजांचें पारिपत्य करण्यास आला होता, त्याला कपटानें मारलें असें ह्मणण्यांत आपले लोकांचें काय खर्चत होतें ? अशाला मारणें तेवेळीं निंद्य समजत नव्हतें; इतकेंच नाहीं, परंतु मोठें श्लाघ्य व पुण्यकर्म केल्यासारखेंच समजत असत असें ह्मणण्यास हरकत नाहीं. **रामदासस्वामीसारख्या** निरिच्छ साधूनें देखील 'दासबोधां'त एके जागीं असें ह्मटलें आहे कीं:—

"गलीमांच्या देखतां फौजा। रणशूरांच्या फुरफुरती भुजा।
ऐसा पाहिजे राजा। कैपक्षी परमार्थी॥"

शिवाजी महाराज कैलासवासी झाल्यावर त्यांचे चिरंजीव संभाजी यास स्वामींनीं पत्र लिहिलें आहे त्यांतही आणखी असें, ह्मटलें आहे कीं:—" गलीम निवटोनी टाकावे."

जर यवनाविषयीं तेवेळच्या मराठ्यांमध्यें इतका द्वेषभाव असे, तर अफझुलखानासारख्या धडधडीत चालून आलेल्या शत्रूस कपटानें किंवा कोणत्याही मिषानें ठार मारला ही गोष्ट कबूल करण्यांत आपल्या लोकांचें काय वेंचत होतें ? त्यांना या गोष्टीचा उलटा हर्ष झाला व ते ही गोष्ट स्तुत्य मानतात हें ग्रांट् डफ् साहेबांनींच लिहिलें आहे. आणि जर ती गोष्ट स्तुत्य समजत होते तर आपले लोक ती कबूल करीत नाहींत हें लिहिणें सर्वथैव असंभाव्य दिसतें. या कारणास्तव ग्रांट् डफ् साहेबांच्या ह्मणण्यावर निदान या बाबतींत भरंवसा बसत नाहीं. ग्रांट् डफ् साहेब आणखी लिहितात कीं, अफझुलखानानें प्रथम खोटसाळपणा केला अशी जी आपल्या लोकांची समज आहे ती फक्त हलकट लोकांमध्यें आहे, सभ्य लोकांमध्यें नाहीं. हें लिहिणें बिलकूल खरें नाहीं असें वाटतें.

अफझुलखानानें खोटसाळपणा केल्याचा ह्मणजे प्रथम शस्त्र उचलल्याचा मजकूर वेरिंग् साहेबांचे ग्रंथांत आहे व वेरिंग् साहेब असें लिहितात कीं, ह्या व इतर मजकुरास आधार केवळ मराठी बखरींचा आहे, व ज्या अर्थी वेरिंग् साहेबांनीं आपल्या ग्रंथाच्या पुरवणींत ह्मटलें आहे कीं, पुष्कळ ग्रंथ पाहिले त्यांत खालील ग्रंथ पाहून मी आपला इतिहास रचला आहे; ह्मणजेः—

युरोपियन ग्रंथ=कपतान जोनाथान स्काट, कर्नेल डौ, मिस्तर हालवेल, मेजर रेनेल, मिस्तर क्राफर्ड, कर्नल केर, मिस्तर टोन व आर्म साहेब, यांणीं लिहिलेले ग्रंथ.

मुसलमानी ग्रंथ=फिरिस्ता, सरूल मुत्त आखरीन, अली इब्राहीमखान, काफीखान वगैरे, यांचे ग्रंथ.

मराठी ग्रंथ =( १ ) शिवाजी व संभाजी यांच्या चार बखरी. यांपैकीं एक रायरीस असते व ती सर्वांत विश्वसनीय होय. ( २ ) पेशवे व शाहूराजे यांच्या दोन बखरी. ( ३ ) पाणिपतच्या लढाईविषयीं दोन बखरी. यांपैकीं एक मल्हारराव होळकरानें लिहिलेली आहे. ( ४ ) माधवराव व नारायणराव पेशवे यांच्या दोन बखरी, नागपूरचे भोंसले, गाईकवाड, शिंदे व होळकर यांची बखर. ( ५ ) 'व्रतराज' व 'राजकोश' या नांवांचे पेशव्यांच्या दप्तरांतील दोन संस्कृत ग्रंथ. ( ६ ) एका बुंदेल्या सरदारानें लिहिलेला शिवाजीचा वृत्तांत.

त्या अर्थी या बखरींत जो जो इतिहास लिहिलेला आहे व जें जें ह्मणणें आहे तें हलकट लोकांचें नसेल याविषयीं शंकाच नको. आणि या बखरींमध्यें जर अफझुलखानानें प्रथम खोटसाळपणा केला असें ह्मटलें आहे

तर तें ह्मणणें हलकट लोकांचें नाहीं, आणि हलकट लोकांचें आहे असें लिहिण्यांत ग्रांट् डफ् साहेबांचे हातून खचीत चुकी झाली आहे असें ह्मटलें पाहिजे. याशिवाय वेरिंग् साहेब हे इंग्रज सरकारचे तर्फेनें ७ वर्षेपर्यंत पुण्यास वकील होते व त्या वेळीं त्यांणीं आपला ग्रंथ लिहिला आहे आणि त्यांणीं अफझुलखानाचे खोटसाळपणाविषयींचा मजकूर ग्रहण केला आहे. त्यास वेरिंग् साहेबांनीं हलकट मनुष्यांच्या तोंडच्या गोष्टी आपल्या ग्रंथांत घेतल्या नसतील आणि घेतल्याचा दोष ग्रांट् डफ् साहेबांच्यानें त्यांस देववेल असें वाटत नाहीं, व दिल्यास त्या गोष्टीवर कोणी विश्वासही ठेवणार नाहीं.

एकंदरीनें पाहतां ग्रांट् डफ् साहेबांनीं प्रतापगडच्या लढाईविषयीं जो वृत्तांत दिला आहे तो केवळ अविश्वसनीय व असंभाव्य नसला तथापि सर्वथैव विश्वसनीय व संभाव्य आहे असें कोणीही विचारी मनुष्य ह्मणणार नाहीं, व जोंपर्यंत शिवाजी महाराजांनीं अफझुलखानास कपटानें मारलें ही गोष्ट कारणासहित यथायोग्य सिद्ध होणार नाहीं तोंपर्यंत या बाबतींत आपल्या लोकांनीं दिलेला इतिहास खरा मानून विचारी व शोधक पुरुष शिवाजीमहाराजांस दोषी ठरविणार नाहींत, इतकेंच नाहीं तर निश्चयात्मकपणें दोष स्थापित झाला नाहीं तोंपर्यंत दोषाभावच मानणें योग्य समजतील.

# भाग ४ था.– निबंधसार.

महाबळेश्वरीं जाण्यापासून अनेक फायदे होतात. नरदेहीं इहलोक व परलोक साध्य करून घेणें हें मनुष्याचें कर्तव्य कर्म होय. इहलोकीं साध्य करण्याच्या मुख्य दोन गोष्टी आहेत;—स्वहित व स्वदेशहित. स्वहिताचा संबंध व्यक्तीकडे व शरीरसुखाकडे असतो; स्वदेशहिताचा संबंध देशबांधवांकडे व राज्यसत्तेकडे असतो. परमार्थमध्यें आत्मानात्मज्ञान, जीवात्मा व परमात्मा यांचें स्वरूप व परस्पर संबंध, तसेंच सृष्टीची उत्पत्ति, स्थिति, लय इत्यादिकांचा विचार येतो. आतां महाबळेश्वरीं स्वहित, स्वदेशहित व परमार्थ हे तीनही साध्य करून घेण्याचीं चांगलीं साधनें आहेत, त्याविषयीं थोडा विचार करूं.

स्वहित ह्मणजे मुख्यत्वेंकरून शरीरसुख व उपभोग इत्यादि होत. हे साध्य करून घेण्यास महाबळेश्वरीं जशी अनुकूलता आहे तशी थोडे ठिकाणीं आहे हें पहिले भागांत सविस्तर सांगितलें आहे; यास्तव आतां जास्त लिहिणें नको. परंतु एका शंकेचें निवारण केलें पाहिजे, ती अशी कीं, "अति सर्वत्र वर्जयेत्" या ह्मणीप्रमाणें महाबळेश्वरीं अतिशय शरीरसुख व विलासाचीं साधनें असतील तर त्यांच्या योगानें वाईट परिणाम होण्याचा संभव आहे. आपल्या लोकांना या गोष्टीची धास्ती नको; कारण त्यांना द्रव्याची ऐपत नसल्यामुळें महाबळेश्वरीं साधारण सुख देखील मिळत नाहीं हें पूर्वींच सांगितलें आहे. परंतु इंग्लिश लोक पुष्कळ सुख भोगितात व राजविलास करितात, या कारणास्तव त्यांच्यावर कदाचित् अतिसुखाचे वाईट परिणाम होतील. इंग्लिश लो-

कांची विद्या, शक्ति व शहाणपणा यांजकडे लक्ष दिलें असतां अशा शंकेचें कांहीं कारण दिसून येत नाहीं. तथापि शंका घेणारे आहेत यांत संशय नाहीं. ता० २४ जुलै स०१८७४ इसवीचे 'टाईम्स आफ् इंडिया' पत्रांत अलाहाबादेहून एका गृहस्थानें पत्र लिहिलें आहे. तो मोठाल्या अधिकाऱ्यांविषयीं व मुख्यत्वेंकरून हिंदुस्थान सरकारचे सेक्रेटरीमंडळास अनुलक्षून असें लिहित आहे कीं;—

"The Head officials go and amuse themselves "at the Hills with Badmington for eight months "in the year, leaving the junior members down in "the plains to vary their idleness by paring their "nails and sending out an occasional Takeed or "reminder. The higher the pay and the larger the "establishment, the less the amount of work to be "expected. These idlers are collected to assist the "Government.

"The art of governing India consists in setting "a few idlers to burden industrious men with more "work than they are physically capable of performing and in remunerating officials in proportion "to the spare time they can find for Badminton "at the Hills. It is to be feared these hills will "eventually crush British influence out of the East. "The first question for the additional member to "be given to the Governor General's Council ought "to be as to how these Hills can be most effectually and expeditiously levelled with the plains, so "that we may have opportunities of bringing idlers "to their proper position."

वरील वाक्याचा भावार्थ असा आहे कीं, "मुख्य अधिकारी लोक डोंगरावर हवा खाण्याकरितां जातात व वर्षांतून आठ महिने पावेतों 'बाडमिंटन' खेळत असतात. ते आपल्या बरोबर हाताखालचे लहान लहान अधिकारी नेत नाहींत; व या लहान मंडळीस कांहीं काम नसल्यामुळें जें काम असतें तेवढ्यांतच. ते नानाप्रकार करितात; ह्मणजे चाकूनें नखें कोरीत बसतात व कधीं कधीं एखादी 'ताकीद' पाठवितात. सारांश, जसा जसा मोठा पगार व कचेरींतील लोक पुष्कळ तसें तसें अधिकाऱ्यांच्या हातून काम कमी होतें. अशा प्रकारचे रिकामटवळे डोंगरावर जमले ह्मणजे तें सरकाराला मदत करण्याकरितां येतात असें ह्मणतात.

"हिंदुस्थानामध्यें राज्य करण्याची शैली ह्मटली ह्मणजे थोडे बहुत रिकामटवळे अधिकारी नेमावे व त्यांनीं मग हाताखालच्या मेहनती लोकांपासून मरेमरेतों काम घ्यावें ही होय. तसेंच डोंगरावर 'बाडमिंटन' खेळण्यास ज्याला जास्त फुरसत मिळेल त्याला जास्त पगार देत जावा. याप्रमाणें अधिकारी लोक डोंगरावर राहतात; तेणेंकरून सरशेवटीं इंग्लिशांना या मुलखांतून आपलें राज्य घालवावें लागेल कीं काय अशी धास्ती पडते. गव्हर्नर साहेबांचे कौन्सिलांत पब्लिक वर्क्स खात्याकरितां नवीन मेंबर नेमला आहे त्याला पहिलें काम असें सांगितलें पाहिजे कीं, हे दुष्ट डोंगर तावडतोब जमिनीच्या सपाटीबरावर मिळवून टाकावे, ह्मणजे जे रिकामटवळे डोंगरावर जाऊन बसत असतात त्यांचे चांगले डोळे उघडण्यास आपल्याला संधि सांपडेल."

या वाक्याच्या झोंकावरून स्पष्ट आहे कीं लिहिणारा कोणी तरी युरोपियन असावा व त्याच्या ह्मणण्याचें तात्पर्य

असें आहे कीं, मुख्य अधिकारी लोक डोंगरावर मजा मारीत बसतात व कामाला शिवत देखील नाहींत; आणि राज्य करण्याची शैली एवढीच समजतात कीं, रिकामटवळे लोक मोठमोठ्या अधिकारावर नेमावे व त्यांणीं टांक न बुडवितां हाताखालच्या लोकांकडून प्राण जाईपर्यंत काम घेत असावें, पण या प्रमाणें राज्यकारभार चालेल तर सरतेशेवटीं इंग्लिशांना आपलें राज्य घालवावें लागेल.

आह्मांस वाटतें हें लिहिणें अप्रयोजक आहे व लिहिणारा आपल्या मनांतले कुतर्क काढून बोलत आहे. कदाचित् त्याला कधीं जातीनें डोंगरावर जाण्याला मिळत नसेल यामुळें हे हेव्याचे उद्गार निघाले असतील. कारण, आपले प्रस्तुतचे राज्यकर्ते सर्व भूमितलावर इतके बलाढ्य, विद्वान् व राजगुंडे आहेत कीं ते हिंदुस्थानांत ऐषआराम करून राज्य बुडविण्यास आले आहेत हें ह्मणणें कोणाचे स्वप्नीं देखील येणार नाहीं. रोमचें सार्वभौम राज्य जाण्यास कारण अंतीं ऐषआराम झाला. मुसलमानांनीं हिंदुस्थानचें राज्य ऐषआराम करून बुडविलें. ह्या व इतर इतिहासप्रसिद्ध गोष्टी इंग्लिशांच्या डोळ्यासमोर असतां, तेही तसल्या मार्गास प्रवृत्त होतील इतके का इंग्लिश लोक वेडे आहेत? अशी कल्पना घेणें हें विनाकारण त्यांचे चाणाक्षपणास व उद्योगास दोष लावणें आहे. आह्मांस वाटतें कीं, साहेब लोक केवळ ऐषआरामाकरितां डोंगरावर जात नाहींत. बंगालच्या दुष्काळाच्या वेळेस गव्हर्नर जनरल साहेब सिमल्यास न जातां कलकत्त्यासच राहिले हें आपणास माहित नाहीं काय? आपले राज्यकर्ते आळशी व ऐषआरामी नाहींत या गोष्टीला हें काय लहान

प्रमाण आहे ? या कारणास्तव साहेब लोक डोंगरावर -जातात त्याचीं कारणें निराळींच असलीं पाहिजेत.

एक तर असें दिसतें कीं, त्यांना राज्यकारभाराचे अति परिश्रम होतात याकरितां विश्रांति घेण्याला त्यांना डोंगरावर जाणें भाग पडतें. पण विश्रांति ह्मणजे कांहीं ऐषआराम नव्हे. ती सर्वांना आवश्यक आहे व राज्यभार वाहणारे पुरुषांस तर तिजवांचून चालणारच नाहीं. आतां हिंदुस्था-नामध्यें राज्य करण्याचे श्रम आहेत तसे कोठेंच नसतील. आपल्या ह्या आर्यमाउलीची दशा यवनांनीं काय बरें केली होती ? यवनांनीं तिचें सर्वस्व हरण केल्यानें तिचीं पंचवीस कोटी पोरें तिला कशीं यमासारखीं तोडीत आहेत हें आपण पहात आहों. त्याअर्थीं अशा प्रसंगीं राज्य करणें ह्मणजे महादुर्घट काम आहे. परंतु तें काम आपले प्रस्तुतचे राज्यकर्ते किती दक्षतेनें करीत आहेत हें आपण समक्ष पाहतों आहों व प्रजेस सुख व्हावें या हेतूनें हा व्यवसाय चालविला आहे ह्मणून ते सांगतात. जरी खरोखर सुख होण्याला विघ्नें येतात, तथापि यत्न सुरू आहे व हिमालयापासून सेतुबंध रामेश्वरा-पर्यंत एकच्छत्र पृथ्वी होऊन तिच्या राज्यभाराचें अजस्र यंत्र कसें सुरळीत चाललें आहे ? पण हें यंत्र चालविणारे जे आपले प्रस्तुतचे राज्यकर्ते त्यांना विश्रांति नको काय ? विश्रांति पाहिजे, ह्मणून प्रत्यक्ष कालिदासाचें वचन आहे. 'विक्रमोर्वशी' नाटकांत वैतालिक पुरूरवा राजास ह्मण-तात कीं:—

"आलोकान्तप्रतिहततमोवृत्तिरासां प्रजानां
तुल्योद्योगस्तव च सवितुश्चाधिकारो मतो नः ।
तिष्ठत्येकः क्षणमधिपतिर्ज्योतिषां व्योममध्ये

प्रे काले त्वमपि लभसे देव विश्रान्तिमन्हः ॥"
याचा अर्थ 'ज्ञानसंग्रहां'त असा केला आहे:—
"राजाचा अधिकार आणि रविचा हे तुल्य आह्मां गमे
तेजानें निज हारितां उभयही तुह्मी प्रजांचीं तमें ।
तारांचा पति अंबरीं क्षणभरी विश्रांतिला घेतसे
विश्रांति प्रभुलाहि नित्य दुसऱ्या यामीं दिनाच्या असे ॥"
या श्लोकांत राजाची व रवीची तुलना केली आहे. व रवि जसा दोन प्रहरीं संतप्त झाल्यावर आकाशाच्या मधोमध येऊन विसांवा घेतो तसा राजालाही घ्यावा लागतो. याप्रमाणें राज्यभारानें श्रमी झालेले आपले राजेही उष्ण काळामध्यें विसांवा घेतात, व अर्थात् जसे श्रम दुर्घट तसें विश्रामाकरितां स्थानही उत्तम पाहिजे. नाहीं तर श्रमपरिहार व्हावा कसा ? एवढ्याकरितां महाबळेश्वरासारख्या ठिकाणांची योजना हिंदुस्थानांतील बहुतेक प्रांतांत केली आहे. मुंबई इलाख्यांत महाबळेश्वर आहे त्याप्रमाणें मद्रासेंत नीळगिरी, बंगाल्यांत दार्जिलिंग, वायव्य प्रांतांत नैनिताळ, पंजाबांत सिमला, वऱ्हाडांत चिखलदरा, मध्यप्रदेशांत पंचमढी, व रजपूतस्थानांत अबूचा पहाड हीं स्थळें आहेत. हीं सर्व पुरेनाशीं होतात तेव्हां इंग्लिशलोक काश्मिरांत जातात. काश्मिरासारखें रमणीय स्थल जगतांत नाहीं. फारशी भाषेंत ह्मण आहे कीं, "काश्मीर नजीर जिन्नतस्त" ह्मणजे काश्मीर स्वर्गाची प्रतिमा आहे; व याकरितां लार्ड हार्डिंग् साहेबांनीं काश्मीर हातचें जाऊं दिलें ह्मणून इंग्लिशलोक त्यांना दोष लावीत असतात. सारांश, अशा ठिकाणीं इंग्लिश लोक राज्यभाराचे परिश्रम शमन करण्यासच जात असावे हें ह्मणणें सयुक्तिक दिसतें.

दुसरें, स्वदेश सोडून परदेशवास करणें कोणास प्रिय आहे ? परंतु राजसत्तेस्तव करावा लागतो, व अशा अवस्थेंत विशी एकूनविशी स्वदेशाचें सुख महाबळेश्वर वगैरे ठिकाणीं साहेबलोकांस मिळतें. कारण, तेथील सर्व तऱ्हा विलायती असते. थंड हवा, धुकें, पाऊस, एवढींच विलायतेचीं चिन्हें असतात इतकेंच नाहीं; तर, सर्व स्थल विलायतमय असतें. यास प्रत्यंतर महाबळेश्वरचेंच घ्यावें. तेथें वस्तीचें नांव 'माल्कम्‌पेठ' आहे व प्रत्येक बंगल्याचें नांवही इंग्रजी असून सभोंवतालचीं जीं रमणीय ठिकाणें आहेत त्यांचीं जुनीं नांवें टाकून देऊन त्याऐवजीं साहेब लोकांनीं आपलीं नांवें दिलीं आहेत. एल्फिन्स्टन् साहेबांनीं 'पांगळा' हें जुनें नांव काढून, एल्फिन्स्टन् पोंइंटास आपलें नांव दिलें आहे. सिडनी पोंइंटाचें जुनें नांव 'डोमेश्वर' आहे. आर्थर सीटचें नांव 'मढीमहाल' आहे. मुंबईचे माजी गव्हर्नरांवरून कार्न्याक् पोंइंट्, फॉकूलंड् पोंइंट् हीं नांवें पडलीं आहेत. माल्कम् साहेबांच्या दोन मुलींवरून 'केट्‌ पोंइंट्' व 'अमेलिया खोरा' हीं नांवें देण्यांत आलीं. अलिक्झेंडर फ्रियर साहेबावरून 'फ्रियर होल्' व 'फ्रियर घांट' हीं नांवें पडलीं. व 'रडतोंडीचा घांट' या शब्दाचा अपभ्रंश होऊन 'रोटंडा घांट' असें लाटिन नांव देण्यांत आलें आहे. लहान लहान प्रतीचे साहेबलोक बंगल्याला आपलीं स्वतःचीं नांवें किंवा विलायतेंतील खुबीदार नांवें देतात. जसें:—'ईगल्स् नेस्ट्,' 'वुड् लॉन्,' 'हिल्स्टोन्,' 'ग्लेन्मोर्,' 'आल्बानिया,' 'फोर् ओक्स्,' 'लिलि-कॉटेज्,' 'रोज् कॉटेज्,' 'बिली व्ह्यू,' 'सिड्नी-हौस्' वगैरे. असाच प्रकार इतर ठिकाणीं होत चालला

आहे. याठिकाणीं साहेबलोकांना अगदीं स्वदेशीं असल्याप्रमाणें वाटतें. ही गोष्ट नीळगिरीविषयीं एका साहेबानें खालीं मजकूर लिहिला आहे त्यावरून वाचकांचे लक्षांत येईल.–

"You enter Coonoor, a charming European town. Here the scenery resembles Dorking in Surrey; much grander and more romantic. You find comfortable houses, built in the style of English houses, with their chimney tops peeping from every height through every glen. A very pretty place indeed. The whole place abounds with ferns of all kinds and some grow into great trees. It is simply lovely. The climate here is delighfully temperate all throughout the year. There are some very comfortable hotels here kept by European proprietors, and the rides and walks are very grand. You leave this and go higher. The scenery changes at every step. From dense forests you come out into more open heights. The scenery begins to resemble your own Devon—perfect verdure! Living green! You travel as it were on the tops of undulating hills, with shoals and forests in the valleys. About 16 miles from Coonoor you come to Oottey. I have heard that here the country resembles Switzerland. After visiting various places in the neighbourhood, I became so enamoured with the climate and the country that I purchased a large estate. In position, soil, climate, water and other advantages it is almost unrivalled." [Journal of the National Indian Association, August 1875].

महाबळेश्वर पाहूनही असेच उद्गार साहेबलोकांच्या मुखां-

तून निघतात;--" Under the leafy screen of many of the rides, the Anglo-Indian Exile ( if not a botanist ) might for a few moments dream that he were cantering through a Devonshire lane or sauntering on the banks of Bruar Water—after Burn's " Humble Petition had clothed those banks with umbrageous shelter. " ( Handbook of Hindustan. p. 190. )

यास्तव राज्यश्रमपरिहारार्थ व स्वदेशत्यागाचें दुःख कमी व्हावें ह्मणून साहेबलोक डोंगरावर जातात; ऐषआराम करून राज्य घालविण्याकरितां जात नाहींत. इंग्लिशलोक राज्यबुडवे नव्हत. वर अलाहाबाद येथील पत्रांत कुकल्पना आहेत तशा लोकांचे मनांत येऊं नयेत ह्मणून विषयांतर करून इतकें लांबलचक लिहिलें आहे.

आतां महाबळेश्वरीं गेल्यानें देशहित काय होतें याचा विचार करूं. देशहितामध्यें राज्यविषयक हित मुख्य होय. जे लोक स्वदेशांत स्वराज्य कायम राखून स्वातंत्र्य भोगितात व स्वधर्म रक्षण करून विद्या, कलाकौशल्य व व्यापार यांची वृद्धि करितात तेच लोक जगतामध्यें मान्य व पूज्य होत. स्वदेशाखेरीज परदेश काबीज करून कीर्ति मिळविणें हें तर फारच मोठें कृत्य आहे. परंतु ज्या लोकांना स्वदेशांत स्वातंत्र्य नसतें व ज्यांजकडून स्वधर्मरक्षण होत नाहीं त्यांना कितीही सुख मिळालें तरी इहलोकीं एकप्रकारें अस्तित्व नसतें. रामदासस्वामींनीं 'दासबोधां'त लिहिलें आहे कीं, " स्वदेशीं भोगी विपत्ति, तो एक मूर्ख. " या कारणास्तव स्वराज्य व स्वधर्म रक्षण करणारे किंवा त्यांची हानि झाल्यास पुनः संस्थापना करणारे जे पुरुष ते सर्वत्र वंद्य असतात. त्यांचीं

चरित्रें इतिहासांतरीं गाइलीं जातात व त्यांणीं ज्या ठिकाणीं पराक्रम केले तीं स्थानें सर्वदा पूज्य मानलीं जातात. आपल्या महाराष्ट्र लोकांच्या स्वातंत्र्याचा यवनांनीं ऱ्हास करून धर्म-छळ व स्त्रीजनांची हेळणा मांडली असतां, महाराजाधिराज **शिवाजी** महाराज यांणीं यवनांचें पारिपत्य करून स्वराज्य स्थापन केलें व आर्यधर्म उदयास आणून दिगंतरीं मराठ्यांचें नांव प्रसिद्धीस आणलें. या कारणास्तव ज्या ज्या ठिकाणीं महाराजांनीं शत्रूंचें शासन केलें किंवा स्वातंत्र्याविषयीं उपक्रम चालविला, किंवा धर्मकृत्यें केलीं, तीं तीं स्थानें आपणास पूज्य आहेत. कारण, तीं स्थानें राजक्षेत्रें होत, व धर्मक्षे-त्रांचे दर्शनापासून जसें पारमार्थिक फल प्राप्त होतें, तसें या राजक्षेत्रांचे दर्शनेंकरून तद्विषयक फल प्राप्त होतें; ह्मणजे स्वदेशाभिमान, स्वधर्मश्रद्धा व स्वबंधुजनप्रीति इत्यादि जे अमोलिक गुण आपणामध्यें मुळींच नाहींत किंवा फारच कमी आहेत त्यांचें बीजारोपण व प्रसार होऊन हल्लींच्या निकृष्टावस्थेमध्यें एक प्रकारचा अतिशय हितावह संस्कार मनावर होतो. विशेषेंकरून महाबळेश्वरीं हा संस्कार दृढ रूपानें होण्यास कारणें फार आहेत:—

एक तर, हें ठिकाण मराठ्यांच्या स्वातंत्र्याचें माहेरघर होतें असें ह्मटलें पाहिजे. बऱ्या वाईटानें या ठिकाणीं मरा-ठ्यांची सत्ता फार दिवस राहिली. मुळापासून शिरके, मोरे, भोंसले हे या ठिकाणीं राज्य करीत आले. हीं तीन घराणीं मराठ्यांचींच असतां त्यांनीं आपसांत एकमेकांचें पारिपत्य केलें ही गोष्ट वाईट झाली, हें तर खचित आहे; कारण अशाच प्रकारानें मुसलमानांच्या राज्यास बळकटी

येऊन तें पुष्कळ दिवस टिकलें; तथापि कोंकणघाटमाथा यवनांचे हातीं सर्वैयैव न जातां मराठ्यांच्या हातीं राहिला ही गोष्ट लहानसान महत्त्वाची नव्हे.

दुसरें, **शिवाजी**महाराजांनीं स्वराज्याचा पाया मूळ महाबळेश्वरीं घातला असें ह्मटलें पाहिजे. कारण, [१] विजापूरवाल्यांशीं स्पर्धा करून त्यांचा सेनाधिपति **अफझुलखान** याचा वध या ठिकाणीं झाला. हें कांहीं कृत्य साधारण नव्हतें; व जरी पुढें आपलें वर्चस्व व्हावें ह्मणून विजापूरवाल्यांनीं भगीरथप्रयत्न केले, तरी ते निष्फळ होऊन या वेळापासून **शिवाजी**महाराजांचा उत्कर्षच होत गेला. मध्यंतरीं बारा किल्ले शिवाय करून **औरंगजेबास** सर्व मुलुख द्यावा लागला व महाराज दिल्लीस गेले असतां औरंगजेबानें त्यास कांहीं महिने कैदेंतही ठेविलें, तथापि महाराज परत आल्यावर त्यांचे प्राबल्य पूर्वीपेक्षां वृद्धिंगत होत गेलें, व औरंगजेबासारख्या प्रतापी योद्धयानें मराठे वश व्हावे ह्मणून पराकाष्ठा केली व शेवटीं या कामीं जीवही खर्ची घातला, तथापि अफझुलखानाच्या वधापासून यवनाचें मिळून वर्चस्व महाराजांवर झालें नाहीं. मरतेवेळीं औरंगजेबाचे मुखांतून असे उद्गार निघाले कीं:—“शिवाजी मोठा शूर योद्धा होता व नवीन राज्य स्थापन करण्याचें श्रेय फक्त त्याणेंच मिळविलें. मी तर हिंदुस्थानांतील पुरातन राज्यें नाहींशीं करण्याविषयीं प्रयत्न केला व माझ्या फौजा एकुणीस वर्षेंपावेतों शिवाजीशीं लढत होत्या तथापि त्याचें राज्य सदोदित वृद्धिंगतच होत गेलें.” औरंगजेब मेल्यावर तर महाराष्ट्रांत

१ स्कॉट् वेरिंग् साहेबाचा इतिहास. ( १८१० ) पृष्ठ ९०.

निर्यवन पृथ्वी झाली व इंग्लिशांचें मान चढेपर्यंत उत्तरोत्तर मराठे मुसलमानांस डोईजड होत गेले. या सर्व कारणांस्तव प्रतापगडची लढाई हा मराठ्यांच्या राज्यसत्तेचा मूळ पाया समजला पाहिजे, व याच कारणास्तव महाबळेश्वर व प्रतापगड आपणा महाराष्ट्रनिवाश्यांस मोठीं राजक्षेत्रें होत. आतां धर्मछळ, स्त्रीहेळणा इत्यादि जुलमांच्या योगानें मुसलमानांनीं हिंदूंस किती ग्रस्त व जर्जर केलें होतें हें सांगणें नको. मुसलमानांच्या परमावधि जुलमाविषयींचीं प्रमाणें इंग्रजी पुस्तकांत शेंकडों सांपडतात तीं सर्वांस विदित आहेतच. परंतु संस्कृत व प्राकृत ग्रंथांमध्येंही प्रमाणें नाहींत असें नाहीं. 'विश्वगुणादर्श' काव्यांत याविषयीं एक उत्तम श्लोक आहेः—

"अवनावतीतपवनाश्वशोभिनो
भवनागशायिभवनाभिमर्दिनः ।
सवनादिकर्मलवनाय दीक्षिता
यवनाश्चरन्ति भुवनाविभीषणाः ॥"

याचा अर्थ—"वायूपेक्षांही अधिक त्वरित गति आहे ज्यांची अशा अश्वांनीं शोभायमान, आणि शंकर व विष्णु यांचीं भवनें अर्थात् देवालयें यांस जमीनदोस्त करणारे, तसेच यज्ञयागादिक कृत्यें जीं त्यांच्या उच्छेदाच्या कामाकरितां दीक्षाच घेतली आहे ज्यांनीं असे जे यवन ते भुवनाला भयप्रद असे होत्साते भारतवर्षीय पृथ्वीवर फिरत आहेत." 'विश्वगुणादर्शा'चा कर्ता कोणत्या काळीं झाला हें माहित नाहीं. परंतु तो ग्रंथ फार जुना असावा असें वाटतें. 'स्त्रियांनीं सहस्र अपराध केले तरी त्यांना फुलांनीं देखील मारूं नये' असें मनु ह्मणतो; त्या आपल्या स्त्रियांची दशा मुसलमानांच्या सहवासानें व जुलमानें अशी झाली कीं, त्यांस आपण को-

डून ठेवून दास्यत्वाप्रत आणलें, इतकेंच नाहीं तर मुलींना शत्रुवत् समजून जन्मतः कित्येक हिंदु लोक ठार मारूं लागले, व अद्यापि मारताहेत आणि अद्यापपावेतों देखील आपल्यापैकीं अशिक्षितांच्या मनांत मुलींविषयीं जो कंटाळा बिंबला आहे तो समूळ जात नाहीं. या विषयावर एक श्लोक आहे तो सर्वत्र प्रसिद्ध आहे:—

"संभवे स्वजनदुःखकारिका संप्रदानसमयेऽर्थहारिका ।
यौवनेऽपि बहुदोषकारिका दारिका हृदयदारिका पितुः ॥"

अर्थ.—"कन्या कशी आहे, तर जन्मसमयीं स्वजनांला ह्मणजे आई इत्यादिकांस दुःख देणारी, व संप्रदानसमयीं ह्मणजे विवाहकाळीं द्रव्य हरण करणारी, आणि यौवनकाळीं बिघडण्याची भीति घालणारी; सारांश 'दारिका' हें जें नांव कन्येस दिलें आहे तें यथार्थ आहे, कारण, ती पित्याची 'हृदयदारिका' ह्मणजे दुःखानें हृदय विदारण करणारी होय, यांत शंका नाहीं."

परंतु यवनांच्या धर्मछळाविषयीं शिवाजीमहाराजांस रामदास स्वामींनीं पत्र पाठविलें आहे त्यांत लिहिलें आहे कीं:—

"तीर्थें क्षेत्रें तीं मोडिलीं । ब्राह्मणस्थानें बिघाडिलीं ।
सकळ पृथ्वी आंदोळिली । धर्म गेला. ॥ "

या ओवींत रामदासस्वामींनीं शिवाजीमहाराजांच्या वेळची स्थिति वर्णन केली आहे.

याप्रमाणें मुसलमानांच्या हातून क्रूरपणाचीं शेंकडों कृत्यें झालीं तीं मराठ्यांच्या मनांत रात्रंदिवस जळत असत. तथापि शिवाजीमहाराजांचें अंतःकरण किती दयाभूत व न्यायी असे हें त्यांचे शत्रु देखील कबूल करितात. यास प्रमाण असें

आहे कीं, शिवाजी महाराजांचा हाडवैरी जो औरंगजेब त्याचे पदरीं जो बुंदेला सरदार असे, त्याणें शिवाजीमहाराजांचें चरित्र लिहून ठेविलें आहे हें वर सांगितलें आहे. आतां विरुद्ध पक्षाकडील मनुष्यानें हें चरित्र लिहिलें असल्यामुळें त्यांत पक्षपात असेल ही शंका नको व याचमुळें वेरिंग् साहेबांनीं आपले ग्रंथांतील शिवाजीमहाराजांचा वृत्तांत या चरित्रांतून घेतला आहे. ह्या बुंदेल्या सरदारानें महाराजांचे स्वभावाचें असें वर्णन दिलें आहे कीं, " शिवाजीच्या बरोबरीचा योद्धा कोणी झाला नाहीं. राज्यकारभारांत तो चतुर असे. तसेंच सद्गुणी व धर्मनिष्ठ मनुष्यांचा तो परम मित्र असे. त्याणें जे बेत करावे त्यांची योजना तो शहाणपणानें करी व निश्चयानें ते तडीस नेई."

महाराजांनीं यवनांच्या स्त्रियांस कधींही बोट लाविलें नाहीं व तसेंच यवनांचा जीवही कदापि विनाकारण घेत नसत. कल्याणचे लढाईंत एक सुंदर यवनी सांपडली असतां तिला महाराजांनीं भ्रताराकडे परत पाठविली ही दंतकथा सर्वांचे लक्षांत असेलच. तसेंच लढाई झाल्यावर शरणागत शत्रूस दुःख न देतां स्वपक्षाच्या लोकांप्रमाणें त्यांचा समाचार घेणें ही गोष्ट हिंदुस्थानांतील पूर्वींच्या राजे लोकांमध्यें शिवाजी-महाराजांच्या हातूनच घडली. मुसलमानांमध्यें असे पुरुष विरळाच आढळतात.

परंतु राज्यप्राप्तीविषयीं झटणारे शिवाजीमहाराजांसारखे जे योद्धे त्यांच्याच मनामध्यें केवळ यवनांविषयीं द्वेषभाव उत्पन्न झाला होता असें नाहीं. रामदासस्वामी व तुकाराम

---

१ स्काट् वेरिंग साहेबाचा इतिहास, पुरवणी, पृष्ठ २०६.

बावा यांच्या सारखे उदासीन व निस्पृही जे साधु त्यांना देखील यवनांपासून अतिशय ताप झाला होता; व धर्मस्थापना करावी आणि अनाथांचें रक्षण करावें हेंच त्यांचें सदोदित महाराजांस सांगणें असे. वर जें पत्र सांगितलें त्यांत रामदासस्वामीनीं महाराजांस लिहिलें आहे तें वाचकांचे लक्षांत असेलच:—

"या भूमंडळाचे ठायीं। धर्म रक्षी ऐसा नाहीं।
महाराष्ट्रधर्म राहिला कांहीं। तुह्मांकरितां॥
सर्वज्ञ मंडळी धर्ममूर्ति। सांगणें काय तुह्मांप्रती।
धर्मस्थापनेची कीर्ती। संभाळिली पाहिजे॥"

तसेंच तुकारामबावास एके समयीं महाराजांनीं भेटीचा लाभ द्यावा ह्मणून प्रार्थना केली असतां, "भेटीचें कारण नाहीं, यवनांनीं पीडित जे अनाथ त्यांचें आपण संरक्षण केलें ह्मणजे आह्मीं समाधान पावलों" असें बावांनीं एका ओवीबद्ध पत्रांत महाराजांस लिहिलें आहे:—

"सांगणें नलगे, सर्वज्ञ तूं राजा।
अनाथांच्या काजा, साह्य होसी॥
हेंचि ऐकुनीया, पावें समाधान।
आतां या दर्शना, काज नाहीं॥"

मनुष्यमात्राला स्वधर्म ह्मणून जी कांहीं वस्तु आहे ती अनुपम आहे. तिच्यांत आडकाठी घालणें ह्मणजे अमर आत्म्याच्या शाश्वत सुखाची हानि करणें होय. तसेंच आई, बायको, वहिणी, मुली इत्यादि जे प्रियजन व ज्या नामेंकरून आणि स्वभावतः अबला आहेत त्यांची हेळणा शत्रूंनीं आपल्या नेत्रांसमोर करणें यासारखी दुःसह गोष्ट दुसरी नाहीं.

आतां महाबळेश्वर येथील राजक्षेत्राचें माहात्म्य केवळ प्रतापगडची लढाई व शिवाजी महाराजांचीं चरित्रें यांच्याच योगानें आहे असें नाहीं. परंतु महाराजांचे गुरु, परम साधु जे रामदासस्वामी तेही या ठिकाणीं महाराजांस सदुपदेश करण्यास वारंवार येत असत. तेणेंकरूनही हें क्षेत्र पवित्र झालें आहे. शिवाय, रामदासस्वामींनीं महाबळेश्वरीं अल्प-काळपर्यंत तपश्चर्या केली व आपलें स्मारक असें एक कृत्य म्हणजे मारुतीचें देवालय बांधलें आहे तें अद्यापि कायम आहे. स्वामींना भाविक लोक मारुतीचा अवतार समजत असत; व ज्या ज्या ठिकाणीं आपलें स्मरण रहावें असें त्यांस वाटलें तेथें त्यांणीं मारुतीची स्थापना केली आहे. याप्रमाणें एकंदर ११ मारुतींचीं स्थानें आहेत, त्यांपैकींच महाबळेश्वरचें देवालय होय. रामदासस्वामी हे केवळ महाराजाचे मोक्षगुरूच होते असें नाहीं, तर राजगुरुही होते व राजगुरु या नात्यानें त्यांणीं जे आपल्यांवर उपकार केले आहेत त्यांना सीमा नाहीं.

शिवाजीमहाराजांमध्यें स्वातंत्र्येच्छा व स्वदेशाभिमान हे गुण मोठे होते यांत शंकाच नाहीं. परंतु त्या गुणांप्रमाणें त्यांच्या हातून कृति होण्यास दोन पुरुष मुख्य कारण झाले. एक **दादाजी कोंडदेव** व दुसरे **रामदासस्वामी**. हे उभयतां सज्जन व ब्राह्मण असत. यामुळें राज्यप्रकरणाचे कामांत त्या उभयतांच्या उपदेशानें महाराजांस इतकें उत्तेजन व स्फुरण येई कीं, तेणेंकरून महान् महान् संकटांस न भीतां व कधीं निराश न होतां आपले सर्व प्रयत्न त्यांणीं सिद्धीस न्यावे. दादाजी कोंडदेव हा महाराजांचा लहानपणाचा राजगुरु होय. त्याणें मरतेसमयीं महाराजांस काय सांगितलें

हे सर्वांस माहीत आहेच. त्याचे पाठीमागें महाराज कैला-सवासी होईपर्यंत राज्यसाधनाचे कामांत त्यास पूर्ण उपदेश रामदासस्वामीचा असे. स्वामी हे केवळ टाळकुटे साधु किंवा इहलोकीं स्वार्थास निंद्य समजणारे नसत. "जनीं वंद्य तें सर्व भावें करावें" असें त्यांणीं 'मनाचे श्लोकांत मूळा-रंभींच ह्मटलें आहे व तदनुसार सदैव त्यांचें सांगणें शिवाजी-महाराजांस असे. स्वामी हे महाराजांच्या उदयास किती कारण झाले याविषयीं कोठें फारसें लिहिलेलें आढळत नाहीं. यास्तव स्वामींच्या चरित्रांतून याविषयीं माहिती मिळते ती एथें घेतों:—

रामदासस्वामी हे शके १५३० किलक नाम संवत्सरीं चैत्र शुद्ध ९ स जन्मले. ते मूळचे गोदातीरीं जांब एथील रहाणारे होत. तथापि आयुष्याचा बहुतेक काळ त्यांनीं कृ-ष्णातीरीं राहून मराठ्यांच्या ऐहिक व पारलौकिक कल्याणांत घालविला. आपल्या लोकांत अशी दंतकथा आहे कीं स्वा-मींनीं याच कारणाकरितां अवतार धारण केला होता, व हें भविष्य प्रथमतः एकनाथस्वामींनीं केलें. एके समयीं रा-मदासस्वामी लहान असतां त्यांचे तीर्थरूपांनीं त्यांस एक-नाथस्वामींचे दर्शनास नेलें. तेव्हां एकनाथस्वामींनीं सांगितलें कीं, "ह्रा परमसमर्थ, कृष्णातीरीं राहून जगद्विख्यात होऊन जगउद्धार करील." पुढें स्वामींनीं नाशकास जाऊन पंच-वटीमध्यें तपश्चर्या केली, त्या वेळी त्यांस श्रीरामांनीं आज्ञा केली ती स्वामींचे चरित्रांत येणेंप्रमाणें लिहिली आहे:—

---

१ रा० स्वा० बखर. पृष्ट १२.

"तुह्मीं श्रीकृष्णातीरीं जावें आणि तेथें श्रीसांभजीच्या वरें-करून शके १५४९ वैशाख शुद्ध ३ चे दिवशीं शिवाजी-राजा जन्मला आहे त्यास तुह्मीं साह्य होऊन त्याचे हातून पृथ्वीला भारभूत झालेल्या म्लेंच्छांचा उच्छेद करून धर्म-स्थापनापूर्वक उपासनामार्ग प्रवृत्त करून जगदुद्धार करावा." हें भक्तिभावानें लिहिलें आहे. यावर कोणाचा विश्वास बसो अगर न बसो. परंतु ही गोष्ट खचित आहे कीं पुढें पुष्कळ देश पर्यटण करून शके १५५६ सालीं स्वामी कृष्णातीरीं महाबळेश्वरीं आले व चाफळास राहून तेथें रामाच्या मूर्ति स्थापन केल्या आणि जे शरण येत त्यांस अनुग्रह प्रसाद देत असत. चाफळ संस्थानांत एकंदर दहा गांव व कांहीं इनाम जमिनी आहेत.[1] हीं सर्व गांवें पुढें शिवाजीमहाराजांनीं संस्थानाच्या खर्चाकरितां जहागीर दिलीं, तीं अद्यापि चालत आहेत. जहागिरीचें उत्पन्न सालिना रुपये १४,५२२ आहे. चाफळास असतां स्वामींनीं महाराजांस पत्र पाठविलें तें व स्वामींची कीर्ति ऐकून महाराजांचे मनांत त्यांचें दर्शन घेण्याविषयीं कशी उत्कंठा उत्पन्न झाली, व शके १२७१ सालीं त्यांनीं स्वामीचा मंत्रोपदेश घेतला, हा सर्व मजकूर मागें 'इतिहासप्रकरणां'त आला आहे. शके १५७२ त महाराजांनीं अत्याग्रह केला व विनंति केली कीं, 'मला आपल्या दर्शनाचा लाभ वारंवार व्हावा ह्मणून राय-गड अथवा प्रतापगड किंवा परळीच्या किल्ल्यावर रहावें.' तेव्हां स्वामी परळीवर राहण्यास गेले, ह्मणून त्या किल्ल्याचें

---

१ रा० स्वा० बखर. पृष्ठ १३.

२ रा० स्वा० बखर. पृष्ठ ७०.

नांव महाराजांनीं 'सज्जनगड' असें ठेविलें. पुढें आमरणपर्यंत स्वामींनीं बहुतेक काळ येथेंच घालविला. कोणे एके समयीं स्वामी परळीस असतां महाराज दर्शनास आले आणि प्रार्थना केली कीं, 'मजपासून कांहीं सेवा घ्यावी.' तेव्हां स्वामींनीं उत्तर केलें कीं, "आह्मास उपाधीचें कारण नाहीं. तूं राज्यकारभार चालवून प्रजा पालन करितोस हीच आमची सेवा आहे." नंतर स्वामी रामेश्वरास जात असतां चंदावर येथें व्यंकोजी महाराजास भेटले आणि परळीस परत आल्यावर महाराज दर्शनास गेले तेव्हां त्यांनीं प्रार्थना केली कीं, "परळी संस्थानाच्या उत्साहाच्या खर्चाविषयीं मला आज्ञा व्हावी." हें ऐकिलें न ऐकिलेंसें केलें असतां पुनः महाराज दंडवत करून स्वामीपुढें उभे राहिले. तेव्हां स्वामींनीं सांगितलें कीं, "तूं जें करीत आहेस तीं सर्व सेवाच आहे, तत्रापि तूं ह्मणतोस तर आह्मीं जें मागतो तें द्यावें. शिववा, हल्लीं यवनी राज्य नसतां परस्पर 'जोहार' ह्मणण्याचा परिपाठ आहे, हें ठीक नाहीं. तर इतःपर सर्वत्रांनीं एकमेकांस 'रामराम' ह्मणत जावें." त्या दिवसापासून 'रामराम' ह्मणण्याची प्रवृत्ति सुरू झाली, ती जोंपर्यंत मराठ्यांत मराठेपणा आहे तोंपर्यंत जाणार नाहीं.

मराठ्यांचे झेंडे भगवे असत त्याचें कारण असें आहे कीं, "कोणे एके दिवशीं महाराज साताराचे किल्ल्यावर आहेत त्या संधीस स्वामी माहुलीकडून येऊन करंजास भि-

---

१ रा० स्वा० बखर. पृष्ठ ७९.

२ रा० स्वा० बखर. पृष्ठ १०९.

३ रा० स्वा० बखर. पृष्ठ १०९.

क्षा मागून माचीस आले; आणि तेथें भिक्षा करीत असतां शिवाजीमहाराज किल्ल्यावरून खालीं राजवाड्यांत आले तों स्वामीही अकस्मात् राजवाड्यांत भिक्षेस आले. हें शिवाजीनें ऐकतांच बाहेर येऊन दंडवत केला आणि बाळाजी आवजी यांचे हातें चिठ्ठी लिहून तिजवर आपले हातची धाकटी मुद्रा करून ती चिठ्ठी स्वामीच्या झोळींत टाकली. हें पाहून स्वामींनीं विचारलें कीं, "शिवबा, झोळींत काय टाकलें ?" "महाराज, भिक्षा घातली," असें शिवाजीनें सांगतांच, "उद्धवा, चिठ्ठी वाच," ह्मणून समर्थांची आज्ञा होतांच, उद्धवानें चिठ्ठी वाचली. त्यांतील भाव "आजपर्यंत मिळविलें तें सर्व स्वामीस अर्पण असो." "असें करणें ठीक नाहीं" ह्मणून स्वामींनीं पुष्कळ उपदेश केला आणि सांगितलें कीं, "शिवबा, ब्राह्मणानें तपश्चर्या करावी आणि राजानें राज्य करून त्याचें संरक्षण करावें हा मुख्य धर्म आहे." परंतु महाराज ऐकेनात. तेव्हां स्वामी बोलले कीं, "बरें आहे. आतां तूं मला राज्य अर्पण केल्यामुळें हें राज्य माझें झालें खरें, परंतु तपश्चर्या सोडून मला राज्य करावयाचें नाहीं. आणि शिष्यही गुरूचाच पुत्र आहे. यास्तव तूं माझ्या राज्याचें संरक्षण करून प्रजेचें पालन करावें." नंतर महाराजांनीं स्वामींच्या पादुका मागून नेल्या आणि राज्य स्वामीचें ह्मणून स्वामींच्या छाट्यांप्रमाणें झेंडे सर्व भगवे केले. ते अखेरपर्यंत तसेच होते.[१]

भवानी या नांवाची शिवाजी महाराजांची प्रख्यात तरवार असे. तिजविषयीं अशी कथा आहे कीं, "महाराज एके

१ रा० स्वा० बखर. पृष्ठ १२१.

समयीं परळीस गेले असतां वेदांताच्या गोष्टी निघाल्या. तेव्हां स्वामींनीं सांगितलें कीं, 'मनुष्य जन्मास येण्याचें कारण वासना होय. ती नाहींशी झाल्याखेरीज आत्म्याला मोक्षपद प्राप्त होणार नाहीं.' हें ऐकतांच महाराज बोलले कीं, 'वासना कोणतेही ऐहिक विषयाचे ठायीं नाहीं, परंतु एका हत्याराचे ठायीं मात्र आहे. हेही पायांजवळ ठेवितों.' असें ह्मणून भवानी तरवार त्यांचेपुढें ठेविली व परत गेले. ही तरवार कांहीं दिवस स्वामींचे मठांत होती. पुढें परळीस गर्दी झाली, ते वेळीं स्वामींच्या शिष्यांनीं कोल्हापुरचे पाटलास दिली. हें वर्तमान पुढें शाहू महाराजांस कळतांच त्यांणीं ती तरवार आणून आपल्याजवळ ठेविली. ती अद्यापि सातारकरांचे घरीं आहे. स्वामींच्या मनांत महाराजांविषयीं किती प्रीतिभाव असे हें समजण्यास मोठें प्रमाण असें आहे कीं, रामदासस्वामींनीं आपला प्रसिद्ध ग्रंथ जो 'दासबोध' त्यांत शिवाजीमहाराजांचें वर्णन केलें आहे, व त्या वर्णनास 'उत्तमपुरुषवर्णन' असें नांव दिलें आहे. याविषयीं स्वामींचे चरित्रांत अशी हकीकत दिली आहे कीं, "कोणी एके समयीं समर्थ रामदासस्वामी ग्रंथ लिहित बसले आहेत. ते समयीं महाराज छत्रपति स्वामीदर्शनास येऊन साष्टांग दंडवत प्रणाम करून हात जोडून उभे राहिले. त्या समयीं अठराव्या दशकाच्या पांचव्या समासाची समाप्ति होऊन सहाव्या समासास आरंभ होता. तों शिवाजीमहाराजांस पुढें उभे पाहून राजश्रीची रीत, गुण, औदार्य व सामर्थ्य समर्थांनीं मनांत आणून चालत्या ग्रंथासंलग्न त्यांचें वर्णन करून तो

समास सगात केला आणि 'उत्तमपुरुषवर्णन' ह्मणून त्या समासाचें नांव ठेविलें.[१]"

या समासांत स्वामींनीं शिवाजीमहाराजांस उपदेश केला आहे. तो येणेंप्रमाणें:—

"अति सर्वत्र वर्जावें । प्रसंग पाहोनी चालावें ।
हट्टनिग्रहीं न पडावें । विवेकी पुरुषें ॥ ७ ॥
बहूतचि करितां हट्ट । तेथें येवोनि पडले तट ।
कोणीं एकाचा शेवट । झाला पाहिजे ॥ ८ ॥
बरें ईश्वर आहे साभिमानी । विशेष तुळजाभवानी ।
परंतु विचार पाहोनी । कार्य करणें ॥ ९ ॥
अखंडचि सावधाना । बहूत काय करावी सूचना ।
परंतु कांहीं एक अनुमाना । आणलें पाहिजे ॥ १० ॥
समर्थापाशीं बहूत जन । राहिले पाहिजे साभिमान ।
निश्चळ करोनियां मन । लोक असती ॥ ११ ॥
म्लेंच्छ दुर्जन उदंड । बहूतां दिवसांचें माजलें बंड ।
या कारणें अखंड । सावधान असावें ॥ १२ ॥
सकळ कर्ता तो ईश्वरू । तेणें केला अंगिकारू ।
तया पुरुषाचा विचारू । विरळा जाणें ॥ १३ ॥
न्याय नीति विवेक विचार । नाना प्रसंग प्रकार ।
परि क्षरणें परांतर । देणें ईश्वराचें ॥ १४ ॥
महायत्न सावधपणें । समयीं धारिष्ट धरणें ।
अद्भुतची कार्य करणें । देणें ईश्वराचें ॥ १५ ॥
यश कीर्ति प्रताप महिमा । उत्तम गुणासिं नाहीं सीमा ।
नाहीं दुसरी उपमा । देणें ईश्वराचें ॥ १६ ॥

१ रा० स्वा० बखर. पृष्ठ १४१.

देव ब्राह्मण आचार विचार। किती एक जनास आधार।
सदां घडे परोपकार। देणें ईश्वराचें ॥ १७ ॥
इहलोक परलोक पहाणें। अखंड सावधपणें रहाणें।
बहूत जनांचें साहणें। देणें ईश्वराचें ॥ १८ ॥
देवाचा कई पक्ष घेणें। ब्राह्मणांची चिंता करणें।
बहूत जनाशीं पाळणें। देणें ईश्वराचें ॥ १९ ॥
धर्मस्थापनेचे नर। ते ईश्वराचे अवतार।
झाले आहेत पुढें होणार। देणें ईश्वराचें ॥ २० ॥
उत्तम गुणाचा ग्राहक। तर्क तीक्ष्ण विवेक।
धर्मस्थापना पुण्यश्लोक। देणें ईश्वराचें ॥ २१ ॥
सकळ गुणांमध्यें सार। तजविजा विवेक विचार।
जेणें पावेल पैल पार। अत्र परत्रीं जो ॥ २२ ॥"

स्वामींचे चरित्रांत लिहिलें आहे कीं, एक वेळीं राजधर्म, क्षत्रधर्म यांचे व इमारती वगैरे कारखाने बांधण्याचे व बाग लावणें इत्यादिकांचे महाराजांनीं स्वामींस प्रश्न केले. त्याप्रमाणें स्वामींनीं वेगवेगळे ग्रंथ करून दिले.

शिवाजी महाराज कर्नाटकची स्वारी करून परत आल्यावर स्वामींचे आज्ञेवरून त्यांणीं रायगडीं शके १५९६ आनंद नाम संवत्सरीं ज्येष्ठ शुद्ध १३ मंदवारीं राज्याभिषेक करून घेतला व अष्टप्रधानादि नेमून त्यांसहवर्तमान स्वामींचे दर्शनास परळीस आले व एक महिनाभर त्यांचे जवळ वास केला. त्या समयीं सेवा घ्यावी ह्मणून प्रार्थना केली. तेव्हां स्वामी बोलले, "शिवबा, वारंवार सेवा घ्यावी असें जें ह्मणतोस हें काय? हें सर्व राज्य आमचेंच आहे, हें चालवितोस हीच आमची सेवा आ-

१ रा० स्वा० बखर. पृष्ठ १५५-६.

ह." स्वामी किती निरिच्छ असत हें यावरून कळून येईल. याच सुमारास महागाई पडून परळीस दर्शनास लोक फार येऊं लागले ह्मणून नेहेमींची धान्यसामुग्री पुरेनाशी झाली. तेव्हां स्वामींनीं 'मनाचे श्लोक' २०५ रचून शिष्यांजवळ कोंकणांत पाठविले आणि भिक्षा मागून तांदूळ आणविले. परंतु ही गोष्ट महाराजांस कळविली देखील नाहीं. पुढें किल्ल्यावरच्या कारकुनानें हकिकत कळविली. तेव्हां महाराजांनीं पराकाष्ठा केली, पण स्वामी धान्यसामुग्रीविषयीं आज्ञा देईनात. मग आज्ञा होऊ अगर न होऊ, असें बोलून महाराजांनीं १२० खंड्या हरजिनसी धान्याची नेमणूक करून आंग्रे यांजकडून तांदुळांची तजवीज करविली[१].

मरणापूर्वी कांहीं दिवस महाराज परळीस आले असतां त्यांचें व स्वामींचें पुष्कळ संभाषण झालें. त्यांत स्वामींनीं महाराजांस अखेरचा उपदेश दिला. तो असा कीं, "[२] राज्याचा बंदोबस्त यथास्थित करावा. सेवक व सरदार लोक एकचित्तें करून ठेवावे, आणि देशाधिकार ज्यांस ज्यांस दिला आहे त्यांस तुह्मीं यथास्थित वर्तन स्वामीसेवेशीं अंतर करूं नये असें सांगून, त्यांचा बंदोबस्त करावा. कोश भांडार यांचा अधिकाऱ्यांचे हातून बंदोबस्त ठेवून शिलक झाडा पाहून विश्वासुकांचे स्वाधीन करावा. तुरुंग, किल्ले, व कोट या ठिकाणीं विश्वासुक मनुष्य ठेवावे. त्यांणीं प्राण वेंचावे परंतु फितूर होऊं नये. आसमंताद्भागीं शत्रु असतील त्यांशीं सख्य करून ठेवावें आणि महान् शत्रु एक असेल तर त्यास सर्वांनीं

---

१ रा० स्वा० बखर. पृष्ठ १५०–६१.

२ रा० स्वा० बखर. पृष्ठ. १५३–४.

जपावें. इत्यादि गोष्टी बहुत प्रकारें सांगून त्याचा सर्व बंदोबस्त एकीकडे ठेवून उभयतां पुत्रांचा एक विचार करून बंदोबस्त आधीं करावा. यांतून विपर्यास घडूं नये." याप्रमाणें स्वामींची आज्ञा घेऊन महाराज रायगडीं परत आले. तेथें सर्व बंदोवस्त करून उभयतां चिरंजीवांचा एक विचार करावा ही गोष्ट दुरापास्त झाली ह्मणून ज्येष्ठ पुत्राचा पन्हाळ्यास बंदोबस्त करून आपण रायगडीं राहून श्रीचे आज्ञेप्रमाणें प्रातःस्नान शिवपूजा व पादुकापूजा करून, देवब्राह्मणांचें श्रद्धापूर्वक पूजन केलें. आणि साधुवृंदें बोलावून आणून त्यांचें दर्शन, व पुराणश्रवण, व गोशत, भूदान, व ग्रामदानप्रभृति दानें करून, यथाशास्त्र आसनविधिपुरःसर परीक्षितीसारखा मुखानें "शिव शिव" असा उच्चार करीत असतां शके १६०२ रौद्र नाम संवत्सरीं चैत्र शुद्ध १५ रविवारीं दोन प्रहरीं दीर्घस्वरानें रामशब्द उच्चार करून शिवाजी महाराज परधामाप्रत गेले! "हें वर्तमान ऐकून 'श्रीची इच्छा, शिवाजी परधामाप्रत गेला' असें ह्मणून स्वामी खोलींत गेले." नंतर दोन वर्षांच्या आंत शके १६०३ दुर्मुख नाम संवत्सरीं माघ वद्य ९ मंदवारीं दोन प्रहरीं स्वामी देह ठेवून कैलासवासी झाले. या दोन वर्षांत शिवाजी महाराजांचे मरणानें स्वामीस किती दुःख झालें याचा वृत्तांत येणेंप्रमाणें चरित्रांत लिहिला आहे. "यानंतर समर्थ महाराज यांणीं पर्यटन करावयाचें सोडिलें. परळी व चाफळ येथें रहावें. जवळ आका व उद्धव बावा आदिकरून शिष्यमंडळी होती. परंतु विशेष भाषण कोणाशीं करावयाचें नाहीं व याउपर कोणाजवळ बहुत दिवस रहावयाचें नाहीं, असा

---

१ रा० स्वा० बखर. पृ० १६६

विचार आपले मनांत करून परळीस रहाते झाले. आपल्यास जाण्याचा अवकाश थोडा राहिला यास्तव शिवबांनीं मंदिर तयार करविलें आहे तेथें रहावें असें मनांत आणून घरांत वस्तीचा संकल्प करून बाहेर जाणें टाकिलें. नंतर महाराजांनीं पितळेच्या खुराचा पलंग करून दिला होता त्यावर स्वामींनीं खोलींत सर्वदा बसत असून अन्न व आहार अगदीं टाकिला; आणि दुग्ध आहार करून पांच चार महिने होते. तेव्हां जवळ कोणीं येऊं नये, ज्यास बोलावतील त्याणें मात्र येऊन आज्ञा काय तें विचारून जावें. आका व उद्धव बावा हे मात्र खोलींत न विचारतां जात असून स्वामींस उठवून दुग्ध देत असत. परंतु स्वामींनीं मर्जीस आल्यास दुग्ध घ्यावें, नाहीं तर अपेक्षा नाहीं ह्मणून सांगावें. किल्ल्यावरची हवा कठीण आहे. यास्तव प्रकृतीस मानत नाहीं ह्मणून चाफळास जावें, किंवा खालीं तरी उतरावें, केवळ पर्वतावर रहाणें चांगलें नाहीं, अशी सर्वांनीं प्रार्थना केली असतांही कोठेंही जाण्याचें नाहीं, येथेंच रहावयाचें असें स्वामींनीं बोलावें." या प्रकारानें स्वामी परळीस असतां कैलासवासी झाले.

स्वामीनीं मराठ्यांस जो शेवटचा उपदेश दिला त्याची हकीकत येणेंप्रमाणें आहे. "पौषमाशीं संभाजी महाराज यांची स्वारी किल्याखालीं आली आणि मी दर्शनास येतों ह्मणून विनंति सांगून पाठविली. तेव्हां समर्थांची आज्ञा झाली कीं, 'आह्मांस समाधान नाहीं. यास्तव दर्शन घडावयाचें नाहीं, तुह्मीं येऊं नये.' त्यावरून संभाजी सातार्‍यास गेले.

१ रा० स्वा० बखर, पृ० १६७.

तेथें जाऊन त्यांणीं दहावीस मुत्सद्दी हत्तीच्या पायांखालीं देऊन मारले. हें वर्तमान ऐकून स्वामींनीं आश्चर्य केलें कीं, 'शिवाजीच्या पोटीं पुत्र असा झाला ! असो, कालमाहात्म्यास उपाय नाहीं.' तेव्हां सर्वत्रांनीं श्रीची विनंति केली कीं, "महाराज, राजास आज्ञापत्र पाठवून तो यथामार्ग चालेल असें करावें." त्यावरून समर्थांनीं ओवीबद्ध पत्र लिहून राजास पाठविलें. तें असें:-

"अखंड सावधान असावें । दुश्चित्त कदापि नसावें ।
तजवीज करीत बसावें । एका स्थळीं ॥ १ ॥
कांहीं उग्रस्थिति सोडावी । कांहीं सौम्यता धरावी ।
चिंता लागावी परावी । अंतर्यामीं ॥ २ ॥
मागील अपराध क्षमा करावे । कारभारी हातीं धरावे ।
सुखी करून सोडावे । कामाकडे ॥ ३ ॥
पाटांतील तुंब निघेना । तरी मग पाणी चालेना ।
तसे जनाच्या मना । कळलें पाहिजे ॥ ४ ॥
जनाचा प्रवाह चालिला । म्हणजे कार्यभाग आटोपला ।
जन ठायीं ठायीं तुंबला । म्हणजे तें खोटें ॥ ५ ॥
श्रेष्ठीं जें जें मिळविलें । त्यासाठीं भांडत बसलें ।
तरी मग जाणावें फावलें । गलिमांशीं ॥ ६ ॥
ऐसें सहसा करूं नये । दोघे भांडतां तिसऱ्याशीं जाये ।
धीर धरून महत्कार्य । समजून करावें ॥ ७ ॥
आधींच पडली धास्ती । मग कार्यभाग होय नास्ती ।
या कारणें समस्तीं । बुद्धी शोधावी ॥ ८ ॥
राजीं राखतां जग । मग कार्यभागाची लगबग ।
ऐसें जाणोनियां सांग । समाधान करावें ॥ ९ ॥
सकळ लोक एक करावे । गलीम निवटून काढावे ।

येणें कीर्ती धांवे । दिगंतरीं ॥ १० ॥
आधीं गाजवावे तडाखे । तरी मग भूमंडळ थाके ।
ऐसें न होतां धके । राज्यास होती ॥ ११ ॥
समय प्रसंग ओळखावा । राग निवटून काढावा ।
आला तरी कळों न द्यावा । जगामाजी ॥ १२ ॥
राज्यामध्यें सकळ लोक । सलगी देऊन करावे साक ।
लोकांचे मना धाक । उपजोचि नये ॥ १३ ॥
बहुतं लोक मिळवावे । एक विचारें भरावे ।
कष्ट करोनी घसवावे । म्लेंच्छावरी ॥ १४ ॥
आहे तितुकें जतन करावें । पुढें आणीक मिळवावें ।
महाराष्ट्र राज्य करावें । जिकडे तिकडे ॥ १५ ॥
अहंमती लोकीं धरावी । हिंमतीची तरवार करावी ।
चढती बढती पदवी । पावाल येणें ॥ १६ ॥
शिवराजास आठवावें । जीवित्व तृणवत् मानावें ।
इहलोकीं परलोकीं तरावें । कीर्तिरूपें ॥ १७ ॥
शिवराजाचें आठवावें रूप । शिवराजाचा आठवावा साक्षेप ।
शिवराजाचा आठवावा प्रताप । भूमंडळीं ॥ १८ ॥
शिवराजाचें कसें बोलणें । शिवराजाचें कसें चालणें ।
शिवराजाची सलगी देणें । कैसी असे ॥ १९ ॥
सकळ सुखाचा करावा त्याग । करूनि साधिजे तो योग ।
राज्यसाधनाची लगबग । कैसी केली ॥ २० ॥
त्याहून करावें विशेष । तरीच ह्मणवावे पुरुष ।
या उपरी आतां विशेष । काय लिहावें ॥ २१ ॥"

येणेंप्रमाणें शिवाजी महाराजांनीं राज्याचा मूळ पाया प्रतापगडीं घातला व पायावर इमारत बांधण्यास साह्यभूत जे रामदासस्वामी त्यांणीं कृष्णातीरीं व आसमंतात् जीं चरित्रें

केलीं. तेणेंकरून महाबळेश्वरादि ठिकाणांचा महिमा किती आहे हें सांगणें नको. परंतु या ठिकाणीं अहिल्याबाईनीं एक देऊळ बांधलें आहे असें वर सांगितलें आहे. काय या अहिल्याबाईची कीर्ति ! ज्याप्रमाणें महाराष्ट्र राजामध्यें शिवाजी माहराज उत्तम राजे होऊन गेले, व राजगुरूंत रामदास स्वामी झाले, तद्वत् महाराष्ट्र राण्यांमध्यें अहिल्याबाई एक रत्नच होऊन गेली. "अहल्या द्रौपदी सीता तारा मंदोदरी तथा" हा श्लोक प्रात:काळीं आपले लोक ह्मणून पुराणप्रसिद्ध अहल्येचें नित्य स्मरण करतात. परंतु तिजपेक्षां देखील अर्वाचीन अहिल्या श्रेष्ठ आहे. कारण त्या अहल्येला इंद्रापासून पातिव्रत्यभंग झाल्याचा एकवार डाग लागला होता. पण या अहिल्येमध्यें शत्रूंच्यानें देखील दोष काढवले नाहींत. यास्तव महाबळेश्वरीं गेलें ह्मणजे शिवाजी महाराज, रामदासस्वामी, व अहिल्याबाई या तिहींचें एकदम स्मरण होतें व त्यांचीं सत्कृत्यें डोळ्यांसमोर उभीं राहूं लागतात. कारण शिवाजी, रामदास व अहिल्याबाई हीं नांवें माराठ्यांना केवळ व्यक्तिवाचक नाहींत, परंतु गुणसमुदायवाचक आहेत. यास्तव जो वास्तविक महाराष्ट्र जातीचा आहे व विचार करतो त्याचे मनावर आपल्या हल्लींच्या निकृष्टावस्थेमध्यें महाबळेश्वरीं असतां जें एक प्रकारचें शिक्षण होतें त्याचें वर्णन करतां येत नाहीं. तें स्वसंवेद्य आहे; व मराठ्यांच्या इतिहासावर पुष्कळ पुस्तकें वाचलीं तथापि त्याजपासून असा फायदा होणार नाहीं.

परंतु मराठ्यांचे इतिहासावर पुष्कळ पुस्तकें वाचण्यास आहेत कोठें ? एक फक्त ग्रांट् डफ् साहेबांचा प्रसिद्ध ग्रंथ आहे. पण तो ग्रंथ मराठ्यांना जितका उपयुक्त व्हावा

तसा कधींही होणार नाहीं कारण इंग्लिश लोकांनीं मराठ्यांस सहज जिंकलें, त्या अर्थी मराठ्यांविषयीं त्यांच्या मनांत फार पूज्यभाव येणें नाहीं, व जरी त्यांणीं मराठ्यांचे गुण घेतले तरी ते नाक मुरडीत मुरडीत घेतात. हें करणें स्वाभाविक आहे; यापेक्षां जास्त त्यांच्या हातून घडणें ह्मणजे लोकोत्तर आहे. अशा इतिहासापेक्षां केवळ तिरस्थांनीं लिहिलेला इतिहास बरा. कारण, तिरस्थांच्या मनांत पूज्यभाव नसला तथापि तिरस्कारबुद्धि तरी नसते; पण पूज्यभाव नसेल तर, इतिहासापासून जे फायदे व्हावे ते व्हावयाचे नाहींत, व हा पूज्यभाव ज्यांचा त्यांणीं इतिहास लिहिल्याशिवाय येणार नाहीं. पूज्यभाव ह्मणजे खऱ्याचें खोटें करावें व आत्मस्तुति करावी असें बिलकुल नाहीं. एकत्र माहिती निरनिराळ्या भावानें व निरनिराळ्या मनुष्यांनीं लिहिली असतां निरनिराळ्या तऱ्हेची दिसूं लागते व मनावर निरनिराळा ग्रह होऊं लागतो हें सर्वांना माहित आहे. फार कशाला, आपल्या पुराणांचेंच उदारहण घेऊं. या पुराणांत भाकड कथा आहेत, तथापि त्यांच्या योगानें शिवाजी महाराजांस उत्तेजन येऊन त्यांणीं महत्कृत्यें केलीं व भगवान् वाल्मीकींनीं रामायणाचे प्रारंभीं फलश्रुति लिहिली आहे तीस सार्थकता आणली:—

"क्षत्रान्वयो भूमिपतित्वमीयात्
शृण्वन्हि शूद्रोऽपि महत्वमीयात्."

ह्याच पुराणकथा युरोपियन लोक लिहितात तेव्हां आपल्या मनावर काय ग्रह होतो ? तोच प्रकार ग्रांट् डफ् साहेबांच्या इतिहासाचा आहे. त्यांणीं रामदासस्वामीविषयीं मुळींच लिहिलें नाहीं. अशा कित्येक गोष्टी सुटल्या असतील. या-

करितां **ग्रांट् डफ्** साहेबांच्या ग्रंथांत जी माहिती आहे ती घे-ऊन आपल्या लोकांनीं आपल्या तऱ्हेनें इतिहास रचला पाहिजे. पण असें करण्याला **ग्रांट् डफ्** साहेबांच्या ग्रंथास आधारभूत ज्या मौल्यवान् बखरा त्या पाहिजे होत्या. परंतु त्यांची **ग्रांट् डफ्** साहेबांनीं होळी करविली ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. असें करण्याचें कारण **ग्रांट् डफ्** साहेबांसच माहीत. परंतु बखरी नाहींत तर जुन्या दंतकथा, जुनीं पत्रें व पवाडे मिळतील ते जमा करावे, व किल्ले आणि लढायांच्या जागा समक्ष पाहून माहिती गोळा करावी आणि उत्तम रीतीनें लिहावा. परंतु ही गोष्ट आपल्या नवीन विद्वानांच्या मनांत ठसली आहे असें दिसत नाहीं. त्यांचा झोंक बहुधा पालीभाषेंतील पुरातन लेख शोधून त्यांच्या एकेक मात्रेवर व वेलांटीवर लांबलचक टीका करण्याकडे फार आहे. असें करण्यामध्यें एक फायदा असा दिसतो कीं, या लेखास मागें पुढें शेंडा बुडूख नसतें यामुळें टीकाकारांच्या कुशाग्रबुद्धीस मोकळीक सांपडून आपलें तर्कज्ञान दाखवितां येतें. परंतु यापेक्षां मराठ्यांविषयीं माहिती संपादन केल्यास फार उपयोगी आहे. कारण हल्लीं आपली स्वधर्मावरची श्रद्धा व पूर्वजांविषयीं पूज्यभाव नाहींसा होत चालला आहे, व असाच क्रम कांहीं दिवस चालल्यास आपणामध्यें महाराष्ट्रपणा राहाणार नाहीं. आणि तो जर गेला तर मग ह्या आपल्या जीविताला व जी थोडी विद्या आहे तिला धिक्कार असो! यास्तव जोंपर्यंत योग्य ग्रंथ नाहींत तोंपर्यंत महाबळेश्वर, प्रतापगड इत्यादि स्थानें पाहिलीं असतां आपण मराठे आहों असें वाटूं लागतें तर तीं पाहण्यापासून किती फायदा आहे याविषयीं ज्याचा त्यानें विचार करावा.

आतां महाबळेश्वरीं गेल्यापासून पारलौकिक हित काय होतें हें भाविक हिंदुलोकांना सांगणें नको. कृष्णादिपंचगंगेचें स्नान व महाबळेश्वराचें दर्शन यांचे माहात्म्य पुराणांत फार मोठें लिहिलें आहे व तें आह्मीं 'क्षेत्रवर्णनां'त सांगितलेंच आहे. परंतु जे वेदांती आहेत व मी कोण, कोठून आलों, मला कांय करणें आहे व मी जाणार कोठें, याचा विचार करतात आणि सदोदित उपनिषदादि महाग्रंथांचें मनन करीत असतात त्यांना "सर्व ईश्वर आहे, तद्व्यतिरिक्त सर्व मिथ्या आहे" हें तत्त्व समजण्यास महाबळेश्वरासारखीं नैसर्गिकचमत्कारविशिष्ट स्थानें पाहिलीं पाहिजेत. या ठिकाणीं गिरिकंदर, पाषाण, मेघ, नद्या, वृक्षकाननादि अमानुष चमत्कार पाहून मन संस्कृत होत जातें, व नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्तस्वभावे आणि सच्चिदानंदस्वरूप जो भगवान् परमात्मा तो मनांत येत जातो, व क्रमेंकरून मनुष्य ईश्वरपरायण होतें. मनुष्याचें मन स्वभावतः संसारांत इतकें निमग्न असतें कीं त्यास ईश्वराचा विसर पडत जातो. या कारणास्तव आपल्या धर्मांत वानप्रस्थ व चतुर्थाश्रम घेऊन पर्वत, अरण्यें, गुहा, व पुण्यनद्या, ईहींकरून विशिष्टस्थळीं तप करण्यास सांगितलें आहे. ज्यांच्या हातून हें होत नाहीं त्यांणीं महाबळेश्वर, भीमाशंकर, ओंकार, पंचमढी आदिकरून ईश्वरमहिमा मनांत बिंबविणारीं जीं स्थानें आहेत तेथें नियमितकाळीं यात्रेस जाण्याची योजना केली आहे.

मनुष्यकृत चमत्कार कितीही पाहिले तथापि त्यांजपासून मन कधींही मोठें होत नाहीं. यास उदाहरण हेंच आहे कीं, मुंबईस राहून मोठमोठ्या टोलेजंग इमारती पाहिल्या व जन्महीं मुंबईस घालविला, तथापि ईश्वराचा महिमा याचा

तितका कधीं मनांत येतो काय ? व जरी कदाचित् आला, तरी परिणामीं भुलेश्वरासारखीं निंद्य कर्मांनीं दूषित झालेलीं देवालयें आणि वल्लभपंथी महाराजांसारखे साधु उत्पन्न होतात ! मुंबईच्या मोठमोठ्या इमारती पहिल्या पहिल्यानें मात्र डोळ्यांत भरतात; पण एकदां वळणांत पडल्या, ह्मणजे त्यांचें महत्त्व लक्षांत येईनासें होतें. तसा प्रकार ईश्वरी चमत्कारांचा नव्हे. महाबळेश्वरचे चमत्कार नित्य पहात गेलें तथापि तृप्ति कधीं झाली आहे काय ? प्रथमदर्शनीं जो ईश्वरी महत्त्वाचा मनावर भास होतो व ऊर दडपत असतो, तीच स्थिति लोक प्रतिवर्षीं पाहण्यास जातात तरी कायम असते, व एकवेळ महाबळेश्वर पाहिलें ह्मणजे पुनः दृष्टीस पडावें ह्मणून मनाची किती उत्कंठा असते हें महाबळेश्वर पाहणारासच विचारलें पाहिजे. जे केवळ धर्मशून्य व कधीं स्नानसंध्या व ईश्वराचें स्मरण देखील करीत नाहींत, व दुसरे करीत असल्यास त्यांस हंसतात, त्यांच्या अंतःकरणांतही विरक्ति उत्पन्न होऊन महाबळेश्वरीं जाऊन ईश्वरचिंतन करावें अशी बुद्धि उत्पन्न होते. यास प्रमाण आर्यकवींमध्यें अर्थगौरवाविषयीं प्रसिद्ध जो भारवि त्याचें वचन आहे. भगवान् वेदव्यास यांची अनुज्ञा घेऊन अर्जुन हिमालयावर तपश्चर्येकरितां गेला त्या समयीं बरोबर यक्ष होता त्याणें पर्वतावरील सर्व रमणीय आणि उपभोग्य व विहारयोग्य स्थानें दाखविलीं आणि नंतर अर्जुन हें वाक्य बोलला:—

वीतजन्मजरसः परं शुचि
ब्रह्मणः पदमुपैतुमिच्छताम् ।
आगमादिव तमोपहादितः
संभवन्ति मतयो भवच्छिदः ॥

याचा भावार्थ–"जन्म आणि जरा यांहून अतीत जें परब्रह्म, त्याच्या श्रेष्ठ पवित्र पदाप्रत जाण्यास जे इच्छितात, त्यांच्या बुद्धि, अज्ञानतिमिरनाशक जी श्रुति तिच्या अध्ययनें व मननेंकरून जशा संसाराचा उच्छेद करणाऱ्या आणि ईश्वरपर होतात, तद्वत् हे पर्वतावरील चमत्कार पाहून होतात." ह्या श्लोकावर **मल्लीनाथानें** टीका अशी केली आहे कीं–"न केवला इयं भोगभूमिः, किंतु मुक्तिक्षेत्रमपीति तात्पर्यार्थः"•म्हणजे–हें स्थान केवळ उपभोगार्ह नव्हे, तर मुक्ति देणारें क्षेत्रही आहे. हें हिमालयाचें वर्णन झालें. पण सह्याद्रि हिमालयाचाच भाऊ आहे. तर, जर हीं स्थळें साक्षात् वेदोपम आहेत व त्यांच्या दर्शनापासून मनें संसारातीत होऊन ईश्वरपरायण होतात, तर यापरता परमार्थ राहिला कोणता ? ईश्वरज्ञान कशा रीतीनें होतें याविषयीं पुढील श्लोक सर्वांच्या ऐकण्यांत असेलचः—

तीर्थे तीर्थे जायते साधुवृन्दं
वृन्दे वृन्दे तत्त्वचिन्तानुवादः ।
वादे वादे जायते तत्त्वबोधो
बोधे बोधे सच्चिदानन्दभासः ॥

आह्मांस वाटतें कीं येथें जीं साधुवृंदें सांगितलीं आहेत तीं उपनिषद्भागांतील अगस्त्य, लोपामुद्रा, भृगु, वरुण इत्यादि होत. जो तत्त्वचिंतानुवाद सांगितला आहे तो आत्मानात्म, जीवेश व उत्पत्तिस्थितिलय याविषयीं विचार होय, व जो तत्त्वबोध सांगितला आहे तो "सदेव सौम्य इदमग्र आसीत् ।" "एकमेवाद्वितीयम् ।" "सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म ।" "ब्रह्मविदाप्नोति परम् ।" इत्यादि महावाक्यें होत. व जीं तीर्थें सांगितलीं

आहेत तीं महाबळेश्वरासारखीं स्थानें होत. इतर ठिकाणीं असे परिणाम घडावयाचे नाहींत.

आतां शेवटीं एवढी शंका राहिली आहे कीं, कदाचित् कोणी एथें लिहिलें आहे तें ऐकून महाबळेश्वरास जाईल आणि ह्मणेल कीं, "आह्मी प्रतापगड पाहिला, महाबळेश्वरही पाहिलें, परंतु आमच्या मनांत येथें सांगितल्याप्रमाणें स्वदेशाभिमान व स्वधर्मश्रद्धा यांचा लेशही आला नाहीं." तर यास एवढेंच उत्तर आहे कीं, आपण विचारशून्य मन व भावशून्य हृदय समागमें घेऊन केवळ चर्मचक्षूनें पहाल तर, महाबळेश्वरीं जन्मांधळ्यापेक्षां देखील तुह्मांस कमी दिसणार आहे. यास दृष्टांत मावळे लोकांचाच आहे. त्यांच्या पूर्वजांनीं आपला पूर्ण कैवारी जो शिवाजी राजा त्याच्या पुण्याईनें रायगडास राज्य स्थापन केलें, तोरण्यास विजयतोरणें लाविलीं, सिंहगडास सिंहासारखे पराक्रम केले, प्रतापगडास यवनांवर प्रताप गाजविले, व सज्जनगडास परम सज्जन जो रामदास त्यांच्या अनुग्रहेंकरून धर्मस्थापना केली, ते मावळे हल्लीं मोळ्या वहात या किल्ल्यांच्या खालून रात्रंदिवस जात येत असतात. परंतु ते पूर्वींचे मोळकेचे मोळकेच आहेत. आणि पाषाणांनीं बांधलेले किल्ले देखील भंगून कालगतीनें पडत चालले आहेत, परंतु मावळ्यांच्या हृदयास काडीमात्र द्रव येत नाहीं. यास्तव, जो कोणी विचारदृष्टीनें महाबळेश्वर पाहील त्याच्या सुशिक्षित, संस्कृत व सूक्ष्मदर्शी मनावर फार हितावह परिणाम होतील व असे परिणाम त्यांनीं करून घ्यावे हाच या विषयाचा उद्देश होय.

# पुरवणी.

## A.

(पृ० ९९ पहा.)

*Extract from Edward Scott Waring's History of the Marathas* ( 1810 ) *pp.* 67-69.

"The Beejapur Government had often, and in vain, tried the efficacy of threats and promises. It then applied to Shahjee, who was still in the Carnatic, to repress his son's rebellion: Shahjee anticipated his refusal, and abandoned him to the vengeance of his incensed sovereign. A force of twelve thousand men under Abdoola Khan was sent against him, which penetrated as far as Wye upon the Kistna. He then sent his Secretary with offers of pardon, and promises of promotion, and also to arrange the necessary steps for an interview. Sevajee consented to the meeting, refusing, however to allow the army to encamp below the fort, or to admit him with a large retinue. The preliminaries of the interview were at length adopted, and Sevajee prepared himself for one of the most desperate enterprises of his life. Nor did he assume that tranquillity, which a constant intercourse with danger usually affords. He distributed large presents to Bramins; sent two to Gya and Benares to intercede with the Almighty; and foregoing his usual dress, discovered that he was embarked on an undertaking of doubtful success. His mother clung to him, and entreated him to abandon his

design. (But although his conduct betrayed his anxiety, he omitted no precaution to render his treachery effectual.) An ambuscade was planted near the tent; his garrison was distributed in the most convenient situations, and his guns were directed against the camp of the enemy.

"Abdoola Khan advanced in defiance of the remonstrances of his friends; but as the road leading to PertabGurh was uneven and narrow, he was obliged to alight from his elephant. He then proposed that Sevajee should meet him below the fort; this he positively refused; and the Khan persevered in his original intention. As he advanced, Sevajee took a hasty but affectionate farewell of his friends committing his son Sambha to their protection. He then advanced to meet him, and as is customary in the East, they both extended their arms to embrace each other. Abdoola Khan, who was a man of great personal prowess, secured him with one of his hands and endeavoured to stab him. Sevajee was indebted for his life to the precaution he had used of wearing armour. Disengaging himself from his grasp, he plunged a Bhagnak (a weapon, when the hand is closed, resembling rings upon the fingers, concealing in the palm of the hand sharp steel claws, whence the name of tiger-claws) into his stomach, and cut him down with his sword. His Secretary endeavoured to avenge the act, when Sevajee (with uncommon hyhocrisy, for it could scarcely result from religious prepossession) bade him fly, as he

should always hold sacred the life of a Bramin. The troops now rushed out, and not a man, except the fortunate Bramin, escaped to relate the horrid murder. The Beejapoor army was not allowed to recover from its panic; it was surprised and defeated, retiring with the loss of its horse, guns, elephants, and camp-equipage."

---

## B.

(पृ० १०३ पहा.)

*Extract from E. Scott Waring's History of the Marathas* (1810) *Appendix p.* 200 *Note* 5.

"This rests entirely upon the authority of the Mahratta manuscripts, and I think them entitled to credit. Had not Abdoola Khan intended the like treachery, I should greatly doubt his consenting to an interview with such a man as Sevajee and upon such harsh conditions. For what more could he expect to effect at an interview than could have been effected by his Secretary? This intention of Abdoola does not extenuate Sevajee's conduct, for Sevajee had made up his mind from the first to murder the Mogul General."

---

## C.

(पृ० १०५ पहा.)

*Extract from Scott's History of the Deccan, Vol. II p.* 8.

"The Beejapore Government having in vain desired Shahjee (who disclaimed all connection

with him, and pretended that he had discarded him as a relation ) to repress the excesses of his son at length sent against him a considerable army under a general named Abdoola Khan.

" Sevajee with artful policy now wrote to the general, imploring pardon for his crimes and inviting him to come and receive his submission. Abdoola advanced without opposition near the residence of the rebel and it was agreed, that he should repair to a tent, with ten followers, where Sevajee would meet him with only five attendants. They met accordingly, when the treacherous Zemindar stabbed Abdoola in embracing him. Upon a signal given, the Marathas rushing from an ambuscane, attacked the unsuspecting army of Beejapore, which, deprived of their chief was quickly defeated, Sevajee plundered their rich camp, and by this victory became master of all Konkun, the Zemindars of which flocked to acknowledge his authority to save their possessions. The strong fortress of Sattara and other places also opened their gates to receive him."

---

# D.

(पृ० १०६ पहा.)

*Extract from E. Scott Waring's History of the Marathas* [1890] *Preface pp.* 8-10,

" However much I may regret the scantiness of my materials, and the paucity of striking events, I must still congratulate myself that my inquiries

have not often led me to consult Persian authorities. None, so far as I can judge, can be more fallacious, or can less requite the diligence of patient investigation. Ferishta, who composed a general history of India, as well as a particular history of the Deccan, is almost the only historian who merits the praise of impartiality and accuracy. He died before the era of Mahratta independence, and his mantle was not fallen upon any of his brethren. The Moslems, of course, view with animosity and anguish, the progress the Mahrattas have made in the conquest of their fairest provinces; and which of late years must have been aggravated by the bondage of their king, the unfortunate representative of the house of Timoor. From such persons little that was favourable to the Mahratta character could be expected. The facts they give are garbled and perverted, which the slightest circumstance against them is seized upon, and extended to an immeasurable length. Their style is also a subject of just reprehension. Their forced and unnatural images, their swelling cadences and modulated phraseology, are as disgusting to a discriminating taste, as they must be inimical to historical truth. For in a history composed in verse, something will be sacrificed to measure, and to rhyme. Although the Persian histories be not written in verse, yet they partake of all its faults. They abound in quaint similies and forced antithesis while the redendancy of their epithets distracts and bewilders attention. If this judgment to the

Persion scholar seem harsh, I refer him to the history of the late Nizam of the Deccan, or if he object, to the undisputed master of this prurient style, the celebrated Abul Fazil.

"Not so the Mahratta histories. Their historians (some will deny them the name) write in a plain, simple, and unaffected style, content to relate passing events in opposite terms, without seeking turgid imagery or inflated phraseology. [Excepting to the letter addressed to the Peshwa, by the great Malhar Rao Holker,] no attempt is made to make the worse appear the better reason. Victory and defeat are briefly related; if they pass over the latter too hastily, they do not dwell upon the former with unnecessary minuteness. They do not endeavour to bias or mislead the judgment, but are certainly greatly deficient in chronology and in historical reflections."

——oo——

## E.

(पृ० ७९ पहा.)

### शिवाजी महाराजांचा पोवाडा.

सकळा देव आदीदेव शिव नमन धरूनी भावू । जैसा शिवाजीचा भावू कलिमधी प्रसन्न महादेवू । सांबाचा अवतार छत्रपती राजा शिवू । शिवाजीच्या तव्ब्यांत पाणी पिती सर्व जीवू । पाणी पूर्ण पीकले न्हावू भाकेंत गुंतला महादेवू । राजगडासारिखा जैसा देवें दिला टावू । रगतगड रोयला जांवळी प्रतापगड मंडण । सोनवासहीऱ्या राजगडावरी सुवर्ण । गड हुडा दुर्ग चांगले भाग मी राज्याचे गाईन ॥ १ ॥

सांगन शिवाजीच्या हिकमती किल्ले दूर्ग झुलती । भले दुणेदार जाणती मराठे राजकुमर ऐकती । मोऱ्या चंद्रराव धरिला गड पण जावली घेतली । पावनगड पनाळा प्रभळगड हे संगीन । मतंगड घोसाळा राहिल्या अनंत वाड्या दीन । कुबळघर वेढिलें काबिज केलें तळ कोकण । पावला चवली घेऊन मुलुक काबिज केला महाराजान । धोंड पाताळ कोकणघाटचे किल्ले मी गाईन । सिरवळ सुपळ देश घेतले जैसे इंदापुरापासून । कुणबीस्तान कोकण शेकसल पीर पाहेन । घेतली बाराही बंदरें भाग मी राज्याचे गाईन ॥ २ ॥

कल्याण भिवंडी मारून नेली फिर्याद विज्यापुराला गेली । बाच्छाई क्रोध झाला जैसी अग्न प्रंजळली । जिता धरा शिवाजीला, कुलवजिरांशीं बोलला । बोलवा बाजी घोरपड्याला, संगें झादजी भोंसल्याला । घाटग्या झुंझार रायाला, देवक्याजिवाजीला । सडंग त्रिमुख रायाला, वेदऱ्या पिलाजिला । कऱ्यावऱ्या संभाजीला, विंगळ्या सुभानाला । राजे खान बडेखान सिद्दीला । अबदुलखान, अवघ्या वजीराचा कोट सद्र बैसले दिवाण । विडा उचलिला पैजेचा, खान विज्यापुरांत बोलिला । जो बाच्छाई नावाजला, घोडाफिरंगी सद्रे दिला । सातशें उंट भरले बाणाचे, करडें लश्कर खानाचें । लश्कर चवदाहजार घोडा तोंडावर धराया चालिला । भांड सर्व देतिल कणकिल्ले विलोकिती । खानदरमजली कुचकेलें, चालुन तोरन्यासि आला, विन फतेमारीच्या विनीच्या खालीं आला । ब्राह्मण कृष्णाजी बोलिला साहेब आपसकून झाला । खान दरमजली कुचकेलें, चालुनी तुळजापुराला गेले । फोडिलीच भोवानीला, मांडिला देवीला । खान दरमजली कुचकेले, चालुनी पंढरपुराला गेला । पंढरी-

चा विठोबा भिवरेंत बुडविला। मसुद बांधली देवाला, मग खानाचा भोग पुरला। खान दरमजली कुच केला, चालुनी पालीकारणें गेला । पालीचा खंडोबा अज्यामत दावी मोगलाला। न्हाटो न्हाटोरे भाइ बोलिला, तीनकोस मोड केला दीपमाळ बांधिली देवाला, मग खानाचा भोग पुरला। खान दरमजली कुच केला, चालुनी आवुंदाला गेला। आवुंदाची येमाई प्रचीत दावी खानाला। गोंधळ घातला देविला, मग खानाचा भोग पुरला। पांढऱ्या संभूला घेतला, खान दरमजली कुच केला, चालुनी वाईकारणें गेला, आपुल्या मुलुकांत राहिला,। बरवेपणाचे कागद लिहिले, ब्राह्मण कृष्णाजी पाठविला। हेजीम बोले शिवाजी राजाला, खान आला भेटायाला। शिवाजी जरी तूं भेटसी उदंड, दवलत देईल तुला। शिवाजी हेजीमासी बोलतो, खान मजला काय देतो। चहुंआगळे चाळीस गड मी खानाला देतो। मजवरी कृपा आहे खानाची। जावळीस दर संवारितो। तेथें यावें भेटायाला, मी खानाची वाट पाहातो। तसलिबा दिल्या बामणाला, बामण खानाजवळी आला। शिवाजी राजाचा हेजीम जिवाजी ह्मालदार, खानापाशी येऊन, धंड न बोले अवदुल्याला। चौदा हजार घोडा तुह्मी आणिला कशाला, अवूत द्याया जगदंबेला । हेजीम बोलतांच अवदुलखान खवळला। जिवाजी ह्मालदार शिवाजी राजाजवळी आला। खान दरमजली कुच केला। चालून रणतोंडीची घाटी चढून गडवेढा दिला। चवदा दिवस कोंड केला। खबर कळली ह्माराजाला। राजान गुपीत राहिला, शामराजा बोलाविला। रघुनाथ पेशवे, धातोंड्या माणकोजीला विंगळ्या सुभानाला, महिकुलमाजी राजा बैसला सद्रेला। सरदार बैसले

बूद पुसे सुभेदाराला। भाईनु अबदुलखान आला, त्याचा धाक तो रे देवाला। कसा जाऊं भेटायाला, बुद्धि सांगावी आम्हाला। गाईकवाड कृष्णाजी बोलिला, शिवबा सोल चढवा आंगाला। गळीं घातली पोलाद, कंबर बस्ता वेढा केला। पटा जिवझाल्यापाशीं दिला, दोनी वाघनखें रायाच्या पंज्याला वरुनी बारीक झगा त्याला, भगवंताचो दया त्याला। बाच्छाई साज करुनी आला, जिजाबाई भेटी गेला। पालकेंत बैसुनी, जिजा आली भेटायाला, जीजाबाइ घेती अलाई बलाई चढती दवलत येऊंदे तुला। घे यशाचा विडा आपुल्या स्मरावें महादेवाला। तसलीम माझी जिजा येवू तुला। शिवबा बोले जिजावा सय येवढी प्राप्त झाली, नाहीं भेटला दिवानाला। बोरे बुद्धिनें कार्य साधावें, उसने संभाजीचें घ्यावें। बये येथुनी सलाम सांगे शाहाजी राजाला। गड दिले गडकऱ्याला, राज्य दिलें नेतोजीला। पुतण्या उमाजीला। राजाला पांचशें लोक दिले त्याला। रणतोडीच्या घाटाला, तुक्याभिवाजीन वेढा दिला। राजांनीं सदरा शृंगारील्या, गाद्या पडगाद्या घातल्या। आतल्या शाकुमासा वस्तां दरयांतल्या जोडिल्या। सुरंग खांब जडताचे, वरी घोंस पोवळीयांचे। माणीकांच्या बरव्या हारी, वरी मोत्यांच्या लाविल्या। तिणव्या सदरे मांडणी, सूर्य लकलकितो गगनीं। साळस वर्णनाचे पाणी, चांदवे जडताचे चौकोनी। पलंग टाकिला सोनेरी, मस्तानी पडदा चिटाइत घातला। नानापरीचीं चित्रें त्याला, घोस हिऱ्याच्या जोडिल्या माळा। चौघे बळी बांधुनी फळी, एक बळानें चालिले। पहिल्या सद्रेला गेले, गडकऱ्यांनीं दटाविले। दुसरे सद्रेला गेले, कारकुन अबदुल्याला बोले। तिसऱ्या सद्रेला गेले। कंचणींत बुडविले। अबदुला

खदखदां हासीला, जिवाजी झालदार जिवाजी आले सदरेला। पहिला सलाम महादेवाला, दुसरा सलाम शाहाजीला। तिसरा सलाम जगदंबेला, चवथा सलाम गडकऱ्यांला । माझा पांचवा सलाम, येतो अबदुल्या तुला । तूं रे कुणबीका छोरा, बनाया दिवाणका सदरा । ऐशा सदरा नाहीं आल्या, इदलशा बाछावाला । तू रे कुणबीका छोरा, खेतबाडी करकर भरणा दिवाणका रस्ता । खाना ज्याची करणी, काय भ्यावें रघुनाथाला । खाना जातीके कोण आह्मीं जाणतों तुह्माला । अबदुला जातीके भटारणी, मिया करना दुकानदारी । बिज्यापुरमे दुकान तेरा, लड्डु जिलबी बिच खाना । तुरे भटारणीका छोरा, मज राजापर लिया तोरा । अबदुल्यानें कव घातली, शिवाजी गवसून धरला सारा । चालवि कटार शिल्यावरी मारा न चाले जरा । राजान बिचवा लावून दिला, वागपंज्याचा मारा केला। ज्याचें उदर फाडिले, खानाची चरवी आली दारा । अबदुलखान लश्करी भला, पटका कमरेचा सोडिला। खचून हात फिरंगीं घातला, मारिला फिरंगीचा गुंडाळा, राजाचा शिर टोप तोडिला। पांच वेडे मंदीलाचे, चवदा वेडेहो तोड्याचे, तुटून जरासा लागला। जखम चढली महाराजाला। मारिला शिवाजीनें गुंडाळा। मान खांद गवसुन केला, जानव्याचा दोरा, खान पडलासा देखिला। सैद बंडू उठावले, मारिला पटा त्याचा, शिवाजीनें वरचेवर तोलला। सैद जो मारिला, खांद्यापासुन केला सारा । सैद बंडू पडलेसे देखिले, त्याचा बामण झोरे झाला। परतरे माघारा सर जा शिवाजी बोलिला। ब्राम्हण मारूं नये तुला, क्रिया देवाची आह्माला। महाराज खदखदां हासिला, हातिचा पटा टाकुन दिला। शिवाजीचा जिवाजी झालदार। त्यानें शिघ्र उडी घातली । काढिला

बराणपुरी बरचा, त्याणें अचाट फेंकून दिला। नाभीकमळीं बैसला, बरचा पाठीला फुटला। ब्राह्मण हरहर बोलिला, त्याचा प्राण निघुनी गेला। कावजी राजाचा लेक, घ्या घ्या करीत आला। पायां केल्या भोयांचा खटारा धरणीवर पाडिला। शिवाजी आले शिर कापुनी न्हेऊनी गेले। प्रतापगडची भोवानी शिर वाहिलें जगदंबेला। बत्तीस दाताचा बोकड मातला गे होता, आहुती द्यावी अबदुल्याची। येथुनी इशारत कुल रांजांच्या लोकांला, बारा तोफा मारा केला। अवाज प्रतापगडावर होती, कडका पायदळ येती। पडले धडधडा बोळले निशाणाचे हत्ती। त्रिमुख कागड्या सुरे राव लोटला, रणतोंडीची घाटी, तुक्या भिवाजी भिडला, साठ आरबांच्या घोड्या पाडाव केला, त्या क्षणी हनुमंताला, पायींचे पायदळ शिवाजी राजाला। महाराज पनाळ्यावर गेले, पनाळा चौफेरी बांधिला। कैदीन भांडण पनाळा, नही देई बाच्छाहाला। सरदार मिळाले सदरेला। बाईन शाहीर बोलाविले। अग्नीनदासकवेश्वर, त्याणें कडाका गाइला। दिला एक इनाम गांव, बक्षीस त्याला, दोन सोन्याचे लंगर चढविले हाताला ॥—॥

---

# F.

(उपोद्घात पृष्ठ ३ पहा.)

## A BALLAD ON SIVAJI.

Supreme of gods, O Siva, I keep
My trust in Thee, with reverence deep.
Full is Sivaji's faith in Thee;
Hence, bless'd with grace divine is he.

In him Thy Presence smiles on earth.
Now freedom, peace, content, and mirth
Cheer our hearts, be we great or small:
Enjoy this bliss, Oh patriots all.
God first assigned the Rajgarh fort
For great Sivaji's royal court.
Raktgarh and Roela now obey,
Pratapgarh, Mandan too, his sway.
On Rajgarh Souba holds command,
That flow'r of warriors in the land.
Thus forts on hill and forts on plain
And bastions guard his whole domain.
With pride I sing aloud and clear
The glories of my Sovereign dear. 1.
Hear Oh ye youths of royal race,
Who now are gathered in this place,
Ye Lords of wealth, well-known to fame,
Proud of Maratha blood and name,
How forts on hill and plain obey
Our great Sivaji's mighty sway;
With valour how he conquests gained,
With vigour how his rule maintained.
The Jaoli Chief was vanquished first;
That traitor, be his name accurst!
Pavangarh and Panala then,
Invincible e'en to mighty men,
Matangarh and Ghosala fall
To him, with countless hamlets small.
By Fourths and Eighths from all received,
A mighty kingdom he achieved.
Forts o'er the ghauts and down below,

He captured from the Moslem foe.
Indapur, Supal and Sirol,
He brought under his own control.
He won the Kunbi's father-land,
That graceful skirts the ocean grand.
The dozen ports upon the coast,
And Seksal Pir the Mogal's boast.

With pride I sing aloud and clear
The glories of my Sovereign dear. 2.

Now Kalyan–Bhiondi with its lands
Is wrested from the Moslem's hands,
The tidings to Bijapur go;
Their sad defeat the Moslems know.
No bounds the Badsha's anger knows
And from his lips this fiat flows:—
" Get me Sivaji here alive,
" Get me Sivaji here alive."

Now all the grandees of the state,
At their Chief's call, in conclave sate.
Ghorpadia Baji known to fame;
Mahadji Bhonslia high in name;
Zunjarrav of the Ghatge clan,
The Deshmukh of the land of man;
Jivaji wise, and Trimukh brave;
Sambhaji great, and Subhan grave;
Abdulla Khan the Vazir grand,
Who held the army in command;
The Siddi ruling over the sea;
And other lords of high degree
Surround the Monarch on the throne;
That bright with regal splendour shone.

Up rose Abdulla Khan and spake:—
" Monarch, a promise thee I make
" To bring Sivaji bound in chains,
" To bring Sivaji bound in chains. "
The Monarch smiled and forthwith gave
To him a sword and charger brave.
Now camels come in endless strings,
And each its load of rockets brings.
Then gaily all in martial trance,
The horses with their riders dance.
Equipped, the numerous soldiers stand,
Ready to do their Chief's command.
The Khan then leads the warlike host,
The Moslem Monarch's hope and boast,
The bards aloud proclaim his praise;
Along the ramparts peoplo gaze.
But as the Khan for Torva made
Krishnaji Brahman loudly said:—
" Alas ! behold the omen dire,
" It bodes no good to thee, O Sire !
" Sudden the flag on Fattimar,
" Runs down the flag-staff, down and far."
With pride I sing aloud and clear
The glories of my Sovereign dear. 3.
On to Tuljapur thence he past,
And there the proud iconoclast
Broke dread Bhavani's temple down;
But when she showed her awful frown,
Repentant ho her greatness praised
And 'gain to her a temple raised.
When on to Pandhari thence he goes,

Into the Bhivra heedless throws
Divine Vithoba's idol bright;
But when he knew Vithoba's might,
To him a Masjid grand he built.
Thus more and more increased his guilt.
Further the Khan for Pali made,
Khandoba there a wonder played.
For six long miles the god pursued
And though unseen, the foe subdued.
The vanquished Khan then loudly quoth:—
" Fly, fly, my men, the god is wroth.
" I pray, O God, excuse my guilt;
" To thee a tower for lights is built."
Thence to Yamai's Aundh he goes.
The goddess there strange wonders shows
With prayers and songs he then appeased,
The goddess who had seemed displeased.
Against the gods thou tak'st the field,
Beware, O Khan, thy fate is sealed.
A further march the Khan now makes.
Sambhu Mahadev hills he takes.
To Wai last he goes to stay
Where once as Subha he held away.
A friendly letter then he sent;
Krishnaji Brahman with it went
To where Sivaji held his court,
On high Pratapgarh's craggy fort.
Before the chief the letter laid,
The Brahman then his message said:—
" The Khan sends me his servant meek,
" An interview for him to seek.

" Shouldst thou, great Chief, to this agree,
" The Khan will make thee great and free.
With pride I sing aloud and clear
The glories of my Sovereign dear. 4.
To him the Chief:—" I do not know
" What 'tis the Khan gives me and how.
" Bear him this message now of mine,
" My four and forty forts are thine,
" A friend thou seemst, come here, I wait
" Thee to receive as fits thy state."
Curtsies exchanged, the Brahman goes,
From him the Khan the message knows.
Sivaji now his envoy sent
Jivaji Mhaldar bold, who went
And most abruptly in a tone
Suddenly to resentment grown,
Addressed the Khan:—"Bringst thou this force,
" These fine four and ten thousand horse,
" To offer to the goddess dread,
" Whose presence guards Pratapgarh's head,
" As hecatombs, in crowds to bleed,
" Under our swords that vengeance need?"
At this enraged, the Khan proceeds
With all his force, which straight he leads
Down the Radtondi ghaut and lays
A seige for four and ten long days
Round the Pratapgarh hill; but soon
Sivaji heard the news; anon
His statesmen sage and warriors brave
Awhile for consultation grave
In secret council meet, Behold

Shamraj the Peshva wise and bold;
Raghunath the Amat Pradhan ;
Great Mankoji and brave Subhan ;
Sit round their Royal Chief. He says:—
" Abdulla Khan the Moslem prays,
" That he may meet us here anon
" God is great : let all fear begone ;
" Not man but God alone I fear,
" In Him I trust, Him I revere.
" My faithful Peers, then say ye how
" We should in this affair act now. "
Krishnaji said:—It seems to me,
Thou shouldst thy armour put on thee. "
With pride I sing aloud and clear
The glories of my Sovereign dear. 5.
Following this advice sincere,
Soon as the meeting hour drew near,
The Royal Chief in armour dight,
Hung by his side his falchion bright ;
Upon his head a cap he laid,
A cap that was of steel-chain made.
Thereon a princely turban rolled
Of many a gold-embroidered fold
Around his waist a band he tied ;
With tiger's claws his nails supplied.
To cover all from his shoulders down,
He wore a splendid muslin gown ;
In his right sleeve a Bichva hid,
And what was needful else he did.
But best of all his weapons grand
Was gracious God's protecting hand.

Jivaji bore his straight long sword
And walked behind his valiant lord.
Jija his mother dear to see,
Towards her palace then went he.
But him to bless, the Royal Dame
Herself, out in a palkhi came.
With pride I sing aloud and clear
The glories of my Sovereign dear. 6.
Upon her feet august he laid
His head and for her blessings prayed.
" Blessing and love, " she said " to thee ;
" Long mayst thou live and mightier be.
" Resign thyself to God , my son,
" And see that victory is won.
" O my dear mother , " he replied,
" Thy parting words will be my guide.
" I wish I could my father see,
" His counsel take, and wiser be.
" But since he is away, I pray,
" Mother, my love to him convey. "
" Achieve thy end, do what is meet.
" But Sambha's death needs vengeance sweet."
Thus ended she; they parted then ;
And thus the Chief addressed his men:—
" Palkar, to government thou attend ;
" Ye killedars, your forts defend ;
" Umaji, these brave troops command;
" Tuka, go thou, with thy men stand
" At the Radtond ghaut, and lay
" A seige there, thus to guard that way. "
Now preparations grand began,

To royally receive the Khan.
Along the passage up the fort,
At every gate there shone a court,
Each decorated bright and fair,
With furniture superb and rare.
Fine cushions large and small were spread,
All soft with down, with satin red.
The pillars pointed rich and bright,
Full with gems studded pleased the sight.
There coral beads in clusters hung,
Rubies in shining wreaths were strung,
And precious pearls of various size,
In sooth, all dazed the gazer's eyes.
Full blazed the lamps on tripods bright,
Like the sun burning heaven with light.
Like Sarasa birds the fountains played,
And flights up to the ceiling made.
Painted in gold, there sofas stand,
Hung round with curtains rich and grand.
Embroidered chintz and silk were there,
Inlaid with rows of diamonds rare.
The Khan and three men up there go
Victims to fall, all at one blow.

With pride I sing aloud and clear
The glories of my Sovereign dear. 7.

When they the first court reached, they saw
Sivaji's soldiers there with awe.
When to the next court they had gone,
The karkun there snubbed them anon.
Last the appointed court they reach,
Fair dancing girls there, all and each,

With blandishments and charms beguile.
The guests with joy unbounded smile.
Sivaji with Jivaji then
Come to the court. Says he:—" My men,
" My first salute to God is given,
" The God that stands supreme in heaven.
" I next salute my father dear
" Whose love to me is so sincere.
" My third salute Bhavani takes,
" Who loving me her shrine here makes.
" My forth salute next goes to you
" Who guard this fort, its foe subdue.
" And now my last salute will greet,
" The Khan who comes here me to meet."
" Thou peasant boy, O dost thou dare,"
Then says the Khan, " such courts prepare?
" That Monarch even, whose subjects we,
" Such courts did never possess nor see.
" To plough thy field and pay thy rent
" Should be thy aim, thy heart's content."
" Discourteous Khan," Sivaji says,
" Thy tongue no heed to courtsey pays.
" Great is my God; I am his care;
" I will not thee, O Khan, now spare.
" Thou art but a Bhatari boy;
" And to sell sweetmeats thy employ.
" Mine is the land, I am its lord.
" 'Gainst me don't thou dare raise thy sword."
With pride I sing aloud and clear
The glories of my Sovereign dear. 8.
On this the Khan embraced him fast

And into him his dagger past.
But off his armour slipped the blow,
And fast the weapon dropt below.
Sivaji now his Bichva drew,
He hit the Khan and down him threw.
With tiger's claws his bowels tore,
When out their full contents they pour.
But the Khan like a warrior true,
His belt untied, and his sword drew,
And with the force he could command,
He broke Sivaji's steel-head-band.
The blow cut deep, through many a fold
Of the embroidered turban rolled
Around Sivaji's Royal head ;
But stopping there, was spent and dead.
Sivaji struck his two-edged blade,
And right in two the Khan he made.
With pride I sing aloud and clear
The glories of my Sovereign dear. 9.
Then Sayyad Bandu brandished high
His steel ; as it came down and nigh,
Sivaji parried off the blow
Cut him in twain and laid him low:
Comes to the front a Brahman now,
" O Brahman, get away, for how
" This Royal hand can dare thee kill ?
" God wills it not, nor do I will. "
This said, Sivaji threw away,
His sword and still and quiet lay.
But ere the Foe had further gone
Jivaji jumped at him anor ;

A sharp Barhanpur spear he drew,
And sudden at the foe it threw.
Then perched upon his breast, when, Lo!
Through him the spear burst out below.
"Har, Har," the Brahman piteous cried
And ne'er to rise again he died,
But when this fight was going on,
The Khan's remaining friends had gone,
Bearing his corpse in haste away,
Which bleeding in a palkhi lay.
But Kaoji dashed at them his steel,
And made their legs its force to feel.
Down on the ground the beir they flung,
And soon their charge from them was wrung,
Sivaji then cut off the head,
And took it to the goddess dread
That guards Pratapgarh's craggy hill,
Saying, "O goddess, here I kill
'This fattened goat in human shape,
'That tried from me hence to escape.
'Goddess, accept this offering meet,
'And quench thy thirst for vengeance sweet."
With pride I sing aloud and clear
The glories of my Sovereign dear 10.
Twelve booming guns upon the fort,
Proudly the victory report.
Now all at once the troops below
Rush forth, defeat and kill the foe.
Their elephants that banners bore
Turn back with panic fall and roar.
Trimukh and Kakdya drive the foe

From the Radtondi ghaut below.
Tuka leads forth his brilliant force,
And conquers sixty Arab-horse.
Hanmantya musters all the men
And up the fort retakes them then.
The Chief now to Panala goes,
There too his might the Moslem knowns.
All round he fortifies the place,
And sends the foe back with disgrace.
Now at the Royal Mother's call
Gatherd the chiefs and poets all;
These longed to sing and those to hear
The glories of their Sovereign dear.
The best of poets in that throng,
Agrindas sang this wondrous song.
The Sovereign of his own occord,
Most pleased, made him a village lord.
And put around his wrists a pair
Of thick gold bracelets then and there.
With pride I sing aloud and clear
The glories of my Sovereign dear. 11.

# धौमम्हाबळेश्वरवर्णन.

[ पत्रकारांचीं मतें. ]

कै० यशवंतराव आनंदराव उदास बी. ए. कृत धौम-महाबळेश्वरवर्णन–महाबळेश्वराविषयीं स्थानिक, पौराणिक व ऐतिहासिक माहितीचा हा निबंध पुष्कळांस ठाऊक असेल. ह्याची भाषा फार सुंदर असून, स्थलवर्णन हुबेहुब आहे. ऐतिहासिक भागांत अफझुलखानास शिवाजीनें कपटानें मारल्याचा आरोप मुद्देसूद रीतीनें खंडन केला आहे. मराठी भाषेची आस्था बाळगणारांनीं पुस्तक वाचून संग्रह करण्याजोगें खचितच आहे.–**सुधारक**,२८-९-९१.

---

**धौमम्हाबळेश्वरवर्णन.**—कै० यशवंतराव आनंदराव उदास, बी. ए., ह्यांनीं केलेलें, आवृत्ति दुसरी. या पुस्तकांत स्थलवर्णन फार चांगलें असून, महाबळेश्वरचा इतिहासही फार चांगला दिला आहे. पहिल्यानें एक चांगला नकाशा जोडला आहे. अवश्य संग्रहीं असावें.

**बालबोध १–१०–९१.**

---

VERNACULAR PUBLICATIONS.–We have received an "Account of Dhaum—Mahableshwur," written in Marathi by the late Yashwant Anandrao Udas, B. A., and published by the Manager of the Vividha-Jnana-Vistar Magazine. This essay first appeared in the pages of the V J. V. Magazine

some years ago. The book is divided into four parts. The first part contains a description of Mahableshwur itself; and the surrounding places and the charming scenery are vividly depicted. The second part is devoted to a mythological account of the sacred place and the sacred source of the river Krishna which takes its rise from the Mahableshwur hills. The third part treats of the history of Mahableshwur and the places around from 1347 down to the period of Shivaji, the founder of the Maratha empire, who constantly lived on the historical fortress of Partapghur, at the foot of which the famous Bijapur General, Abdoalla Khan, was assassinated. In this part an old ballad on Shivaji is published with copious notes, which minutely describes the events connected with the battle of Partapghur. An English translation of this ballad in verse is given at the end of the work, which was revised by the Hon'ble Mr Justice Telang. The fourth part treats of the advantages, both religious and political, to be derived from a visit to Mahableshwur, and advises every Maratha, if his means permit, to visit the place once in his life. Upon the whole, the book is very useful, and written in a style that is at once vigorous and readable.—*Times of India*, 9-10-91.

---

**श्रीमन्महाबळेश्वरवर्णन.**—पहिल्या आवृत्तीपेक्षां हींत, उदास ह्यांनीं केलेलें शिवाजी महाराजांवरच्या पोवाड्याचें इंग्रजी भाषांतर, रा. रा. हरि महादेव पंडित यांनीं लिहिलेला उपोद्घात, आणि महाबळेश्वरचा एक सुबक

नकाशा ह्या गोष्टी नवीन घातल्या आहेत. पोवाड्याचें भाषांतर चांगलें उतरलें आहे....पुस्तकांत नकाशा सामील केला आहे तो फार चांगला आहे....चारही प्रकरणाचें विवेचन फारच चांगल्या रीतीनें केलेलें असून तें वाचल्यानें मनावर चांगला ठसा उमटतो, आणि त्यावरून ग्रंथकर्त्याची शोधकबुद्धि फारच चांगली प्रगट होते. अशी शोधक बुद्धि आमच्या सुशिक्षित लोकांमध्यें फारच क्वचित् आढळते....पुस्तक एकंदरीनें फारच चांगलें उतरलें आहे, व तें सर्व लोकांनीं अवश्य संग्रहीं ठेवावें.— **इंदुप्रकाश**, २६–१०–९१.

---

**धोममहाबळेश्वरवर्णन**.—हें अत्युपयोगी, मनोरंजक आणि सृष्टिरचनाचित्र डोळ्यांपुढें उभें करणारें पुस्तक द्वितीयावृत्तीनें वि ज्ञा. वि. मासिक पुस्तकाचे मालकांकडून प्रसिद्ध झालें....प्रस्तुत आवृत्तीला महाबळेश्वराचा दिशा व स्थळदर्शक असा एक लहानसा नकाशा जोडला आहे; आणि येणेंप्रमाणें ह्या पुस्तकाची उपयुक्तता जितकी जास्त दाखवितां आली तितकी दाखविण्यास प्रकाशकांनीं हयगय केली नाहीं....प्रस्तुत पुस्तकाची योग्यता लक्ष्यांत आणून, येथील नूतन मराठी विद्यालयांत वरच्या वर्गांतील एका इयत्तेला त्या शाळेच्या सुपरिंटेंडेंटांनीं हें पुस्तक वाचनाकरितां नेमलें आहे, असें समजतें. शाळाखात्यांत ह्या पुस्तकाचा याप्रमाणें उपयोग झाल्यास त्यापासून कर्त्याचे श्रम अधिक सार्थकतेस पावल्यासारखे होणार आहेत. सर्व वाचनप्रिय पुस्तकसंग्रहेच्छूंनीं ह्या

पुस्तकाची एकेक प्रत आपल्या संग्रहास ठेवल्यांवांचून राहूं नये.,—ज्ञानचक्षु २८-१०-९१.

---

**धोमसहाबळेश्वरवर्णन** या शिरोलेखाखालीं थोडे वर्षांपूर्वी विविधज्ञानविस्तार मासिक पुस्तकामध्यें लेख आले होते; व त्यांचें स्वतंत्र पुस्तकही प्रसिद्ध झालें होतें. त्या पुस्तकाची ही पुनरावृत्ति आहे. हल्लींची आवृत्ति सुबक छापली व बांधली असून किमत कमी केली आहे. ....यांत महाबळेश्वराचें स्थलदृष्ट्या व ऐतिहासिक दृष्ट्या समग्र सुरेख वर्णन आहे. भाषासौंदर्याचे संबंधानें हें पुस्तक मराठी भाषेचा एक नमुना आहे. आमच्या भाषेंत ग्रंथ असोत वा नसोत, पण तिच्या अंगीं उत्कृष्ट ग्रंथरचना करितां येण्याजोगी योग्यता आहे, असें या एवढ्या पुस्तकावरूनच सिद्ध होईल. स्थलवर्णनाचा भाग फार मनोरंजक आहे. एकदां स्थल पाहून आलेल्या वाचकास वाचतांना आपण तेथेंच आहों काय, असा भास होईल.... प्रतापगडच्या लढाईत शिवाजी महाराजांनीं अफजुलखानास कपटानें मारलें, असा आरोप कित्येक यवन व इंग्रज इतिहासकारांनीं केला आहे, त्याचें खंडण या पुस्तकांत इंग्रज व एतद्देशीय इतिहासकारांच्या आधारें उत्तम रीतीनें केलें आहे. ....हें पुस्तक महाराष्ट्र भाषा व महाराष्ट्राचा इतिहास यांची आस्था बाळगणारांनीं अवश्य संग्रहीं ठेवावें, अशी आह्मी शिफारस करितों.— **ज्ञानप्रकाश.** ५-११-९१.